म: ग्रं. सं. ठाणे
विषय [illegible]
सं. नं. २८८
RFFBK-0005455



# जवानमर्द बा[illegible]

मो. शि. गोखले

# 'झेनिथ'

# द्राक्षासव

**"झेनिथ द्राक्षासव"**

सर्व लोकांस पसंत पडून त्याचा खप सर्वत्र
जबरदस्त वाढला आहे. म्हणून हल्लीं

**झेनिथ द्राक्षासवाची**

नक्कल सुरू झाली आहे. तरी आमच्या
गिऱ्हाइकांनीं द्राक्षासव घेतेवेळेस

**झेनिथ द्राक्षासवच**

पाहून घ्यावें.

**शरीरामध्यें रक्ताचा**

भरपूर पुरवठा करून शक्ति, उत्साह व जोम
वाढविणारें एकच अस्सल द्राक्षासव आहे.

**झेनिथ केमिकल वर्क्स**

मुंबई नं. २

# कॉमनवेल्थ

## विमा कंपनी लि.

सात वर्षांत पुरें झालेलें काम रु. १०००००००चे वर.

---

हयाती नंतरच्या विम्यावर हजारीं त्रैवार्षिक नफा रु. ४५-०

---

हयातींतील विम्यावर हजारीं त्रैवार्षिक नफा. रु. ३७-८-०.

---

उत्कृष्ट अटींवर एजंट नेमणें आहेत. विशेष माहितीसाठीं भेटा अगर लिहा.

अत्यंत काटकसरीची व्यवस्था व १००% स्वदेशी.

* * *

माफक हप्त्याचे दर.

* * *

मायभाषेंतून पत्रव्यवहार व पॉलिसी मिळण्याची सोय.

* * *

क्लेम्सचा झटपट निकाल.

* * *

वार्षिक हप्त्यांवर २½% सूट वगैरे अनेक वैशिष्ट्यें आहेत.

**अभ्यंकर आणि कंपनी,**

मॅनेजिंग एजंट्स.

बापू गोखल्यांच्या काळीं सुखाचा प्रवास होण्याचें साधन म्हणून तट्टांचा उपयोग होत असे, परंतु हल्लीं तट्टांची जागा मोटारीनें भरून काढली आहे;

तरी

या मोटारी वापरण्याकरितां

**जुन्या मोटारी स्वस्त व नव्या उधारीनें मिळण्याचें ठिकाण**

# गरवारे मोटर्स लिमिटेड

येथें चौकशी करावी.

लहान मुलांना आवडतात

व मानवतात.

**साठे बंधू पुणें**

—यांचीं—

# पूना बिस्किटें

**एजंट—महाजन ब्रदर्स मुंबई नं. ४**

# एम्. ए. जोशी आणि कंपनी,

(शास्त्री बिल्डिंग प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई नं. २)

## दि रविउदय आणि विजय फाईन आर्ट फोटो ऑफसेट वर्क्स, घाटकोपर.

हिंदूंचीं धार्मिक चित्रें, राजा रविवर्मा, एम्. ए. जोशी आणि दुसऱ्या प्रसिद्ध चित्रकारांचे व जगप्रसिद्ध हिंदी कारखानदार नकाशे, पोस्टर्स, पत्रें, पुढाऱ्यांचे फोटो, कॅलेंडर्स, सिगरेट पॅकेटस, व्यापारोपयोगी व गिरण्यांना उपयुक्त अशीं लेबलें यांचीं मॉडर्न ऑफसेट पद्धतीचीं छपाई आणि फोटो लिथो पद्धतीची रंगीत छपाई हीं संपूर्ण अद्यावत् केलीं जातात. त्याचप्रमाणें फ्रेम्स व कॅमेऱ्याची दुरुस्ती हेंहि या कंपनीचें वैशिष्ट्य आहे.

शरीर संपत्ति ही सर्वश्रेष्ठ संपत्ति होय

डोंगरेका बालामृत

बच्चोंके लिये ताकत बढ़ाने वाली



मशहूर दवाई है

डोंगरे यांचें बालामृत आपल्या मुलांस देऊन या संपत्तीचा त्यांना लाभ घेऊं द्या

# जवानमर्द बापू.

लेखक:—

मो. शि. गोखले.

क्र. ५४५५

REFBK-0005455

किंमत १॥ रुपया.

प्रकाशक—

**मो. शि. गोखले.**

हिंदप्रकाशन संस्था,
नावलकर बिल्डिंग,
कांदेवाडी मुंबई, ४.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

मुद्रक—

**एस्. व्ही. परुळेकर,**

मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड,
गिरगांव मुंबई, नं. ४

# आधारभूत ग्रंथांची यादी.

१ ऐतिहासिक लेखसंग्रह (वासुदेवशास्त्री खरे).
२ मराठ्यांच्या लढायांचा इतिहास (शि. म. परांजपे.)
३ बापू गोखले यांचें चरित्र (शं. तु. शाळिग्राम.)
४ गोखले घराण्याचा इतिहास. (गो. वि. आपटे).
५ Wellesly's despatches.
६ Fifteen years in India.
७ Hasting's private journal.
८ बापूंची हस्तलिखित पत्रें. (संग्राहक न. चिं. केळकर).
९ मराठी दप्तर रुमाल १ भाग १ (वि. ल. भावे.)
१० पाच्छापूरकरांची बखर.
११ बापूंसंबंधीं पत्रें (संग्राहक. तम्मणभट्ट उगरगोळकर).
१२ बापूंसंबंधीं पत्रें (संग्राहक. कृ. वा. पुरंदरे) इत्यादी.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| अर्घ्यप्रदान ... ... ... ... | ३ |
| मुजरा ... ... ... ... | ९ |
| स्थलांतर ... ... ... ... | २५ |
| प्रगतीपथावर ... ... ... ... | २९ |
| करवीरकरांचा बंदोवस्त ... ... ... | ४२ |
| दैवाचा घाला ... ... ... ... | ५४ |
| प्रतिज्ञापालन ... ... ... ... | ६७ |
| पटवर्धन प्रकरण ... ... ... ... | ७८ |
| किरकोळ माहिती ... ... ... | ९३ |
| खडकीची लढाई ... ... ... | १०९ |
| पळ नव्हे गनिमी कावा ... ... ... | १३४ |
| मरणांत खरोखर जग जगतें ... ... | १५१ |
| प्रतिनिधींचा पाडाव ... ... ... | १६७ |

# दोन शब्द

गतवर्षी येथील ब्राह्मणसभेमध्यें 'बापू गोखले' पुण्यतिथीनिमित्त माझें भाषण झालें त्यावेळीं मी त्यांच्या चरित्रांतील कांहीं किरकोळ गोष्टी सांगितल्या नाहींत म्हणून एक इसम माझ्यावर रागावले. तसाच राग या चरित्रांत मी कांहीं दंतकथा समाविष्ट केल्या नाहींत म्हणून कांहींजण माझ्यावर काढतील. माझे वरील मित्र तेथें हजर होते म्हणून मी त्यांना सहज उत्तर देऊं शकलों, परंतु या पुस्तकावर रागावणाऱ्या मित्रांना तसें उत्तर प्रत्यक्ष देणें मला शक्य होणार नाहीं म्हणून तें येथेंच नमुद करणें बरें.

मराठेशाहींत अनेक पुरुष जन्माला आले व मेले त्यांपैकीं कित्येक आपापल्या घराण्याचे संस्थापक असतील, परंतु त्यांचीं चरित्रें लिहिलीं गेलीं नाहींत, नव्हे त्यांची आठवणही कोणाला होत नाहीं. ज्यांच्याबद्दल आदरभाव वाटतो अशा व्यक्ति केवळ त्यांच्या खाजगी वर्तनामुळें प्रिय होत नाहींत. त्यांचें समाजांतील वर्तन उज्ज्वल असावें लागतें. त्यामुळें त्यांचे गुण वर्णन करण्याची इच्छा होते आणि म्हणून त्यांच्या सार्वजनिक गोष्टी, ज्यामुळें त्यांना मोठेपणा प्राप्त झाला, त्या पुढें मांडाव्या लागतात. लो. टिळकांना सुपारीचें व्यसन होतें ही गोष्ट कौतुकानें सांगणारा एखादा भाविक भक्त मिळाला म्हणून लो. थोर ठरत नाहींत. त्यांच्या इतर अनेकविध व्यवसायांकडे लक्ष दिलें तर त्यांचें अलौकिकत्व ज्या व्यवसायांत दिसून येतें ते सर्व सार्वजनिक स्वरूपाचे होते म्हणूनच त्यांचा उल्लेख त्यांच्या चरित्रांत तात्यासाहेब केळकरांनीं केला. लो. टिळकांचें त्रिखंडात्मक चरित्र वाचलें तर त्यांच्या व्यक्तिविषयक-संसारविषयक-बाबी तेथें अजिबात आढळत नाहींत याचें कारण हेंच आणि हीच दृष्टी येथें अनुसरली आहे.

इतिहास या शब्दाचा अर्थ जसें घडलें तसें असा पुष्कळ लोक करतात तो मलाही मान्य आहे. परंतु त्याप्रमाणें ते खरा इतिहास लिहित नाहींत अशी माझी तक्रार आहे आणि इतिहास हा विषय रुक्ष बनण्याचें कारण हेंच. ज्या काळांत आपण जिवंतपणा दाखविला तो काळ जिवंत भाषेंतच वर्णन केला पाहिजे. तेथें नुसती शकावली देऊन चालणार नाहीं. जेव्हां आपला पडताकाळ आला असेल तेव्हांची भाषाही त्याप्रसंगाला अनुरूप असली पाहिजे. ' जसें घडलें तसें ' म्हणजे काय याचा अर्थ मी वरील प्रमाणें करतों.

प्रस्तूत पुस्तकांत एक ढोबळ चूक झालेली आहे व ती म्हणजे 'प्रतिनिधी प्रकरण,' हें सर्वांत शेवटीं पडलें आहे. ही चूक करतांनाच मला समजली होती पण त्याला माझा इलाज नव्हता. आयत्यावेळीं त्या प्रकरणाबद्दल एका ठिकाणीं कागदपत्र मिळण्यासारखे आहेत अशी बातमी मला मिळाली व मी तिकडे गेलों. त्याचवेळीं जर बरीच माहिती मिळेल तर प्रकरण शेवटीं घालण्यास हरकत नाहीं असें मीं ठरविलें व छपाईचें काम तसेंच पुढें चालू ठेऊन मी तिकडे निघून गेलों. प्रत्येक प्रकरण स्वयंपूर्ण असल्यामुळेंच एका प्रकरणाचे बाबतींत–तें शेवटीं टाकलें तरी–विशेषसा घोटाळा होणार नाहीं व त्याबद्दल माझे वाचकही मला क्षमा करतील अशी मला खात्री होती. शेवटीं पुष्कळसा पत्रव्यवहार पहावयास मिळाला, परंतु बापूंच्या चरित्राच्या दृष्टीनें त्याचा काडीइतकाही फायदा होऊं शकला नाहीं. नाहीं म्हणावयास गेल्या महिन्यांत रियासतकार सरदेसायांनीं ' ज्योत्स्ने 'च्या अंकांत बापूंच्या बद्दल केलेल्या एक दोन विपर्यस्त विधानांचा समाचार घेण्याची संधी मिळाली. हे आक्षेप रियासतकारांसारखा विचारी पुरुष घेणार नाहीं अशी मला खात्री वाटत होती. परंतु सर्वच गोष्टी मनुष्याच्या इच्छेप्रमाणें कोठें घडतात ? बापूंवरील आक्षेपांचें निराकरण करण्याचे दृष्टीनें हें प्रकरण ' बाईटांतून चांगलें निघतें ' म्हणतात तसेंच निघालें.

माझे मित्र श्री. वळंजू यांनीं माझ्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली

त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. एखाद्या नाट्यछटेला एखाद्या वड्या लेखकाची प्रस्तावना घेऊन त्याचें विडंबन करण्यापेक्षां आपल्या माहितीच्या व· तोलाच्या सहकारी मित्राची प्रस्तावना घेणें मला ज्यास्त इष्ट वाटतें. वाट चुकणें हा तरुणांचा स्वभावधर्मच आहे. मोठीं माणसें मात्र त्यांच्यावर मुद्दाम वाट सोडल्याचा आरोप करतात. देशभक्ताचें चरित्र विशिष्ट भाषेंत लिहिलें म्हणजे 'यानें वाट सोडली हा केव्हां खड्ड्यांत पडेल याचा नेम नाहीं' असें जुनी माणसें म्हणूं लागतात. त्यावेळीं आपल्या सहकाऱ्यांची आठवण होते. असा सहकारीच आपणांला खड्ड्यांतून काढून आपणांमध्यें नवजीवन उत्पन्न करतो. असा सहकारी होण्याला श्री. वळंजू यांनीं संमती दिली यांतच त्यांचा थोरपणा आहे.

प्रस्तूत पुस्तक लिहितांना मला माझ्या ज्या मित्रांची विशेष मदत झाली आहे त्यापैकीं श्री. का. के. जोशी व श्री. मु. वि. चितळे यांचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे.

हें पुस्तक संपूर्ण नाहीं याची जाणीव मला आहे तें जेव्हां पूर्ण होईल तो सुदिन. परंतु तोंपर्यंत तरी आहे तें प्रिय वाचकांच्या पुढें ठेवीत आहें. हें चरित्र लिहीत असतांना मला जपून पाऊल टाकावें लागत आहे, वाङ्मय प्रांतांत नवशिका म्हणून मला होतकरू या सदरांत घालून माझे अपराध वाचकांनीं पोटांत घालावे अशी याचना करण्याचा अथवा त्यांच्या टीकेला आधींच बुजून भीत भीत पाऊल पुढें टाकण्याचा माझा स्वभाव नाहीं. 'Survival of the fittest' हेंच तत्व मला मान्य आहे. परंतु असें असलें तरी हल्लींच्या प्रेसॲक्टामुळें अंतरींच्या भावना बोलून दाखवितां येत नाहींत ही गोष्ट खरी आणि त्यामुळेंच हें पुस्तक लिहीतांना मला जपावें लागत आहे.

या पुस्तकाच्या छपाईला सुमारें २५० रुपयांची मदत ज्यांचेकडून मिळाली त्या सर्वांचे एकत्र आभार येथें मानले पाहिजेत. त्यांची मदत नसती तर हें पुस्तक म्हणजे एक विरलेलें स्वप्नच ठरलें असतें.

त्याशिवाय भारत इतिहाससंशोधक मंडळाचे श्री. दत्तोपंत आपटे, शंकरराव जोशी ( वांईकर ), श्री. ग. ह. खरे, श्री. य. न. केळकर श्री. कृ. वा. पुरंदरे, श्री. यशवंतराव खरे यांनीं ज्या निरनिराळ्या सूचना केल्या, कागदपत्र दाखविले व हरतऱ्हेनें उत्तेजन दिलें त्याबद्दल त्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें. त्यांचें प्रेम माझ्यावर असेंच राहील अशी मला खात्री आहे.

छापखान्याचे मॅनेजर पैसे घेतात व मजकूर छापतात त्यांत त्यांचे कसले आभार मानावयाचे असें मला पूर्वी वाटत होतें, परंतु प्रत्यक्ष अनुभव उलट झाला व माझी गैरसमजूत दूर झाली. हा चांगला अनुभव मला आणून दिल्याबद्दल व माझ्याबद्दल घेतलेल्या त्रासाबद्दल मी मुंबईवैभव प्रेसचे मॅनेजर श्री. सिद्धये यांचे आभार मानतों. त्याचप्रमाणें उठावदार कव्हर करून दिल्याबद्दल माझे कॉलेजबंधू व प्रख्यात चित्रकार श्री. नी. म. केळकर यांचा मी अत्यंत ऋणी आहें. आणखी कितीतरी मित्रांचे आभार मानावयाचे आहेत, परंतु 'आमचा नामनिर्देश पुस्तकांत न कराल तर आपले आभार होतील' असें त्यांचें म्हणणें पडल्यामुळें मी त्यांचा नामनिर्देश न करतां त्यांचे आभार मानतों.

दत्तजयंती<br>ता. २८-११-३६

**मो. शि. गोखले.**

माझ्या निर्लोभी मित्रास

व

राष्ट्रमातेकरितां झगडणाऱ्या

तेजस्वी व त्यागी सैनिकास

—श्री. दा. कृ. गद्रे यांस—

ही माझी दुसरी कृती

सप्रेम अर्पण.

# अर्घ्यप्रदान

अनोळखी प्रांतांत वावरणाऱ्याला त्या प्रांताची चांगली माहिती असलेला असा मार्गदर्शक बरोबर घ्यावा लागतो. तद्वतच वाङ्मय प्रांतांत शिरूं पहाणारे नवशिके लेखक योग्य मार्ग दाखविण्यासाठीं कुणातरी नामवन्त साहित्यिकाची योजना करतात. आजवरचा हा असा शिरस्ता असल्यानें माझे मित्र श्री. गोखले यांनीं त्यांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यासाठीं मला आज्ञा केली त्यावेळीं तर मी आश्चर्यानें थंकच झालों. कारण, अनोळखी प्रांतांत एका वाटसरानें आपल्यासारख्याच दुसऱ्या नवीन वाटसरूला आपला वाटाड्या होण्यास सांगण्यांतलाच हा प्रकार! श्री. गोखले यांचें वाङ्मयक्षेत्रांतलें हें पहिलेंच पाऊल आहे आणि ह्या क्षेत्रांत मी टाकलेलें पहिलें पाऊल तर अजून स्थिर व्हावयाचें आहे. अशा स्थितींत माझ्या या सोबतीचा त्यांना कितीसा उपयोग होणार? परंतु कित्येक वेळां भावना व्यवहारबुद्धीवर विजय मिळवितांना दिसते आणि त्याचाच परिणाम मला प्रस्तावनाकार करण्याच्या मुळाशीं असावा. कुणाही मिरासदार प्रस्तावना लेखकाची विनवणी करून त्यांनीं प्रस्तावना मिळवली असती तर सर्वच दृष्टीनें त्यांचा फायदा झाला असता हें सत्य पूर्णपणें माहित असूनही माझ्या प्रस्तावनेसाठीं त्यांनीं प्रेमाचा हट्ट धरला, कारण धंदेवाईक भाडोत्री वाटाड्यानें जरी अचूक वाट दाखविली, तरी सुहृदाच्या संगतींत लाभणारं सौख्य त्याच्या सहवासांत कसं मिळणार? दोघेही अननुभवी असल्यानें वाट चुकून जरी आपण भलतीकडेच गेलों तरी एकमेकांच्या संगतींत लाभणारं सौख्य तरी मनमुराद अनुभवायला मिळेल असेंच त्यांच्या भावपूर्ण मनाला वाटलें असावें.

अर्थात् मार्गदर्शक या नात्यानं माझा त्यांना कांहींच उपयोग नाहीं हें ठरलेंच नी त्या गोष्टीची ते अपेक्षाही करीत नाहींत. आतां राहातां राहिलेलें माझें कार्य म्हणजे माझ्या सहचराच्या गुणावगुणांची पथिकांना ओळख करून देण्याचें. विशेषतः गुणांचीच माझ्या हातून ओळख होणार, कारण गुणदोषांचें विवेचन करून ते पुढें मांडण्याचा त्रयस्थाला शोभेलसा समतोलपणा माझ्याकडून कोणीच अपेक्षिणार नाहीं. तें कार्य टीकाकारांचें आहे. आणि सहृदय नी विवेचक बुद्धीचे असे टीकाकार महाराष्ट्रांत तुरळक असले तरी केवळ दोषदर्शन म्हणजेच टीका असा समज करून घेतलेल्या टीकाकारांची तरी कांहीं उणीव नाहीं. अशांपैकींच कुणी टीकाकार पुढें सरसावला तरी प्रस्तुत पुस्तकाची मी न दाखविलेली बाजू सहज दिसून येईल.

आधींच महाराष्ट्रांत चरित्रवाङ्मयाला मागणी कमी त्यातून कालाच्या प्रवाहानें ज्यांच्या स्मृती वाहून गेल्या आहेत अशांचीं चरित्रें कोण वाचतो ? शिवाजी महाराजांसारख्या थोर राष्ट्रीय विभूतींच्या चरित्राविषयींचें देखील ज्यांचें ज्ञान बालपणीं शाळेंत जुलुमानें वाचलेल्या इतिहासाच्या छोट्या पुस्तकापलिकडे गेलें नाहीं अशीं कितीतरी माणसें आजच्या महाराष्ट्रांत आढळतील राष्ट्रवीरांच्या चरित्रांविषयीं काय अनास्था ही ! अशानें कशी होईल राष्ट्रांतल्या वीर वृत्तीची जोपासना ! राम आर्य होता कीं अनार्य होता अशा निरर्थक विषयावर वादविवाद घालणारे आम्हीं, शूर पूर्वजांच्या स्मृति हृत्पटलावरून पुसून त्याठिकाणीं मार्क्स नी लेनीनचे ग्रंथ कवटाळून धरणारे आम्हीं, शेजाऱ्याशीं साधी माणुसकीही दाखवितां येत नसतांना व्यासपीठावर चढून विश्वबंधुत्वाच्या लांबलांब गप्पा ठोकणारे आम्हीं, आमचें स्वत्व विसरल्यामुळें भाविकालांत नादान नी जगण्याला नालायक ठरलों तर नवल काय ? व्यर्थ आम्हीं आपल्या पूर्वजांच्या देशांत जन्म घेतला. आमच्या उत्पत्तीसाठीं खर्च झालेल्या त्यांच्या रक्तापेक्षां धारातीर्थी सांडलेल्या त्यांच्या रक्तानेंच त्यांना जास्त नांव मिळवून दिलें. त्यांची स्मृति अजरामर केली. त्यांच्या

कुळांत, त्यांच्या जातींत, त्यांच्या राष्ट्रांत जन्मून आम्ही काय केलें तर देशासाठीं मोठ्या शौर्यानें लढतां लढतां ज्यांनीं रणांगणावर देह ठेविला त्या वीरश्रेष्ठांची स्मृति आम्ही अवघ्या शतकांत विसरलों. अशा विसरलेल्या वीरांपैकींच सरदार बापू गोखले हे होत.

आम्हाला पडलेला अशातऱ्हेचा विसर आमच्या आजच्या वृत्तींचा विचार केल्यास मुळींच अस्वाभाविक नाहीं. आमच्या पारतंत्र्याचा आम्हांला विसर पडलेला आहे. आमच्या तरुणपिढींत विश्वबंधुत्वाचं नी समाजसत्तावादाचं वारं शिरून वारा प्यालेल्या वासराप्रमाणें त्यांची स्थिति झाली आहे. जगांतलीं इतर स्वतंत्र राष्ट्रें जिथें आम्हाला समान लेखायला तयार नाहींत, आमच्या आवडी निवडीप्रमाणें वागण्या इतकीही सत्ता जिथं आमच्या हातीं नाहीं त्याठिकाणीं विश्वबंधुत्वाच्या नी समाजसत्तावादाच्या गप्पा मारणें खुळेपणाचें नाहीं का? आधीं अंगीं नसलेली लायकी आणि हातीं नसलेली सत्ता मिळवायला पाहिजे तरच जेत्यांना शोभतील अशा वरील प्रकारच्या गोष्टी बोलणें योग्य दिसेल. राष्ट्रीय वृत्तीच्या पोषणेसाठीं लो. टिळकांनीं सुरू केलेल्या गणेशोत्सवाचें आजचें करमणूकप्रधान स्वरूप पाहिलं. ध्येय पूजेऐवजीं आम्हीं चालविलेली व्यक्तिपूजा पाहिली कीं मन निराशेनें बावरून जातें. स्वातंत्र्य संपादनार्थ आवश्यक असलेली तडफ नी वीरवृत्ती आमच्या अंगीं कधीं नी कशानें बाणणार असा प्रश्न मनांत उभा राहिल्याविना रहात नाहीं. परंतु मध्येंच असें तुरळक प्रसिद्ध होणारें चरित्र पाहिलें कीं आशा वृक्षाला नवीन पालवी फुटते. अशा राष्ट्रवीरांच्या चरित्र वाचनानें नी चिंतनानेंच आमचें ओसरलेलें ओज आम्हाला पुन्हा लाभणार आहे. आमची आम्हाला पूर्ण ओळख पटणार आहे.

ज्या तळमळीनें नी तन्मयतेनें सदर चरित्र श्री. गोखले यांनीं रंगविलें आहे ती तन्मयता नी तळमळ ह्या चरित्र वाचनानें आमच्या युवकवर्गांत अंशतः उतरली तरी राष्ट्राचें एक मोठें काम झालें असें मी मानीन. चरित्र नायकाशीं तें इतकें समरस झालेलें आहे कीं प्रत्यक्ष चरित्र नायकच

त्यांच्या तोंडून आपली कहाणी ऐकवितो आहे कीं काय असा भास होतो. आजमितीस उपलब्ध असलेले सारे खरेखोटे ऐतिहासिक पुरावे त्यांनीं उपयोगिले आहेतच पण ऐतिहासिक माहितीची नुसती गुंफण करूनच ते थांबलेले नाहींत. त्यांनीं त्यांत एक प्रकारचें चैतन्य ओतलेलें आहे. बॅ. सावरकरांचा 'जोसेफमॅझिनी' वाचण्याचें भाग्य ज्यांना लाभलें असेल त्यांना प्रस्तुत चरित्रांत जरी तो आवेश आढळला नाहीं तरी नाक मुरडण्याचें कांहींच कारण नाहीं. आकाशांत स्वैर भरारी मारणाऱ्या गरुडाबरोबर नुकत्याच उडायला शिकलेल्या त्याच्या पिलाची तुलना करणें कितिसें न्यायाचें होईल? त्यांचीं लहान लहान सुटसुटीत वाक्यें त्यांच्या शैलीची सहजता नी अंतरींची तळमळ उत्तम रीतीनें व्यक्त करतातच परंतु वाचकांचें मन हेलावल्यावांचूनही सोडीत नाहींत. कित्येक प्रसंगीं तर लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रांची आठवण होते. त्या वीरश्रेष्ठाला त्यांनीं केलेल्या मुजऱ्यांत आजच्या युवकांच्या जिवंत हृदयाचं प्रतिबिंब पडलेलें कुणाला आढळल्यास नवल नाहीं. हातपाय चारी बाजूंनीं आवळलेले असले, बोळा कोंबून तोंड बंद केलेले असलें तरी जिवंत हृदयांतली खळबळ चेहऱ्यावर मूकस्वरूपांत कां होईना व्यक्त होतेच. अशाच तऱ्हेनें आमच्या दाबून टाकलेल्या आशा आकांक्षा आज या प्रकारच्या पुस्तकांच्या रूपानें पूर्णपणें कायदेशीर स्वरूपांत आम्हाला व्यक्त कराव्या लागत आहेत.

"धोंडोपंतांनीं आपल्या पराक्रमाची शर्थ केली व शत्रूची फळी फोडून आपला घोडा बेफाम सोडला. आपल्या शौर्यानें त्यांनीं शत्रूला तोंडांत बोट घालावयास लाविलें होतें; व भीषण भवितव्यतेवरही मात केली होती. पण आपल्यावर कुरघोडी झालेली दैवास पसंत पडली नाहीं. बेफाम सुटलेला घोडा रस्त्यांतील झाडाच्या फांदीला अडखळला व धोंडोपंतांचा तोल जाऊन ते जमिनीवर आदळले तरीसुद्धां त्यांनीं बिलकुल कच खाल्ली नाहीं. जखमा झाल्या आहेत, अंगांतून रक्ताचे पाटच्या पाट ओघळत आहेत, प्रकृति क्षणाक्षणाला खालावत आहे असें दिसतांनासुद्धां त्यांनीं आपला प्रयत्न


सोडला नाहीं व ते शत्रूंशीं सारखे झुंजतच राहिले. " हा आणखी याच्या सारखे दुसरे कित्येक उतारे या पुस्तकांतून काढून दाखवितां येतील कीं ज्यांत वर्ण्यविषयांशीं चरित्रकाराची एकतानता आढळून येईल. त्यावरोबरच त्यांत एकप्रकारचा आवेशही आहे आणि अशाच तऱ्हेचा आवेश लिखाणाला जिवन्तपणा आणतो. " पण असें झालें नसतें तर दैवाचें मोठेंपण मनुष्याला कधींच पटलें नसतें. आपलें मोठेपण लोकांच्या मनावर ठसविण्याकरतां या क्रूर व स्वार्थी दैवानें धोंडोपंतासारख्या कैक रत्नांचा चुराडा करून टाकला आहे. " अशा तऱ्हेचीं सुभाषित वजा नी आंतरिक तळमळ व्यक्त करणारीं वाक्यें प्रस्तुत चरित्रांत इतस्ततः विखुरलेलीं आढळून येतील. पृष्ठ १११ वरून सुरू होऊन ११४ पानांवर संपूर्ण होणारे एकदोन परिच्छेद त्यांच्या लेखनहेतूची नी शैलीची योग्य साक्ष देतील. १११ पानांवरील मजकुरांत महात्मा आगरकरांचा सडेतोडपणा नी ११३ पानांवरील स्तंभकांत कै. शि. म. परांजप्यांची उपहासगर्भशैली भासमान झाल्यावांचून रहात नाहीं. ' वापूंच्या धडधडलेल्या चितेवर स्वतःच्या स्वार्थाच्या विड्या ज्याला ज्याला शक्य वाटलें त्यानें त्यानें पेटवल्या ' हें एकच वाक्य वापू गोखल्यांचा उदात्त भाव नी फितुरांची नीच मनोवृत्ति एकसमयावच्छेदेंकरून दर्शविण्यास समर्थ आहे.

दहाव्या प्रकरणांत चरित्रनायकाचा अंत झाल्यानंतर, लेखकानें अगदीं हळुवार हातानें बापूंचा जीवनहेतू विशद करून सांगितला आहे. बापूंच्या एकंदर चरित्राचें सार, त्यांची स्वातंत्र्य लालसा आणि तीमागें असलेलें त्यांचें उज्ज्वल देशप्रेम ती प्रामाणिक स्वामिनिष्ठा हे सर्व गुण तो स्तंभक वाचल्यावर आपल्या चित्तचक्षूंसमोर विशेषत्वानें दिसूं लागतात बापूंच्या मरणाचें वृत्त वाचून वाटलेल्या खेदाचें विषादांत रूपांतर होतें नी आपण कांहीं तरी करायला पाहिजे अशी गोष्ट करीत नाहीं अशी मनाला हुरहूर लागून रहाते. परिणामकारकतेच्या दृष्टीनें १६१ ते १६३ पानांवरील हें लिखाण सरस उतरलें आहे यांत शंका नाहीं.

प्रस्तुत चरित्र समग्र वाचल्यावर मला एका सृष्टिचमत्काराशीं आपल्या देशाच्या परिस्थितीचं साम्य भासलें. दिवसाचा अंत झाला कीं आकाशांत पूर्वपश्चिम भागीं संध्येची लाली पसरते. नंतर हळुहळू काळोखाचं साम्राज्य पसरूं लागतं आणि उषःकालीं पुन्हा दिग्प्रान्त लालरंगानें रंगतो. त्यानंतरच सूर्यदर्शन होतं. पेशवाईच्या अंतकाळीं आपल्या शूरपूर्वजांनीं स्वातंत्र्य रक्षणाचे आटोकाट प्रयत्न करून आपल्या नी शत्रूच्या रक्तानें महाराष्ट्राच्या जीवन क्षितिजावर संध्येची लाली पसरली. त्यानंतर या दुर्दैवी देशांत अवसेचा अंधार पसरला आहे. सूर्याच्या आगमनापूर्वी उषादर्शन होणं, सारं क्षितीज लाल रंगानें न्हाणं क्रमप्राप्त आहे. उषःकालाचा हा सुप्रसंग आमच्या भाळीं कधीं लिहीलेला आहे देव जाणे. तोंवर मावळलेल्या सूर्याला भक्तिभावानें नी कृतज्ञतेनें अर्घ्यप्रदान करणं हेंच आम्हा शांततेचें व्रत घेतलेल्या ऋषींचं कर्तव्य आहे. आमच्या ओंजळींतल्या अर्घ्यजलावर उषःकालची छटा उमटेल तेव्हां उमटेल !

असो. प्रस्तावनेची आणखी लांबड लावण्यांत काय अर्थ ! काळोखांत विजा चमकल्या तरी मार्ग थोडाच दिसणार ? क्वचित् वीज पडल्यानें पथिकाचा अपमृत्यु मात्र व्हायचा. भारावलेल्या मनानें चरित्रलेखकाच्या स्वातंत्र्य वीराच्या पुण्यस्मृतीवर ही अर्घ्यांजली ओतून मला बाजूला सरलेंच पाहिजे. परंतु जाताजातां अशी सुवर्णसंधि प्राप्त करून दिल्याबद्दल चरित्र लेखकाकडे माझी कृतज्ञ नी स्नेहाळ नजर वळल्याविना कशी राहील ?

रा. शि. वळंजू.



४४५५

# मुनरो.

सन १८१८! महाराष्ट्राचा व हिंदुस्थानच्या आशेचा शेवटचा तंतू याच वर्षी तुटला. स्वातंत्र्याकरितां तडफडणाऱ्या राष्ट्राची शेवटची धडपड याच वर्षी संपली. स्वतंत्रतेनें याच वर्षी हिंदुस्थानकडे कायमची–निदान पुष्कळ वर्षांकरितां तरी–पाठ फिरविली. हिंदुस्थानचे भाग्याचे दिवस संपले. सुवर्ण-भूमी म्हणून गाजलेला हा देश लुटण्याकरितां आलेल्या लोकांनीं आपलें इष्ट ध्येय साध्य केलें. शतक दीड शतक चालविलेल्या खटपटींना अशा तऱ्हेचें अकल्पित यश मिळालेलें पाहून त्यांना आपण कृतकृत्य झालों असें वाटत असेल, पण आम्हां हिंदवासियांना या सालची आठवण झाली म्हणजे ज्या यातना होतात त्यांचें वर्णन सुद्धां करणें अशक्य. महाराष्ट्रीयांची अवस्था तर याहून बिकट. इंग्रजींत अशी म्हण आहे कीं, ‘अजिबात नसलेलें बरें पण मिळवून घालविलेलें नको’ आणि तेंच खरें असें वाटूं लागतें. गतस्वातंत्र्याच्या, गतवैभवाच्या स्मृती मनाला सारखे दुःखाचे चटके देत असतात. तेव्हांचा तो गौरवानें फडकत असलेला भगवा झेंडा आठवला आणि आज चालत असलेली त्याची विटंबना पाहिली म्हणजे मनांत सारखें भडभडून येतें. ‘नवलाख झुले लष्कर तळपे भाला वरच्यावर’ असें एखाद्या शाहीरानें म्हटलें म्हणजे ते शब्द हृदयाला जाऊन भिडतात आणि त्यांचा ओरखडा लागून त्यांतून रक्ताच्या धारा वाहूं लागतात. शिवाजीनें केलेल्या पराक्रमाचीं वर्णनें वाचलीं म्हणजे हृदय सुन्न होतें. कशाला त्यानें आपलें रक्त आटवलें असे निराशेचे उद्गार आंतून कोठून तरी निघूं पहातात. काळाच्या ओघानें भग्न झालेल्या किल्ल्यांकडे नजर वळतांच उघड्या डोळ्यांनीं जीव जात नाहीं म्हणून त्यांवरून आपला कोणीं कडेलोट करील तर बरें अशी इच्छा बळावते. भाऊसाहेबांनीं दिल्लीचें तक्त फोडलेलें ऐकतांच होणारा आनंद, आणि तेंच

तक्त परकीयांच्या ताब्यांत आहे याची जाणीव होतांच वाटणारा विषाद, यांची तुलना केल्यास आनंद पारड्याच्या पासंगाला तरी पुरेल कीं नाहीं याची शंका वाटते. पानपत सोनपत गर्जवणाऱ्या मराठ्यांच्या वंशजांच्या तोंडचें संगीत आपणांस निराशेचें भेसूर सूर ऐकवतें. आपल्या सभोंवार पिकलेलीं शेतें दिसतांच पेशव्यांच्या चौथाई, सरदेशमुखीची आठवण होते आणि सारा भरण्याची वेळ येतांच धान्याच्या मोजून दिलेल्या प्रत्येक दाण्यागणिक हृदयाचे लचकेच कोणींतरी तोडीत आहे असें वाटतें. मनाला शांती लाभावी म्हणून रामदासांचा दासबोध हातीं घेतला तर त्यांतील

**धर्मासाठीं मरावें । मरोनि अवघ्यांसि मारावें ॥**
**मारितां मारितां घ्यावें । राज्य आपुलें ॥**

या ओळी डोळ्यापुढें लख्कन तळपून जातात; आणि मनाची अशांती अधिकच वाढते.

अशा भावनांनीं मनामध्यें चाललेल्या उद्वेगाचा पूर ओसरला म्हणजे आपल्या पूर्वजांनीं केलेल्या पराक्रमाची आठवण होते आणि कविश्रेष्ठ विनायकाच्या

**पूर्व दिव्य ज्यांचें त्याला, रम्य भाविकाळ ।**

या ओळी नजरेसमोर नाचतात. आज जरी आम्ही निराशेच्या काळोखांत वाट चांचपडून पहात असलों, तरी पूर्वीं एकदां मार्ग आक्रमिला असल्याकारणानें त्याची अवशेष असलेली स्मृती आम्हांस आपल्या इच्छित स्थानाकडे लवकर नेऊं शकेल अशा आशेचे अंधुक किरण मनामध्यें डोकावतात; व म्हणून आपण पूर्वीं मार्ग कसा आक्रमिला होता याची उजळणी करावीशी वाटते. त्यांतील कित्येक प्रसंगाचें चित्र डोळ्यापुढें येतांच तें मनाला संतोषदायी होतें व त्याकडे सारखें विहंगम दृष्टीनें पहात रहावेसें वाटतें. अशा आमच्या गतेतिहासाच्या सुरम्य चित्रांपैकीं **नरवीर बापू गोखले** यांचा पराक्रम हें एक चित्र होय.

पेशवाईचीं सूत्रें वास्तवीक रीतिनें दुसऱ्या बाजीरावाच्या प्रधानपदावर आरूढ होण्याचे वेळींच जळून खाक व्हावयाचीं. नानाफडणिसांच्या मृत्यू-बरोबर हिंदुस्थानांतील मुत्सद्दीपण लयाला गेलें असे एल्फिन्स्टननें उद्गार काढले; परंतु, त्यामुळें मराठी राज्य कायमचें नष्ट झालें असें मात्र त्याला म्हणतां आलें नाहीं. राज्य जावयाला मुत्सद्देगिरीबरोबरच शौर्याचाही अभाव पाहिजे असतो. नाना फडणिसांच्या मृत्यूनें मुत्सद्देगिरी लयाला गेली असेल, पण शौर्य मात्र दौलतराव शिंदे, यशवंतराव होळकर व बापूसाहेब गोखले, यांच्या रूपानें साक्षात् जिवंत होतें; आणि म्हणूनच बापू-साहेब गोखले यांचा अंत होईपर्यंत, आपण कृतकृत्य झालों असें त्यांना म्हणतां आलें नाहीं. अष्टीला बापूंचा अंत झाल्यावर मात्र सन १८१७ ते १८१९ मधील लढाया या पुस्तकांचा कर्ता ब्लेकर यानें 'The great object of bringing enemie's horse into action was accomplished, and with Goklás fall the most important procurable result was obtained' असे उद्गार काढले.

मराठेशाहीच्या या शेवटच्या वीराचें चरित्र खरोखरच असामान्य गुणांनीं भरलें आहे. हा शूर पुरुष सन १७७८ मध्यें जन्मास येण्याऐवजीं जर अगोदर १०–५ वर्षें जन्मास येता, तर पेशवाईचा अंत इतक्या लवकर झाला नसता खास. लहानपणीं त्यांनीं ज्यांच्या ज्यांच्या हाताखालीं काम केलें त्यांच्या त्यांच्या गुणांचें अनुकरण करण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. केवळ २–३ वर्षे वेलस्लीच्या बरोबर राहिल्यावर त्यांनीं त्यांच्या गुणदोषांचें पूर्णपणें निरिक्षण करून त्याची लढण्याची पद्धती शत्रूवर उलटविली. 'Fifteen years in India' या पुस्तकाच्या कर्त्यानें हिंदु-स्थानांतील अनेक लढाया पाहिल्या होत्या व अष्टीचा प्रसंगही त्याच्या नजरेसमोरच घडला होता. त्यानें बापूंबद्दल काढलेले, 'And he was an experienced and able general well acquainted with our tactics, for he had fought, as an auxillery under Sir Arthur Wellesly, and seen some of the most

dashing battles in India' हे उद्गार लक्षांत घेतले म्हणजे वरील म्हणण्याची सत्यता पटेल. नाना फडणिसांचा सहवास त्यांना अल्पकाळ लाभला आणि तोही वयाच्या वीस बाविसाव्या वर्षी. या वयांत त्यांना विचाराचा पोक्तपणा आला नव्हता. अल्लडपणें नाचण्याबागडण्याचे दिवस ते. रुक्ष राजकारणांत किंवा असल्याच इतर विषयांत भाग घेण्याचे खास नव्हेत. शिवाय ते नानांच्या उतारवयांत काम करीत असले तरी नानांचे निकटवर्ती नव्हते. नाना पुण्यांत तर हे कर्नाटकांत. अशा परिस्थितींत त्यांना नानांपासून मुत्सद्देगिरीचे धडे घेतां आले नाहींत. तरीसुद्धां दुरून ऐकून व नानांच्या चरित्राचें सूक्ष्म अवलोकन करून त्यांनीं मराठ्यांच्या बारभाईची पुनर्घटना करण्याचा चंग बांधला; त्यांत त्यांना यश आलें नाहीं ही गोष्ट वेगळी. परंतु त्यांनीं आपल्याकडून जोराचे प्रयत्न चालविले होते यांत संशय नाहीं. यशापयशाच्या बाबतींत 'Fifteen years in India' या पुस्तकाचा कर्ता म्हणतो.

"Success is not always criterion of able conduct. To judge properly of any enterprise it is necessary to consider, not only what it effected but also it did not effect; and morever to look at what might have taken place if possible events had ensued according to the calculation of one of the contending parties."

त्रिंबकजी डेंगळ्याला गंगाधरशास्त्री पटवर्धनाचा खून केल्याच्या खोट्या आरोपावरून आपल्या ताब्यांत देण्याचा इंग्रजांनीं नेट लावला असतां, त्यास इंग्रजांच्या ताब्यांत देऊं नका असा सल्ला त्यांनीं बाजीरावाला बेधडक दिला. या नाहीं त्या कारणानें बाजीरावास उत्तेजन देणाऱ्या लोकांस कैदेंत ठेवावयास लावावयाचें हा इंग्रजांचा डाव होता. हा प्रघात एकदां पडला म्हणजे आज त्रिंबकजी उद्यां दुसरा, परवां तिसरा, असे आमच्या स्वाधीन करा असें इंग्रजांनीं खास म्हटलें असते; व त्यास हरीहरी म्हणावयास लाऊन शेवटीं ब्रह्मावर्ताचीच वाट दाखविली असती. या गोष्टी टाळावयाच्या असल्या

तर मनाचा खंबीर निश्चय करणें आवश्यक होतें, व तो त्यांनीं बाजीरावा-सारख्या चंचल बुद्धीच्या माणसाकडून करवला यांत त्यांचा योजकपणा दिसून येतो.

सातारच्या छत्रपतींना आपल्या ताब्यांत ठेवण्याचें कारस्थान त्यांचेंच. प्रतापसिंह महाराजांजवळ मुत्सद्यांची खाण नव्हती; पण सैन्याची वाण मात्र होती. त्यांना इंग्रजांविरुद्ध प्रत्यक्ष लढाईच्या दृष्टीनें आपल्या ताब्यांत घेण्या-पासून कांहींही फायदा नव्हता. परंतु बापूंनीं सामान्य जनता भावनावश असते हें ओळखलें व म्हणूनच त्यांचें खटलें लढाईच्या वेळीं बरोबर बाळगलें. प्रतापसिंह महाराजांजवळ सैन्य नव्हतें ही गोष्ट खरी, परंतु ते परमपूज्य श्रीशिवरायांचे वंशज या नात्यानें सामान्य जनतेमध्यें त्यांच्याबद्दल आदरभाव अतिशय वसत होता. त्यांच्या नांवानें निघालेल्या जाहीरनाम्यांना लोक मान तुकवणार हें उघड दिसत होतें. पेशवाईच्या महालावर निखारे ठेऊन तो भस्मसात् करावयाचा, व आपली तुंबडी भरावयाची हें उच्च ध्येय महाराजांनीं आपल्यापुढें ठेविलें होतें. यामुळें इंग्रजांच्या हातांत महाराज सांपडल्यास ते त्यांच्याकडून हवेतसे जाहीरनामे काढवून घेतील व त्यामुळें आपल्या मानेभोंवतालचे पारतंत्र्याचे पाश अधिकच आंवळले जातील ही जाणीव ठेऊन त्यांनीं महाराजांना कैदेंत ठेवलें.

जें धोरण महाराजांना कैदेंत टाकण्यांत, तेंच बाजीरावाला पलायन करा अशी विनंति करण्यांत. बाजीराव भित्रा नव्हता व पळपुटा तर नव्हताच नव्हता. तो पळाला असें जरी गृहीत धरलें, तरी तो बापूंच्या विनंतीवरून. खडकीची लढाई चालू असतां बापूंनीं, '**तुम्ही सासवडास निघून जा' असा पेशव्यांस लागोपाठ चौदा वेळां निरोप पाठवला. परंतु तो त्यांनें मानला नाहीं. 'बरें वाईट काय व्हावयाचें असेल तें होईल परंतु धनी गेल्यामुळें लष्कराचा धीर सुटला असें भले लोक म्हणतील म्हणून मी निघून जात नाहीं,**' असें त्याचें म्हणणें होतें. (पाच्छापूरकरांचीं बखर) शेवटीं बापूंनीं सक्तीचे निरोप पाठविल्यामुळें

त्याला जाणें भाग पडलें. बाजीराव लढाईंत रहाता व कदाचित् मारला गेला असता, तर त्याची जागा कोणीं घ्यावी असा प्रश्न पुढें आला असता. अर्थात् पक्ष पडते व त्यामुळें जें थोडें बहुत सैन्य स्वामिनिष्ठ राहिलें होतें, त्यामध्यें आपसांत दुही माजून शत्रूचें आणखीं फावलें असतें. अमृतरावाला इंग्रजांनीं पेन्शन देऊन ठेवला होता, त्यामुळें तो ते सांगतील त्याप्रमाणेंच वागला असता. बाजीराव गारद झाल्यावर लढायचें तरी कोणासाठीं व कशाचे जोरावर, असे अनेक विचार त्यांच्या मनांत घोळत होते व म्हणूनच ते ‘ दहाचा पोशिंदा असावा ’ असे उद्गार काढीत असतें.

पेशवाई अस्तगत होण्यास आणखीं कितीही कारणें असलीं, तरी अनुभवी व वृद्ध अशा जबाबदार पुढाऱ्यांचा अभाव, हें एक महत्त्वाचें कारण होय यांत शंका नाहीं. नाना वारले, गोविंदराव काळे यांनीं राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें, त्यामुळें सर्व कारभार पोरसवदा लोकांनीं चालविला. बापूंनी आपल्या मगदुराप्रमाणें शक्य तितक्या नेटानें राजकारण चालविलें, लढायांत पराक्रम गाजविला, हिंदुस्थानांतील उत्कृष्ट सेनापती अशी कीर्ति मिळवली; परंतु ते वयानें जर थोडे जास्त असते तर आणखीं कितीतरी फायदा झाला असता. ते तसें नसल्यामुळें बाजीरावाला कोणतीही गोष्ट अधिकारवाणीनें सांगूं शकले नाहींत. पुष्कळशा सरदारांना हा आपल्या बरोबरीचा आहे आपणांस काय शिकवणार, असें वाटलें; त्यामुळें ते शेवट-पर्यंत बाजीरावाच्या बरोबर असूनसुद्धां प्रसंगविशेषीं त्याच्या उपयोगीं पडले नाहींत. वृद्ध होते ते कर्तबगार नव्हते व कर्तबगार होते ते वृद्ध नव्हते अशी त्यावेळची स्थिती होती. गोविंदराव काळे यांस बाजीरावानें भेटीस बोलावलें तेव्हा एल्फिस्टन्‌ची जी त्रेधा उडाली ती पाहिली म्हणजे वरील विधानांची सत्यता सहज पटेल.

बापूंच्या मुत्सद्देगिरीचें वर्णन वर केलें आहे तसें त्यांच्या शौर्याचें कर-ण्याची विशेष गरज नाहीं, त्यांचा प्रताप त्यांच्या शत्रूंनींसुद्धां वर्णन केला आहे. धोंडजीवाघ, शिंदे, भोंसले, वगैरे बरोबर झालेल्या लढायांत

त्यांनीं आर्थर वेलस्ली यांच्या हाताखालीं काम केलें व त्याबद्दल त्यांची 'He served during the war which ensued with the utmost zeal and fidelity and in a manner perfectly satisfactory to me. His troops were engaged with the enemy repeatedly and always conducted themselves well and Gokhla particulary distinguished himself and in late action against a formidable band of freebooters who had assembled upon the frontiers of the Peshwa's teritories and cut off the supplies of the city of Poona'. अशा जोरदार शब्दांत प्रशंसा केली. आणि या लढाया बापूंच्या वयाच्या अवघ्या २३-२४ व्या वर्षी लढल्या गेल्या होत्या.

हरीभाऊ देशमूख हे बापूंबरोबर नेहमीं होते. त्यांनीं गाईलगडची लढाई व इतर अनेक लढाया पाहिल्या होत्या. ते म्हणतात, 'लढाईची वार्ता ऐकणें अतिशय सोपें पण प्रत्यक्ष युद्ध पहाणें हें फार भयकारक होय. मग प्रत्यक्ष लढाई करणें तर दूरच राहिलें; पण अशा परिस्थितींत सुद्धां एखाद्या शुभकार्याला बाहेर पडावें अशा तऱ्हेनें लढाईत नाचत जाणारे दोनच पुरुष मी पाहिले. एक परशुरामभाऊ पटवर्धन व दुसरा बापू गोखला. लढाईचें नांव ऐकलें कीं, यांना स्फुरण चढत असे आणि अंगरख्यांचें बंद तटतटां तुटत. प्रतिनिधींच्या बरोबरच्या लढाईतसुद्धां त्यांनीं आपलें कौशल्य उत्तम तऱ्हेनें व्यक्त केलें व इंग्रजांबरोबरच्या शेवटच्या लढाईनंतर 'Fifteen years in India' या पुस्तकाच्या कर्त्याला,

'It is impossible not to respect the spirit of Gokla. The judgement with which he prepared to recieve general Smith was only equalled with his valour and skill in bravely endeavouring to retrieve the day upon finding that his centre could not withstand the charge of the 22nd dragoon and the history will

encircle his name with a laurel for fidelity and devotion in his countrie's cause. 'असे उद्गार काढावयास भाग पाडलें.

खडकीला दोन्ही सैन्यांची बरोबरी झाल्यावर पेशव्यांच्या पलायनास व नंतरच्या गनिमीकाव्याचे लढाईंत तेच प्रमुख होते ही गोष्ट लक्षांत घेतां. 'Bajeerao must have been allowed to have shown considerable art in the style of warfare he adopted... He cannot be denied the praise of having exibited much ingenuity and stratagem in his several dispositions of which their protracted result was a sufficient evidence.' असें एका इंग्रज सेनापतीनें काढलेले उद्गार त्यांच्या गनिमीकाव्याच्या लढाईची साक्ष उत्तम तऱ्हेनें पटवितात. त्याचप्रमाणें अष्टें येथें त्यांचा अंत झाल्यावर स्मिथच्या सैन्यामधील अव्यवस्थेबद्दल त्याची बाजू मांडतांना ब्लेकर म्हणतो.

'Without pursuing this disquision further it will be granted that he had on his side all the arguments derivable from success and he was opposed by the most able manoeuvre which could be expected from his antogonist Gokla justly denominated by his master the sword of the empire.' त्याचप्रमाणें पिटर आवर त्यांच्याबद्दल The best general of Peshwa असे उद्गार काढतो.

१८१७ सालीं इंग्रजांशीं लढाई करावी कीं करूं नये, असा प्रश्न बाजीरावानें आपल्या सरदारांस विचारला तेव्हां आज लढाईची तयारी नाहीं, सबब युद्ध पुकारूं नये असें पुष्कळांनीं सांगितलें; पण एकट्या बापूंनीं लढण्याची सल्ला दिली. लढाईची तयारी गुप्तरीतिनें करावी आणि मग शत्रूस तोंड द्यावें असा बाकीच्यांनीं सल्ला दिला व तो योग्य होता; बापूंनीं उगीचच घाई केली असें काहीं टीकाकारांचें म्हणणें आहे. परंतु ती गोष्ट शक्य होती कीं नाहीं याचा त्यांनीं विचार केलेला नाहीं. बाजीराव

**कोणत्या वेळीं काय पदार्थ खातो याची माहिती मिळवणारा एल्-फिन्स्टन त्याची युद्धाची तयारी चालली असतां तिकडे काणाडोळा करून स्वस्थ बसेल हें म्हणणें अत्यंत हास्यास्पद ठरतें.** त्यानें पेंढाऱ्यांच्या नाशार्थ पलटणें ठेविलीं तीं लढाईकरतां असा संशय इंग्रजांनी घेतलाच. इंग्रज पेशवाई घशांत टाकणार हें ईश्वरच बोलून चुकला होता. प्रश्न इतकाच होता, कीं, एखाद्या मरतमढ्यासारखें पडून आपलें मरण कांहीं काळ लांबवावयाचें, कां मरतां मरतां आपल्या पराक्रमानें जगाचे डोळे दिपवून टाकावयाचे. आम्ही एकही रक्तबिंदू न आटवतां राज्य मिळविलें अशी दर्पोक्ति शत्रूला काढूं द्यावयाची कीं, आज जरी जय झाला तरी यांच्या अंगचें तेज केव्हां उसळेल या चिंतेनें त्यांना स्वस्थ झोंप येऊं द्यावयाची नाहीं. आज अपयश येणार हें जरी निश्चित असलें तरी आपल्या नालायकीचा ठसा आपल्या वंशजांवर उठवावयाचा का, उठा ! आम्ही आपलें कर्तव्य बजावलें आहे आतां तुमची पाळी आहे ती योग्य रीतीनें पार पाडा; असा त्यांना संदेश द्यावयाचा. जगामध्यें हिंदुस्थान डोळे मिटून पारतंत्र्य स्वीकारतो अशी स्वतःला अपमानास्पद समजूत पसरण्यास मदत करावयाची, का लढतां लढतां केलेल्या पराक्रमाबद्दल त्याला मान डोलावयास लावावयाचे. ध्येय हस्तगत होण्याकरितां स्वतःचे प्राण वेंचावयाचे का, 'होणारें न चुकेल होइल जरी ब्रम्हा तया आडवा' अशीं रडगाणीं गात बसावयाचें. आणि या पुढाऱ्यांमध्यें चाललेल्या द्वंद्वामध्यें त्यांनीं तेजस्वी वृत्तीच दाखविली. आपल्या शौर्यानें शत्रूचे डोळे दिपविले आणि मराठे '**मुकीं बिचारीं कुणीं हका या वर्गांतील नसून** जातिवंत सिंह आहेत, हें सिद्ध केलें.

त्यांचा तिसरा गुण म्हणजे धीरोदात्तपणा. लहानपणापासून त्यांचेवर अनेक संकटें आलीं. विशेषतः डवगीनाल्याच्या युद्धांत जो प्रसंग घडला त्यानें कोणाचेंही हृदय फाटून गेलें असतें. प्राणापेक्षांही प्रिय अशा चुलत्याचा धोंडजी वाघानें खून केला. सख्या भावाची गर्दन छाटली गेली. त्याची बायको सती गेली. स्वतःची पत्नी त्याच सुमारास वारली व

स्वतःच्या मुलाचाही तेव्हांच अंत झाला. कौटुंबिक आपत्तींनीं त्यांचेवर जोराचा मारा चालविला आणि या वेळीं त्यांचें वय फक्त वीस बावीस वर्षांचें होतें. अशा निर्वाणीच्या प्रसंगींसुद्धां त्यांचें हृदय खचलें नाहीं. स्वतःच्या धीरगंभीर वृत्तीला कमीपणा आणणारें वर्तन त्यांचे हातून जरा-सुद्धां घडलें नाहीं. 'विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमाना प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति' हें संस्कृत सुभाषित त्यांना योग्य रीतिनें लागू पडतें.

असे कसोटीचे प्रसंग त्यांच्यावर अनेक आले. नाना फडणिसांची त्यांच्यावर इतराजी झाली. पण माफी मागतों, मला पुन्हां कामावर घ्या असले लाचारीचे उद्गार त्यांनीं केव्हांही काढले नाहींत. त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. नानांनाच आपली गरज लागेल व ते आपल्यावरील इतराजी दूर करतील हा त्यांचा कयासच बरोबर ठरला. कित्तुरकरांचे बंडाचे वेळीं नानांना त्यांची मदत घेणें भाग पडलें.

त्याप्रमाणें त्यांची स्वामिनिष्ठाही जबर होती. विसाजीपंत गोखल्यानें चुगली करून बापूंचा हेतु पेशव्यांचें राज्य घशांत टाकण्याचा आहे असें बाजीरावास सांगितलें व त्यांची परीक्षा पहाण्याचें ठरविलें. बापूंस या प्रकाराची कांहींच माहिती नव्हती. बाजीरावानें त्यांच्यापाशीं त्यांच्या ताब्यांत असलेल्या किल्ल्यांची सोडचिठी मागितली व त्यांनीं बेधडक दिली. क्षणांत रावाचा रंक होण्याची वेळ होती ती. त्यांच्या जागीं दुसरा एखादा असता तर त्यानें स्वतःच्या शौर्याच्या घमेंडींत बाजीरावाचा अपमान केला असता. पण बापूंचें तें ब्रीद नव्हतें. त्यांनीं त्यापेक्षां रंकाची पाळी पत्करली. सत्कर्माचें फल परमेश्वर केव्हांही देतोच. व त्याप्रमाणें त्यांच्या सद्गुणांची साक्ष बाजीरावाला पटली व त्यानें बापूंना पूर्वीपेक्षां जास्त मुलुख दिला. बाजीरावाची बाजू सोडण्याबद्दल–निदान तटस्थ रहाण्याबद्दल-इंग्रजांनीं आपल्या कुटिल नीतीस अनुसरून त्यांना भरपूर लांच देण्याची तयारी दर्शविली होती. फितुरीच्या लालचीला बाजीरावाचे मोठमोठे सरदार बळी पडत होते. मराठी राज्याचे मालक म्हणविणारेही या मोहांतून सुटले

नाहींत. पेशवाईचें भीषण भवितव्य त्यांच्या नजरेसमोर गरगरून फिरत होतें. बाजीरावाचा पक्ष धरण्यामध्यें आपल्या सर्वस्वाची हानी होणार हें उघड्या डोळ्यांनीं दिसत होतें. परंतु त्यांनीं एकदां जो पक्ष धरला तो अखेरपर्यंत इंग्रजांकडून आलेल्या लिंगो भगवान नांवाच्या वकिलाला '**तुम्ही खातरजमा दिली ही गोष्ट खरी, परंतु लढाई नमुद जहाल्यावर सरकारांत काम-कसूर केलेस इंग्रज बहादर यांस बट्टा व हरामखोरपणा येईल. ज्याच्या पदरीं आम्हांस ठेवलें आहे त्याच्या इमानें इतबारें चाकरी-वर प्राण गेला तरी चिंता नाहीं. सरकारची तनाखोरी केल्यास तूर्त दौलत देतील परंतु लोकांचा अपवाद व परलोक नाहीं. हें कर्म आमच्यानें होणार नाहीं. आपली दोस्ती आम्हीं मिळविली आहे. आमची लोकांत अपकीर्ति केली असतां ज्यांनीं आमची खातरजमा केली आहे त्यांची शिफारस होईल म्हणून दुसरा भाव मनीं न आणावा. स्वामीद्रोह आहे. तो आम्हीं करून स्वप्राणानिशीं राहून त्या योगानें दौलत मिळवून अनंभव केल्यानें लोक निंदा करतील तें कोठवर ऐकावें. त्यापेक्षां जीवन माफक सन्मुख युद्धामध्यें सरकार कामावर आल्यास श्रेयस्कर**' अशा खणखणीत शब्दांत उत्तर पाठविलें. वेलस्लीच्या हाताखालीं त्यांनीं जें काम केलें त्याबद्दल त्यांना शिफारसपत्र मिळालें; व ते शूर सरदार आहेत अशी बाजीरावाकडे शिफारस झाली, यांत वेलस्लींचे बापूंवर कोठल्याही तऱ्हेचे उपकार नव्हते. तो त्यांच्या कामगिरीचा मोबदला होता व त्याच्यावर त्यांचा हक्क होता. वेलस्लीनें शिफारस केली नसती तर तो कृतघ्न ठरला असता. धोंडजी वाघाविरुद्ध चाललेल्या लढाईत गोखल्यांना माझ्या मदतीस यावयास सांगा अशी इंग्रजांना बाजीरावाजवळ याचना करावी लागली होती याची त्याला आठवण झाली नाहीं. न केलेल्या उपकारांचें ओझें लादण्याचा त्याचा डाव सिद्धीस गेला नाहीं. फितुरीच्या खाणींतसुद्धां त्यांच्यासारखा तेजस्वी हिरा सांपडला व त्यानें शत्रूचे डोळे दिपवले. त्यांनीं दिलेलें उत्तर प्रत्येकानें हृदयावर कोरून ठेवण्यासारखें आहे.

सर्वस्वाचा नाश पत्करला पण फितूर होणें शक्य नाहीं हें त्यांनीं वेलस्लीला बजावलें. Every man has his own price हें तत्व पार्लमेंटमध्यें बेधडकपणें उच्चारतांना वॉलपोलला बापूंची माहिती हवी होती.

त्यांनीं आपल्या आयुष्यांत गुरुही केले होते. परंतु त्यांचे दोन्हीं गुरू हल्लींच्या बुवा या शब्दास अपवाद होते. त्यांची गुरुभक्ति डोळस होती. गुरू करतांना त्यांनीं त्यांची योग्यता पूर्णपणें पारखली होती. ठाकुरदास बोवांस गुरू करतांना त्यांनीं नाना तऱ्हेचे आडवे तिडवे प्रश्न विचारले. त्या कसोटींतून पार पडल्यानंतर मात्र त्यांनीं त्यांना मान दिला. ठाकुरदास बोवा रामशास्त्र्यांप्रमाणेंच निस्पृह होते. बापूंच्या मरणानंतर एकदां प्रतापसिंह महाराज व पटवर्धन वगैरे सर्व सरदार एकत्र बसले असतांना एकानें ' बापूंवर तुमचा वरदहस्त असूनसुद्धां त्यांचा निर्वंश कसा झाला ? ' असा खवचटपणें प्रश्न विचारला. त्याचवेळेला त्याच सरदारांचीं वतनें त्यांच्या मठास चालू असतांना ताडकन् उत्तर दिल्यास आपला वृत्तिच्छेद होईल याची जाणीव असूनसुद्धां त्यांनीं ' स्वामिकार्ये गतेप्राणे अंते तिष्ठति माधव : ' असें संस्कृत अवतरण म्हणून दाखवून **बापू गोखले लढाईंत पडले, त्यांचा निर्वंश झालेला नाहीं ते स्वर्गीं अमर आहेत मात्र जे लढाईंतून पळाले ते नादान जिवंत असून नसून सारखेच** असें बेधडकपणें उत्तर दिलें. त्यांच्या तेजस्वीतेपुढें इतर भ्याले. असा निर्लोभी बुवा त्यांनीं आपला गुरू म्हणून निवडला होता.

दुर्दैवाचे घाले अनंत आले असतांही त्यांचें सर्व कुटुंब त्यांना अनुरूप असेंच निपजलें. चुलते धोंडोपंत अत्यंत हुपार व शूर होते. हल्ल्याळच्या प्रसंगांत ते बळी पडले नसते तर मराठ्यांची बाजू कितीतरी सांवरली असती. ते दूरदृष्टी होते. कवायती पलटणांचें महत्व त्यांना पूर्णपणें पटलें होतें व आपलें सैन्य त्याप्रमाणें तयार व्हावें म्हणून त्यांनीं पोर्तुगीज अंमलदारांच्या देखरेखीखालीं १७९८ सालीं एकदोन पलटणेंही तयार केलीं होतीं. त्यांचें नांव ऐकतांच शत्रूला कंप सुटत असे. धोंडजी वाघाचें प्रकरण अत्यंत

तापदायक झालें असतां, केवळ धोंडोपंत त्याचे विरुद्ध आहेत म्हणून वेलस्लीला हायसें वाटलें. ते जर आणखी कांहीं वर्षे जगते तर दुसऱ्या बाजीरावावर आपला वचक ठेऊन हिंदुस्थानला स्वातंत्र्यांत कायम ठेवते.

धोंडोपंताची पत्नी लक्ष्मीबाई हीही पतीस अनुरूप अशीच होती. बापूंचे व धोंडोपंतांचे गैरहजेरींत तीच घरचा सर्व कारभार संभाळीत असे. धोंडोपंताचा वाघानें शिरच्छेद केल्यानंतर मी त्यांची उत्तरक्रिया करतों असें बापू सांगत असतां '**पहिल्यानें सूड नंतर क्रिया कर्मांतर**' असें सांगून बापूंस वाघाचा शिरच्छेद करावयास तिनें फर्मावलें. अडी-अडचणीच्यावेळीं तिचा सल्ला बापूंस फार उपयोगी पडत असे.

बापूंचे बंधू महादाजी गणेश ऊर्फ अप्पा हेही कर्तबगारच निघाले. त्यांनीं अनेक लढायांत मर्दुमकी गाजविली, विशेषतः कित्तुरकर देसायाचें बंड व पटवर्धनांशीं सामना या दोन प्रसंगीं त्यांचें युद्धकौशल्य चांगलेंच दिसून आलें. ते विनयशील होते. लहान वयांत मरण पावल्यामुळें त्यांच्या गुणांची योग्य अशी चिकित्सा करतां येत नाहीं पण एवढें मात्र खास कीं ते जर आणखीं कांहीं काळ जगते तर त्यांची कर्तबगारी पाहून बापू श्रेष्ठ कीं अप्पा श्रेष्ठ याचा निकाल लावणें जड गेलें असतें. हल्याळ येथें धोंडजी वाघाशीं सामना देऊन, त्यांनीं शत्रूची फळी फोडून मार्ग काढला. पण धोंडोपंत आंत अडकलेले कळतांच मृत्यू सभोंवती घिरट्या घालीत असतांही, त्यांनीं अंगचुकारपणा न करतां मरूं तर दोघेही मरूं अशा वृत्तीनें परत चक्रव्यूहांत उडी घेतली. दोघेही मरणारच मग आपण आपल्या सुटकेचा मार्ग तरी कां शोधूं नये, असा आपमतलबी विचार त्यांचे मनांत एक क्षणही आला नाहीं.

बापूंच्या दोन्हीं पुत्रांचें वय ते मरतांना लढाईचें नव्हतें. त्यामुळें त्यांच्या बद्दल विशेषसा उल्लेख करतां येत नाहीं. दुसरा मुलगा गोविंदबाबा मरतांच त्याच्या पत्नीनें त्याकाळीं भूषणभूत समजल्या जाणाऱ्या सती

जाण्याच्या पद्धतीचा स्वीकार केला. त्यामध्यें–बापूंनीं व बाजीरावानें अडथळे–प्रेमाचेच–आणले असतांही ती आपल्या निश्चयापासून एक रेंससुद्धां ढळली नाहीं. सती जाणें हें आज रानटीपणाचें द्योतक वाटत असेल पण त्याकाळीं तें पराकाष्ठेच्या प्रेमाचें चिन्ह समजलें जात होतें व इतिहासाकडे वर्तमान काळाच्या चष्म्यांतून केव्हांही पहावयाचें नसतेंच. अप्पांची पत्नीही त्यांचे बरोबर सती गेली.

त्यांचे दिवाण बाळाजीराम गोखले हेही चतूर, अनुभवी व सदाचारी होते. त्यांनीं बापूंच्या पैशांचा अपहार कधींही केला नाहीं. त्यांस नेहमीं सुख दिलें व प्रसंगविशेषीं चार उपदेशाचे योग्य शब्दही ऐकवले व बापूंनीही त्यांचा कधीं अपमान केला नाहीं.

राहतां राहिल्या यमुनाबाई–बापूंची पत्नी–त्याही स्वाभिमानी होत्या; जगामध्यें एकंदरीनें पहातां कर्त्या पुरुषांच्या पत्नीला जास्त मान असतो व त्यामुळें अधिकारमादही चढणें स्वाभाविक असतें; पण या साध्वीला गर्व व अभिमानाचा लेशही नव्हता. तिनें आपल्या सासूजवळ भांडून नसते तंटेबखेडे माजविले नाहींत. अष्टीच्या लढाईनंतर बापू वारले असें तिला निश्चितपणें कोणीच सांगेना यामुळें ती शास्त्राधार पाहून सुवासिनीप्रमाणें रहात होती. आपला पती आपणांस केव्हांतरी भेटेल या आशेवर तिनें आपल्या आयुष्याचे उरलेले दिवस काढले. एल्फिस्टन् व बाजीराव दत्तक घेण्याचा आग्रह करीत असतांना सुद्धां तिनें याच आशेनें त्यांचें म्हणणें धुडकावून लावलें.

असो. बापूंचें गुणवर्णन संपलें. त्यांच्या चरित्रापासून काय बोध घ्यावयाचा हें ठरविण्यास ज्याचा तो स्वतंत्र आहे. त्यांच्या सर्वच गुणांनां आपल्या अंगीं बाणवणें आज शक्य नसलें तरी एक गूण मात्र घेतां येण्यासारखा आहे व तो म्हणजे मनाचा खंबीरपणा. परिस्थिती अनुकूल असो वा प्रतिकूल असो. वेळ कशीही भयानक येवो. मार्गामध्यें हजारों नव्हे लाखों विघ्नें असोत.

शत्रू निंदेचे शर सोडोत अथवा सुखासिन स्थितींतले मित्र आयत्या वेळीं दगा देऊन सोडून जावोत; हाताखालीं सैन्य लाखांनीं मोजण्यासारखे असो अथवा वेळ पडली असतां हाताच्या बोटावर मोजण्याएवढेही लोक हांकेला ओ न देवोत, एकदां ठरविलेला निश्चय कायम, तो प्रत्यक्ष ब्रह्मदेव जरी आला तरी टळणें शक्य नाहीं; त्याचा फेरविचार करण्याइकी सुद्धां कच खाण्यास मन तयार होणार नाहीं. आणि हा महत्वाचा गूण अंगीं होता म्हणूनच त्यांचीं कामें तडीस गेलीं. मार्ग ठरवितांना एकदां सर्व साधक-बाधक गोष्टींचा विचार करावयाचा. नंतर मात्र आपल्या मनांत त्याबद्दलच्या नसत्या शंका कुशंकांना स्थान द्यावयाचें नाहीं; हा त्यांचा बाणा होता व म्हणूनच ते शेवटपर्यंत अजिंक्य राहिले. त्यांचें खरें गुणवर्णन माझ्यासारख्या अल्प प्रतिभावानाच्या हातून होणें शक्य नाहीं व हा आपला कमकुवतपणा ओळखून कवी गोविंदाचा खालील ओळीं पुरता आश्रय घेऊन हा गुणगौरव पुरा करतों.

**सलामी द्याया–द्याया तुज भूपा–आमुच्या जवळ नाहीं तोफा ।**
**कराया मुजरे–मुजऱ्यांची फैर–आमुच्याजवळ न दलभार ।**
**प्रभूरे आम्ही–आम्ही परतंत्र–कशाचें नाहीं स्वातंत्र्य ।**

* * * *

**मुक्या मनानें किति उधळावे शब्दांचे बुडबुडे-तुझ्यावर शब्दांचे बुडबुडे.**
**तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे.**

---



बापू गोखले.

गाजला जो शौर्यवंत ।
तयालाच दिव्य अंत ।
पतनींही नक्षत्रांची प्रेक्षणीय मुद्रा ॥

- यशवंत.

# जवानमर्द बापू

## प्रकरण पहिलें

### ‘ स्थलांतर ’

रत्नागिरी जिल्हा हा उत्कृष्ट पुढाऱ्यांची खाण आहे. तिच्यांत अनेक तेजस्वी नररत्नें सांपडतात. अशाच अनेक रत्नांपैकीं बापू गोखले हे एक होत. त्यांचा जन्म सन १७७७ मध्यें झाला. मूळ गांव वेळणेश्वर जरी असला, तरी त्यांचे पूर्वज वेळणेश्वर येथून निघून राजापूर तालुक्यांत तळेखाजणनजीक पिरंदवण नांवाच्या गांवीं बरींच वर्षे वस्ती करून होते. तेथें अजूनही गोखल्यांचीच जमीन आहे. बापूंचें सबंध नांव नरहर गणेश गोखले. त्यांना एकच महादजी ऊर्फ अप्पा नांवाचा वडील भाऊ. दुसरीं भावंडें कोणीही नाहींत. वडील पिरंदवण येथें शेती करीत व चुलते धोंडो बल्लाळ गोखले हे राजापूर येथें नाना फडणीसांचे चुलत भाऊ, मामलतीचें काम पहात, त्यांचे हाताखालीं कारकून होते. या दोघां मुलांची शिक्षणाची गैरसोय होऊं नये म्हणून त्यांना शिक्षण घेण्याकरितां मौजे उपले ( तळे-खाजणनजीक ) येथें ठेविलें होतें. तेथें त्यांचे सहाध्यायी गणेश सदाशिव साठे हे होते. थोडेंसें लिहिणें झाल्यावर धोंडोपंतांनीं त्यांना आपल्याबरोबर पुण्यास नेलें.

या कारकूनाचें स्थलांतर सुद्धां फारच मजेदार रीतिनें घडलें. ते कारकून जरी असले तरी त्यांना लढाईची अत्यंत आवड. कोठेंतरी संधी मिळावी व आपल्या पराक्रमाचा उजेड पडावा असें त्यांस सारखें वाटे. कारकुनी करून

पिचत रहाण्यासारखा अल्पसंतोषीपणा त्यांचे अंगीं मुळींच नव्हता. त्यामुळें एकसारखे ते अधीर रीतिनें कोणत्याही घटनेकडे पहात. प्राप्त संधींतून आपला फायदा कसा होईल याकडे सारें त्यांचें लक्ष असे. सुदैवानें त्यांना अशी संधी मिळालीही.

राजापूरनजीक कोळवण नांवाच्या गांवीं करवीर प्रांतांतील बावडे गांवाच्या मांग व रामोशांनीं उपद्रव चालविला होता. दरवर्षी वसुलीची वेळ आली म्हणजे ते मधच्यामध्यें धान्य वगैरे लुटून फस्त करीत. त्यामुळें लोक चिंताग्रस्त होत व वसूलही वेळच्यावेळीं होत नसे. या बंडाळीच्या तक्रारी दोनतीन वर्षांनीं पुण्यापर्यंत पोंचल्या त्यावेळीं पुण्यास सवाई माधवराव पेशवे होते. त्यांनीं व नाना फडणविसांनीं या बंडखोरांस शासन करण्याबद्दल गंगाधरपंत भानू यांस पत्रें पाठविलीं. परंतु ते शूर नव्हते त्यामुळें त्यांना हें बंड कसें मोडावें याबद्दल पेंच पडला. तेव्हां चिंताक्रांत होऊन हाताखालील उमेदवार व कारकून यांना बोलावून आणून त्यांस ' जो हें बंड मोडील त्याला सरकारांत कायम चाकरी व मेहनतीप्रमाणें इनाम मिळेल. ' असें सांगितलें. परंतु हें जोखमीचें काम अंगावर घ्यावयास कोणीही तयार होईना. पुण्याहून तर सारखे हुकुमावर हुकूम येत होते. अखेरीस एकदां भानू मामलतीच्या कामावर बाहेर गेले असतां धोंडोपंतांनीं बंड मोडण्याचें काम स्वतःच्या जबाबदारीवर पत्करलें व तसें पुण्यास कळविलें. त्याप्रमाणें तिकडून हुकूम परवानगी मिळाल्यावर कांहीं शिपाई आपल्या हाताखालीं ठेऊन त्यांनीं बंडखोरांवर चाल केली. बंदुका व तरवार यांच्या सहाय्यानें त्यांनीं बंडखोरांच्या अड्ड्यावर छापा घातला. बंडखोरही कांहीं कमी शूर नव्हते. त्यांनीं आपल्या पराक्रमाची शर्थ करून शत्रूस तोंड दिलें. बराच वेळ तरवारींचा खणखणाट चालून १००—१५० चोरांना त्यांनीं पकडलें. व त्यांची रवानगी पुण्यास करून त्यांस सरकारांतून शासनही करविलें.

अर्थात् या त्यांच्या कामगिरीचें अपेक्षित फळही त्यांना मिळालेंच. त्यांची जिकडे तिकडे वाहवा झाली. सूर्यबिंब जरी प्रत्यक्ष दिसलें नाहीं तरी

किरण त्याचें अस्तित्व सूचित करतातच ! त्याप्रमाणें धोंडोपंत जरी नजरे-समोर नसले तरी त्यांचा पराक्रम नानांच्या व इतर कारभाऱ्यांच्या चर्चेचा विषय झाला होता. त्यांचें चित्र भानूंच्या नालायकीच्या पार्श्वभूमीमुळें अधिकच उठावदार दिसूं लागलें. लोकांना तुलना करणें नेहमींच आवडतें. त्यांनीं भानूंची व धोंडोपंतांची तुलना केली. धोंडोपंतांची प्रतिष्ठा वाढली व त्याच गुणोत्तरानें भानूंची कुचेष्टाही सुरू झाली. आपल्या हातून बंडाचा वींमोड झाला नाहीं याबद्दल त्यांना वाईट वाटत होतेंच. वसुलाचा हिशोब देण्याकरितां पुण्यास गेल्यावर तेथें त्यांना स्वतःची निंदा स्वतःच्याच कानांनीं ऐकण्याचा प्रसंग आला. मग काय विचारतां ? त्यांनीं धोंडोपंतांना या नाहीं त्या कारणावरून कुरापत काढून त्रास देण्यास सुरवात केली. आपल्या हाताखालील अधिकारी म्हणून क्षुल्लक चूक काढून त्यांचा पदोपदीं अपमान करावा, समाजामध्यें त्यांची निंदा नालस्ती करावी, कधीं टोंचून बोलावें असा त्यांनीं क्रम चालविला.

धोंडोपंताचा स्वभाव तापट होता. त्यांना हा अपमान सहन होईना. आपला अपराध नसतांना निष्कारण स्वतःची निंदा ऐकावयाची त्यांची तयारी नव्हती. लायकीच्या दृष्टीनें पहातां त्यांची श्रेष्ठता केव्हांच प्रस्थापित झालेली होती. या सर्वांचा परिणाम त्यांच्या मनावर होऊन त्यांनीं राजापूर सोडण्याचें निश्चित केलें. आपल्या शाळेंत जाणाऱ्या पुतण्यांनाही बरोबर घेतलें. त्यांच्याबरोबर गणपतराव साठे यांस त्यांच्या मामानें धोंडोपंतांच्या पाठीस लागून पाठविलें.

परंतु पुण्यास भानूंकडून त्यांच्याबद्दल विकृत तऱ्हेची माहिती पुरविली जाणार हें उघड होतें. व भानू हे नाना फडणविसांचे चुलतबंधु असल्यामुळें नाना त्याच माहितीवर विसंबून रहाणार, यांत कोणताही प्रत्यवाय नव्हता. अर्थात् धोंडोपंतांस परत कोकणांत जाण्याचा हुकूम होईल अशी भीति वाटली परंतु त्यांची नजर तीक्ष्ण असल्यामुळें त्यांना भानूंच्या हिशेबांतील

भानगड पूर्वीच दिसून आली होती व वेळ पडल्यास तिचा उपयोग करून आपलें स्थान सुरक्षित ठेवण्याचें त्यांनीं ठरविलें होतें.

पुण्यास लष्करांत जाण्याकरितां ते घराहून निघाले व वाटेंत अनेक प्रकारचीं सुखदुःखें अनुभवित अखेरीस एकदांचे सन १७८४ चे सुमारास त्यांनीं आपलें बिऱ्हाड पुण्यास आणिलें. नानांनीं त्यांना पुण्यास येण्याचें कारण विचारतांच त्यांनीं एकदम भानूंच्या चुका दाखविण्यास सुरवात केली. नानांसही मनुष्याची पारख होतीच. त्यांनीं यांना चुचकारून चार समजुतीच्या गोष्टी सांगून आपल्या पदरीं ठेवलें व अशा रीतिनें स्थलांतर होऊन धोंडोपंत कारकुनाचे शिपाई बनले.

८५५९

## प्रकरण २ रें.

# प्रगतिपथावर.

पुण्यांत आल्यावर धोंडोपंतांचा मान वाढला व कर्तबगारीचें क्षेत्रही विस्तृत झालें. आसपास चालणाऱ्या लहान मोठ्या बंडाळ्यांतील दंगेखोरांना त्यांनीं आपल्या काबूंत आणलें. त्यामुळें कोणतेंही तरवार गाजविण्याचें काम पुढें निघालें म्हणजे पहिल्या प्रथम धोंडोपंतांची आठवण व्हावयाची ही जणूं कांहीं क्रमप्राप्तच गोष्ट आहे, असें वाटूं लागलें. ते रोज सवाई माधवरावांचे दरबारांत जात. सवाई माधवराव पेशवे वयानें लहान असले तरी बुद्धीनें चतुर होते. त्यांस आपल्या वाडवडीलांचेप्रमाणेंच मनुष्याची उत्तम पारख असे. धोंडोपंतांचा आत्मविश्वास व तडफ पाहून त्यांचें मन धोंडोपंतांकडे ओढलें गेलें. शिवाय आप्पा व बापू हे आपल्या बालपणांतसुद्धां कर्तबगारी गाजवूं लागले होते. त्यांची वागणूक व हुषारी पाहून हे तिघेही सरदारीचा हुद्दा देण्यास योग्य आहेत असें श्रीमंत बोलले. श्रीमंतांच्या हुकुमावरून दसऱ्याचे सुमुहूर्तावर यांस सरदारीचीं वस्त्रें देऊन त्यांचा गौरव करण्यांत आला. त्यादिवशीं दरबारांत मोठा समारंभ करण्यांत आला होता. प्रत्येकास पालखी, नगारा, निशाण व हत्ती देऊन त्यांचा व तैनातीकडे १०० शिलेदार व १०० घोडे इतक्यांचा खर्च सरकारांतून देण्याचा ठराव झाला. व अशाप्रकारें बापू गोखले शिपायाचे सरदार बनले.

धोंडोपंत मूळचेच तडफदार व हजरजवाबी होते. बोलण्यांत व युक्तिवादांत ते सहसा कोणालाच हार जात नसत. नाना फडणिसांनीं आपलीं म्हणून निवडक ५० घोडीं वेगळीं काढलीं होतीं. त्यांत दोन घोडीं तर फारच उत्तम होतीं. कधीं नानांची लहर लागलीच तर ते त्यांतील एखाद्या घोड्या-

वर बसत, एरवीं मोतद्दारासुद्धां त्यावर बसण्याची परवानगी नव्हती. घोड्यावर बसण्याबद्दलच्या धोंडोपंतांच्या हुषारीबद्दल नानांच्या कानावर पुष्कळ गोष्टी आल्या होत्या. म्हणून एकदां पर्वतीस देवदर्शनास जात असतांना त्यांनीं धोंडोपंतास आपल्या घोड्यांपैकीं एकावर बसून आपल्याबरोबर देवदर्शनास येण्यास सांगितलें. निघण्याची तयारी झाल्यावर पुढें उभीं केलेल्या घोड्यांपैकीं दोन घोडे खास ठेवलेले होते तेथें जाऊन त्यांनीं एक पकडला व त्यावर ते स्वार झाले. तुम्ही या घोड्यावर बसूं नका तो नानांचा राखीव घोडा आहे, त्यावर दुसऱ्या कोणीं बसूं नये अशी धनीसाहेबांची सक्त ताकीद आहे, तरी तुम्ही दुसऱ्या घोड्यावर जाऊन बसा, असें मोतद्दारानें परोपरीनें सांगितलें. परंतु त्यांनीं कांहींएक उत्तर न देतां त्याच्या खाडकन् थोबाडींत मारली. आणि पुढें चालू झाले. इतक्यांत नाना तेथें देवदर्शनाच्या तयारीनें आले. मोतद्दाराच्या थोबाडींत मारल्याची खबर त्यांचे कांनीं गेल्यावर असें करण्याचें कारण काय म्हणून त्यांनीं हळूच धोंडोपंतांस विचारलें. ' आपण बसण्याची परवानगी दिली असतां मोतद्दारानें मला बसण्यास अडथळा केला आणि आपल्या हुकुमाचा भंग केला. सर्व राज्यांत आपला हुकूम मानला जात असतां मोतद्दारानें तो मानला नाहीं हें मला सहन झालें नाहीं म्हणून मी त्यास हें अल्पसें शासन केलें. वास्तविक पहातां ही शिक्षा त्याच्या गुन्ह्याचे मानानें फारच थोडी आहे असें समर्पक उत्तर दिलें. नानाही अतिशय धोरणी असल्यामुळें, ही घोडी आतां मी वापरणार नाहीं असें मोतद्दारास सांगणें अत्यंत वाईट दिसेल हें जाणून; केलेंत तें फार चांगलें केलेंत; आतां ही घोडी आपलीच झाली; आपण हिजवर नेहमींच बसत जावें असें सांगून ती घोडी त्यांच्याकडे तशीच दिली व मोतद्दार, चंदी, वैरण व रतीब सरकारांतून चालू ठेवला.

याच सुमारास टिपूनें इंग्रजांना हिंदुस्थानांतून हांकलून देण्याचा चंग बांधला. त्याच्या विरुद्ध निजाम व पेशवे यांस चेतवून त्यांच्याकडून टिपूला नाहींसा करण्याचें कारस्थान इंग्रजांनीं चालविलें. या लढाईच्या धामधुमी

म्हणजे धोंडोपंतांच्या भाग्योदयाच्या पर्वणी होत्या. मग ते त्यांत भाग घेतल्याशिवाय कसे रहातील? त्यांनीं नवीन जोमानें या लढाईत भाग घेतला. टिपूच्या लष्करांतील पेंढारी यांच्या भेदनीतिमुळें मराठ्यांच्या लष्करांत आले. पेंढारीच ते, त्यांना स्वामिनिष्ठेपेक्षां लूटमार करणें जास्त प्रिय होतें ते उगीच लढाईच्या भानगडींत कशाला पडतील? त्यांच्या पैकीं निवडक ५०० स्वारांची परिक्षा घेतल्यावर त्यांतीलच तीन पुढाऱ्यांना त्यांचे मुख्य नेमलें व ते सर्व अप्पासाहेबांचे पदरीं ठेवले. त्या सर्वांवर आपले वतीनें आपले पूर्वीचे सहाध्यायी गणेशपंत साठे यांची मुख्य कारभारी म्हणून निवड केली. त्यांस दरमहा ३०० रु. तैनात ५ स्वार पोकलीस व दरमहा १५ रुपये पगाराचा हाताखालीं कारकून, शिवाय बसावयास दोन घोडीं अशी त्यांची व्यवस्था केली. पुढें त्या तीन सरदारांस व गणेशपंतांस धोंडोपंतांनीं सरकारांतून वस्त्रें देवविलीं. तेव्हांपासून गणेश-पंतांचा पण उदयकाळ येत चालला.

पुण्यांत असतांना धोंडोपंतांनीं दोन्ही पुतण्यांना उत्कृष्ट तऱ्हेचें लष्करी शिक्षण दिलें. आसपास असलेलीं बंडें मोडण्याचें काम आपल्या अंगावर पडलें असतांना ते नेहमीं त्यांना आपल्याबरोबर नेत. ते अल्पवयी म्हणून त्यांनीं त्यांना केव्हांच मागें ठेवलें नाहीं. ते स्वतः उत्कृष्ट लढवय्ये होते आणि आपले पुतणेही त्याप्रमाणेंच व्हावे अशी त्यांची उत्कट इच्छा होती. लढाई प्रत्यक्ष पाहिल्यानें त्यांना लढाईचा अनुभव चांगला येत असे व शिक्षणही सप्रयोग मिळे. बापू अनुकरणपटू होते. त्यांनीं या लढायांपासून आपल्या ज्ञानांत फार भर टाकली. शत्रूची लढण्याची पद्धत चांगली वाटल्यास तीही ते स्वीकारीत.

कांहीं दिवस पुण्यास राहिल्यानंतर त्यांना नाना फडणिसांबरोबर शके १७०८ सालीं कर्नाटकांत जावें लागलें त्यावेळीं हैदरअल्ली हा आपल्या धन्याचें राज्य घशांत टाकून फार प्रबळ झालेला होता. मराठ्यांच्या मुलखांत जाऊन लूट करणें व तेथील जनतेस अत्यंत त्रास देणें हा त्याचा रोजचा

कार्यक्रम झाला होता. त्याला तोंड देण्याकरितां नानांची स्वारी धोंडोपंतांना बरोबर घेऊन कर्नाटकांत गेली.

कर्नाटकांत गेल्यावर त्यांना धोंडजी वाघाशीं लढावें लागलें. वाघ पट्टणाहून दोन तीन हजार स्वारांनिशीं पळून जात असतां गोखल्यांचे फौजेशीं त्याची गांठ पडली. घनघोर लढाई होऊन त्यांत वाघाचा पाडाव झाला. वाघ पळून गेला. या लढाईत बापूंस व त्यांचे सरदारांस २-३ शें घोडीं व बरीच चीजवस्त सांपडली. या लढाईत गणेशपंत साठे यांनीं आपलें कौशल्य अप्पासाहेबांच्या नजरेस चांगल्या तऱ्हेनें आणून दिलें. त्यांच्यावर मृत्यूचा घालाच आला होता पण 'काळ आला पण वेळ आली नाहीं' ही म्हण सार्थ ठरून ते बचावले. अप्पासाहेब गुणग्राही होते. त्यांनीं आपल्या सहकाऱ्याची प्रशंसा योग्य शब्दांत धोंडोपंतांजवळ केली व ६ मोठीं घोडीं, रोख चीजवस्त वगैरे ३ हजार रुपयांचे जिन्नस असें देऊन धोंडोपंतांनीं त्यांचा गौरव केला.

त्याचप्रमाणें टिपूचा दुसरा वकील हैद्राबादेस सरकारकामास २ शें स्वारांनिशीं जात होता ती बातमी बापूंस समजल्यावर त्यांनीं गणेशपंतांस त्याच्यावर हल्ला करण्यास पाठविलें. त्यास जिवंत धरून आणण्याचा हुकूम झाल्यामुळें बारा कोस कूच करून जाऊन त्यांच्या जिवास काडीचाही अपाय होऊं न देतां सावनूर मुक्कामीं लष्करांत पकडून आणिला. व धोंडोपंतांनीं त्यास चौकी देऊन त्याची घोडी व दौलत मिळून एक लक्ष रुपये त्याचे पासून वसूल केले. गणेशपंतांस बक्षिसादाखल १२ शें रुपये मिळाले.

श्रीरंगपट्टणावर दोस्ताची स्वारी झाली असतां तेथें बापूंनीं फारच मेहनत केली त्याप्रमाणेंच बदामी किल्लाही हस्तगत करून दाखविला. टिपूविरुद्ध लढण्याची सुरवात करून देऊन नानांची स्वारी पुण्यास आली. येतांना त्यांनीं गोखल्यांस परशुरामभाऊ पटवर्धनांच्या हाताखालीं काम करण्यास ठेऊन दिलें.

धारवाडचा किल्ला हा एक दुर्गम तट समजला जात असे. विजयानगरच्या वैभवशाली हिंदू साम्राज्याच्या अधिपतीनें तो बांधला तेव्हांपासून अनेक संकटांना व कालाच्या प्रभावी ओघाला दाद न देतां तो यावेळेपर्यंत अभंग राहिला होता. तो हातीं घेण्याकरितां व कर्नाटकांत टिपूला पायबंद बसविण्या-करितां नानांनीं हरीपंत फडके हुजरत फौजेसुद्धां व परशुरामभाऊंना त्यांच्या २० हजार फौजेसह पाठविलें. त्यांनी पुण्याहून येतांच धारवाड किल्ल्यास शह दिला व मोर्चे बंद करून लढाई चालविली. बरेच दिवस लढाई चालविल्यानंतर अन्नपाण्याचा पुरवठा होईना म्हणून टिपूचे स्वार किल्ला टाकून पळून गेले. टिपूचा सरंजाम व फौजही जवळच होती त्यामुळें परशुरामपंतांना आपल्या सैन्यांत रात्रीं जागता पहारा ठेवावा लागत असे. धारवाडच्या पहाऱ्याचें (छबिना संभाळण्याचें) काम बापू गोखले यांचेकडे आलें. त्यांनीं कुसुगल किल्ल्याच्या रोखानें छबिन्यास रात्रीं हजार स्वार व पायदळ ठेविलें होतें. एक दिवस टिपूच्या सैन्यानें अकस्मात पहांटेच्या सुमारास त्यांच्यावर हल्ला करून बाण व तोफा यांचा वर्षाव केला; पण त्यांनीं आपली जागा एक इंचही सोडली नाहीं. उलट तोफांची मारगिरी सोसून शत्रूचे स्वारांवर चढाई पुष्कळच केली. दोघांच्या सैन्याची पहांटेच्या मंदप्रकाशांत सरमिसळ होऊन तरवारींचा खणखणाट चालू झाला. शत्रू मित्र ओळखतां येणें हें मोठ्या मुष्किलीचें काम होऊन बसलें. सुलतानाकडील दहावीस मुख्य सरदार जखमी होऊन फौजेचें तोंड करवटलें. मुख्य सरदार जखमी झाल्यामुळें बाकीचे सैनिक सैरावैरा पळूं लागले. अशा रीतिनें शत्रूची दाणादाण उडाल्यानंतर उजाडलें. व लढाईही थांबली. या लढाईंत बापूंकडील १००–१२५ माणसें ठार झालीं. नंतर ते लष्करांत आले. परंतु त्यांच्या कीर्तिचा परिमल परशुराम-पंतास आधींच हुंगावयास मिळाला होता. बापू लष्करांत आल्यावर त्यांनीं पहिल्यानें जखमी लोकांची बडदास्त उत्तम ठेविली. परशुरामपंतांना अत्यंत संतोष झाला व त्यांनीं झाल्या हकीगतीचें पत्र पुण्यास नानांस लिहीलें. त्यांत त्यांनी गोखल्यांची फारच प्रशंसा केली होती. आपली निवड योग्य ठरलेली

पाहून नानांसही अत्यानंद झाला व त्यांनीं सवाई माधवरावांस सांगून बापूंस पागा व वस्त्रें देण्यास परशुरामभाऊंकडे पाठविलीं. तीं शुभ दिवस पाहून परशुरामपंतांनीं धोंडोपंत, अप्पा व बापू यांस सन्मानपूर्वक दिलीं. त्यांच्या सरदारांसही बक्षिसें देवविलीं. श्रीरंगपट्टणच्या लढाईत गोखले अखेरपर्यंत राहिले व त्यांनीं कामगिरी पुष्कळ केली हें पाहून सवाई माधवराव पेशव्यांची त्यांच्यावर फार कृपादृष्टी झाली.

कर्नाटकांत तुंगभद्रेनजिक हुनगी म्हणून एक मोठें गांव आहे. त्या गांवाभोंवतीं कोट असून आंत किल्ल्याप्रमाणें गढी बांधलेली होती. हा तालुका त्यावेळीं काटक लोकांचे ताब्यांत होता. ते आपल्या तोफा व ५ शें लोकांसह त्या गढींत रहात. कोणत्याही सरकारी अंमलदारास आपले गांव मोठें आहे हें दिसूं नये व त्यानें आपणाजवळ जास्त वसूल मागूं नये म्हणून ते सरळ आंत येऊं देत नसत. दरसाल वसूल करण्यास मामलेदाराची स्वारी तेथें गेली म्हणजे ते आपलें सर्व सैन्य घेऊन बाहेर पडत व त्याचेवर हल्ला करून त्यास पकडून व त्याचे डोळे बांधून त्यास गढींत नेत. तेथें गेल्यावर त्याचे डोळे सोडून त्यास आपल्या मर्जीप्रमाणें वसूल देत व पुन्हां डोळे बांधून बाहेर आणून सोडीत.

परंतु असा बेबंदशाही कारभार दरवर्षीं चालणें शक्य नव्हतें. हा अपमान प्रत्येक मामलेदार सहन करणें ही अशक्य गोष्ट होती. त्यांनीं आपली तक्रार थेट गोखल्यांपर्यंत नेऊन पोंचविली व अशा प्रकाराला वेळींच आळा न घातला तर बाकीचे हिंमतवान लोक असाच प्रकार सुरू करून राज्याच्या स्थैर्यास धोका बसेल असेंही बजावलें. धोंडोपंतांसारख्या करड्या मनुष्यास ही गोष्ट पसंत कशी पडणार ? त्यांनीं लगेच सर्व सैन्यास तयार रहाण्याचा हुकुम देऊन स्वतः तिकडे निघून गेले. सैन्य येतांच त्यांनी गांवांवर चाल केली. काटक लोकांनीं तटाच्या आंतून गोळीबारास सुरवात केली. परंतु अनेक कसोटीच्या लढाया लढलेल्या गोखल्यास त्याचें विशेष वाटलें नाहीं. गोळीबार सुरू होतांच त्यांनीं तट फोडून आंत शिरकाव करून घेतला व हातीं

सापडलेल्या सर्व लढवय्या काटकांचा शिरच्छेद करून ती गढी जमीनदोस्त करून टाकली. आपलेकडील कारकून व शिबंदी ठेऊन तेथील कारभार त्यांचे हातीं सोंपविला त्याचप्रमाणें जेथें जेथें बंड झाल्याच्या बातम्या आल्या तेथें तेथें स्वतः जाऊन, प्रसंग पडल्यास लढाई पुकारून, त्यांस जेरीस आणून त्यांनीं आपला अंमल बसविला. यामुळें वसूल सुरळीत व वेळच्यावेळीं येऊं लागला.

इतक्यांत टिपूवर जोराचा हल्ला करण्याच्या पेशवे, इंग्रज व निजाम यांच्या बेतास मूर्तस्वरूप आलें व पटवर्धनांनीं बापूंना आपणांस मिळण्याविषयीं पत्र लिहीलें. तें पत्र पोचतांच धोंडोपंत २ हजार स्वारांनिशीं परशुरामपंतांस येऊन मिळाले. मराठ्यांची एकंदर फौज २५ हजार होती. एक दोन दिवसांतच शत्रूचे फौजेची गांठ घ्यावयाची, पण कृष्णा नदीस फार पूर आल्यामुळें नदी कांठींच मुक्काम करणें त्यांस भाग पडलें. सेनेचा तळ नदीकांठीं पडला असतां एके दिवशीं टिपूच्या पेंढाऱ्यांच्या पथकांतील ५ शें स्वार या सेनेच्या पलीकडील बाजूस कृष्णा नदीच्या कडेवर येऊन उभे राहिले. या स्वारांचा कोणी समाचार घेईल तर फार चांगलें होईल असें परशुरामभाऊ सहज म्हणाले. आपला पराक्रम दाखविण्याची ही संधी धोंडोपंत थोडीच वांया दवडणार? त्यांनीं तें काम आपल्याकडे घेऊन डेऱ्यांत जाऊन तीनशें लोक निवडून घेतले. सर्वांची तयारी झाल्यावर त्यांनीं तोंडांत तरवारी धरून नदींत उड्या टाकल्या. व नदीपार पोहून गेले. एवढ्या भयंकर पुरांतून आपल्यावर कोण चालून येणार अशा घमेंडींत टिपूचे स्वार बसले होते. त्यांना या पोहणारांचें कौतुक वाटलें व ते जसजसे जवळ येऊं लागले तसतसा त्यांना विस्मयही वाटला पण अशा रीतीनें आपलें मरण संनिध येत आहे अशी त्यांना कल्पनाही झाली नाहीं. पण ही मंडळी तीरावर येतांच चेहऱ्यावरचें औत्सुक्य मावळून जाऊन त्याची जागा भीतिनें घेतली व अभिनंदन करण्याकरितां तयार ठेवलेल्या हातांना तरवारी शोधण्याकरितां सरसावें लागलें. धोंडोपंत जे किनाऱ्यावर पोंचले ते हरहर महादेव अशी गर्जना करीतच. धर शत्रू कीं हाण असा त्यांनीं सारखा सपाटा चालविला. ह्या लढाईत टिपूकडील

स्वारांपैकीं ५०–६० जखमी झाले व बाकीचे वाट सांपडली तिकडे पळत सुटले. हा पराक्रम पलीकडून सर्व सेना पहातच होती. त्यांनीं हरहर महादेव अशी गर्जना करून आपल्या वीरांचें अभिनंदन केलें. शत्रू पळून गेलेला दिसतांच धोंडोपंतांस आणण्याकरितां पटवर्धनांनीं नांवा पाठविल्या. नांवांत बसून विजय मिळवून धोंडोपंत परत आपले तंवूंत आले.

निजामाचे लोक शत्रूच्या हातीं सांपडले असतांना मित्रकार्य म्हणून धोंडोपंतांनीं टिपूच्या सैन्यास जेरीस आणून त्यांची सुटका केली या प्रसंगीं धोंडोपंतांचे तोंडावर व बापूंच्या मनगटावर जबर जखमा लागल्या. निजामास हें कळतांच तो फार खूष झाला व त्यानें गोखल्यांस दहा हजारांचा मुलूख इनाम दिला.

टिपूशीं झालेल्या लढायांत धोंडोपंतांनीं आपली कर्तबगारी जनतेच्या नजरेस चांगल्या तऱ्हेनें आणून दिली. शत्रूस धोंडोपंत हें नांव ऐकतांच थरकांप होत असे. वरील प्रत्येक लढाईत बापूंनीही महत्वाचा भाग घेतला होताच. पेशव्यांस त्यांचा फारच मोठा आधार वाटूं लागला. कर्नाटकांत कोठेंहीं बंड उद्भवलें तरी गोखल्यांची नेमणूक तेथें केल्यास त्यास सहज पायबंद बसून शत्रूचा बींमोड होत असे व त्या योगानें पेशव्यांचा दरारा वाढत असे.

सावनूर तालुक्यांत पुरदया अरलीकटगी करंदुगी महालांत होता. तो २–४ हजार लोक आपल्या हाताखालीं घालून सबंध तालुक्यांत धुमाकूळ घालीत होता. पेशव्यांकडे या प्रकरणाबद्दल बोभाटा जातांच त्यांनीं त्याचें पारिपत्य करण्याविषयीं धोंडोपंतांस लिहीलें. सरकार हुकूम हातीं पडतांच त्यांनीं मजल दर मजल कूच करून सावनूरावर छापा घालून पुरदयावर गलप ठोकला. घनघोर लढाई होऊन पुरदया ससैन्य जमीनदोस्त झाला. बंडाचें पारिपत्य करून त्यांनीं सावनूर तालुक्यांतच आपलें बस्तान ठोकलें. पण कोठून कळ फिरली कोणास ठाऊक ती फिरली खरी व नाना फडणिसांची त्यांचेवर

इतराजी पण झाली आणि त्यांच्या हाताखालचे सर्व सैन्याला एकदम पुण्यास येण्याचा हुकूम मिळाला. व तोफखाना पानशे यांचे हाताखालीं देण्याचा हुकूम झाला व सर्व तालुक्याची व्यवस्था भीमराव पानशे यांचेकडे सोंपविली गेली.

यावेळचें धोंडोपंतांचें वर्तन लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यांचा सर्वस्वी वृत्तिच्छेद झाला होता इतकेंच नव्हे तर सरकारी काम इमानेंइतबारें करून व प्रसंगविशेषीं–नव्हे नित्य–प्राण धोक्यांत घालून त्यांनीं कर्नाटकांतील सरकारी दौलत संभाळली होती. त्याचा परिणाम उलट झालेला पाहून त्यांचा मनक्षोभ होणें स्वाभाविक होतें. बंड करून आपण मिळविलेली जहागीर आपल्या ताब्यांत ठेवावी असा विचार त्यांनीं केला असता तर तेंही अशक्य नव्हतें. पण असल्या देशद्रोही विचाराचा त्यांनीं आपल्या अंगास स्पर्शही होऊं दिला नाहीं. अपमानानें अंगांतील रक्त सळसळत असतां त्यांनीं तें सुविचारानें थंड केलें व अनुकूल संधीची वाट पहात ते स्वस्थ बसले.

परंतु नानांस स्वतःची चूक लवकरच कळून आली. त्यांचा सर्व भर पानशांवर होता. पण पानशे स्वतः शूर असले तरी राज्य संभाळण्याचें काम त्यांना अवजड जाऊं लागलें. निरनिराळीं बंडें उद्भवूं लागलीं व त्यांना आटोक्यांत आणणें शक्य नव्हतें. धोंडोपंत स्वाभिमानी होते. ते आपण होऊन पानशांचे मदतीस गेले नाहींत. कर्नाटकांत बखेडा माजल्याचा बोभाटा सारखा पेशव्यांचे कानांवर येऊं लागला व त्यांनीं नाना फडणिसांस त्याचा जाब विचारला. शेवटीं नानांनीं पुन्हां धोंडोपंतांस बंडाचा वींमोड करण्या-साठीं कळविलें व अनुकूल संधी येतांच त्यांनीं ती साधून खालीं ठेवलेलें शस्त्र पुन्हां हातीं धरलें.

नानांना आपला निश्चय बदलण्यास मुख्य कारण निजामअलीशहा असलीखान हा झाला. त्यानें हजारावारी सैन्य आपल्या हाताखालीं जम-विलें होतें व सबंध हुनगुंद तालुका बळकावला होता. दररोज कांहींना कांहीं

तरी पेशव्यांचा मुलुख वळकावल्याशिवाय त्यास चैनच पडत नसे असें म्हटलें तरी चालेल. त्याच्या बंडाबद्दल पानशे आदी सरदारांकडून एकसारखीं नानांस पत्रें येऊं लागलीं. त्याचें पारिपत्य धोंडोपंतांशिवाय दुसऱ्या कोणा-कडून होणार नाहीं अशी त्यांची खात्री पटली व म्हणून बापूंस सनदा, वस्त्रें, व शिक्का कट्यार देऊन त्यांची पुण्याहून कर्नाटकांत रवानगी केली.

धोंडोपंत हुनगुंदास पोंचतांच शहादत अलीखान हा आपलें सर्व सैन्य घेऊन त्यांचेवर चालून आला. यावेळीं त्यांच्याजवळ फक्त फौज ५ शें एक तोफ व १ हजार पायदळ एवढेंच सैन्य होतें त्या मानानें शहादत अलीखानाची पुष्कळच तयारी होती. त्याचें नुसतें पायदळच ५ हजार होतें. तोफाही बऱ्याच होत्या. गोखल्यांचें सैन्य थोडें असलें तरी त्यांची हिंमत भरपूर होती. शत्रूस पाठ दाखवणें हें त्यांचें ब्रीदच नव्हतें. त्यांनीं आपल्या थोड्या पण शेलक्या सैन्याला उत्तेजनपर गोष्टी सांगून बराच धीर आणला. जेथें धनीच पोलादासारखा खंबीर तेथें इतरांचीं मनें तितकींच वेडर असणें स्वाभाविकच. त्यांनीं ' हरहर महादेव ' अशी गर्जना करून शत्रूच्या चढाईस तोंड दिलें. दोन्ही बाजू चांगल्याच हातघाईवर आल्या. दोन घटकांपर्यंत सारखा तरवारींचा खणखणाट चालू होता. त्यांच्या आवाजापुढें दुसरा कोणताच आवाज टिकला नाहीं. सैन्याची अशी धुमश्चक्री चालू असतांनाच शहादतअली व धोंडोपंत यांची गांठ पडली. त्याच्या आधीं बराच वेळ तो धोंडोपंतांस शोधीत होता. दोन्हीही कसलेले आघाडीचे वीर आणि अशा रोमहर्षण प्रसंगीं आलेला भरपूर चेव असा संगम घडला. ' हरहर महादेव ' व दीनदीनच्या गर्जना सारख्या चालू होत्या. दोन्ही वीरांचें बराच वेळ तुंबळ युद्ध झालें. कोण जिंकतो याची खात्री देणें फार अशक्य झालें. इतक्यांत गोखल्यांच्या उजव्या हातावर शत्रूचा वार लागला. जखम जबर आणि तीही हातावर पण ते घाबरले नाहींत. ' **पतनामुळें गुणिल्याबळें द्रुत भीमसा उसळे पुन्हां** ' या यशवंतांच्या स्फुर्तिप्रद ओळीप्रमाणेंच त्यांचें झालें. त्यांनी तशाच जखमी

हातानें शत्रूवर जोरजोरानें घाव घातले. त्याचा आवेश शत्रूस सहन झाला नाहीं. त्यांनी जोरानें शेवटचा घांव मारून शत्रूचा हात कलम करून टाकला. तेव्हां अर्थातच पठाणानें आपला घोडा माघारा वळविला. पण त्याचा तोही प्रयत्न सफळ झाला नाहीं. धोंडोपंतांनीं त्याचा डाव ओळखून त्याचेवर झेंप टाकली. दोघांचीही मिठी पडून ते घोडयाखालीं आले. शहादत अली-खान निःशस्त्र होता तो सहजच गोखल्यांचे हातीं सांपडला. या लढाईत त्यांचे वरेचसे सरदार जखमी झाले तरी सैन्यानें धीर सोडला नाहीं. अप्पा व बापू यांनांही जबर जखमा लागल्या. त्यांनीं आपल्या शौर्याची शर्थ केली होती. शत्रूकडील लोक तर अतोनातच मेले. शहादत अलीखान वगैरे वरेचसे मुख्य सरदार गोखल्यांचे हातीं लागले. पठाणांचा पूर्ण पाडाव झाला. त्यांची फौज लुटून फस्त करण्यांत आली.

शहादत अलीखान हातीं लागला तरी त्याची खरी योग्यता गोखले जाणून होते. त्यांनीं त्याचा बहुमान करून त्याच्या जखमा बांधल्या, त्याच्या शिल्लक राहिलेल्या सैन्याला त्यांचा योग्य तो सन्मान करून पाठवून दिलें. ते स्वभावतःच दिलदार होते. त्यांनीं निःशस्त्रावर शस्त्र चालविलें नाहीं.

यानंतर सवाईमाधवराव पेशव्यांचें निधन झालें. आटोकाट प्रयत्न करून नानांनीं मूर्तस्वरूपास आणलेल्या मराठी राज्याचा आधार ढांसळला. शत्रूकडे लक्ष देऊन त्याची रग जिरविण्याऐवजीं पुण्यांतील सर्व मुत्सद्यांचें लक्ष आपापसांतील यादवीकडे खेंचलें गेलें पेशव्यांच्या आत्महत्येला दुसरा बाजीराव कारणीभूत असल्याचा अपवाद खरा असो वा नसो पण त्यास अनुकूल संधी प्राप्त झाली ही गोष्ट खरी. त्याच्यावर असलेलें सवाई माधवरावाचें दडपण निघाल्याबरोबर त्यानें आपल्या कार-स्थानांस सुरवात केली. हा काळ नारायणरावांच्या वधाच्या वेळेसारखा संक्रमणावस्थेचा होता. त्या वेळेला गंगाबाईला मुलगा झाला व बारभाईचें कारस्थानही फळाला आलें. पण त्या वेळेचा जोर व एकोपा मराठ्यांत शिल्लक

राहिलेला नव्हता. नाना वृद्ध झाले होते. परशुरामभाऊ पटवर्धन, हरीपंत फडके, सखारामबापू वगैरे रणधुरंधर सेनानायक व मुत्सद्दी कालवश झाले होते. शिवाय गंगाबाईला मुलगा होणें व नानांच्या पुढील बेताप्रमाणें चिमाजीअप्पाला सवाई माधवरावांचे पत्नीचे मांडीवर दत्तक देणें यांत बराच फरक होता. नारायणरावाचा खून करविल्यामुळें राघोबाबद्दल लोकांचीं मनें कलुषित झालेलीं होतीं व नारायणरावाला ( नात्यानें पहिल्या बाजीरावाच्या थोरल्या वंशजाला ) मुलगा झाला. पण येथें सुरवातीस तरी दुसऱ्या बाजीरावाविरुद्ध तक्रार करण्यास लोकांना जागा नव्हती. शिवाय पेशव्यांच्या शिल्लक असलेल्या वंशजांस तो मानानें श्रेष्ठ म्हणून त्याचा हक्क धुडकावून लावणें शक्य नव्हतें. संभाजीला—तो व्यसनी असला तरी—नजर कैदेंत ठेवून शिवाजीचे मरणानंतर राजारामाचे हातीं कारभार देणें ज्या मनोवृत्तीमुळें अशक्य झालें तीच मनोवृत्ती येथेंही आड आली व नानांच्या हेतूंवर स्वार्थीपणाचा आरोप लादणें त्यांच्या प्रतिपक्षियांना शक्य झालें. अर्थस्य पुरुषो दासः या म्हणीप्रमाणें शिंद्यानें बाजीरावास गादीवर बसविलें. कोणालाहीं स्वप्नांतसुद्धां अशक्य वाटणारी गोष्ट—नाना फडणीसांना अटक—ही घडून आली. पण राजकारणांत असे प्रकार अनेक ठिकाणीं घडतातच.

या सर्व उलाढालींचा परिणाम राज्यावर स्वाभाविकपणेंच झाला. यांच्या आपापसांतील यादवीमुळें शत्रूचें आयतेंच फावलें. त्यांनीं जिकडून तिकडून उचल केली. आजपर्यंत अनेकवेळीं धूळ खाऊन मनगटें चावीत बसलेल्या निजामादि धूर्त लोकांना जोर आला. स्वराज्याचे छत्र आपापसांतील दुहीनें मध्यभागीं व शत्रूच्या हल्यांनीं बाजूंनीं जोरजोरानें फाटूं लागलें. त्यांचा बंदोबस्त करतां करतां धोंडोपंतांसारख्या कसलेल्या इमानी योध्याचा जीव मेटाकुटीस येऊं लागला व त्यामुळें आहे तें राखणें अशक्य होऊन बसलें ही दैवी आपत्ती होती. तिला प्रतिबंध घालणें लोकांना शक्य झालें नाहीं; तरीसुद्धां त्यांनीं गुरुच्या आज्ञेवरून पाण्याचा लोंढा स्वतःच्या देहानें अडवूं पहाणाऱ्या शिष्याप्रमाणेंच आपल्या पराक्रमाची पराकाष्ठा केली.

बापू गोखले सेनापति होते मग त्यांनीं इंग्रजांना त्यांच्याच युक्त्यांचें अनुकरण करून जेरीस कां आणलें नाहीं, असा प्रश्न इतिहासाच्या अल्प ज्ञानावर विसंबून रहाणाऱ्या लोकांकडून अनेकदां विचारला जातो. बरेच जणांची समजूत बापू गोखले नेहमीं पुण्यासच होते अशी आहे. जन्मभर देशाकरतां लढून जीवाचें रान करणाऱ्या या असामान्य योद्धयाचा उल्लेख हिंदुस्थानच्या इतिहासांत एकदोन ओळींतच सांपडत असल्यानें अशी समजूत झाल्यास त्यांचा दोष नाहीं. जीं अनेक बंडें उद्भवलीं त्यांत त्यांना आपली सर्व शक्ति खर्च करणें भाग पडलें. एकाच वेळीं स्वकीय परकीय अशा दोन चार योद्धयांशीं लढावयाचें म्हणजे ती कांहीं सोपी गोष्ट नाहीं. त्यांना कशा टकरा द्याव्या लागल्या याची माहिती पुढील प्रकरणांतून संगतवार येईलच.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. नं.
ता.

# प्रकरण ३ रें

# करवीरकरांचा बंदोबस्त.

सवाई माधवराव वारल्यानंतर नानांनीं दुसऱ्या बाजीरावाचा धाकटा भाऊ चिमाजी अप्पा यास पेशव्यांच्या गादीवर बसविण्याची खटपट केली. पण तिला यश न येतां बाजीरावच शिंद्यांचे मदतीनें गादीवर आरूढ झाला. आपल्या हक्कांची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्याची नानांवर व त्यांच्या मदतगार मंडळींवर इतराजी झाली व त्यांचा सूड उगवण्याकरितां त्यांना कैदेंत टाकण्यांत आलें. पुण्यांत कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी स्थिती झाली. कांहीं दिवस शिंदे करतील तें कारण असा प्रकार चालला होता.

पुण्यांतील कर्तबगार मंडळी अशा तऱ्हेनें बाहेर लक्ष पुरवण्यास असमर्थ ठरलेली आढळून आल्याबरोबर प्रत्येकाला रान मोकळें सापडलें. जो तो इतरांच्या हक्कांवर आक्रमण करू लागला. त्यांतच जिवबा पोतनीस व चतरसिंग यांचें बंड आणि सातारकर व करवीरकर महाराज यांचे दंगे यांची गणना होते. वास्तवीक पहातां या सर्वांस बंडाच्या एकाच स्वरूपांत घाल- ण्यास हरकत नाहीं. शेवटचे दोघे जरा जास्त प्रतिष्ठित होते म्हणून त्यांच्या बंडास दंगा म्हटलें गेलें एवढेंच.

या अंदाधुंदीच्या काळांत बाजीरावानें धोंडोपंतांना आपल्या हाताखालीं ५ हजार फौज ठेवण्याची परवानगी दिली. त्याशिवाय धारवाड किल्ल्यांतील दोन तोफा व तिकडील तालुक्यांतून खर्चाकरितां १ लाख रुपयांची वरात दिली. यामुळें धोंडोपंतांचा उत्कर्ष होऊं लागला.

करवीरकरांना रत्नाकरपंत राजाज्ञा नांवाचा तसाच धडाडीचा दिवाण मिळाला होता. त्यानें ही संधी पाहून चढाईचें धोरण स्वीकारलें. गोकाकचें ठाणें ताब्यांत घेतलें व त्या गांवांतून २–४ लाख रुपये खंडणीदाखल वसूल केले. नंतर वण्णूर कावीज करण्यांत आलें व त्यांनी आपली नजर हुबळीकडे वळविली. इतकें झाल्यावर तिकडील सुभेदारांनीं–पटवर्धन–रास्ते–गोखले–यांनीं पेशव्यांकडे तक्रार केली; त्यांनीं 'करवीरकरांस शिंद्यांकडून ताकीद देवविली आहे' असें उत्तर दिलें. पण याचा उपयोग कितपत होणार हें करवीरकर जाणून होते. ते या जरबेला थोडीच भीक घालतात. त्यांनीं सावनूरचे अकराचे अकरा महाल आपल्या हाताखालीं घातले. त्यांची चलती पाहून कित्तुरकर देसाई त्यांना जाऊन मिळाला. कित्तुरकर देसाई हा पहिल्या नंबरचा लुटारू होता. कोठून कां मिळेना पैसा मिळाला कीं झालें एवढेंच त्याचें ध्येय होतें.

पेशव्यांकडून कांहीं मदत होत नाहीं असें पहातांच धोंडोपंतांनीं स्वतंत्र रीतीनें करवीरकरांचें पारिपत्य करण्याची तयारी आरंभली. ते बापूजी शिंदे यांना बरोबर घेऊन हुबळीकरांच्या मदतीस निघाले. परंतु करवीरकरांनीं त्यापूर्वींच हुबळीचें ठाणें घेतलें होतें म्हणून त्यांनीं आपला मुक्काम मुदलावलीस केला. यावेळीं रत्नाकरपंत यांचा मुक्काम तेथून तीन कोसांवर सुरीवन नजीक जोरगल गांवीं होता. वाटेंत गोखले यांनीं यादवाड प्रांतातील पांच खेड्यांपासून खंडणी वसूल केली. अखेरीस त्यांनीं मौजे कारडगी, तालुका सावनूर येथें रत्नाकरपंतांस गांठलें आणि लढाईस तोंड लावलें.

१६–१७ आगस्ट रोजीं रत्नाकरपंत व धोंडोपंत यांचें युद्ध झालें. त्यामध्यें दोन्ही बाजू समान ठरल्या. आपा व बापू या दोघांस जखमा लागल्या. त्या फार महत्वाच्या नसल्या तरी त्या बऱ्या होण्यास एक महिना लागला. मध्यंतरीं रोज थोडी वहुत झुंज होतच होती. दोन्ही बाजूंचा जय सारखाच होता. कोणीं कोणाला हटेना. म्हणून धोंडोपंतांनीं त्याचा एकदां सोक्षमोक्ष लाऊन टाकण्याचें ठरविलें व आपल्या सैनिकांना बोलावून

युद्धाची सिद्धता केली. तिचें व त्यानंतर झालेल्या तयारींचें लढाईचें वर्णन कृष्णाजी परशुराम गद्रे यांनीं खालील पत्रांत केलें आहे.

श्री. ( भाद्रपद व. ९, ४ आक्टोबर १७९८ )

सेवेसीं कृष्णाजी परशुराम गद्रे सा. नमस्कार विज्ञापना वि. तागायत छा। २३ रविलाखर गुरुवासर ४ घटका दिवसपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. छ. २२ रविलाखर रोजीं करवीरकरांच्या फौजेबरोबर लढाई झाली त्याचा तपशील कलमें.

१ मंगळवारीं भोजनोत्तर सर्वत्र मानकरी भले लोक व शिलेदार व गाड्यांचे जमादार व रोहिले व आरब वगैरे यांस बोलावून दादांनीं सांगितलें कीं, " करवीरकर महाराज यांचे फौजेचें प्राबल्य होऊन दिवसें-दिवस बळावत चालली. सावनूरचे रस्ते बंद झाले. दाणा मिळत नाहीं. खर्चाचा गवगवा, ( तुमची ) तलबही चढली आहे. आणि कृष्णराव देशपांडे कारडगीकर हे दक्षिणस्थांची फौज कारडगीनजिक आहे तेथें कुमक आणावया-बद्दल गेले आहेत. कुमक आल्यानंतर सर्व एकत्र होऊन शहरावर चालोन घ्यावें असा शत्रूचा बेत ठरावांत आला. सावनुरांत खैरुमिया ( सावनूरचा नबाब ) आहे त्याचेंही संधान करवीरकरांकडेच आहे हें पक्केंच समजणेंत आहे. त्याक्षणीं दिवस घेऊन परिणाम नाहीं. तूर्त मजजवळ पैसा नाहीं. परंतु माझ्या रक्षणार्थ श्रीमंतांचें पुण्य आहे तेंच पार पाडणार. तुम्हीं सर्वत्रांनीं मजवर कृपा करून करवीरकरांची फौज फार व आम्ही थोडे हें चित्तांत न आणतां मारुतीचें नांव घेऊन तीन टोळ्या करून लहानथोरांनीं एकसारखें चालोन घ्यावें. माझी जखम ओली आहे. परंतु श्रीमंतांचें कृपें या प्रसंगीं ती जखम ओली आहे असें मला भासत नाहीं. सर्वत्रांनीं कृपा केली असतां फत्ते होतें. अगर दुसरें, सर्व संकटांतून पार होतों ! " या रीतिनें दादांनीं पदर पसरून सर्वत्रांस मागोन घेतलें तेव्हां सर्वत्रांनीं म्हटलें कीं दादा, ' आपण धन्याच्या जागीं आहांत आपण जी आज्ञा केली ती आम्हांस मान्य

आहे. आपणांस जखमा लागल्या त्या समयीं आम्हां सर्वत्रांची चाकरी घडली नाहीं. आमच्या चित्तांत आपली आज्ञा व्हावी इतकेंच मागणें आहे." सर्वांचें बोलणें एकच पडोन सर्वत्रांस मान्य होऊन चालोन घ्यावयाचा निश्चय ठरला कलम.

१ छ. २२ रबिलाखर रोज बुधवार बारा घटका दिवसास झाडून फौज व पायदळ व कवायती व अरब तोफखाना झाडून सलतनत सुद्धां तयार करून खुद्द दादा पालखींत बसोन शहराबाहेर आले. तों करवीरकरांच्या व आपल्यामध्यें ओढा आहे त्या अलीकडे इकडील फौज गेली. तंव पावेतों करवीरकरांच्या गोटाजवळ छाविना मात्र होता. तो कांहीं आलिकडे येत नव्हता. जागच्याजागींच उभा होता. तें पाहोन पावलोक आम्हांकडील उभे घातले. त्यांचे पाठीवर दोनशें स्वार उभे केले. इतकेंत करवीरकरांकडील लोक ज्या ओढ्यांत होते त्याच ओढ्यांत येऊन पडले. इकडील पायदळास त्यांजकडील पायदळास गोळागोळी होतं होती. हें त्यांनीं पाहोन त्यांची फौज झाडून ५ हजार स्वार खासे तयार होऊन फरा धरोन उभे राहिले. तें दादांनीं पाहोन पहिल्या संकेताप्रमाणें टोळ्या जाहल्या. उजवे बाजूस राजश्री बापू साहेब यांचे मांडीस निव्वळ हजार खासे, डावे बाजूस राजश्री आपासाहेब यांचे मांडीस सात आठशें खासे, मध्यें पायदळ व तोफा व अरब. त्यांचे पाठीमागें खुद्द दादा. (याप्रमाणें) झाडून फौजसुद्धां तयार होऊन चालोन घ्यावयाची योजना करीत असतां इकडील डावे बाजूच्या तुकडीवर करवीर-करांकडील दीड हजारापर्यंत खाशांनीं चालोन घेतलें. ते बंदुकीच्या टप्पेवर निकड करीत आले. पाठीमागें झाडोन त्यांची फौज तयार होऊन येत होती. इतक्यांत इकडील फौजेची मारागिरी व लयनांच्या शिलका (कवायती बंदु-कांच्या पायदळाच्या फैरी) झडूं लागल्या. त्या त्यांणी खातरेंत न आणतां सर्वत्र जपून निकडीनें घोडीं घातलीं. तेव्हां निकडीचा समय. यासमयीं कमती झालीं असतां धर बसणार नाहीं, हें समजोन दादा घोड्यावर बसोन श्रीमंतांचे चरण हृदयांत आणोन दोन्ही टोळ्यांसुद्धां चालोन

घेतलें. उभयपक्षीं खणाखणी अर्धा घटका मातवर झाली. इकडील निकड विशेष जहाली. त्यासमयीं करवीरकरांचा मोहरा किंचित् माघारा झाला. तेव्हां सर्वत्रांनीं निकड करून त्यांबरोबरच त्यांच्या गोटांत शिरले. त्यासमयीं त्यांच्यानें गोटांत निभाव न पडेसें होऊन गोट सोडून निघाले. त्यांच्या पाठीस दोनकोशपर्यंत पाठलाग केला. इतक्यांत अस्तमान जाहला. दिवस असता तर आणखीं पाठलाग होता. परंतु रात्र जाहली. दिसेनासें जाहल्यामुळें माघारे फिरोन त्यांच्या तळावर येऊन मुकाम केला व डेरे राहुट्या, बाजारबुणगें वगैरे झाडून लुटलें गेलें. लूट माफ म्हणोन चालून घेतेसमयीं सर्वांस सांगितलें होतें. कलम.

१ त्यासमयीं खासे ठार व जखमी मिळोन चारशेंपर्यंत अदमासें होईल. मुख्य खुद्द पांढरे सरदार व वेंकटराव घोरपडे व निळकंठराव शिंदे, मनोळकर व मोंगलाकडील पठाण मातवर सरदार होता तो, याप्रमाणें चार असामी ठार जहाले. कोणी जखमी म्हणतात. व हिंमतबहाद्दर यास तीन जखमा लागल्या. याप्रमाणें मोड खाऊन कुंदगोळच्या मार्गानें गेले. कलम.

१ इकडील खासे पायलोक वगैरे सुद्धां दोनशेंपर्यंत ठार व जखमी होतील. अद्याप गणती नाहीं. मागाहून सविस्तर लिहीतों. कलम.

१ सरकारांत करवीरकरांकडील हत्तीवरील साहेब नौबत व निशाणें दोन व तोफा दोन सरंजामसुद्धां हत्ती व पालख्या वगैरे आलें. गणती जाहल्यावर मागाहून कळवितों. कलम.

१ एकंदर लष्करांत लहान मोटे घोडे मिळोन ५-७ शें व उंट पावणे-तीनशें व डेरे दोनसुद्धां व गुरें बकरीं वगैरे लूट भारी जाहली आहे. याचें पक्कें समजेल तें मागाहून लिहितों. तूर्त जाहलें वृत्त समजलें तें जलदीनें कळावें म्हणोन लिहीलें आहे. कलम.

एकूण सहा कलमें लिहीलीं आहेत. सारांश श्रीमंतांच्या पुण्योदयेंकरून व मारुतीच्या कृपेनें मोठें यश आलें. अस्मानी फत्ते जाहली आहे. विदीत

होय हे विज्ञापना. या लढाईचें वर्णन धोंडोपंतांनीं स्वदस्तुरच्या पत्रांत पुढील प्रमाणें केलें आहे.

श्रीगजानन

पै. छ०८ जमादिलावल सन तिस्सा तिसैन

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री गंगाधर स्वामींचे सेवेशीं. पोष्य धोंडो बल्लाळ. कृतानेक सा।। नमस्कार विनंति. येथील कुशल तागायत छ २५ रविलाखर ( ६–१०–१७९८ ) पावेतों आपलें कृपेंकरून वर्तमान यथास्थित आहे विशेष. राजश्री रत्नाकरपंत नि।। करवीरकर यांचा मुक्काम फौजसुद्धां मौजे सावनूर, येथें होता. त्याजवर सरकारची फौजसुद्धां छ २२ रविलाखरीं सायंकाळचे प्रहर दिवसास सर्व गोष्टींचें संकट जाणोन गेलों. लढाई संध्याकाळचे चार घटका दिवसास सुरू झाली. दोन घटका तोफातोफी होत होती. नंतर घोडे घातले. हातघाईची लढाई दोन घटका जाहली. करवीरकरांची फौज अस्तमानीं मोडली. त्यांजकडील ३–४ शें खासा जखमी झाला व सवाशेंपर्यंत ठार झाले. पाउणशेंपर्यंत घोडे ठार झाले. वुणगें झाडून लुटलें गेलें. हत्ती नौबतसुद्धां एक व तोफा दोन व नगारे निशाणे व पांचशेंपर्यंत घोडे लहान मोठे याप्रमाणें पाडाव झाले. पंचवीस तीस त्यांजकडील शिलेदार मंडळी जखमा लागोन पाडाव आले आहेत. त्यांची वरदास्त करून सोडून द्यावयाची चाल आहे त्याप्रमाणें करतों. बाकीची फौज रत्नाकरपंतसुद्धा दाणादाण होऊन अनेक मार्गें बारीपार मनोळीस गेली. सरकारचे फौजेंतील २०० खास जखमी व ठार. पायदळापैकीं पन्नास साठ माणूस जखमी व ठार. घोडे ७५–८० पर्यंत ठार व दोनशेंपर्यंत जखमी याप्रमाणें जहालें. आम्हां तिघांना ( धोंडोपंत, बापू, व अप्पा यांना ) या लढाईत जखम कोणासच लागली नाहीं. श्रीमंताचें पुण्येंकरून खैर आहे. पेशजी लढाईत जखमा मला लागल्या आहेत पण त्याही महिना पंधरा दिवसांत बऱ्या होऊन स्नान

करावयास मोकळीक होईल. लोकांनीं मेहनतही बहुत केली. परंतु यश श्रीमंतांचे प्रतापाचें. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंति.

अशा रीतीनें महिना :दीड महिना झटापट चालून शेवटीं करवीरकरांचा मोड झाला. या शिवाय धोंडोपंतांच्या भाचाची करवीरकरांच्या फौजेशीं खानापुरास कलागत झाली व त्यास जखमा झाल्या परंतु शेवटीं करवीर-करांचा पराजय होऊन ते पळून गेले व धोंडोपंत कित्तुर येथें आलें.

रत्नाकरपंत आपले सहकारी प्रीतिराव चव्हाण यांजबरोबर दोन चारशें सडया स्वारांनिशीं कारडगीवरून कुंदगोळास आले. तेथेंही त्यांना स्वस्थता वाटेना म्हणून नवलंगुदास निघून गेले व तेथून त्यांनीं मनोळीचा रस्ता धरला.

धोंडोपंत नव्या हुवळीकडे वळले. रत्नाकरपंतांचा कांहींच पत्ता लागेना म्हणून करवीरकर फार दुःखी होते. परंतु स्वतःचा मोड झाल्याचें पत्र रत्नाकरपंतांनीं त्यांना पाठविल्यावर दुःखांत तेवढेंच सुख असें समजून त्यांनीं साखर वाटली व तोफांचे पांच बार काढले.

धोंडोपंतांनीं नवी हुवळी व तडस हीं दोन्हीही ठाणीं घेतलीं व नवलगुंद ठाण्यावर आपला मोर्चा वळविला. वाटेंत धारवाड जवळ नवलूर या गावीं मुक्काम केला. राजाज्ञाचे लोक संवदत्तीकडे गेले. यांनीं तिकडे त्यांच्यावर हल्ला करून त्यांस मनोळीस जावयास लावलें.

वकुंदच्या मुक्कामीं लष्कर उतरलें असतां धोंडोपंत आपली फौज घेऊन परशुरामभाऊंना भेटावयास गेले. तेव्हां भाऊंनीं त्यांना शिरपेंच, कंठी व वस्त्रें देऊन त्यांचा गौरव केला. नानांच्या पत्रावरून बाया व करवीरकर यांच्याशीं लढत असलेल्या परशुरामभाऊंना मदत करण्यास ते आले होते परंतु तो युद्ध प्रसंग तूर्त प्राप्तच होत नसल्यामुळें भाऊंनीं त्यांस करवीरकरां-कडून सौंदत्तीचें ठाणें घेण्याची कामगिरी सांगितली. तिकडे जाऊन धोंडो-

पंतांनीं तें ठाणें काबीज केलें. तों वाया पुण्याकडे परत वळल्या म्हणून ते भाऊंच्या लष्कराकडे परत न येतां गदग नवलगुंदकडे निघून गेले.

पुढें परशुरामभाऊंची व करवीरकरांची लढाई झाली. तींत परशुरामपंतांचा मोड होऊन ते शत्रूच्या हातीं लागले. करवीरकरानीं खुनशीपणानें त्यांचा खून केला. त्यांचें प्रेत नीटपणें जाळलें नाहीं. तें करवीरकरांकडील सरदारांनीं मागून घेतलें. पण तें देतांना सुद्धां करवीरकरांनीं फारच खळखळ केली.

परशुरामभाऊंचा शत्रूनें खून केल्यावर त्यांचे मुलगे चेवून जाणें स्वाभाविकच होते. धोंडोपंताना ते पांचवा मुलगा मानीत होते. व धोंडोपंतही पुत्राप्रमाणेंच वागत होते. त्यांना अत्यंत संताप आला. त्यांनीं रामचंद्रपंतांना खालील प्रमाणें पत्र पाठविलें.

श्रीगजानन. ( भाद्रपद वद्य १३–२७ सप्टेंबर )

पै॥. छ. ६ जमादिलावल सन मय्यातैन व अलफ.

श्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरस्वामीचे सेवेसीं. पोष्य धोंडो बल्लाळ कृतानेक सा. ॥ नमस्कार विनंति. येथील कुशल तागायत छ. २६ रविलाखर पावेतों मुकाम सावनूर आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित आहे. विशेष श्रीमंत राजश्री भाऊ यांची व करवीरकर यांची लढाई होऊन बिघडली म्हणून राजश्री आपासाहेब यांचें पत्र आलें त्याजवरून सविस्तर कळलें. अतःपर त्यांचे परीक्षेचा समय आहे. त्यांचे पुण्येंकरून आहों हें पुष्कळ. सर्वांनीं सर्वस्वास उदार होऊन एक विचार करून मसलतीचा उद्योग होऊन शत्रूचा सूड घ्यावा हा पुरुषधर्म आहे. येविषईचा विचार तेथें असतील त्यांस बोध होऊन पक्केपणें ठरेल त्यांत मी आहे. मजपाशीं ५००० फौज व ३००० पायदळ तोफ सरंजामासुद्धां आहे. पक्का निश्चय जहाल्यानें ईश्वर अनुकुल होईल. या उद्योगास मसलत मोठी, पैका पाहिजे, परिणाम कसा होईल, धनीपणा विचार एक प्रकारचा. पुरवणी मागून होणे कठीण, मोठेपणाप्रमाणें पदरीं पैसा नाहीं हें अंदेशें समजावणार बहुत मिळतील. परंतु तें चित्तांत

आणावयाचा हा प्रसंग नव्हे. पटवर्धन यांच्या घराण्यांत कैलासवासी गोविंदपंत नाना यांच्या वंशानें दौलत मिळविली ती पाठीमागें भाऊ यांनीं रक्षिली; त्यापेक्षां पुढेंही त्यांचे कोणी आहेत असें म्हणविणें आपल्याकडे आहे. इतके विस्तारें मी लिहावें इतकी माझी योग्यता नाहीं. परंतु भाऊंजवळ माझें वचन गुंतलें आहे कीं, चार ( पुत्र तुमचे ) तसा मी पांचवा यास्तव हें लिहीणें लौकिकी नव्हे. बहुत काय लिहीणें कृपावृद्धि असावी हे विनंति.

हें पत्र धोंडोपंतांच्या चरित्रावर व स्वभावावर उत्तम तऱ्हेचा प्रकाश पाडतें. धोंडोपंतांचा स्वभाव करारी होता. कोणत्याही परिस्थितींत माघार घेण्याची त्यांची तयारी नव्हती. झाल्या अपमानाचा सूड घेण्याकरितां त्यांचें अंतः-करण सारखें जळत होतें. हा सूड घेण्यास–आपली बाजू लंगडी आहे म्हणून–पटवर्धन कदाचित् कांकूं करतील अशी शंका येऊन त्यांनीं ' पक्का निश्चय जाहल्यानें ईश्वर अनुकुल होईल. या उद्योगास मसलत मोठी, पैका पाहिजे, धनीपणा एकप्रकारचा. पुरवणी मागून होणें कठीण. मोठेपणाप्रमाणें पदरीं पैसा नाहीं हें अंदेशें समजावणार बहुत मिळतील. परंतु चित्तांत आणावयाचा हा प्रसंग नव्हे ' असे उद्गार काढले. गोखल्यांचें ब्रीद हेंच होतें. आपली ताकद कमी म्हणून शत्रूपुढें मान वांकविण्यास त्यांची तयारी नव्हती जगायचें तर स्वाभिमानानें जगण्याची अंगांत धमक आहे तोंपर्यंत असें त्यांचें मत होतें. त्याचप्रमाणें प्रयत्नांतीं परमेश्वर आहे अशीही त्यांची श्रद्धा होती. ते म्हणतात ' पक्का निश्चय जहाल्यानें ईश्वर अनुकुल होईल. ' म्हणजे आधीं स्वतःची तयारी दाखवावयाची व नंतर ईश्वराच्या मदतीची खात्री बाळगावयाची असें त्यांना वाटत होतें आणि शेवटीं त्यांना आपल्या शब्दाची अतोनात किंमत होती हेंही पुढील वाक्यावरून दिसून येईल. ' परंतु भाऊंजवळ माझें वचन गुंतलें आहे कीं चार ( पुत्र तुमचे ) तसा मी पांचवा. पटवर्धनांना मदत केली नसती तर धोंडोपंतांचें कांहीं वांकडें होत नव्हतें. उलट स्वतःची कातडी शाबूत ठेऊन चार पैसे पदरीं राखतां आले असते. पटवर्धनांच्या मदतीस जाण्याबद्दल नानांनीं अनेक

सरदारांना पत्रें पाठविलीं होतीं पण त्यांचा कांहीं उपयोग झाला नव्हता. पण एकटे धोंडोपंत मात्र मदत करण्याबद्दलचें पत्र पोंचतांच पटवर्धनांना जाऊन मिळाले आणि याचीं कारणें दोनच व तीं म्हणजे नानांचा हुकुम व पटवर्धनांबद्दलचें प्रेम.

पित्याच्या वधाचा सूड घेण्याचें रामचंद्रपंतांनीं ठरवलें व त्याप्रमाणें पन्हाळ्याच्या लढाईत करवीरकरांचा मोड केला.

रामचंद्रपंतांच्या कुमकेस शिंद्यांची पलटणें आलीं होतीं. रामचंद्र आप्पांनीं शहरास वेढा घातला. पानशांनीं तोफांचा दणदणीत मारा सुरू करून २०० हात तट जमीनदोस्त केला व तेथें मोठें खिंडार पाडलें. तेव्हां करवीरकर घाबरले आणि पटवर्धनांचीं घेतलेलीं सर्व ठाणीं परत करण्यास तयार झाले. इतकेंच नव्हे तर ज्या रत्नाकरपंत राजाज्ञानें त्यांच्या वतीनें हे प्रकरण एवढें चिघळविलें त्यालाच ओलीस म्हणून रामचंद्रपंतांचे ताब्यांत द्यावयास तयार होते. तटास खिंडार पडलेलें पहातांच पायदळावरचा मुख्य सरदार ब्राऊन हल्ला करण्याची घाई करूं लागला. रामचंद्रपंतांनीं त्याला विरोध केला पण त्यानें त्यांचें म्हणणें ऐकलें नाहीं. त्याच्या उतावळेपणाचा परिणाम अत्यंत विपरीत झाला. त्यांत त्यांचा पूर्णपणें पराभव झाला.

धोंडोपंत १५ मार्च १८०० रोजीं करवीर मुक्कामीं लष्करांत येऊन दाखल झाले. त्यांच्याजवळ ४००० पायदळ तितकेंच स्वार शिवाय पेंढार व बाजारबुणगे मिळून एकुण जमाव १५००० हजार होता. त्यांनीं मुसा वास गो नांवाच्या पोर्तुगीज माणसाकडून एक पलटण व पांच तोफा असा सरंजाम तयार करविला होता व तो या कामगिरीवर आपल्याबरोबर आणिला होता. रामचंद्रपंतांनीं रंकाळ्याच्या बाजूनें मोर्चेबंदी करण्याकरितां त्यांची योजना केल्यावरून त्यांनीं नदीवर मुक्काम केला. ता. २१ रोजीं त्यांनीं आपल्यावर सोंपविलेली कामगिरी उत्तम तऱ्हेनें पार पाडून रंकाळ्याचें पाणी बंद केलें व तेथें मोर्चा बांधून ठेवला.

शत्रूला शहरांत कोंडला तरी तो स्वस्थ बसला नव्हता. करवीरकरांनीं आंतून तोफांचा मारा चालू ठेवला होता. तेव्हां त्यांच्यावर हल्ला केल्यावांचून गत्यंतर नव्हतें. तेव्हां हा हल्ला करण्याकरितां आलेला पूर्वीचा अधिकारी ब्राऊन हा जखमी झालेला असल्यामुळें त्याच्या जागी ज्या डाससाहेबाची योजना झाली होती त्याला दारुगोळ्याकरितां १० हजार रुपये देण्यांत आले. सामान आलें परंतु हल्ला करण्यास डाससाहेबानें टाळाटाळ चालविली.

या त्याच्या कृत्याच्या बुडाशीं दुसरा हेतू होता. बाजीरावाकडे शिंद्यानें पैशाची निकड लाविली होती. इतके दिवस पुण्याचें राजकारण बाळोबातात्या चालवीत होते. शिंद्याच्या सत्तेला जर कोणाकडून विरोध होत असेल तर तो बाळोबातात्याकडून. तेव्हां त्यालाच कैद करण्यांत आलें म्हणजे काम संपलें असें शिंद्याचा हस्तक सर्जेराव घाटगे यानें ठरविलें व त्याप्रमाणें शिंद्यांची संमतीही मिळविली. पटवर्धन बाळोबातात्यांचे मित्र होते. त्यांनीं पटवर्धनांना पलटणापासून सावध राहाण्याची सुचना दिली व रामचंद्रपंतांनीं सुद्धां निराळें कारण देऊन पलटणापासून आपलें लष्कर दूर नेलें.

शिंद्यानें पटवर्धनांवर दोन लाख रुपये देण्याचा हुकुम आणला त्यामुळें त्यांना करवीरकरांवरील हल्ला सोडून स्वतःस सुरक्षित राखण्याची व्यवस्था करावी लागली. डास अशा संधीकरितां टपलेलाच होता. त्यानें आपल्या पलटणाच्या पगाराची मागणी केली. तेव्हां 'तूं मोर्चे आहेत तसेच कायम ठेव मी पैसा मिळवून आणतों' असें पटवर्धनांनीं सांगितलें परंतु मोहीम तुमची, तुम्ही निघालेत आतां मी येथें कशाकरितां? माझे पैसे मिळेपर्यंत मी तुमची पाठ सोडणार नाहीं असें त्यानें उत्तर दिलें. पैशांबद्दल रामचंद्र अप्पा धोंडोपंतांची हमी देत होते पण तीही तो मानण्यास तयार होईना.

इतकें झालें हातातोंडाशीं असलेला घांस निघून गेला, तरी एवढ्यानेंच कुठें भागत होतें. लढाई अर्धवट टाकल्याचें निमित्त करून बाजीराव पुन्हां याना शह द्यावयास टपलाच होता. म्हणून पलटणें वाटेल तें करोत बाकीचे आपण सर्व निघून जाऊं असें रामचंद्रपंतांनीं गोखल्यांना सांगतांच त्यांनीं वरील

अडचण दाखविली. व सांगितलें कीं, ' मी माझा मोर्चा उठविणार नाहीं व तुम्हींहीं उठवूं नका. रामचंद्रपंतांनीं आपला तळ हालवावा, पलटणांनीं आपला मोर्चा काढावा व नंतर आपण मोर्चा उठवूं. आतांच मोर्चे उठविल्यानें सरकारची मसलत नासल्याचें निमित्त व जोखीम आपणावर येणार तें घ्यावें? तुम्ही भिऊं नका **मी व माझे दोघे पुतणे अप्पा व बापू जिवंत आहों तेथवर तुमच्या लवेस देखील धक्का लागूं देणार नाहीं.** '

त्याप्रमाणें रामचंद्रपंतांनीं आपलें बुनगें पाठवून दिलें व धोंडोपंतांस निघण्यास सांगितलें. पण त्यावेळेला त्यांचीं कांहीं घोडीं व तट्टें बाहेर गेलीं होतीं. तीं परत येईपर्यंत तेथून हलणें योग्य नव्हतें शिवाय भर दिवसा जर ते निघाले असते तर पुन्हां शहरांतल्या मंडळीना जोर येऊन ते उलटण्याचा संभव होता तेव्हां त्यांनीं रामचंद्रपंतांस पुढें पाठविलें व रात्रीं चंदास्त झाल्यानंतर मोर्चे काढून कूच केलें व दुसऱ्या दिवशीं सकाळीं रामचंद्रपंतांस येऊन मिळाले. डास हे केव्हां जातात या तपासांत होताच. गोखले व पटवर्धन निघून गेल्याचें कळतांच त्यानें आपलाही तळ हालविला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नं.
ता.

# प्रकरण ४ थें

# दैवाचा घाला.

Honour and fame from no condition rise
Act well your part there all the honour lies.

कर्नाटकांत पटवर्धन व गोखले यांचें अधिकारप्राबल्य होतें. पेशव्यांनीं तेथील सर्व व्यवस्था त्यांचेकडे सोंपविली होती या धामधुमीच्या काळांत एकाच वेळीं अनेक शत्रूंचा बंदोबस्त करणें त्यांचे अंगावर पडलें. या त्यांच्या शत्रूंपैकीं धोंडजी वाघ हा एक महत्वाचा सरदार होता. तो अत्यंत धाडशी, महत्वाकांक्षी, व कर्तबगार असा असल्यामुळें त्याचें पारिपत्य करणें मराठ्यांना अत्यंत जड गेलें. याचवेळीं त्यांचे हात करवीरकरांशीं लढाई करण्यांत गुंतले असल्यामुळें धोंडजी वाघाला आपला दरारा कर्नाटकांत बसविण्यास चांगलाच अवसर मिळाला. त्याला दडपता कोणी राहिला नाहीं. दुसरे हिंमतबहाद्दरही त्याच्याच आश्रयानें राहून आपलें हित पाहूं लागले व कर्नाटकांतून पेशव्यांचा अंमल अजिबात नष्ट होतो कीं काय अशी भीति बाजीरावास वाटूं लागली. त्याकाळीं सर्वसमर्थ अशा इंग्रजांसही त्याचा अत्यंत धाक वाटत असे. त्याच्या हालचालींचे रिपोर्ट्स् लॉर्ड वेलस्लीला विलायतेंत पाठवावे लागत. ३ सप्टेंबर १७९९ रोजीं त्यानें पुढील मजकूर विलायतेस पाठविला.

I received accounts from Colonel Stevenson that Dhondopant Gokle, a chief, commanding a division of Peshwa's army, had plundered Dhondia's camp within a few hours, after it had been pitched within

the teritory of Mahrattas, had carried away all his elephants, camels, bullocks and guns and entirely deprived him of his means of future depredation.

( *Wellesly despatches Volume II page 116* )

वाघाचें घराणेंच शूरांचें होतें. त्याचें मूळचें आडनांव पवार असें असतांनासुद्धां त्याच्या पूर्वजांनीं वाघ हा वंशपरंपरा किताब मिळविला होता. त्याचे पूर्वज शिदोजी पवार व त्याचा भाऊ बहिरजी पवार हे दोन्ही पहिल्यानें विजापूरचे बादशहाचे पदरीं आले. बादशहानें त्यांस आपले वजीरांचे तैनातेस लावून दिले. एकदां वाघिणीचें दूध आणून द्या असा बादशहाचा वजीरास हुकूम झाला. पवारांनीं दोन वर्षांची मुदत मागून घेतली. रानांत गुरें व बकरीं बांधून लाखण लावली. वाघीण दुधाची सांपडली ती बादशहाजवळ आणून दिली. बादशहा खूष झाला व त्यानें आपलें काय मागणें असेल तें मागा म्हणून सांगितलें. त्यावरून त्यांनीं एखादा किताब द्यावा म्हणून मागणी केली. बादशहानें त्यांस वाघ हा किताब वंशपरंपरा लावा म्हणून हुकूम केला.

धोंडजी वाघ प्रथम कांहीं वर्षे पटवर्धनांच्या व नंतर करवीरकरांच्या फौजेंत चाकरीस होता. पुढें तो लक्ष्मेश्वरचा सरदार देसाई केंचनगौडा याच्या पदरीं राहिला. हा देसाई स्वभावतःच बंडखोर होता. त्यांत त्याला वाघासारखा समानशील दोस्त मिळतांच त्यानें इ. स. १६७६–७७ मध्यें बंड केलें व हैदरअल्लीची फौज मदतीस घेऊन त्यानें सांवशीच्या लढाईत मराठ्यांचा पूर्णपणें पराजय करविला. पुढच्या वर्षीं त्याचें पारिपत्य करण्यास परशुरामभाऊ व हरीपंततात्या फडके आले तेव्हां केंचनगौडा श्रीरंगपट्टणास पळून गेला. भाऊंनीं त्याचीं मुलेंमाणसें कैद करून मिरजेस पाठविलीं व त्याचें वतन जप्त केलें. टिपूनें देसायास नजरकैदेंत ठेवलें तेव्हां त्याची रखेली केंचवा म्हणून होती तिला हाताशीं धरून धोंडजीनें शिरहट्टीचा किल्ला पुन्हां बांधला व त्यांत राहून भोंवतालच्या मुलखांत दंगा आरंभला.

तो दंगा ५–७ वर्षें चालला होता. पुढें १७८६ मध्यें टिपूकडून दौलतखान नांवाचा सरदार फौज घेऊन आला; त्यानें वाघाचा वंडावा मोडला आणि केंचव्वा व वाघ या दोघांनाही कैद करून पट्टणास नेलें. नंतर १७९० मध्यें परशुरामभाऊंचें लष्कर श्रीरंगपट्टणावरील स्वारीकरितां धारवाडास आलें; तेव्हां 'मला सोडाल तर मी परशुरामभाऊंचा समाचार घेतों, त्यांचा अंमल इकडे वसूं देत नाहीं' अशी टिपूला थाप मारून वाघानें आपली सुटका करून घेतली. परंतु टिपूला दिलेलें वचन धाब्यावर वसवून त्यानें उलट भाऊंनाच मदत केली व त्याप्रमाणें श्रीरंगपट्टणची सर्व चाकरी संपेपर्यंत तो मराठी लष्करांत चाकरी करीत होता. ही कामगिरी करून दाखविण्यांत भाऊंनीं आपल्या धन्याचें जप्त केलेलें वतन सोडवावें हा त्याचा हेतू होता, व त्या कामासाठीं तो भाऊंच्या स्वारीवरोवर तासगांवापर्यंतसुद्धां आला होता. परंतु त्याचा तो हेतू पूर्ण न होतां भाऊ घाईघाईनें पुण्यास निघून गेले. त्यामुळें संतापून धोंडजीनें सावनूरास मोठा दंगा केला. भाऊंनीं पुण्याहून आल्यावर हें वाघाचें वंड मोडण्याकरितां रामचंद्र आपावरोवर मोठी फौज देऊन पाठविलें. आपांनी मसूर येथें वाघास गांठून त्याच्या फौजेचा धुव्वा उडवून त्यास तुंगभद्रापार टिपूच्या राज्यांत पिटून घातलें. तिकडे गेल्यावर तो स्वस्थ न वसतां विदनूर प्रांतांत लुटालूट करूं लागला. तेव्हां टिपूनें त्यास पकडून पुन्हां कैदेंत घातलें. टिपू मरेपर्यंत तो त्याच्याच कैदेंत होता.

ज्यावेळेला इंग्रजांचे फौजेनें हल्ला करून श्रीरंगपट्टण कावीज केलें. त्यावेळेला टिपू मारला गेला व त्याच्या राज्याची वांटणी मराठे, निजाम व इंग्रज यांनीं आपसांत वांटून घेतली. त्याचवेळीं टिपूनें कैदेंत ठेवलेल्या लोकांची सुटका करण्यांत आली; त्यांत धोंडजी वाघ होता तो सुटला. तो केवळ आपल्या सुटकेची वाट पहात वसला होता. सुटतांक्षणींच त्याच्या दवून राहिलेल्या उत्साहानें जोराची उसळी मारली आणि जमाव करून त्यानें पहिली आरोळी वंडाची ठोकून इंग्रजांना उपद्रव देण्यास सुरवात केली. शहरेंच्या शहरें

लुटलीं. अर्थात् इंग्रजांनीं आपली फौज त्याचे पाठीवर पाठविली. फौज पाठी-वर येतांच त्यानें आपल्या फौजेचा मोर्चा वळविला व तो तुंगभद्रेचें उत्तरतीर व वरदा नदीचें दक्षिणतीर या दोन नद्यांच्या मध्यें आला. तेथें त्यानें धोंडो पंतांशीं संधान बांधलें. परंतु मध्येंच कांहींतरी बिघाड होऊन त्यानें पाठविलेला जामदारखाना व बुणगें गोखल्यांकडून लुटण्यांत आलें म्हणून तो तेथून निघून हनगलाजवळ उतरून लक्ष्मेश्वरास आला तेथें पटवर्धनांचे मामलेदार बाळकृष्णपंत लागू म्हणून होते. वाघाला आपल्या पदरीं ठेवावा म्हणून परशुरामपंतांनीं त्यांस सांगून पाठविलें, पण तें त्यांनीं ऐकलें नाहीं. गोखले त्याचा पाठलाग करीत लक्ष्मेश्वरापर्यंत जाऊन पोंचले व लगेच दोन घटका दिवसास ते वाघावर चालून गेले. वाघानें तोफेचे गोळे मारले व बाणही सोडले परंतु त्याचा उपयोग कांहींही झाला नाहीं. त्यांनीं त्याच्यावर हल्ला केल्यामुळें त्याची फौज लुटली गेली व पळाली. तोफा वगैरे सर्व गोख-ल्यांच्या हातीं लागलें. वाघ तेथून फक्त दहाबारा स्वारांनिशीं निघून गेला. तो मनोळी येथें खंडेराव भोंसले यांचे आश्रयानें राहिला.

वाघ मनोळींत आल्यावर त्यानें पुन्हां एकदां जमवाजमवीस सुरवात केली. पटवर्धनांचे गोकाक वगैरे सर्व महालांत चांगलाच धुडगूस घातला. त्याचा पराक्रम पाहून शेखमिरा नांवाचा सरदार त्यास अनुकूल झाला. वाघानें पाच्छापूर विनिवाल्यांचे ताब्यांत होतें तें काबीज केलें. तेथून निघून चिकलदिनीचे डोंगरांतून पटवर्धनांचे इलाख्यांतील शहापूर तालुक्यांत काकतीस येऊन देसाई यांचें घर लुटलें. देसायानें आपल्याजवळ बरीच माया केली होती. तिचा फडशा धोंडजीनें एका क्षणांत उडवला. बेळगांवचें ठाणें पण विनीवाले यांजकडेच होतें तेव्हां त्यांनीं तेथील किल्लेदार व पटवर्ध-नांचे शहापुर येथील मामलेदार यांच्या सहाय्यानें वाघावर चाल केली. शहापूर तालुक्यांत कडोलीनजीक मोठी लढाई झाली. परंतु त्याचा पराजय झाला, तेथून निघून तो करवीरास गेला. तेथें छत्रपती महा-राजांस भेटला. तेथें त्यानें आपल्या पदरची फौज वाढविली. पटवर्ध-

नांचे प्रांतांत लुटालूट करण्याबद्दल त्यानें त्यांचें मन वळविलें. तेथून जो सटकला तो कुलगोड येथें पटवर्धनांचे जहागिरींत प्रकट झाला. तेथें सौंदत्ती व शूर्पाल या ठिकाणांची त्यानें लुटालूट केली. मागाहून त्यास मदत करण्याकरितां रत्नाकरपंत राजाज्ञा, करवीरकर छत्रपतींचे प्रधान हे आले व दोघेही जोडीनें अथणीकडे गेले. अथणी त्यावेळीं सरदार रास्ते यांच्या ताब्यांत होती. तेथें रास्ते यांचे ठाणेदार परचुरे म्हणून होते. त्यांची व वाघाची लढाई झाली. रास्त्यांकडील लोकांनीं कच खाल्ली. रत्नाकरपंत व वाघ या दोघांनीही अथणी व तिच्या आसपासचा बराचसा मुलुख लुटला. येथपर्यंत वाघ व राजाज्ञा यांचा सलोखा होता. परंतु, खंडणीचे पैसे रत्नाकरपंतांनीं मधच्यामध्येंच दाबले. यामुळें वाघाचें व त्यांचेंही बिनसलें व तो तेथून निघून बागलकोटाकडे गेला. आधींच तडफदार स्वभाव व त्यास पायबंद घालण्यास समर्थ जे पटवर्धन व गोखले ते करवीरकरांशीं लढाईंत गुंतलेले मग काय त्याची चंगळच उडाली. त्यानें लुटमार करून पैसा व सैन्य वाढवलें व यावर कळस म्हणून कीं काय मुल्केजहां हा किताब धारण केला.

करवीरची लढाई संपल्यावर चिंतामणराव पटवर्धन व गोखले यांनीं वाघाचा समाचार घेण्याचें ठरविलें. कर्नाटकांतील ठाण्याचा बंदोबस्त करावा या इरादानें त्यांनीं निघून शहापूर परत आपल्या ताब्यांत घेतलें व आपला रोख पाच्छापुराकडे वळविला. धोंडोपंत व पटवर्धन यांची फौज तेथें एकत्र झाली. दोघेही एकत्र होऊन पाच्छापूरचे बारीनें पार होऊन रुद्रापूर तालुक्यांतील मुरगोड या मुकामास गेले. वाघाच्या बंडाळीचा बोभाटा पुण्यापर्यंत पोंचला होताच. त्यानें पारिपत्य करण्याविषयीं याच वेळीं पुण्याहून पत्र आलें. धारवाड, कुसेगल, शिरहट्टी, हावनूर गजेंद्रगड हीं ठाणीं हस्तगत करण्याकरितां वाघ यानें जंग जंग पछाडलें. पण त्यांत त्याला यश आलें नाहीं.

वाघाच्या हालचालीकडे इंग्रजांचें पूर्ण लक्ष होतेंच. परंतु एकट्यानें त्याचा पाडाव करण्याची त्यांस हिंमत झाली नाहीं. पटवर्धन व गोखले हे करवीर-

करांच्या हल्यांत लढले असल्यामुळें त्यांस थकवा आलेला होता. व वाघ यशाच्या मंदिराकडे रोज एकेक पायरी चढत होता. अशावेळीं पटवर्धन, गोखले यांशीं इंग्रजांनीं संधान बांधलें व ते आपलें सैन्य घेऊन पट्टणाहून निघाले. कित्तुरास एकत्र मिळावें, वाघ अंगावर आल्यास गांवचे आश्रयानें लढाई द्यावी, असा बेत ठरला व त्याकरितां चिंतामणराव पटवर्धन व गोखले हे फौजसुद्धां रुद्रापुराहून निघून, कित्तूर तालुक्यांत चिदंबरस्वामी दिक्षीत देवळापूर येथें होते; तेथें त्यांचें दर्शन घेण्यास गेले.

याचवेळीं बापूंची पत्नी प्रसूत होऊन, मुलास मागें ठेऊन, परलोकवासी झाली. गोखले कित्तूरकडे येत असतां वाघाचें लष्कर मुगुटखानाच्या हुबळी-पर्यंत आलेच होतें. तेथून तो लढाई देण्याच्या उद्देशानें ता. २८ रोजीं कित्तूरजवळ तीन कोसांवर गदग म्हणून खेडें आहे तेथें जाऊन उतरला. त्याची फौज फार. कित्तूर ही जागा बळकट खरी परंतु तेथें पाण्याचा तोटा. शत्रूचा वेढा बसल्यास निभाव लागणार नाहीं. याकरितां तेथून सुमारें दहा कोसांवर हल्याळ येथें इंग्रजांचें ठाणें व दोन पलटणें आहेत, त्यांच्या आस-ऱ्यास तूर्त जावें आणि नंतर शक्याशक्यता पाहून, इंग्रजांच्या मसलतीनें काय तो बेत ठरवावा असें चिंतामणराव पटवर्धन व गोखले यांनीं ठरविलें. आणि ते त्याच दिवशीं रात्रौ चंद्रास्त झाल्यावर हल्याळास जाण्याकरितां लष्कर घेऊन निघाले. रात्र काळोखी, पण तो मार्ग दाट झाडीचा असल्या-मुळें सात कोस मजल येईपर्यंत प्रहरभर दिवस आला. तेथून हल्याळ तीन साडेतीन कोस राहिलें होतें. वाटेंत डवगीनाला म्हणून ओढा लागला त्यांत गोखल्यांची काळापहाड म्हणून उत्कृष्ट तोफ होती ती रुतून बसली. ती बाहेर काढण्यामध्यें तीनचार तास मोडले. लष्करचें बाजारबुणगें पुढें चालतें झालेंच होतें. वाघाच्या टापूंतून आपण सुटलों आपली मसलत साधली अशी समजूत झाल्यामुळें सैन्यांत बेसावधपणा उत्पन्न झाला होता. त्यामुळें निमेशिमे घोडेस्वार व सर्व पायदळ पुढें निघून मुकामास गेले. धोंडोपंत, अप्पासाहेब, बापूसाहेब गोखले वं चिंतामणराव अप्पा पटवर्धन तोफांजवळ

ओढ्यावर बसून राहिले, त्यांच्याजवळ जुजबीस्वार मात्र दोनचार हजार होते. रुतलेली तोफ बाहेर काढण्याचा उद्योग चाललाच होता. सुमारें दोन प्रहर दिवसास बाघाची हरळी ऐकूं आली. कितुरकर देसायांनीं त्यास गोखल्यांच्या प्रयाणाची बातमी कळविली होती. कितूरकर हे वरपांगी गोखल्यांस आपण मदत करीत आहों असें दाखवीत होते. कित्तुर ते हल्याळ हा रस्ता धोंडोपंताच्या पायरवांतला नव्हता. म्हणून त्यांनीं कित्तुरकर देसायांची मदत घेतली. त्यानें या संधीचा फायदा घेऊन धोंडोपंत निघाल्याचें बाघास कळविलें व रात्री मुद्दाम रस्ता चुकवून त्यांचा फार खोळंबा केला.

वाघ आला तो मुळीं गर्जतच. ज्या संधीची तो आजपर्यंत वाट पहात होता ती सोन्यासारखी त्याच्याकडे चालून आल्यावर त्यानें मिनिटाचासुद्धां विलंब लावला नसल्यास आश्चर्य नाहीं. धोंडोपंतांजवळ समोरासमोर युद्ध करण्याची त्याची हिंमत नव्हती. नाहींतर त्यानें यापूर्वींच या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लाऊन टाकला असता. हातीं आलेली सत्ता कितीही अमर्याद भासली, सैन्याचा समुद्रच्या समुद्र नजरेसमोर पसरलेला दिसला, नजर फिरेल इतक्या पैशाच्या राशीच्या राशी खजिन्यांत सांठवलेल्या असल्या तरी या सर्वांचा चुराडा धोंडोपंत क्षणांत करण्यास समर्थ आहेत ही त्याची खात्री होती. हें सर्व त्यानें मिळविलें खरें, पण त्यावेळीं धोंडोपंत लढाईत गुंतलेले होते म्हणूनच. त्यापूर्वींच्या लढाईत त्यांनीं दिलेले तडाखे तो विसरला नव्हता आणि म्हणूनच त्यांनीं आपला मोर्चा त्याचेकडे वळविल्यावर त्यानें आपलें गनिमी काव्याचें युद्ध सुरू केलें.

यामुळें धोंडोपंत अडचणींत आहेत अशी बातमी कळतांच त्याला हर्षवायू होण्याची पाळी आली. त्यानें साऱ्या सैन्याला तयार रहाण्याचा हुकूम दिला व पळाचाही विलंब न लावतां तो गोखल्यांच्या सैन्यावर येऊन घसरला.

त्याच्या आगमनाची चाहूल गोखल्यांना लागली पण धांवपळ करून काय उपयोग होता ? अंतर साडेतीन कोशांचें असलें तरीं तें सर्व सैन्याला

शाबूत ठेऊन तोडणें शक्य नव्हतें. शिवाय गोखले मंडळी ही रणांगणाला पाठ दाखविणारी मुळींच नव्हती. प्रसंग आला खरा, आतां त्याला धिटाईनें तोंड देण्यांतच भूषण आहे, हाच खरा पुरुषार्थ होय असें त्यांस वाटलें व त्यांनीं आपल्या अल्प पण धेडर सैन्यानिशीं शत्रूला तोंड दिलें. पहिली चकमक धोंडोपंत व बापूसाहेबांनीं सुरू केली व आपल्या शूर व तेजस्वी धन्याचें चीज आपल्या पराक्रमानें करण्यास त्यांच्या सैन्यानें मुळींच कसूर केली नांहीं. सखोपंत बापू पाच्छापूरकर, सदाजी जगताप, मदनसिंग वगैरे हाताखालचे सर्व सरदार मारूं किंवा मरूं या नेटानें वाघावर घसरले. 'हतोवाप्राप्स्यसि स्वर्गं, जित्वावाभोक्ष्यसे महीम्' हें भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाला सांगितलेलें तत्व त्यांच्या रोमरोमीं भिनलें होतें. या युद्धामध्यें जय मिळणें अशक्य होतें. परंतु पराजय पावण्यापेक्षां युद्धांत मरणें हेंच महत्त्वाचें आहे आणि हाच मार्ग आम्ही स्वीकारणार असें त्यांच्या मनानें घेतलें. मृत्यू! मृत्यूची भिती कोणाला? वीराला कीं भ्याडाला? वीर हा कधींही मृत्यूला भीत नाहीं, काळाला डरत नाही, शत्रूच्या दर्शनानें कचरत नाहीं व आपलें ध्येयही सोडीत नाहीं. मृत्यू समोर धांवत आला, विकटपणें हसूं लागला, तर त्याला तितक्याच जोरानें 'ये धांवत मृत्यू' असें विनदिक्कतपणें आव्हान देणारे वीर होते ते. 'मरणांत खरोखर जग जगतें' असेंच त्यांना वाटत होतें. जगावयाचें असेल तर मानानें नाहींतर किड्यामुंगीप्रमाणें जगण्यांत अर्थ नाहीं अशी त्यांची दृढ समजूत होती. त्यांना आपल्या पराक्रमानें मृत्यूवर मात करावयाची होती. मृत्यूनें नश्वर देह नेला तरी आपलें नांव शेंकडों नव्हे हजारों वर्षें लोकांकडून गाईल जाईल ही त्यांना जाणीव होती. आणि असें झाल्यानंतर ती मृत्यूवर मातच नव्हे का? जीव घ्यावयाचा नांवसुद्धां उरूं नये म्हणून; आणि तें हजारों वर्षें अबाधित नुसते चालले नव्हे, तर पराक्रमाच्या पवाड्यांनीं गौरविलें गेलें तर मग मृत्यूचा उद्देश निष्फळ ठरलाच पाहिजे.

आणि याच हिंमतीनें त्यानीं शत्रूस तोंड दिलें. भाल्यास भाले भिडले. तरवारी विजेसारख्या तळपूं लागल्या त्या इतक्या जोरानें गरगर फिरूं

लागल्या कीं त्यांच्यावर नजर ठरेना. ढाली पुढें सरसावल्या. मुखानें हरहर महादेवचा जयघोष चालूच होता. त्या जयघोषापुढें शत्रूच्या दीनदीनचा आवाजही ऐकूं आला नाहीं. एक दोन तीन चार असे किती तरी वीर बापूसाहेबांच्या तरवारीला सारखे बळी पडूं लागले. एक एक वीर प्रतीपक्षास भलताच डोईजड होऊं लागला. आणि याचा परिणाम म्हणून वाघानें आपलें सर्व लक्ष बापूसाहेबांकडे वळविलें. युद्धाची धुमश्चकी फारच जोरानें चालू होती, आणि हा अवघ्या २०–२२ वर्षांचा बालवीर–अभिमन्यू–शत्रूच्या तशा जोरदार हल्ल्याला तोंड देऊन सैन्याची फळी फोडून जाऊं पहात होता. बराच वेळ गेल्यावर एका पठाणाच्या तरवारीचा वार त्यांच्या तोंडावर लागला. इतकावेळ त्यांच्या अंगावर किती वार झाले, शरिराला किती जखमा झाल्या, तरी त्यांची त्यांना मुळींच क्षिती वाटली नव्हती. हाही वार जबरा असला तरीसुद्धां त्यांनीं त्यांकडे लक्षही दिलें नाही; पण धोंडोपंतांचें लक्ष त्यांकडे गेलें. तशा खडतर परिस्थितींत सुद्धां त्याचें पितृहृदय कळवळलें व त्यांनीं बापूसाहेब नको नको म्हणत असतां त्यांची व चिंतामणराव पटवर्धनांची रवानगी व्यवस्थित रितीनें हल्याळास करून दिली. चिंतामणरावांनींही आपली तरवार भरपूर गाजविली. या लढाईत त्यांच्या नाकावर एक जबरदस्त फटका बसून नाक लोंबूं लागलें परंतु हा वीर एक रेंसभरही मागें हटला नाहीं. धोंडोपंताच्यापुढें त्यांचा नाइलाजच झाला व त्यांना हल्याळास जावें लागलें.

धोंडोपंतांची परीक्षा एवढ्यानें संपली नव्हती. एक पुतण्या घायाळ झाला. मुलाप्रमाणें वाढविलेल्या चिंतामणरावअप्पास जबर जखमा झाल्या तरी दैवाला तेवढ्यानें तृप्तता वाटली नाहीं. धोंडोपंतांनीं आपल्या पराक्रमाची शर्थ केली व शत्रूची फळी फोडून आपला घोडा बेफाम सोडला. आपल्या शौर्यानें त्यांनीं शत्रूला तोंडांत बोट घालावयास लाविलें होतें. व भीषण भवितव्यतेवरही मात केली होती पण आपल्यावर कुरघोडी झालेली दैवास पसंत पडली नाहीं. बेफाम सुटलेला घोडा रस्त्यांतील झाडाच्या फांदीला

अडखळला व धोंडोपंतांचा तोल जाऊन ते जमिनीवर आदळले. तरीसुद्धां त्यांनीं बिलकुल कच खाल्ली नाहीं जखमा झाल्या आहेत, अंगांतून रक्ताचे पाटच्यापाट ओघळत आहेत. प्रकृती क्षणाक्षणाला क्षीण होत आहे, असें दिसत असतांना सुद्धां त्यांनीं आपला प्रयत्न सोडला नाहीं व ते शत्रूशीं सारखे झुंजत राहिले.

अप्पांनीं पण शत्रूची फळी फोडलेली होती. पण त्याबद्दलचें समाधान त्यांना क्षणभरच लाभलें. दादांची ती पेंचाडाच्या, शत्रूंनीं रोंखलेल्या एकट्याच वाटेंतून फळी फोडून गेलेली मूर्ती याहून त्यांना आनंद झाला. पण ते खालीं पडलेलें पहातांच त्यांच्या मनाला काय झालें असेल त्याचें वर्णन कोण करूं शकेल हा सामना फक्त योद्धयांत नसून दैव व ससैन्य वाघ एका बाजूला व एकटे गोखले दुसऱ्या बाजूला असा चालला होता असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. तसें नसतें तर कालपहाडसारखी तोफ कीं जिच्या सहाय्यानें त्यांनीं वाघालाच काय पण त्याच्यापेक्षांही मातवर वीरांनासुद्धां पाणी पाजलें असतें तीच नेमकी डवगीनाल्याच्या ओढ्यांत कां अडकून पडावी ? कित्तूरकर फितूर कां व्हावे ? व फळी फोडलेल्या दादांच्या छातीला झाडाच्या बळकट खांदीचा धक्का लागून ते कोलमडून कां पडावे ? पण असें झालें नसतें तर दैवाचें मोठेपण मनुष्याला कधींच पटलें नसतें. **आपलें मोठेपण लोकांच्या मनावर ठसविण्याकरितां या क्रूर व स्वार्थी दैवानें धोंडो-पंतांसारख्या कैक रत्नांचा चुराडा करून टाकला आहे.**

चुलत्याची ती अनुकंपनीय अवस्था पाहून फळी फोडून बाहेर पडलेले अप्पा-साहेब युद्धाच्या भाऊगर्दीत पुन्हां परत शिरले. आपल्या शरिराचें छत्र त्यांनीं बराचवेळ चुलत्याच्या अंगावर घातलें. व पुन्हां पूर्वीइतक्याच जोरानें शत्रूच्या सैन्याचा फडशा पाडण्यास सुरवात केली.

चुलत्या पुतण्याचा हा पराक्रम पाहून धोंडजी वाघाचेंसुद्धां हृदय द्रवलें. अशा रत्नांचा अशा बिकट परिस्थितींत चुराडा करावा असें त्याच्या स्वार्थी मनालासुद्धां

जड वाटलें. तो स्वार्थी असला तरी शूर होता व शूरच शूराच्या पराक्रमाचा गौरव करतो. त्यानें धोंडोपंतांना 'हत्यारें खालीं ठेवल्यास मी तुम्हाला मारणार नाहीं, असें परोपरीनें (आपल्यासारख्यांचा नाश व्हावा असें माझ्या मनाला मुळींसुद्धां वाटत नाहीं ) विनवून सांगितलें पण व्यर्थ. धोंडोपंतांच्या नसांनसांतून स्वाभिमान खेळत होता. तो त्यांना अशा लाजिरवाण्या स्थितींत टाकणें शक्य नव्हतें. त्यांनीं त्याच्या विनवणीस तरवारीचे खणखणाटानेंच उत्तर दिलें.

आणि तेंही खरेंच. त्यांनीं आपल्या वरिष्ठापुढेंही आपली मान कधीं वांकवली नव्हती. कोणाकडूनहीं आपला अपमान सहन केला नव्हता. नाना फडणिसांसारख्यांनासुद्धां आपला सत्पक्ष असल्यामुळें ज्यांनीं भीक घातली नाही ते या एका भुरट्यापुढें मान वांकवणें कधींच शक्य नव्हतें. यापेक्षां त्यांना मरणाची वाट जास्त सुखमय दिसत होती. त्यांनीं शौर्याची शर्थ दाखवून सर्वांला स्तिमित करून परलोकचा मार्ग विनदिक्कत स्वीकारला. अप्पांनीही त्यांचाच कित्ता गिरवला. दादा ज्या वेळेला खालीं पडले त्या वेळेला त्यांनीं अप्पांस तेथून निघून जाण्याची सूचना केली. पण आजपर्यंत मी कधीं आपली अवज्ञा केली नसली तरी या वेळेला आपला हुकूम मानणें शक्य नाहीं असें त्यांनीं उत्तर दिलें. आपण अशा दारुण प्रसंगांत सांपडलां असतां मी आपणांस येथेंच सोडून जाणें हें उचित आहे काय? म्हणूनही त्यांनीं प्रश्न विचारला. व शत्रूच्या भोंवतालीं पडलेल्या गराड्याला आपल्या तरवारीच्या जोरावर उभें करून दादांचें शव संभाळण्याचा आटोकाट प्रयत्न केला. या लढाईचें वर्णन पाच्छापुरकरांच्या बखरींत खालीलप्रमाणें केलें आहे.

"अप्पासाहेब पठाणाची फळी फोडून पार जहाले. माघोन उलटून पुन्हां गर्दींत शिरले. सभोंवतीं गराडा पांचशेंहे पठाणाचा पडला. येक भालेकरी अप्पासाहेब यांनीं मंडल धरोन पठाणास मारीत चालले. अप्पासाहेबांच्या भाल्याच्या जखमांनी शें पन्नास पठाण जखमी झाले. तत्रापि अप्पासाहेब

शावूत. परंतु पांचशेंहे पठाण मर्दतद्धन गढून उभे राहिले. अप्पासाहेब महा-शूर. सहस्रांत एक भारी भालेकरी. घोडयाची लढाई यासी उपमा दुसरा स्वार नाहीं. याचप्रमाणें पांच घटकापर्यंत पठाणाची तरवार लागूं दिली नाहीं. मृत्यूसमीप आल्यावर भाला तुटला. तो भाला टाकिला. तरवार सडक घेऊन पठाणावर धांवला. तों पांचशेही पठाण चहूंकडून एकदांच उठवणी होऊन अप्पासाहेबांनीं तरवारीच्या धारेनें पंचवीस असामी ठार केले. नंतर शेवटीं पंचवीस जखमा तरवारीच्या मस्तकावर होऊन घोडयावर व्याकूळ स्वर्गास गेले. ”

परंतु प्रत्येक गोष्टीला अंत हा आहेच. तिच्याविरुद्ध असणाऱ्या जितक्या गोष्टी अधिक तितका तिचा अंतकाळ अधिक जवळ. तरवारीच्या आसपास फिरकूं देत नाहींत असें पहातांच वाघानें त्यांचेवर गोळ्या झाडण्याचा हुकूम केला व त्यांची वाट पहात असलेले पण त्यांचा पराक्रम पहात स्वस्थ बसलेले देवदूत त्यांना एकदांचे स्वर्गांत घेऊन गेले. वाघानें दोघांची शिरें कापलीं. अप्पांचें तेथेंच झाडाला टांगलें व दादांचें आपल्या बरोबर नेलें.

आपल्या कर्तबगारीवर उच्चपदाला पोंचलेल्या थोडया विभूतींत दादांची गणना सहज करतां येईल. तळेखाजण सारख्या खेडेगांवांत राहणारा हा पुरुष पुढें महाप्रतापी होईल अशी एखाद्या ज्योतिषानें ग्वाही दिली असती तरी ती कोणालाही खरी वाटली नसती. उलटा त्याचा उपहास केला गेला असता. हा मोठेपणा त्यांनीं दुसऱ्या कोणाच्याही मदतीशिवाय कमावला. संधी आली आणि हे घोडयावर स्वार झाले नाहींत असें क्वचितच घडलें असेल. स्वभाव अत्यंत धाडशी. गर्विष्ठ नसला तरी स्वाभिमानी. जितके तरवार गाजविण्यांत शूर तितकेच लेखणीबहादुर. बुद्धी फार तीक्ष्ण. बोलण्यांत हजरजवाबी प्रसंगावधान मोठें व सर्वांवर कड म्हणजे कोणत्याही संकटांनीं खचून न जाण्याची प्रवृत्ती. या गुणवर्णनाचे जोरावर त्यांनीं आपलें योग्य स्थान कमावलें.

या प्रकरणाचा समारोप करतांना कै. वासुदेवशास्त्री खरे यांनीं पुढील-प्रमाणें वाक्य लिहीलें आहे 'याप्रमाणें धोंडोपंत गोखल्यांचा शेवट झाला. त्यांनीं वाघाचा विश्वासघात केला व त्याचा सूड त्यानें कसा उगवला याची कथा ही अशी आहे. हें वाक्य त्यांनीं विचार केल्याशिवाय लिहीलें असें प्रस्तूत लेखकास वाटत नाहीं परंतु त्यांच्या विधानांत, धोंडोपंतावर विश्वास-घाताचा आरोप करण्यांत, पुष्कळच चूक झालेली दिसते. आपल्या आश्रयास आलेल्या वाघावर त्यांनीं हल्ला केला याला कांहीं तरी तसेंच कारण असलें पाहिजे. तेव्हांचीं गुप्त एकूण एक कारस्थानें आपल्या नजरेसमोर नसल्यामुळें त्यांच्यावर असा आरोप करणें धाडसाचें ठरेल. शिवाय जो मनुष्य विश्वास-घातावद्दल सूड घेण्याची प्रतिज्ञा करतो त्याचें वर्तन शुद्ध असलें पाहिजे पण आपण वाघाकडे पाहिलें तर त्यानें स्वतः केलेल्या विश्वासघाताचे दोनचार पुरावे तरी सहज देतां येतील. परशुरामभाऊंचा नाश मी करीन असें टिपूला वारंवार विनवून सांगून स्वतःची सुटका करून घेणारा वाघ सुटल्यावरोवर लगेच टिपूवरच उलटला ही गोष्ट नजरेसमोर असतां धोंडोपंत त्याला आश्रय देऊन आपल्याच हातानें स्वतःला पुरण्याकरितां खड्डा कशाला तयार करतील? त्यांनीं केलें तें वाघासारख्यास योग्य शासनच केलें. शत्रूनें विश्वास-घात सारखा करावयाचा आणि आपण मात्र त्याला विश्वासांत घ्यावयाचें हा न्याय जरी नीतिमानांना आदरणीय वाटला तरी तो युद्ध शास्त्रांत केव्हांही अनुकरणीय ठरूं शकत नाहीं. 'शठप्रतिंशाठ्यम्' असेंच वागावें लागतें.

---

# प्रकरण ५ वें

## प्रतिज्ञा पालन

हल्याळला बापूसाहेब व चिंतामणराव पोंचल्यावर त्यांनीं गोखल्यांकडील एक तोफ बचावून आणली. वाघ त्यांचा पाठलाग करीत आला असतां त्याच्यावर इंग्रजांनीं तोफा डागल्या त्यामुळें तो कच खाऊन पळून गेला. दोघांच्या जखमा त्यांच्या सैन्यांतील शिपाई मिरासाहेब कुन्नरकर होता त्यानें बांधल्या. हल्याळचे किल्ल्यांत गेल्यावर डॉक्टरांनीं पुन्हां टांके घातले. धोंडो बल्लाळ यांचा मुडदा व आपाजी गणेश यांचें धड हीं वाघ आपल्या मुलखांत घेऊन गेला होता. तेथें कृष्णरावजी देशपांडे कारडगीकर यांनीं अप्पासाहेबांच्या शिरस्थानीं नारळ ठेऊन उभयतांस कित्तूरास भडाग्नी दिला. आप्पासाहेबांचें टांगलेलें शीर दुसऱ्या दिवशीं बापूंच्या हातीं लागलें तें आणून त्याचें दहन हल्याळास केलें. दोघांच्या पत्नी नरगुंदास रहात होत्या त्यांस वरील सर्व वृत्तांत कळला. उभयतांच्या अस्थी कृष्णराव देशपांडे यांनीं नरगुंदास पाठविल्या. तेथें अप्पाची पत्नी सती गेली. बापूंनीं आपल्या चुलत्याची क्रिया करण्याचें मत चुलतीपुढें मांडलें परंतु ‘ तिनें जे लढाईत पडले त्यांची क्रिया झालेलीच असते ती पुन्हां करण्याची गरज नाहीं. क्रिया करण्यापासून त्यांना लाभणाऱ्या आनंदापेक्षां शत्रूचा सूड घेतल्यानेंच त्यांना जास्त सुख होईल ’ असें सांगितलें. बापूंनीही वाघाला मारल्याशिवाय पागोटें घालणार नाहीं अशी प्रतिज्ञा केली.

धोंडोपंत गोखले चिदंबर स्वामीचे परमभक्त होते. वाघाशीं लढाई करण्याच्या उद्देशानें जेव्हां ते रुद्रापुराहून कितुराकडे निघाले तेव्हां

देवळापूर–तालुका–कित्तूर येथें दीक्षित बाबांच्या दर्शनास गेले, आपा व बापू हे दोघेही त्यांचेबरोबर होते. तेथें निरोपाच्या वेळीं बावा प्रसादाचें फळ देत असतांना तें धोंडोपंतांनीं घेतलें नाहीं. वाघास मारून येईन तेव्हां प्रसाद घेईन असें बोलले. व फलत्याग करून गेले ते तिकडेच मेले. त्यामुळें दीक्षितांस फारच दुःख झालें. दोन दिवस त्यांच्या डोळ्याचें पाणी खळलें नाहीं.

धोंडोपंतांना ठार मारल्यावर वाघ परत आपल्या मुक्कामास आला तेथें त्यानें कित्तुरकर देसायाचीं ठाणीं मलप्रभेच्या दक्षिणतीरास होतीं तीं सर्व घेतलीं. तेव्हां त्या देसायानें घाबरून त्याला खंडणी देण्याचें कबूल केलें. ( हा वाघाच्या विश्वासघाताचा दुसरा पुरावा. ) नवलगुंद तालुका हा गोखल्यांस पेशवे सरकारांतून जहागीर मिळालेला होता. तो या वेळीं वाघानें घेतला आणि तेथील देसायाकडून कांहीं रकम घेऊन त्याला बहाल केला. दोडवाडचें ठाणें चिंतामणरावआपांचें होतें तें शहापूरच्या देशपांड्यानें फितवून वाघाच्या हवालीं केलें व त्याची कमाविसदारी आपण घेतली. नंतर दोडवाड व नदीतीरचीं ठाणीं व नवलगुंद तालुका यांच्या संरक्षणा-करितां व कित्तूरकरांकडच्या खंडणीच्या वसुलीकरितां वाघानें तीन हजार स्वार व दोन तोफा देऊन जोती घोरपडे यास दोडवाडच्या ठाण्याजवळ ठेवलें असा बंदोबस्त केल्यावर तो इंग्रजांचा समाचार घेण्याकरितां साव-नूरकडे वळला.

वेलस्ली वर्धेवर असतांच धोंडजी आपणांवर चालून येणार ही बातमी त्यास कळली होती आणि म्हणून त्यानें हल्ला करण्या पूर्वी आपणच पुढें होऊन त्यास गांठावें म्हणून ते सावनूरास आले होते व तेथें बाजारबुणगें ठेऊन लढाईला मोकळे झाले. परंतु वाघाची कांहींच बातमी कळेना. तेव्हां त्याच्या ताब्यांतलें कुंदगोळ म्हणून ठाणें सावनूरापासून एकवीस मैलावर होतें त्यावर चालून जाण्याचा त्यांनीं बेत ठरविला. वाघ मध्येंच सावनूरला गेला

होता. त्यास आपल्यावर हल्ला होणार म्हणून कळलें व त्यानें तांतडीनें कुंद्गोळास जाऊन बंदोवस्त केला व आपण धारवाडापासून दहा कोसांवर जाऊन बसला.

या प्रकाराची वेलस्लीला कांहींच माहिती नव्हती. त्यानें ठरल्याप्रमाणें १४ जुलैला कुंद्गोळवर हल्ला केला. ठाणें सर झालें व आंत सांपडलेल्या सहाशें काटकांची कत्तल करण्यांत आली. वाघावरील चढाईचें धोरण पटवर्धनांचे मामलेदार बाळकृष्णपंत लागू यांनीं आंखलें होतें त्यामुळें प्रत्येक ठाणें सर झाल्यावर तें त्यांचे हवालीं करण्यांत येत असे व ते त्याची व्यवस्था उत्तम ठेवीत. याप्रमाणें कुंद्गोळचेंही ठाणें त्यांचे स्वाधीन करण्यांत आलें. याच मुक्कामीं धोंडजी वाघास ठार करणारास ३०००० रुपयांचें बक्षीस देण्याचा जाहीरनामा वेलस्लीनें लावला.

कुंद्गोळ घेतल्यावर दुसरे दिवशीं म्हणजे १५ तारखेस वेलस्ली लक्ष्मेश्वरास आला. तेथचा देसाई वाघाचा हस्तक होता व त्याच्याच हाताखालीं तें ठाणें होतें, पण इंग्रज येण्याच्या आधींच तो ठाणें टाकून पळाला. त्यामुळें तेथें बाळकृष्णभाऊचा अंमल पूर्णपणें बसला. तेथून इंग्रजांचें लष्कर सोळाव्या तारखेस शिरहट्टीस आलें. लक्ष्मेश्वरच्या देसायानें त्यांच्या आगमनाची बातमी कळतांच त्या ठाण्यास घातलेला वेढा उठवला व आपण पळून गेला.

बापू गोखले व चिंतामणरावअप्पा हे १५ दिवस हल्याळास होते, त्या अवधींत त्यांच्या जखमा बऱ्या झाल्या व शिल्लक असलेल्या फौजेलाही विश्रांति मिळाली. नंतर दोघेही तेथून निघून धारवाडवरून हुबळीस गेले. आपणांस येऊन मिळण्याविषयीं वेलस्लीचीं पत्रें येतच होती. व त्यांच्याही मनांतून हल्याळचा बदला घ्यावयाचा होता. बापू गोखले १९ जुलै रोजीं इंग्रजांना येऊन मिळाले.

शिरहट्टीच्या मुक्कामाहून रसदेची भरती करून घेण्याकरितां इंग्रज सावनूरास आले ते डंबळचें ठाणें घेण्याचे उद्देशानें तेथून पंचविसाव्या तारखेस पुन्हां शिरहट्टीस आले. व लगेच ता. २६ रोजीं सर्वजण मिळून डंबळास आले. तें ठाणें बळकट असून आंत शिबंदी सामान भरपूर होतें. देसाई याच्या कारकूनानीं तहाचें संधान लावण्याचा आव आणला परंतु तो साधण्याचा पूर्वींच बापू गोखल्यांचे पेंढारी डंबळच्या पेठेंत शिरले. कोणी काटकांनीं बंदूकीचा बार काढला. लगेच वेलस्लीही गोखल्यांचे मदतीस धांवला. त्यानें तटाच्या दोन बाजूंस तीस तीस फूट उंचीच्या शिड्या लावून आंत प्रवेश केला व दोघांनीं मिळून बंदूकीच्या अनेक फैरी झाडून किल्ल्यांतलें सात आठशें म्हणूस मारून टाकलें. देसाई सांपडला त्याला फांशी दिलें ही बातमी कळतांच गदगच्या ठाण्यांत त्याचा हस्तक भीमराव मुंडरगी म्हणून होता तो तें ठाणें टाकून पळून गेला.

याप्रमाणें त्या त्रिवर्गांनीं ठाणी घेण्याचा व त्यांत सांपडतील त्या लोकांची कत्तल करण्याचा धडाका सुरू केला तेव्हां वाघाच्या इतर ठाण्यांतून जे अधिकारी होते ते ठाणीं मोकळीं टाकून पळून गेले. दोडवाडास तीन हजार फौज घेऊन जोती घोरपडा राहिला होता तो पळून मलप्रभेच्या उत्तरतीरीं रुद्रपुरास जाऊन राहिला. त्रिवर्गांच्या व आपल्यामध्यें दुथडा भरलेली नदी घातल्याशिवाय त्याला चैन पडलें नाहीं. घोरपड्याला हुसकून लावून चिंतामणरावांनीं पुन्हां दोडवाडांत ठाणें बसवून चांगला बंदाबस्त केला. वाघाचे एकंदर आसरे तीन होते. पहिला सोंधेंसावनूर दुसरा मलप्रभा उत्तर-दक्षिण तीर व तिसरा करवीर. पण त्याचा पहिला आसरा एक महिन्यांत गडगडला. इतकेंच नव्हे तर सबंध धारवाड जिल्ह्यांत कोठें उभें रहाण्यास जागा राहिली नाहीं. त्यामुळें तो आतां मलप्रभेच्या आसऱ्यास जाऊन राहिला होता. पण तेथून सुद्धां त्यास हुसकून लावण्याची तयारी चालूच होती.

नवलगुंद तालुक्यांतील सौंदत्तीचें ठाणें अजून बापू गोखल्यांकडे होतें तें घ्यावें म्हणून वाघ त्या ठाण्यास वेढा घालून बसला आहे ही बातमी गदग

येथें असतां त्रिवर्गास कळली. त्यावरून त्यास गांठण्याच्या उद्देशानें ते अलगवाडी येथें आले. तेथून मनोळी २६ मैल व सौंदत्ती १५ मैल आहे. इंग्रज जवळ आल्याची बातमी येतांच वाघानें आपल्या फौजेचा तीन टोळ्या केल्या एका टोळीबरोबर त्यानें आपल्या तोफा व दरोबस्त बाजार बुणगे घेऊन तें मनोळीच्या किल्ल्यासमोर नदी उतरण्याकरितां पाठविलें. दुसरी टोळी दोडवाडचें ठाणें पुन्हां काबीज करण्याकरितां पाठविली व तिसरी टोळी स्वतः घेऊन आपण मोठ्या पहांटेस जालीहाळाकडे निघून गेला.

मनोळीकडे गेलेल्या टोळींत वाघाची स्वारी असेल या समजूतीनें वेलस्ली सौंदत्तीकडे न जातां मनोळीकडे जाऊन वाघास गांठावें या उद्देशानें ता. ३० रोजीं अलगवाडीहून निघाला. शत्रूचें लोक घंटणाळच्या बारीनें पळून जातील याकरितां ती बारी रोंखून धरावी म्हणून बापू गोखले व चिंतामणराव हे पुढें गेले होते. त्याप्रमाणें ते सरदार बारींत येऊन उभे राहतात, तोंच इंग्रजांच्या फौजेनें तिसरे प्रहरीं येऊन वाघाचा तळ गांठला. शत्रूच्या तोफा व फौज आणि दोन हिस्से बाजारबुणगें नदीं-पलीकडे गेलें होतें व एकहिस्सा मागें राहिलें होतें. एकीकडून इंग्रज व दुसरी कडून मराठे असे घुसल्यामुळें त्या सैन्यास कोठेंही पळावयास वाट न मिळतां शेंकडों लोक मारले गेले व शत्रूच्या हातीं होतें नव्हतें तेवढें सर्व सामान मराठ्यांच्या व इंग्रजांच्या हातीं सांपडलें. मनोळीच्या किल्लेदाराची व वाघाची फार दोस्ती होती. आपल्या डोळ्यांदेखत शत्रू वाघाचा गोट लुटतो हें त्याला उघड्या डोळ्यांनीं पाहवलें नाहीं. त्यानें किल्ल्यावरून इंग्रजांवर तोफा सुरू केल्या त्यांनीही उलट मारा करून त्याला पळावयास लावलें. तें पहातांच मनोळीचा किल्लेदार घाबरला आणि सायंकाळीं किल्ला मोकळा टाकून पळून गेला. तें वर्तमान त्रिवर्गास कळतांच त्यांनीं तितक्या रात्रीं सैनिक पोहावयास घातले व पलीकडे असलेली एक नांव अलीकडे आण-विली. आणि तिच्या सहाय्यानें पुढें गेलेल्या सैन्याच्या पांचही तोफा आणविल्या. या तोफा डवगीनाल्याच्या लढाईत वाघानें गोखल्यांपासून

हिरावून घेतल्या होत्या म्हणून त्या गोखल्यांस देण्यांत आल्या पण त्या संभाळणें गोखल्यांना शक्य नव्हतें म्हणून इंग्रजांनीं त्या फोडून टाकल्या. मनोळीचा मोकळा किल्ला चिंतामणरावअप्पा आपल्या ताब्यांत घेणार होते पण त्यापूर्वींच वाघाचा मित्र तल्लुरकर देसाई यानें आपले लोक आंत पाठवून तो किल्ला वळकावला.

बापू गोखले व चिंतामणराव अप्पा सौंदत्तीहून इंग्रजांचे लष्करांत परत आले. वाघ जालीहालाकडे गेला आहे त्याचा पाठलाग तुम्हीं करावा असा त्यांचा निरोप आला त्याप्रमाणें ३१ जुलई रोजीं रात्रीं बापू गोखले फौज तयार करून निघाले ते परसगडच्या पश्चिमेस जातात तोंच तिकडून वाघाची स्वारी परत येतांना त्याच्या दृष्टीस पडली. वाघ इतक्या लवकर येईल अशी त्यांची कल्पना नव्हती. त्यामुळें ते चपापून थबकून उभे राहिले. वाघाची फौज जरी दोन तीन हजारांपेक्षां जास्त नव्हती तरी तो खुशाल दिवट्या पेटवून चालला होता. पण ही अपरात्रीची वेळ असल्यामुळें लढाई होऊं शकली नाहीं. तो दोडवाडच्या बाजूनें गेला अशी त्यांस बातमी लागली. दोडवाडांत चिंतामणरावांनीं प्रयासानें वसविलेलें ठाणें वाघ घेणार हें कळतांच चिंतामणराव व बापू गोखले पहांटेसच आपली फौज घेऊन दोडवाडच्या रोखानें निघाले. ते दोडवाडच्या अलीकडे तीन कोसांवर पोंचतात तोंच वाघ त्या ठाण्याच्या दक्षिण बाजूस टेंकडीवर असल्याची बातमी त्यांस कळली. त्यावरून बुणगें पिछाडीस घालून व अघाडीस फौज घेऊन ते सावधपणें चाल करीत दोडवाडापर्यंत आले. तेवढ्यांत एक प्रहर लोटला. त्यां अवधींत त्यांच्या येण्याची बातमी लागल्यामुळें वाघ तेथून पळाला तो मलप्रभा उतरण्याचा उद्देशानें संगोलीस गेला. लगेच दोघेही सडी फौज घेऊन त्याच्या पाठीवर गेले. त्या दिवशीं वाघाच्या फौजेनें अहोरात्र मिळून २५ कोसांची मजल मारल्यामुळें त्यांच्या अंगांत लढण्याचें त्राण उरलें नव्हतें. ते लोक मोकळ्या अंगानें घोडी सोडून विश्रांती घेत आहेत तोंच गोखले व पटवर्धन आल्याची त्यांस बातमी कळली. ती कळतांच त्यांची

मोठी तारांवळ उडाली व भोजनाचा उद्योग टाकून त्यांनीं पलायनाचा स्वीकार केला. त्यांनीं जी एकदां धूम ठोकली ती सह्याद्रीचें जंगल सांपडे-पर्यंत मागें वळूनसुद्धां पाहिलें नाहीं. नंतर चिंतामणराव अप्पा परत दोडवाडास गेले.

शत्रूचें वुणगें लुटल्यावर वेलस्ली दुसऱ्या दिवशीं सौंदत्तीस गेला. हैदरा-बादेहून तीन इंग्रजी पलटणें व तीन हजार मोंगलस्वार त्यांच्या मदतीस आले. नंतर ऑगस्ट पांचला इंग्रज, गोखले, मोंगल वगैरे लष्कर कितूरला आले. तेथें ते येण्यापूर्वीच वाघ जंगलांत शिरून जांबोटीस राहिला होता. त्यानें आपलें सर्व सैन्य जांबोटीस एकत्र केलें होतें. जंगलांत शत्रूचा रिघाव होत नसल्यामुळें जरी त्याला सुरक्षितपणा प्राप्त झाला होता, तरी स्वतः बाहेर जावयाची धमक नसल्यामुळें अन्नाचा पुरवठा होणें अशक्य झालें व त्यामुळें कांही कां होईना पण आपण बाहेर पडलेंच पाहिजे असें त्यास वाटूं लागलें. तरी तो हिकमती होता. नदी उतरून जाणें शत्रूच्या तावडींतून अशक्य असें पाहतांच त्यानें नदीला वळसा घालून उगमावरून पलिकडे जाण्याचें ठरविलें व तो त्याप्रमाणें निघून गेला. वाघ जंगलांतून निघाला तो शहापूर तालुक्यांत भोरहाळ येथें आला. तेथें त्याचा मित्र जोती घोरपडा हा त्याची वाट पहात वसला होताच. त्यामुळें कर्नल स्टिव्हन्सन व कर्नल वौसर हे खानापुराजवळ नदी उतरून शहापुराकडे वाघाच्या हालचालीवर नजर ठेवण्याकरितां आले.

वाघ तेथून निघाला तेव्हां करवीरकरांचें त्याला सहाय्य असावें असा इंग्रजांना संशय आला. पटवर्धनांचें व करवीरकरांचें अतिशय वांकडें होतें तेव्हां करवीरकर त्यांच्याविरूद्ध वाघाला मदत करतील ही गोष्ट उघड होती, म्हणून इंग्रजांनीं करवीरकरांना चांगलाच दम भरला व त्यांच्याकडून वाघानें इकडे येऊं नये आल्यास त्याचें पारिपत्य केलें जाईल असें जाहीर करविलें.

वाघाचें करवीरकरांकडील संधान फिसकटलें तेव्हां तो वेळगांवकरांकडे

गेला. त्यांच्याकडून कांहीं पैसा उपटतां येईल अशी त्यास आशा वाटली पण ती फोल ठरली. पाच्छापूरचें ठाणें त्याला बधेना आणि शहापूरकरांनीं तर त्याच्याशीं लढाई देऊन त्याचे दोन चार हजार बैल लुटून घेतले. यामुळें वाघास उभें रहाण्यासद्धां आसरा नाहींसा झाला आणि पाटी-मागून शत्रूचें सैन्य एकसारखें जवळ येऊं लागलें. म्हणून तो तो टापू सोडून गोकाकवरून धारवाडास गेला. परंतु तीं ठाणीं पटवर्धनांची होतीं व त्यांचा बंदोबस्तही चांगला होता म्हणून त्यानें आपलें लक्ष खेड्यापाड्यांची लुटा-लूट करण्याकडे वळविलें.

आतां मात्र वाघाचा पडता काळ आला होता. त्याचे सैन्यास एकसारखें कूच करावें लागत असल्यामुळें स्वस्थता नव्हती. त्यामुळें सैनिक संत्रस्त झाले व त्यास सोडून जाऊं लागले. पगार वेळच्यावेळीं न मिळाल्यामुळें कांहींनीं कटकटी सुरू केल्या, त्यामुळें त्याच्या सैन्यांत वारंवार दंगे होत. अशाही विकट परिस्थितींत त्यानें कोणास भावी यशाची आशा दाखवून तर कोणास दम देऊन त्यांची समजूत घातली व त्यांना आपल्या हाता-खालीं ठेवलें.

धोंडजीस देवराव देशपांडे यानें शहापूराकडे लुटालूट करण्याकरितां बोलावलें होतें तो यावेळीं वाघाच्या लष्करांत होता व त्यानें आपलीं मुलें माणसें बेळगांवच्या किल्ल्यांत ठेविलीं होतीं. शहापूर तालुका पटवर्धनांचा असल्यामुळें चिंतामणरावांचा देशपांड्यावर फार दांत होता. हीं मुलेंमाणसें आपल्या हातीं आलीं तर तो चांगला वठणीवर येईल असें त्यांस वाटलें व त्यानें वेलस्लीला तीं आपल्या ताब्यांत घेण्याविषयीं सुचविलें. वेलस्लीनें तीं स्वाधीन करण्याविषयीं बेळगांवचे किल्लेदार सिद्धेश्वरपंत विनीवाले यास सांगितलें. तें त्यांनीं ऐकलें नाहीं म्हणून लढाईचा प्रसंग आला होता. पण लागूंच्या मध्यस्थीमुळें तो मिटला.

या एकंदर परिस्थितीमुळें वाघ एकाकी पडला. यावेळीं त्याच्या बाजूचा

असा एकटा तल्लुरकर देसाई होता. त्याच्या ताब्यांत, मनोळी, मुरगोड, व तल्लूर अशीं तीन ठाणीं होतीं. त्यानेंच जलदी करून मनोळीचें ठाणें आपल्या ताब्यांत घेतलें होतें. म्हणून चिंतामणरावांचा रोंख त्यांचेकडे वळला व त्या देसायावर स्वारी करून त्यांनीं तल्लूरचें ठाणें पाडून टाकलें व त्यांत वाघानें तोफा व बंदुका इत्यादि जें सामान ठेवलें होतें त्या सर्वांचा नाश केला. तल्लुरकर देसाई पळून गेला. त्या प्रसंगीं तोफा फोडल्या त्यांत गोखल्यांची काळापहाड ही तोफ होती. मनोळी व मुरगोड हीं ठाणीं पूर्वी परशुरामपंत भाऊंकडे होतीं म्हणून वेलस्लीनें तीं हरिपंतबाबाचे हवालीं केलीं.

इतकें झाल्यावर धोंडजीवाघाचा पाठलाग करण्याचें काम पुढें व्यवस्थितपणें चालू झालें. सर्व सैन्याच्या एकंदर चार टोळ्या केल्या गेल्या व त्यांनीं निरनिराळ्या मार्गांनीं जाऊन सर्व कर्नाटक रोंखावयाचा व वाघाला जरासुद्धां एका ठिकाणावर ठरूं द्यावयाचा नाहीं असें धोरण आंखलें गेलें. त्याच्या मार्गांमध्यें हुली व शिरसंगी हीं वाघाच्या स्नेह्यांची ठिकाणें लागलीं त्यांची दुर्दशा करण्यांत आली, शेवटीं ही सर्व फौज हालीहाळ येथें पोचली व वाघाच्या येण्याची वाट पहात बसली.

याप्रमाणें चोहोंकडून कोंडमारा झाल्यानंतर वाघाचें मरण अती लवकर ओढवणार असें दिसूं लागलें पण तरीही त्यानें धीर सोडला नाहीं. शांतपणें विचार करून त्यानें नदीस उतार कोठें कोठें लागेल त्याचा तपास लावला व ता. २४ रोजीं रात्रीं हालीहाळ जवळ बारा कोसांवर बुधिहाळ येथें उतार झाला असें समजतांच तो शत्रूंच्या हातावर तुरी देऊन रातोरात निसटून गेला व मोंगलाईंत शिरून स्वस्थपणें लुटालूट करून त्यानें जम बसविण्याचा प्रयत्न केला.

त्यानें शत्रूंच्या टोळ्यांची बातमी चांगलीच राखली होती. मराठे व मोंगल इंग्रजांच्या पुढें झाले आहेत असें कळतांच तो त्यांचा समाचार घेण्याकरितां एक मजल मागें आला. सप्टेंबरच्या ९ तारखेस त्याचा मुकाम कवतालभानू

नंदिहाळ नजीक पडला. त्या मुकामीं लष्करांत दंगा झाल्यामुळें त्यास तेथून हलतां आलें नाहीं. वेलस्लीचे सर्व हेर त्यास बातमी पोंचवीतच होते. सप्टेंबर ७ ला ते कनकगिरी येथें होते. ते दुसरे दिवशीं फक्त ८००० तुरुपस्वार बरोबर घेऊन झपाट्यानें चाल करीत बसवापूर येथें आले आणि पुन्हां बारा कोसांची मजल मारून तारीख ९ रोजीं सायंकाळीं वाघाच्या मुकामापासून ६ मैलांवर यापवपरली येथें येऊन राहिले. वाघ रात्रीच्या वेळीं पळून जातो कीं काय ही काळजी त्यांस रात्रभर भेडसावीत होतीच. पोंचतांच त्यांनीं मी वाघावर सकाळीं चालून जातों तुम्हीं निरोप पोंचतांच निघून या असा गोखले व पटवर्धन यांना निरोप पाठविला. आणि स्वतः पहांटेस सैन्यासह कूच करून वाघाचा तळ गांठला. इंग्रज हल्ला करण्यास येत आहेत अशी बातमी त्यास लागतांच त्यानें आपलें बाजारबुणगें तयार केलें व पुढील प्रसंगास तोंड देण्यास तयार राहिला. इंग्रजांनीं त्यावर येतांच हल्ला केला तेव्हां त्यानेंही त्यावर उलट हल्ला केला. त्यांत पिस्तुलाच्या तीन गोळ्या लागून तो पडला व त्याची फौज पराजित होऊन निघून गेली.

---

* हें सर्व प्रकरण कै. खरे यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रह भाग १२ या पुस्तकावर आधारलेलें आहे. पण जन्मभर बापूंच्या हाताखालीं काम केलेले विठ्ठल चिंतामण पुणेकर यांनीं जी बखर लिहीली तींत चक्षुर्वैसत्यं म्हणून लिहिलेला पुढील मजकूर आढळतो.

‘ धोंडजी वाघास मारल्याखेरीज पागोटें घालावयाचें नाहीं असा बापूंचा निश्चय ठरला होता. त्याप्रमाणें वेलस्लीसाहेबांचे कांहीं लोक बरोबर घेऊन बापू गोखले धोंडजीवाघाची गांठ पडण्याची संधि पहात होते. पुढें एके दिवशीं कवतालभानू येथें गांठ पडली असतां बापूंचे अंगांत त्वेष भरला होता. त्या आवेशांत वाघाचे फौजेवर तुटून पडून त्याचे फौजेची नासाडी करून दिली. आणि एकच सिंहासारखी उडी घेऊन वाघास ठार मारून टाकलें. वाघाचा प्राण घेतल्यावर डोकीस पागोटें घातलें. ’

यानंतर गोखल्यांनीं पाठलागाचें काम पुढें चालू ठेवून सायंकाळपर्यंत वाघाचे लोक जेथें जेथें सांपडले तेथें तेथें त्यांचा विध्वंस केला. त्या पाठलागांत वाघाची कलावंतीण व भाचा अशा दोन महत्वाच्या असाम्या सांपडल्या त्यांत कलावंतीण सांपडली ती इंग्रजांनीं ठेऊन घेतली व भाचा बापूंच्या ताब्यांत दिला.

# प्रकरण सहावें

## पटवर्धन प्रकरण

धोंडजी वाघाचें प्रावल्य एवढें वाढलें असतां वास्तविक सर्व मराठे सरदारांनीं एकत्र व्हावयास पाहिजे होतें. परंतु तें घडलें नाहीं इतकेंच नव्हे पण ज्या परशुरामभाऊंच्या खुनावद्दल धोंडोपंतांनीं इतकी सूड घेण्याची तयारी दर्शविली व ज्यांच्या बरोबरीनें त्यांनीं करवीरकरांची रग जिरवली, जिवावर प्रसंग आला असतां डाससाहेबास १ लाख रुपयांस जामीन रहावयास तयार झाले, आणि स्वतःचा जीव धोक्यांत घालून बाबासाहेब पटवर्धनांस मिरजेस पोंचविण्याची हमी घेतली त्या रामचंद्रपंतांनीं या स्वारींत त्यांना काडीचीही मदत करूं नये हें आश्चर्य होय. वाघाबरोबर लढतांना रामचंद्र अप्पांनी धोंडोपंतांची कुमक मनापासून केली असती तर कित्तूर सोडून हल्ल्याळकडे निघून जाण्याचा गोखल्यांना प्रसंग आला नसता हें खरें आहे. ही गोष्ट कै. खरे मान्य करतात परंतु लगेच पुढच्या वाक्यांत म्हणतात कीं त्यांत रामचंद्रपंत अथवा त्यांचे बंधू यांजकडे कांहीं दोष नाहीं. आणि याला कारण मात्र असें देतात कीं ' तासगांवकर व गोखले यांच्यामध्यें सलोखा दिसून आला तरी तो बाह्यात्कारी होता. आंतून त्या दोघांचीं मनें परस्परांविषयीं सरळ नव्हतीं याचें त्या दोघांच्या मैत्रीवर बाजीरावसाहेबांनीं गुप्तपणें घातलेला बिब्बा हें कारण होय. तासगांवकरांकडे रद कर्जास दिलेले सावनूर राज्याचे महाल त्यांना एक पैसा न देतां श्रीमंताना घ्यावयाचे होते. त्याकरितां त्यांनीं धोंडोपंत गोखल्यांस गुप्त रितीनें हुकूम पाठविला होता कीं हे महाल तुम्हीं पटवर्धनापासून जबरीनें हिसकून घ्यावे ! एकदां ते महाल आपल्या ताब्यांत आले म्हणजे ते पेशव्यांस किंवा

पटवर्धनांस यांपैकीं कोणासही देऊं नयेत फौजेच्या वेगमीकरितां म्हणून आपणच दावून बसावें अशी गोखल्यांची मनीषा होती. वाघाची मसलत आटपल्यावर गोखले व पटवर्धन यांच्यामध्यें युद्ध सुरू होणारच होतें. यामुळें धोंडोपंत गोखले व धोंडजी वाघ या दोघांपैकीं कोणाचेंही अभिष्ट-चिंतन करण्याचें परशुरामभाऊंच्या मुलांना कारण नव्हतें. दोघेही त्यांचे शत्रूच होते, एकानें त्यांचे महाल वळकावलेच होते म्हणून व दुसरा ते पुढें वळकावणार होता म्हणून ! वाघाशीं लढाई होण्यापूर्वी पांच चार दिवस गोखल्यांचा वकील वेलस्लीसाहेबांजवळ असें स्पष्टच म्हणाला होता कीं, पुण्याहून आम्हांला गुप्त हुकुम आला आहे तो आम्ही इतक्यांत फोडीत नाहीं आणि वाघाचा बंदोवस्त होईपर्यंत तासगांवकरांशीं विरुद्धभाव दाखवीत नाहीं तें काम आटपल्यावर तुम्ही तिऱ्हाईतपणें तमाशा पहात रहा. आम्ही आणि तासगांवकर पाहून घेतों ! अशी स्थिती झाल्यामुळें रामचंद्रपंतास गोखल्यांशीं वरकरणी मदत दाखवावी लागत असली तरी धोंडजी वाघावर त्यानें करडी नजर धरली होती असें मात्र नव्हे. त्यानें वासुदेवकाकांस कैदें-तून सोडवून पाठविलें व त्यांच्या द्वारें मैत्रीचा संबंध लावला तेंव्हां त्यालाही ते हूं हूं म्हणतच होते. तूर्त रामाय स्वास्ति रावणाय स्वति अशांतलें धोरण त्यांनीं आंखलें होतें. '

कै. खरे यांच्यासारख्या इतिहाससंशोधकावर पक्षपातीपणाचा आरोप आणि तोही माझ्यासारख्या एका अगदीं कमी प्रतीच्या साहित्यसेवकानें करणें ही गोष्ट अनुचित ठरेल परंतु जरी ती तशी ठरली तरीसुद्धां माझ्या चरित्रनायकावरील आरोप जर त्यामुळें खोटा ठरत असेल तर तिची मला फिकीर वाळगून चालणार नाहीं. धोंडजी वाघाबद्दल त्यांनीं जो आरोप धोंडोपंतावर केला तो कसा चुकीचा ठरतो तें मी पूर्वी दाखविलेंच आहे. या वेळींही माझ्या मनाला पटवर्धनांचे बाबतींत गोखल्यांवर केलेले आरोप खोटे वाटतात व त्याला माझी कारणें पुढीलप्रमाणें आहेत.

तासगांवकरांना दिलेले तालुके पेशव्यांना त्यांच्याकडून हिरावून घ्यावयाचे

होते व त्याकरितां त्यांनीं धोंडोपंतांस गुप्तरितीनें हुकुम पाठविला होता. हा गुप्त हुकूम आधीं पटवर्धनांच्या हातीं लागला असें मानलें तरच त्यानंतरचें पटवर्धनांचें वागणें न्याय्य ठरतें. याचा अर्थ गुप्त हुकुम पाठविणारा बाजीराव अथवा तो ज्यांस मिळाला ते गोखले यांपैकीं कोणाकडून तरी ही बातमी फुटली असली पाहिजे. बाजीराव किती पाताळयंत्री होता हें खऱ्यांनींच आपल्या लेखसंग्रहांतील पत्रांवरून व त्यांतील प्रस्तावनांवरून सिद्ध केलें आहे. तेव्हां असली महत्वाची बातमी तो आधी ८–१० महिने फोडील ही गोष्ट शक्य दिसत नाहीं. शिवाय बाबा काळे यानें १३ ऑगस्ट १८०१ रोजीं जें पत्र पुण्याहून जमखंडीस पाठविलें त्यांत पुढीलप्रमाणें उल्लेख आहे.

"हल्लीं बाळोजी बाबांनीं सरकारचीं पत्रें राजश्री बापू गोखले यांस पाठविलीं कीं सावनूर तालुकेचीं ठाणीं वसवून बाळोजी कुंजीर याचे कारकुनाचे हवालीं करणें. लढाई पडली तरी मोर्चे वसवून घेणें."

धोंडोपंत गोखल्यांचा मृत्यू १८०० च्या आक्टोबर महिन्यांत झाला आणि धोंडजी वाघाशीं लढाई त्याचे आधीं ६–७ महिने चालू होती. त्यानंतर जवळ जवळ २ वर्षांनीं हें पत्र बाबा काळ्यानें लिहिलें आहे. पुण्याकडील पक्का व विश्वासू असा बातमीदार, ज्याच्यातर्फे पटवर्धनांना पुण्याकडील सर्व हकीकत कळावयाची तो ती ज्यावेळीं ही बातमी पटवर्धनांना कळली तेव्हांपासून या दोन वर्षांत अजिबात कळवल्याखेरीज राहील असें वाटत नाहीं. सदरहू पत्रांत आपली पूर्वी अटकळ असल्याकारणानें अशा अर्थाचे उद्गार कोठेंही नाहींत. सर्व पत्र आपण जणूं कांहीं नवीन माहिती कळवीत आहोंत अशाप्रमाणें दिसतें. पटवर्धनांना ही बातमी वेलस्लीकडून कळली असें मानलें तरीसुद्धां अशा महत्वाच्या बातमीच्या खरेखोटेपणाची शहानिशा आपल्या पुण्याच्या बातमीदाराकडून ते पटवून घेतल्याशिवाय रहातील हें म्हणणें मला बरोबर वाटत नाहीं. त्यांनीं यासंबंधीचें पत्र बाबा-काळ्यांस पाठविलें असलें तर त्याचें उत्तर पाठविल्याशिवाय तो रहाला नसता. व हें उत्तर कै. खऱ्यांनींसुद्धां आपल्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत

छापण्यास मागेंपुढें पाहिलें नसतें. मला वाटतें कीं पटवर्धनांची बाजू पुढें मांडण्याकरितां पुढें घडलेल्या गोष्टी जमेस धरून कै. खऱ्यांनीं ती Defend केली आहे त्या गोष्टींची माहिती पटवर्धनांना होती असें गृहीत धरलें आहे. पटवर्धनांनीं गोखल्यांना धोंडजीवाघाविरुद्ध लढण्यांत मदत केली नाहीं याचें कारण हें नव्हे. तसें असतें तर विठोजी होळकराविरुद्ध पेशव्यांच्या वतीनें गोखले लढत असतांना त्यांनी विठोजी होळकराचा पक्षपाती कुशाबा मोदी याला मदत केली नसती. गोखल्यांना त्यांनीं जरी मदत केली नाहीं तरी निदान पेशव्यांच्या शत्रूला आसरा द्यावयास नको होता. त्याप्रमाणें ते ज्या कारणांकरितां धोंडजीवाघाचे वेळीं तटस्थ राहिले तीं कारणें खरीं असतील तर त्यांना विठोजी होळकराचेवेळीं तटस्थ रहाणें भाग होतें. तें त्यांनीं केलें नाहीं. आपल्याच मनुष्यावर स्वार्थीपणाचा आरोप करणें जड जात असलें तरी यावेळीं लेखकाला आपलें कटु कर्तव्य बजावणें भाग आहे. विठोजी होळकराविरुद्ध बापू लढत असतांना पटवर्धनांनीं मोदीला आश्रय दिला याचें कारण एकच व तें म्हणजे त्यांचे शासन बापूंना एकट्यांना करणें जड होतें व ही परिस्थिती त्यांना माहीत होती हें होय. धोंडजी वाघाविरुद्ध इंग्रज व गोखले हे एका बाजूला होते व त्यांच्या विरुद्ध वागल्यास आपलें सर्वस्वी नुकसान झाल्याखेरीज रहाणार नाहीं ही जाणीव असल्यामुळें त्यांनीं धोंडजी वाघाला मदत केली नाहीं. तसें नसतें व गोखल्यांची बाजू थोडी कमकुवत आहे असें आढळून येतें तर त्यांनीं धोंडजी वाघास मदत करून आपला स्वार्थ साधण्यास माघार घेतली नसती. बाजीरावाबद्दल त्यांचें मन परशुरामभाऊंच्या अटकेपासूनच विटलें होतें. महाराष्ट्राच्या राजकारणांत भाग घेण्याचें त्यांनीं जवळ जवळ सोडलें होतें असें म्हटलें तरी चालेल. आपला राहिलेला मुलुख मात्र आपल्या हातून सोडावयाची पाळी आली नाहीं म्हणजे झालें एवढाच त्यांचा हेतु होता. आणि याच हेतूमुळें त्यानीं धोंडजीवाघाचेवेळीं बापूस मदत केली नाहीं. याचा अर्थ बापूंवर त्यांचा कांहीं आरोप होता असा होत नाहीं, तो पटवर्धनांच्या धोरणाचा प्रश्न होता व

तें धोरण निदान यावेळीं तरी स्वार्थीपणाचें होतें यांत बिलकुल शंका नाहीं. हें धोरण इष्ट का अनिष्ट ही गोष्ट वेगळी.

बापू हे तालुके आपल्या घशांत घालणार होते हा त्याच्यावर बेईमानी-पणाचा केलेला आरोपही असाच धुऊन निघतो. लेखकानें 'मुजरा' या प्रकरणामध्यें त्यांच्या इमानीपणाचीं उदाहरणें दिलीं आहेतच. असाच आरोप त्यांच्यावर पंत प्रतिनिधीचा पाडाव केल्यावर त्याची मालमत्ता यांना लाटा-वयाची आहे या शब्दांत त्यांच्याच नातेवाईकानें–विसाजीपंतानें–त्यांच्यावर बाजीरावाजवळ केला. तेव्हांच बापूंच्या इमानीपणाची कसोटी लागली म्हणून त्याबद्दल विशेप न लिहितां चालु प्रकरणाकडे वळणें बरें.

इ. स. १७९१–९२ सालीं मराठे, मोंगल व इंग्रज या तिघांनींही टिपूवर स्वारी केली. मराठी सैन्याचें आधिपत्य नानांनीं विख्यात सेनापती परशुरामभाऊ पटवर्धन यांजकडे दिलें होतें. टिपूवर जरी तिघे एकत्र होऊन चाल करून गेले तरी तोही कांहीं कमी शूर नव्हता. त्यानें यांना सहजा-सहजीं दाद दिली नाहीं. त्यामुळें परशुरामभाऊंना नवीन फौज ठेवणें भाग पडलें. त्यांनीं नवीन फौज ठेवली व टिपूला जमीनदोस्त करण्यांत यशही मिळवलें, परंतु या प्रकरणांत त्यांना नफा व्हावयाच्याऐवजीं उलट ४० लक्ष रुपयांचें कर्ज झालें. हें कर्ज सरकारकामाकरितां झालें असल्यामुळें त्याची जवाबदारी पेशव्यांवर होती व त्यांनीं ती ओळखून टिपूच्या जप्त केलेल्या १ कोट २० लक्ष रु. उत्पन्नाच्या मुलखापैकीं पेशव्यांनी आपल्या वांटणी-पैकीं सुमारें दहा लक्ष रुपयांचे सावनूरचे महाल भाऊंच्या स्वाधीन केले. भाऊंचें कर्ज फिटतांच हे महाल परत पेशव्यांकडे द्यावयाचा करार ठरला होता. सवाईमाधवराव पेशवे कारभार पहात असेपर्यंत तो करार व्यवस्थित-पणें चालू राहिला. परंतु बाजीरावानें सूत्रें हातीं घेतांच जुन्या सरदारांवर शस्त्र उगारलें. नानांचे पक्षपाती म्हणून त्याचा पटवर्धनांवर दांत होता. शिवाय फुकटांत मिळत असतील तर ते महाल परत मिळवण्याकरितां तो धडपडणार ही गोष्ट उघड होती. पटवर्धनांनीं हे महाल दिले असते पण

मध्यें निरनिराळ्या उपस्थित झालेल्या वंडामुळें त्यांना त्या प्रांतांतून वसूल मिळाला नाहीं व त्यामुळें फारशी कर्जफेडही झाली नाहीं. शिवाय करवीर-करांवरच्या स्वारींत त्यांचें कर्ज मात्र वाढलें होतें. त्यामुळें पेशव्यांनीं महाल ताब्यांत द्या म्हणतांच कर्जाची काय ती वाट लावा व महाल खुशाल घ्या असें त्यांना सांगितलें.

पण बाजीराव काय व्यवस्था लावणार ? त्याला शिंद्यानें पेंचांत धरलें होतें. पुण्यांतून निघून जाण्याकरितां त्यानें बाजीरावापाशीं पैशाचा तगादा लाविला होता त्यामुळें तो स्वतः अडचणींत सांपडला होता आणि पटवर्धनांचा नाश करावयास टपला असल्यामुळें त्याला कारण दाखविण्यास ही आयतीच संधी मिळाली. त्यामुळें त्यानें पटवर्धनांचें म्हणणें मान्य न करितां मला स्वतःलाच बरेंच कर्ज झालें आहे त्यांतच तुमचें समजतों व कधीं काळीं देणें शक्य झाल्यास सर्वांबरोबर तुमचीही सोय लावीन. तूर्त महाल ताब्यांत द्या असें बोलणें लाविलें. याउपर जर तुम्हीं कर्जाकरितां अडून बसाल तर महाल घेऊं व कधीं काळीं पैसे देऊं असें आज म्हणतों तेंही पुढें देणार नाहीं. बाळोजी कुंजराच्या हवालीं महाल आज करा आणि नंतर पुण्यास येऊन वाटाघाट करा असें तो म्हणूं लागला.

त्यानंतर पुन्हां त्यांनीं बाबा काळे यांना सरकारांत नेऊन सांगितलें कीं कर्नाटकचा सरसुभा तुम्हीं करा व बारा लाख रुपये द्या. तें न होईल तर फक्त सावनूर महाल आपल्या ताब्यांत ठेवा व त्यावर जी रक्कम उभयपक्षीं ठरेल ती द्या आणि तेंही शक्य नसेल तर महाल सोडा. मागील कर्ज वारावयाचें नाहीं असें सांगत आलों तरी तुम्हीं महाल पण सोडीत नाहीं व खंडणीही देत नाहीं. गेलें सर्व वर्ष असला प्रकार तुम्हीं चालवला आहे. याउप्पर तुम्हीं असेच वागाल तर आमची तुमच्यावर गैरमर्जी होईल. त्यावर काळ्यांनीं उत्तर केलें कीं सरकारची आमच्यावर मर्जी पाहिजेच व आम्हीं महालही देण्यास तयार आहों पण आम्ही आपण होऊन महाल दिले असें झालें तर सावकार चिडवतील व अडवतील. आणि यापुढें आम्हांला कर्ज

मिळणें शक्य होणार नाहीं. **आपल्यातर्फे हा वाडा जर गोखल्यांनीं घेतला तर तो सरकार आज्ञेवरून जबरदस्तीनें घेतला त्यामुळें आम्हीं आज आपलें कर्ज देऊं शकत नाहीं. तरी होईल तितकें करून आपली रक्कम फेडूं असें सांगावयास आधार सांपडेल.** *

बाबा काळे यांचें असें उत्तर मिळतांच बाळोजी कुंजरानें बापू गोखले यांस सावनूर तालुक्यांतील ठाणीं कबीज करून आमचे कारकून बाळोजी कुंजर यांचे हवालीं करा. वेळ पडल्यास लढाईही करा असें कळविलें आणि त्याचप्रमाणें धारवाडचा किल्लेदार शिंदे यांस बापूंस लागेल तेवढी दारू गोळ्याची मदत करावी म्हणून लिहीलें. सावनूरच्या ठाण्यावर बाजीरावानें सहा लक्षांचा आकार केला होता. तो देण्याइतके पैसे रामचंद्र अप्पाजवळ नव्हते. गोखल्यांजवळ लढावयाचें असें ठरवून त्यांनीं अप्पा निपाणकरांकडे मदतीबद्दल बोलणें सुरू केलें. त्याचीं गदग डंबळ वगैरे ठाणीं गोखल्यांनीं जबरदस्तीनें ताब्यांत घेतलीं होतीं त्यामुळें त्याचें मत गोखल्यांबद्दल साफ नव्हतेंच. त्यानेंही पटवर्धनांस मदत करण्याचें कबूल केलें व त्याप्रमाणें तो अनंतपूराहून कूच करून अथणीपर्यंत आला होता. ही संधी साधण्यास कित्तुरकर देसाई कसा विसरेल. गोखल्यांविरुद्ध कोठेंही चळवळ सुरू झाली कीं ही स्वारी तेथें हजर असलीच पाहिजे. तो आपली फौज घेऊन निघालाच. रामचंद्र अप्पाही कार्तिक शु. प्रतिपदेच्या सुमुहूर्तावर जमखिंडीहून निघाले. बापू गोखलेही कांहीं कमी तयारींत नव्हते. त्यांनीं पटवर्धनांच्या फौजेचा सारखा पाठलाग चालविला होता. रामचंद्र-पंतांचे धाकटे बंधू हरी परशराम हे तडस तालुक्यांत होते. कर्नाटकमध्यें स्वार चांगले नाहींत म्हणून त्यांची भरती जमखिंडी मिरज या भागांतून चालली होती. बापू गोखले व पटवर्धन हे पूर्वीं एकाच ठिकाणीं काम केलेले

---

* यावरून असें स्पष्ट दिसून येईल कीं महाल जबरदस्तीनें घेण्याची सल्ला बाबा काळ्यानें—पटवर्धनांच्या वकिलानेंच—दिला होता.

त्यामुळें परस्परांशीं लढतांना आपणांपैकीं कोण श्रेष्ठ ठरतो याबद्दल दोघेही डोळ्यांत तेल घालून पहात होते. आणि आपण श्रेष्ठ ठरावें या करितां त्या दोघांनीं पैशाची फिकीरही केली नाहीं. याचवेळीं अमृतराव पेशव्याकडून गोखल्यांना मनाचिठी आणण्याचा त्यांचा प्रयत्न चालला होता पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं.

बापू पाठलाग करीत करीत मोंगलांचे तालुके तुडवून सावनूरचे रोखानें आले. बापू येताहेत असें पहातांच सावनूरचे कारभारी हरीबाबा पटवर्धन यांनीं तें ठाणें सोडून आपला मुक्काम कुंदगोळास नेला. बापूंनी वाटेनें येतां येतां कुंदगोळ तालुक्यापासून घांस दाणा वसूल केला व आयतेंच रिकामें सांपडलेलें सावनूरचें ठाणेंही काबीज केलें.

या लढाईबद्दल पटवर्धनांचा पुण्याचा वकील बाबा काळे याचें मत विरुद्ध होतें. सावनूरचे महाल बाजीरावाचे ताब्यांत यावे व कर्जाबद्दलही सावकारांस त्याचेकडेच बोट दाखवावें असें त्याचें मत होतें. बाजीरावाच्या हुकुमावरून गोखले यांनीं सावनूरचे महाल जबरदस्तीनें ताब्यांत घेतले तरी सुद्धा प्रसंगाकडे लक्ष देऊन स्वस्थ बसावें असें त्याचें मत होतें. पटवर्धनांशीं पैशाची फार ताणाताण होती. ही मोहीम करावयाची तर पैसा पाण्यासारखा ओतावा लागणार होता. गोखल्यांनीं कितीही आगळीक केली तरी आपण स्वस्थ बसावें कारण शत्रूजवळ झुंजण्याची आपली ताकद नाहीं असें सांगून त्यानें निपाणकर यांजबद्दल पुढील मत प्रदर्शित केलें.

' अप्पा देसाई निपाणकर येऊन जमखिंडीस आपल्यास भेटला. वे॥ राजश्री रामचंद्र शास्त्री दिक्षीत वाटवे यांचे विद्यमानें राजश्री बापूराव सर्जेराव यांचे विद्यमानें देसाई आले म्हणोन कळलें ऐसी यास ही विनंति मी करूं नये कां म्हणतील तर आपण सर्वजण आहांत परंतु सूचना लिहिली आहे. प्रथम देसाई वडिलीं (परशुरामभाऊपंतांशीं) चाकरीस होते वडीली कामही वतनाचें केलें होतें पुढें करवीरावर स्वारी मिरजेहून गेली ते समयीं राजश्री सदाशिवपंतदादा

मनोळीकर यांचे विद्यमानें वडिलीं दरमहा सात किंवा आठ हजार रुपये करार करून ठेविले असतां समयास आपण दगा करून जावें हा बेत देसाई यांनीं केला. परंतु आपण मजबूत म्हणून गोष्ट निभावली. आपणांपासून निघून घाटगे याजपाशीं राहून आपला प्रांत मजबूत करून पलटणें फौजेचा जमाव करून आपला प्रांत तासगांवसुद्धां खंडण्या घेऊन शेवटीं मिरजेपासूनसुद्धां खंडणी घेतली. दैववशात् आपण धांवून आलेत म्हणून मिरजेचें शहर वांचलें. इतके गुणानुवह आपणांस पुरते ठाऊक असून हल्लीं आपण त्यास जेव्हां ठेवणार तेंही असो. काल (नुकताच) चिंतामणराव यांनीं त्यास सर्वोपरी लुटला हेंही त्याचे चित्तांत असेल. आपण आणि चिंतामणराव एक. आपण देसाई यांस भेटलां तेव्हां चिंतामणराव यांची आपली ममता रहाणार नाहीं. ( श्रीमंत तर ) **यास हरामखोर निपाणकर म्हणतात.** * ऐसें त्याचें वृत्त असतां आपण त्यास बोलावला हें वरें दिसत नाहीं. यंदांच आपणांपाशीं पैसा कोठून आला ? देसाई बदफैली आहे. जातीनें कजाग आहे, समयास माय मावशी ओळखणार नाहीं. मग मर्जी. त्याचे स्वाधीन मनोळी, नेरळी अनंतपूर हीं ठाणीं जबरदस्त आहेत. तेव्हां त्याचा विश्वास धरणें तो विचार करून धरावा. '

बापूंनीं सावनूर तालुका ताब्यांत घेतला एवढेंच नव्हे तर पटवर्धनांच्या सरंजामी मुलखासही त्रास दिला. तेथून सारखीं तीन वर्षें खंडणी वसूल

---

* आणि हेच सर लष्कर निपाणकर अष्टीच्या लढाईचेवेळीं बाजीरावा बरोबर होते. बापूसाहेब आपल्या थोड्या सैन्यानिशीं शत्रूवर चाल करून गेले आणि यांना त्यांनीं आपल्या मदतीस पुढें या असे कळविलें. यांनींही झाड्याची सबब सांगून त्यांस मदत केली नाहीं. ही मदत जर पोंचती तर बापू अष्टीचा संग्राम खात्रीनें जिंकते. किंवा आपली तयारी नाहीं म्हणून सांगते तर बापूनीं दुसरा कांहींतरी मार्ग काढला असता पण फितुरी करून स्वार्थ साधण्याची संवय असलेल्या मनुष्याला बापूंचा नाशच झालेला पहावयाचा होता.

केली. ती परत केल्याशिवाय पटवर्धन चढावाचें धोरण टाकणार नव्हते. यांत जयपराजय किंवा बाजीरावाची मर्जीगैरमर्जी यांचा विचार करण्याची त्यांची तयारी नव्हती. जो कांहीं सोक्षमोक्ष व्हावयाचा असेल तो होऊंदे पण गोखल्यांची रग जिरवीपर्यंत माघार घ्यावयाची नाहीं असें त्यांनीं ठरविलें होतें. धारवाडास शिंदे यांस पत्र दिल्हें कीं, दारुगोळा सावनूर तालुका घेण्यास लागेल तो देणें येणेंप्रमाणें पत्रें पाठविलीं.'

निपाणकर व कित्तूरकर यांच्याशीं त्यांनीं संधान बांधल्यापासून तर बाजीरावाला त्यांना डिवचण्यास आणखी एक कारण सांपडलें. पेशव्यांशीं सलोखा करून हें प्रकरण तोडण्याचा यत्किंचितही प्रयत्न न करितां त्यांनीं या बंडखोरांना आपल्या हाताशीं धरलें यावरून 'तुमचा विचारच बंड करण्याचा आहे,' असा त्यानें पटवर्धनांवर आरोप केला. बापूंनीं सावनूरवर चाल केली म्हणून आम्हीं ही फौज जमा केली असें पटवर्धनांचे वतीनें बाबा काळ्यांनीं सांगितलें. त्याच्यावर गोखले हे आमच्या हुकुमावरून तालुका घेत आहेत हें तुम्हांस माहीत असतां तुम्हीं तेथें फौजांसह कां राहिलेत असा बाजीरावानें प्रश्न विचारला व मी झालेल्या हुकमांत काडीचाही फेरबदल करावयास तयार नाहीं असें त्यानें सांगितलें.

ता. १ जानेवारी १८०१ ला बापू गोखल्यांचें बुणगें नरगुंदास होतें व सडी फौज व तोफासुद्धां ८००० सैन्य त्यांचे ताब्यांत होतें. बाबासाहेब पटवर्धन कुसेगलानजीक होते. कित्तुरकर देसाई मुरगोडाहून कूच करून बाबासाहेबांना मिळण्यांकरितां कुसेगलास निघून गेले. आप्पा देसाई निपाणकर पाच्छापूरवरून वण्णूराहून कुसेगलाकडे गेला. दोन जानेवारीला ही मंडळी हेवलीस मुक्कामास होती. सायंकाळीं दोन घटका दिवस राहिला असतां कुसेगलाचे सीमेबाहेर दिक्षितबाबांचे सांगण्यावरून या मंडळीनें प्रस्थान ठेवलें. यावेळीं कितुरकर व निपाणकर यांनीं सैन्य खालील प्रमाणें आणलें होतें.

अप्पा देसाई याजपाशीं ५००-६०० स्वार व एकहजार गाडदी चार तोफा दोन मोठ्या दोन लहान. कितुरकरांकडचे स्वार ४००-४५० पायदळ १५०० ते २००० गारदी ४०० एक एक शेरगोळयाची तोफ एकंदर फौज सहाहजार पायदळ ३००० व तोफा चार असा पटवर्धनांच्या संयुक्त सैन्याचा आंकडा होता.

ता. ६ रोजीं पटवर्धनांचें सर्व सैन्य हुलगुरास आलें. तेथून कारडगीवर जाणार होतें पण करवीरकरांचें लढाईचे वेळीं गोखल्यांचा तेथें जय झाला होता. म्हणून ती जागा कोणीही पसंत करीना. म्हणून तेथून कूच करून शीगांवाजवळ आलें. तेथून सावनूर लांब पडलेंसें पाहून बंकापूर मागें टाकून सावनूर पासून दीड कोसावर ओढ्याच्या पाण्यावर उतरले. गोखले साव-नूरच्या पूर्वेस मोतीतळयावर होते. बुणगें मात्र त्यांनीं शहरांत घातलें होतें. बाकी पायदळ तोफा वगैरे शहरचा आसरा चांगला होता. त्यांचें सैन्य फक्त अडीच ते तीन हजार होतें. पटवर्धनांनीं गोखल्यांना लढाई करितां सावनूरचे बाहेर आणण्याचा प्रयत्न केला पण गोखले कांहीं बाहेर आले नाहींत. असें तीन आठवडे चालल्यानंतर शेवटीं २८ जानेवारी रोजीं पटवर्धन व गोखले यांची लढाई झाली. तिचें वर्णन राजश्री हरी परशराम पटवर्धन यांनीं पुढील प्रमाणें केलें आहे.

'आज दुपारीं तलाव्यास गेलों होतों सायंकाळचे प्रहर दिवसपर्यंत इकडील व तिकडील फौजेची मारागिरी झाली. गोखले यांचेकडील एकटोळी सावनूरचे दक्षिणेस गांव सोडून पुढेंही थोडीशी वाढून आली होती. वरकड फौज व पायदळ गांवालगत उभें होतें. दोनतीनशें राउतांची टोळी पुढें आली होती. त्याजवर ती॥ राजश्री विठ्ठलराव बाबा व कित्तुरकरांची फौज पाठविली. ते देवगिरीचे वाटेवर जाऊन उभे राहिले. आम्ही शहर पूर्वेकडे माथ्यावर होतों ते पुढें सरकून गोखले उभे होते त्यांजवर चालून घेतलें. आमचे उजवे बाजूस अप्पा देसाईही उठले. त्यांची तोफांची मारगिरी होत

होती ती सोसून गेलों. तिकडून बावाही सरकले. बावांचे तोंडावर टोळी वाढली होती ती उधळून मागें सरकली. तेव्हां गोखले यांणीं पायचें माणूस सुद्धां आम्हांवर चालून घेतलें, तेव्हां गाडयांचा मार सोसवेना. तोफांचे व बंदुकीचे गोळ्यांनी २५ तीस ठार व वीस जखमी झाले. दहाबारा माणूस जखमी व दोनचार ठार झाले. तेव्हां आमचे फौजेनें तोंड काढले. राजश्री अप्पा देसाई आमचे उजवीकडे होते त्यांनींही मार भरपूर सोसला. नंतर मागें फिरले. त्यांची फौज व पायदळ मिळूनच आम्हांवर चालून येत चालले तेव्हां आम्ही मार सोशीत सोशीत संभाळीत संभाळीत निघून ओढा उतरून माथ्यावर अस्तमानपर्यंत उभे राहून गोटास आलों. तेही ओढ्यापर्यंत येऊन अस्तमानपर्यंत उभे होते. रात्र पडल्यावर तेही गांवांत गेले. आम्हांकडील वीसपर्यंत घोडे ठार झाले आहेत. आपा देसाई याजकडील सात आठपर्यंत घोडे ठार झाले असतील असें वाटतें. राजश्री अंताजीपंत फडके यांस पाठींत भाल्याची जखम लागली आहे. खैर आहे. आप्पा देसाई याजकडे शहाजी निंबाळकर होता तो पडला. जिवंत होता परंतु निघाला नाहीं.

बापू शहरांत असल्यामुळें बाहेरून पटवर्धनांनीं त्यांची रसद बंद केली होती. तर ते रात्रींच चोरून दाणा आणवीत. त्या शिवाय त्यांनीं आंत एक वर्षाची बेगमी करून ठेविली होतीच.

या लढाईवरून शत्रूच्या अफाट दिसणाऱ्या सैन्याचें बळ बापूंनीं अजमावलें. ज्याअर्थी आपणांवर सरळ रितीनें हल्ला करण्याची शत्रूची तयारी नाहीं त्याअर्थी आपण बिनधोक रहाण्यास हरकत नाहीं अशी त्यांची खात्री पटली. पटवर्धन त्यांना रोज हुलकावणी दाखवून बाहेर पाडण्यांचा प्रयत्न करीत असत तर गोखले पटवर्धनांना सावनूरकडे खेंचू पहात. दोघेही एकाच गुरूचे चेले व दोघांनीही गनिमी काव्याची लढाईची पद्धत अंगिकारिलेली म्हणून या लढाईचा निकाल लवकर लागला नाहीं. रोज किरकोळ चकमकी व्हाव्यात पण म्हणण्यासारखें कोणाचेंच नुकसान होऊं नये असा प्रकार बरेच दिवस चालला. पहिली लढाई संपल्यावर जवळजवळ एक महिना

कोणी कोणावर चढाई केली नाहीं. शत्रूचें बल जोखून बापू पुन्हां तारीख २० फेब्रुवारी रोजीं सावनूरचे बाहेर पडले व त्यांनीं मुंज्यापूरच्या आसपास दक्षिणेस माथा आहे त्यावर पटवर्धन उभे होते त्यांच्यावर चाल केली. पटवर्धनांच्या व अप्पा देसायाच्या पायदळानें बराच दम धरला. परंतु फौजेनें पाहिजे त्याप्रमाणें उठाव केला नाहीं. फौज भिऊन मागें सरली. हरिपंतांनीं आपल्याकडून शक्य तितका जोराचा प्रयत्न केला. फौज मागें सरल्याबरोबर तिच्यामागचे गाडदीही उखळले. अप्पा देसाई याजकडील तोफ मोडली. देसाई यानें अत्यंत मेहनत केली पण उपयोग झाला नाहीं. या लढाईचें वर्णन ऐतिहासिक लेखसंग्रह भाग १३ यांत पुढीलप्रमाणें आलें आहे.

( २४ फे १८०२ ) आज शनवार + + ( २० फे ) सायंकाळचे दोन घटका दिवसांपर्यंत मुंज्यापूर दक्षिणेस घांटमाथा आहे त्याजवर उभे होतों. दोन घटका दिवसास गोखले यांनीं चालून घेतलें ते टेकडीपर्यंत आले. आम्हाकडील पायदळ व अप्पा देसाईकडील पायदळानें दम बराच धरला. फौजेने उठावयाची कमती केली फौज मागें फिरली. जितका प्रयत्न होता तो केला. परंतु फौज दम धरीना. मागें सरल्याबर गाडदीही उखलले. अप्पा देसाई याजकडील तोफ जायबंदी झाली ती जाग्यावरच राहिली. देसाई यांनीं खस्त बहुत केली. परंतु दैवानेंच मागें घेतलें बुणग्यापासोन अद-कोसावर येऊन उभे राहिलों. याउपरी काय घडतें तें पहावें. अप्पा देसाई यास थोडीशी हातावर जखम आहे. + + तुटला. चिलखतावर राजश्री विठ्ठलबाबा यांस थोडीशी भाल्याची जखम लागली. चिलखताची जखम भाल्याची आहे. आणिक कोणकोण जखमी झाले तें मागाहून लिहातों. याऊपरी उदईक सावनूर सोडून अंगावर येतो कीं काय तें पहावें. तालुका रहाणें कठीण आहे. फौज अगदीं हवालदील झाली. + + फौज येथें फार आहे परंतु परिणाम या तऱ्हेचा होऊं लागला ! जो प्रयत्न होता तो केला परंतु फौज उठेना ! + + दैवाची परिक्षा माझे जहाली.

या लढाईबद्दल पटवर्धनांमध्यें तीन प्रकारचीं मतें झालीं होतीं. बाबा काळ्याचें मत वर दिलें आहेच. हरिपंतांचा लढाईचा जोर फार होता. कोणाशींही संधान बांधून कां होईना पण गोखल्यांचा पराजय केलाच पाहिजे असें त्यांचें मत होतें. त्याकरितां त्यांनीं करवीरकरांशीं पूर्वींचें शत्रुत्व विसरून जाऊन संधान जमवण्याचा प्रयत्न केला होता. सोंडूरकरांकडून तोफा व सैन्य मागवलें पण इंग्रज त्यांना आपल्या मुलुखांतून आणूं देईनात. अप्पा देसायानें लढाई सुरू झाल्यावर ती अर्धवट सोडण्यास विरोध केला. त्यांनीं पुन्हां लढाईचे बेत चालविले पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. तेव्हां बापू कवडीकर यांचेतर्फे गोखले व पटवर्धन यांच्यांत तहाचें बोलणें सुरू झालें. बापू गोखल्यांनीं सरळ सांगितलें कीं आजपर्यंत झालें तें झालें, आम्ही तुमचें वांकडें कोणतेहि प्रकारें करणार नाहीं. याबद्दल जी दोघांची खातर जमा व्हावयाची ती दिक्षीत बाबांचे विद्यमानें व्हावी. आपणां दोघांपैकीं कोणालाही जर सरकारांतून दुसऱ्याचे विरुद्ध वागण्याची आज्ञा झाली तर दोघांनींही एकमेकांना ( आंतून ) संभाळावें. परशुरामभाऊंनीं धोंडोपंतांस पुत्र म्हणून वागविलें तसेंच तुम्हीहि मला वागवा. माझेकडूनही त्याप्रमाणेंच वागणें होईल. कोणी कोणाच्याही वांकड्यावर टपून बसूं नये.

या झगड्यामध्यें पटवर्धन व गोखले या दोघांचेही गुरू चिंदवरम् स्वामी स्वस्थ बसले तर आश्चर्यच. त्यांनीही आपल्या तऱ्हेनें शक्य तेवढे प्रयत्न चालविले. गोखल्यांनीं लढाईची हकीकत कळविली असतां त्यांनीं 'तुम्हीं दोघांनीं आपसांत कलह करूं नका, दोघेही माझे येथें या आणि एकमेकां-बद्दल कलुषित झालेलीं मतें साफ करून टाका असें सांगितलें. गोखले कुसे-गलास जाण्यास तयार असतील तर आम्हांही येऊं असें पटवर्धनांनीं सांगितलें.

पटवर्धनांनीं यानंतर बापूंवर हल्ला करण्याचा बेत सोडून दिला व ते तेथून उठून लक्ष्मेश्वर तालुक्यांत जाऊन राहिले. या मोहिमेंत त्यांना सुमारें ९–१० लाख रुपये खर्च बसला. त्यामुळें ते मेटाकुटीस आले होते शिवाय

बापूंना मदत करण्याकरितां पेशव्यांकडून हैबतराव गायकवाड हाही आला. त्यामुळें तर पटवर्धनांचा धीर जास्तच खचला.

पटवर्धनांशीं हें युद्ध जवळजवळ सात महिने चालू होतें. त्याकरितां बापू गोखल्यांनींही नविन फौज ठेविली होती. त्या फौजेच्या खर्चाकरितां १ लाख ९० हजार रुपयांची तरतूद करण्याचें बाजीरावानें आश्वासन दिलें होतें. हे पैसे ठरल्याप्रमाणें कुशावा मुनशी यांनीं वेळेवर दिले नाहींत. शेवटीं त्यांच्याकडे बराच तगादा केल्यावर पैसे वसूल झाले.

पटवर्धनांचा अशा तऱ्हेनें पूर्णपणें पराभव झाला असला तरी यशवंतराव होळकरांचें बंड सुरू झालें असल्यामुळें बाजीरावाला त्यांच्या मदतीची जरूर होती. म्हणून त्यानें कृष्णराव उर्फ कुशावा मुनशी यांस गोखले व पटवर्धन यांचा तह करून देण्याकरितां पाठविलें. त्यांनीं १४ मार्च रोजीं या उभयतां-मध्यें तह करून दिला.

---

## प्रकरण ७ वें

# किरकोळ माहिती

विसाजीपंत गोखले हे बापूंचे चुलत चुलते होते. त्यांची गरिब स्थिती जाणून बापूंनीं त्यांना आपल्या आश्रयास बोलावलें. ते येतांच त्यांस आपल्या कुळांतील एक समजून पंक्तीस भोजन व पागेंतील घोड्यांवर बसण्याची परवानगी दिली. पुढें त्यांचा गरीब स्वभाव पाहून त्यांस वाढवावें म्हणून पालखी अब्दागिर देऊन शंभर घोडयांची पागा नगारा निशाणासह दिली. त्याशिवाय लढाईचा प्रसंग आल्यास त्यांच्या हाताखालीं अधिक लोक देऊन त्यांना कामगिरीवर पाठवीत असत. एकदां त्यांचेबरोबर कांहीं लोक देऊन त्यांना खंडणीचा पैसा वसूल करण्याकरितां पाठविलें. पण ते तिकडे न जातां बाजीरावाकडे गेले व त्यांनीं बापूंच्याविरुद्ध त्याचे कान भरले. कोणताही सरदार जास्त शूर दिसला कीं हा आपणांस वरचढ होऊन धाब्यावर बसवतो कीं काय अशी बाजीरावाला नेहमीं भीति वाटत असे. त्याप्रमाणेंच त्याला बापूंबद्दल फार भीति वाटत होती म्हणून त्यानें बापूंना ताबडतोब निघून या असें लिहीलें. यावेळीं बापू मसूर येथें होते. नुकताच प्रतिनिधींचें बंड मोडण्यांत त्यांचा पुष्कळसा पैसा खर्च झाला होता त्यामुळें त्यांना तेथून निघतां येईना.

पुढें थोड्याच दिवसांनीं बाजीरावाची स्वारी वांईस आली तेव्हां बापू मसूराहून दोन हजार सड्या स्वारांनिशीं वांईस त्याच्या भेटीस आले तेव्हां त्यानें त्यास पुण्यास बोलावलें ती आज्ञा मान्य करून बापू सड्यास्वारीनिशीं पुण्यास आले. प्रतिनिधींचें बंड मोडल्यापासून त्यांचा सर्व मुलुख बापूंच्या ताब्यांत होता. तो कांहीं बाजीरावानें उगाच त्यांच्या ताब्यांत ठेवला

नव्हता. प्रतिनिधींची बाजू योग्य असून बाजीरावानें स्वार्थाकरितां त्याचा नाश केला अशी लोकांमध्यें प्रचलित समजूत होती ती खोटी ठरावी व जगाला स्वतःचा सच्चेपणा पटावा म्हणून त्यानें त्या प्रांताची व्यवस्था बापूंकडे सोंपविली होती. बापू पुण्यास येतांच त्यानें त्या प्रांतांची सोडचिठी बापूंजवळ मागितली. त्यास असें वाटत होतें कीं बापू सोडचिठी देण्यास अनमान करतील. पण तो अदमास चुकला, व बापूंनीं आपल्या ताब्यांत असलेल्या सत्तावीस किल्यांची सोडचिठी पाठवून दिली.

बापूंनीं सोडचिठी दिलेली पहातांच विसाजीपंतांचें तोंड काळें ठिक्कर पडलें. बापू हे इमानी चाकर असून आपली आज्ञा मान्य करण्यास काडीचा देखील अवकाश लावीत नाहींत असें पाहून बाजीरावाला त्यांच्या सोडचिठ्या परत द्याव्याश्या वाटल्या. मग त्याचे मर्जीचा कल पाहून बापूंनींही कांहींतरी जहागीर द्यावी म्हणून विनंती केली. पेशव्यांनीं सव्वातेरा लक्ष रुपयांची जहागीर त्यांना दिली. जहागिरीचा कांहीं मुलुख कर्नाटकांत व कांहीं दक्षिणेंत दिला. व ५००० फौज कायमची दिली. आणखीं फौज ठेवणें झाल्यास मुशाहिऱ्याचा ऐवज निराळा सरकारांतून मिळत जाईल. म्हणून सांगितलें. याप्रमाणें बापू पुण्यास आले व तेथें मुख्य सेनापती झाले. बापूंनीं विसाजीपंतांस पाठविलेलें पत्र पुढीलप्रमाणें:—

श्रीगजानन.

ति. रा. विसाजीपंत दादा वडीलांचे स्वामीचे सेवेशीं.

अपत्येंसमान बापूजी गणेश साष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. तुमचे विषयीं राजश्री आप्पाजी बल्लाळ व लक्ष्मण गोविंद यांणीं समजाविले. त्यास तुम्हीं एक निष्ठेनें सेवाचाकरी करीत आलां आणि करणार आहां त्याअर्थी तुम्ही चार बंधूसुद्धां आमचे पदरीं आहां आणि चालवीत आहों त्यास तुमचे व तुमचेमागें बंधूचे कुटुंबाचें जो पर्यंत आमची दौलत तोंपर्यंत चालविलें जाईल. तुम्हीं कोणेविसींची अंदेशा न करितां बिनदिक्कत स्वारींत निघून यावें. तुमचें चालविण्याविषयीं दुसरा विचार व्हावयाचा नाहीं.

# बापू गोखले व ठाकुरदास बोवा.

ठाकुरदासबोवा हे जातीचे कनौजा ब्राह्मण. भागीरथीच्या कांठीं गुसांईर्जींचें शिवराजपूर म्हणून एक गांव आहे तेथचे रहाणारे. यांचे मूळचें नांव बालाप्रसाद निलकंठ द्विवेदी. लहानपणापासून यांचा ओढा विरक्त-पणाकडे होता. अकरा वर्षांचा असतांनाच ही स्वारी घरून पळून गेली. तेथून तीर्थयात्रा करीत करीत दक्षिण हैद्राबाद ऊर्फ भागानगर येथें आला. त्याचें भजन कीर्तन ऐकून पुष्कळ लोक त्यांच्या नादीं लागले. त्यावेळीं हैद्राबाद येथें चंदूलाल नांवाचा दिवाण होता. हा मोठा धार्मिक असून हिंदू धर्माचा अभिमानी होता. त्यानें त्यास आपल्या घरीं नेऊन ठेविलें. तेथें कांहीं दिवस राहून तो रामेश्वराकडे गेला व पुन्हां फिरत फिरत पंढरपुरास आला. तेथील भजनाचा सोहळा व अठरापकाड जातीचे लोक उच्चनीचपणा सोडून एका वारकरी पंथांत शिरले आहेत, एकमेकांना नमस्कार करीत आहेत, अशी त्यांची समता पाहून बालाप्रसादच्या चित्तास प्रेमाचे पाझर सुटले व त्या ठिकाणास भूवैकुंठ समजून तेथें बरीच वर्षे राहिला. तुमचें नांव काय म्हणून कोणीं विचारल्यास माझें नांव ठाकुरदासबोवा असें तो सांगे. त्यावरून पुढें त्याचें ठाकुरदासबोवा हेंच नांव पडलें. बाजीराव पेशवे एकदां पंढरपुरास आले असतां त्यांच्याबरोबर भूदेव मिश्र नांवाचा कनौजा पंडित होता. त्यानें पुंडलिकाच्या देवळासमोर ठाकुरदास यांचें कीर्तन ऐकलें तेव्हां तो अगदीं लुब्ध होऊन गेला. ही हकीगत त्याच्याद्वारें बाजीराव व बापू गोखले ह्यांनीं ऐकून तेही दुसरे दिवशीं कीर्तनश्रवणास आले. त्यावेळीं साधा शिपाईगडी गोखला तर त्या कीर्तनांत इतका रमला कीं ह्या भव-सागरांतून तारणारा सद्गुरू हाच आहे, असें त्यास वाटून त्याचा चेला बनला. त्यानें पेशव्यास सांगून ठाकुरदासबोवा यांस सातारा जिल्ह्यांतील तासगांव येथील जिल्हे अंमल म्हणजे मोकासा ¾ अंमल इमान दिला. पुढें या अंमलाबद्दल श्रीमंत छत्रपति महाराज प्रतापसिंह यांनीं आपलीं दुमाल पत्रें दिलीं व ३००-४०० रु. आकाराची शेतीची जमीन दिली.

## जवानमर्द बापू

बापू गोखले मरण पावल्यावर कांहीं वर्षांनीं साताऱ्यास महाराजांचे वाड्यांत कांहीं उत्साह होता, त्या निमित्तानें छत्रपतींचे वाड्यांत पाहुणे मंडळी पुष्कळ जमली होती. उत्सवांत ठाकुरदासबोवाचे कीर्तनास सर्व मुत्सद्दी मंडळ व सरदारमंडळ जमलें होतें. बुवासाहेब मुख्यस्थानीं विराजमान झाले होते. सर्व पटवर्धनमंडळी सचीवपंत, कऱ्हाडचे पंतप्रतिनिधी, अप्पा निपाणकर बाळाजीपंत नातू अशी दुसरीही पुष्कळ मंडळी जमली होती, इतक्यांत गोपाळराव जमखिंडीकरांनीं बावांस उद्देशून म्हटलें कीं बापू गोखल्यांवर आपला वरदहस्त होता तरी त्यांचा निर्वंश होऊन मागें नांव घेण्यास कोणी उरलें नाहीं, हें टोंचून बोललेले बोल ऐकून बोवांस अत्यंत वाईट वाटलें पण तें सहन करून त्यांनीं महाराजांस म्हटलें याचें उत्तर देऊं ! महाराजांनीं उत्तर देण्याचें सुचविल्यावर ते म्हणाले " स्वामिकार्येगते प्राणे अंते तिष्ठति माधवः " बापू गोखले स्वामिकार्यार्थे रणीं पडले म्हणून ते परलोकीं जिवंत पण जे दगाबाजी करून परत आले त्यांची संतति असून नसून सारखीच. जे राहिले ते मृत आणि रणांत पडले ते जिवंत असेंच मी समजतों, असें बुवांचें उत्तर ऐकून सर्व स्तब्ध झाले.

## प्रतीनिधीनंतर

पंढरपूर, वांई, कोपरगांव, नाशीक वगैरे ठिकाणीं बाजीराव जाऊं लागला कीं बापूंस बरोबर नेत असे. त्याचे बरेचसे दिवस तीर्थाटनांतच जात असल्यामुळें चतरशिंगराजानें कऱ्हाडप्रांतीं बंड केलें तें उपस्थित झालें. बंड उपस्थित झाल्यावेळीं बाजीरावाची स्वारी नाशिक कोपरगांवांकडे होती. बंडवाल्यांनीं सुमारें तीन चार हजार पायदळ व स्वार मिळून जमाव करून प्रथम मच्छिंद्रगड किल्ल्यावर हल्ला चढविला. या किल्ल्यावर बाजीरावानें वासुदेव सदाशिव पटवर्धन यांस शिबंदी देऊन किल्ल्याचे बंदोबस्ताकरितां ठेविलें होतें त्यांस पकडून ताब्यांत घेतल्यावर बंडवाले वसंगड किल्ल्यावर गेले. तो किल्ला घेऊन चतरशिंग तेथेंच राहिला. नंतर बंडवाल्यांनीं मसूरची गढी घेऊन कऱ्हाडचेंही ठाणें वळकावलें.

हें सर्व वर्तमान कोपरगांव येथें बाजीरावास कळलें. त्यानें बापूंस आज्ञा केली कीं तुम्ही तत्काळ आपले लोक पाठवून बंडवाल्यांचें पारिपत्य करावें. गोखल्यांकडील कांहीं लोक पुण्यास होते. त्यांतील मुख्य विठ्ठल चिंतामण पुणेकर* होत. हे बाजीरावाची थोरली पत्नी वाराणशीबाई इजकडे तैनातीला होते. बापूंस श्रीमंतांची आज्ञा होतांच त्यांनीं तत्काळ बंडवाल्यांवर जाण्याचा हुकूम पाठविला. यावेळीं त्यांच्या जवळ फक्त २०० स्वार होते. बंडवाले फार असून आपले लोक थोडे आहेत अशी कुरकुर न करितां त्यांनीं शत्रूवर चाल केली. पुणेंकर कूच करून पुढें गेल्यावर मागाहून आणखीं कांहीं स्वार पायदळ तोफा असें सामान बाळाजीपंत मराठे व बाळाजीपंत गोखले यांजबरोबर त्यांना पाठविण्यांत आले. पुणेकरांची व यांची गांठ पाडळी येथें झाली. बंडवाल्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलेल्या मसूरच्या ठाण्यांत त्यांचे सुमारें १५० लोक होते. त्यांजवर पुणेंकर यांनीं आपल्या स्वारांनिशीं हल्ला केला. या हल्ल्यांत शत्रूचे ३०–४० लोक मेले. व ५०–६० जखमी झाले. हा प्रकार संपत आहे तोंच मागील सर्व फौज तेथें जाऊन दाखल झाली. तेथें एक दिवस मुक्काम करून त्यांनीं दुसरे दिवशीं वसंतगडावर हल्ला केला. चतुरसिंग याच किल्ल्याच्या आश्रयास होता. हा किल्ला व मसूर यांचेमध्यें फक्त तीन कोशांचें अंतर होतें. किल्ल्यांत चतरशिंगाचे स्वार अदमासें ५० होते, ते त्यानें मोर्चांजवळ उभे केले होते. आलेल्या सेनेंतून पुणेंकर जे निघाले ते आपले २०० स्वार बरोबर घेऊन कृष्णानदीचे पश्चिमेस जाऊन किल्ल्याचे माचीस मोर्चांपाशीं उभे असलेल्या स्वारांवर जाऊन थडकले. बाकी राहिलेली फौज व तोफा घेऊन मराठे व गोखले पूर्व बाजूनें किल्ल्यासमोर येऊन दाखल झाले. किल्ल्यावरून यांच्या फौजेवर तोफांचे गोळे सोडण्यांत आले. परंतु यांचें विशेषसें नुकसान झालें

* यांनीं बापूंच्या चरित्राची बखर लिहीली आहे व तीवरूनच शालिग्राम यांनीं आपलें बापूंचें चरित्र लिहिलें आहे. प्रस्तुत पुस्तकांतसुद्धां या बखरीचा उपयोग बराच केला आहे.

नाहीं. विठ्ठलपंतांनीं आपल्या लोकांसुद्धां बंडवाल्यांवर हल्ला करून एका सपाट्यांत तीस पस्तीस घोडे जखमी केले व कांहीं स्वारही पकडले. हें पाहून बंडवाल्यांचे स्वार पळूं लागले. त्यांच्या मागें हे लागले असतां आंतील बंडवाल्यांस आपला बाहेर पराभव झाला आहे हें समजलें त्यामुळें किल्ल्याचे दक्षिणबाजूचे दरवाजानें अजमासें १००-१५० लोक पळूं लागले. त्यांचा पुणेकरांनीं पाठलाग करून त्यांतून बहुतेक लोक मारले, मग किल्ल्यास प्रदक्षिणा करून पुन्हां पूर्वीच्या आपल्या स्वारांस येऊन मिळाले. अशा प्रकारें बंडवाल्यांचा मोड करून संध्याकाळीं मसूर येथें मुक्कामास गेले. दुसरे दिवशीं तेथें राहिले असतां बंडवाल्यांनीं पकडून ठेविलेला किल्लेदार पटवर्धन येऊन सांगूं लागला कीं बंडवाल्यांनी तुमचें कालचें शौर्य पाहून, किल्ल्यास वेढा पडला तर आंतच मरण्याची पाळी येईल यास्तव किल्ला सोडणें बरें असा विचार केला व दोन प्रहर रात्रीं सर्व बंडवाले मागील दारानें निघून गेले. आणि आम्हीं आपल्या भेटीस आलों. हा मजकूर समजल्यावर त्यांनीं किल्ल्याच्या रक्षणाकडे शिबंदी पाठविली. नंतर बापू गोखले यांस झाल्या मजकुराचें पत्र मराठे व गोखले यांनीं पाठविलें. त्यांत पुणेकरांचें शौर्य फार चांगलें वर्णन केलें पुढें गोखले सातशें स्वार बरोबर घेऊन बंडवाल्यांचा शोध काढीत चालले. मागें मराठे सर्व फौज घेऊन राहिले होते. बंडवाले कोल्हापुरास गेल्याची वार्ता कळली त्यावरून मराठे कोल्हापुरास जाऊन अप्पा दिवाण यांस बंडवाल्यांची खबर विचारली. परंतु आपणांस त्याबद्दल कांहीं माहिती नाहीं असें त्यांनीं सांगितलें. तसेंच गोखले यांनीं पंचगंगेचें तीर व आसपासच्या पहाडांतून शोध केला. परंतु मुळींच पत्ता नाहीं असें पाहून सर्व फौज आपापल्या स्थळीं येऊन दाखल झाली.

## शिंद्यांशीं लढाई

पटवर्धनांवर विजय मिळवून बाजीरावाच्या आग्रहाच्या विनंतीस मान देऊन बापू पुण्यास आले त्यावेळीं बाजीराव नुकताच गादीवर बसला होता. भोंसले, शिंदे, होळकर हे त्यांस जुमानीत नसत. त्यांचें इंग्रजांशीं पण हाडवैर

झालें होतें. त्यामुळें बापू पुण्यास आल्यावर लगेच त्यांना वेलस्लीबरोबर या तिघांच्या बंदोबस्तास पाठविण्यांत आलें इंग्रजांनीं प्रथम शिंद्यांशीं लढाई दिली त्यांची गांठ प्रथम अजिंठ्यास पडली. ज्यावेळीं यांचीं पलटणें तेथें जाऊन भिडलीं त्यावेळीं शिंद्यांचे सैन्यांत फारच गडबड उडाली. ती वेळ दुपारची असल्यामुळें तोफा ओढणारे बैल रानांत चरावयास गेले होते. शिंद्यापाशीं फौजेचा व कवाईत शिकलेल्या लोकांचा भरणा जास्त होता तरी त्यापैकीं फार लोक लढाईस टिकले नाहींत. फक्त ४ पलटणी, ३२ तोफा घेऊन तोंड देण्यास उभ्या राहिल्या. खुद्द शिंद्याजवळ ७–८ हजार स्वार होते. तेही पण या पलटणींच्या मागें उभे होते पलटणींतील लोकांनीं यांस असें सांगितलें कीं तुम्ही स्वस्थपणें आमच्या पाठीशीं उभे रहा. उगीच उठावणी करूं नका. तुम्ही जर आमच्या पुढें याल तर आमच्या तोफा बंद होऊन शेवटीं आपणांस पराभव करून घ्यावा लागेल. दौलतरावानें त्यांचें म्हणणें ऐकलें.

यामुळें गोखल्यांचे व इंग्रजांचे लोक पटापट मरूं लागले व त्यांना मागें हटावें लागलें. कोणाचाच उपाय चालेना. तोफांच्या समोर उभा न रहातां दौलतरावानें पिछाडी धरून इंग्रजांवर जोराचा हल्ला चढविला. त्यामुळें वेलस्लीला आपल्या तोफा पुढें आणून फौज मागें ठेवणें भाग पडलें. त्यानें तीन गोरीं पलटणें व २८ तोफा घेऊन त्या शिंद्याच्या पलटणीवर चालू केल्या. शिंद्यांचे गोलंदाज अतिशय हुशार असल्यामुळें त्यांनीं इंग्रजांकडील फौज पहिल्या सपाट्यास गोळा घालून फोडून टाकली. गोलंदाजांपुढें हात टेंकण्याची पाळी आलेली पाहून वेलस्लीनें आपली सारी भिस्त मराठी सैन्यावर टाकली व घोड्यावर आरूढ होऊन वेलस्ली स्वतः दौलतरावाचा समाचार घेण्यास निघाला पण त्याचा घोडा गोळा लागून पडला. शिंद्याकडून जंजिऱ्याचा मारा होत होता. त्यापुढें यांचा नेट लागेना. इंग्रजांकडील सैन्य ओळ बांधून चालत होतें, पण शिंद्याच्या तोफेचा गोळा समोर पडतांच त्यांच्यामध्यें विस्कटाविस्कट होई व गोंधळ माजत असे. वेलस्लीचा घोडा

पडतांच नुसतें पुढें जाणें अशक्य आहे असें त्यास वाटलें म्हणून त्यानें आपला घोडा फिरविला. परत आल्यावर दुसऱ्या पलटणी घेऊन दुसऱ्या बाजूवर आरूढ होऊन पुन्हां शिंद्याचे पलटणीवर स्वारी केली. परंतु त्याचे अंमलदार चतुर व घोडेस्वार चलाख असल्यामुळें इंग्रजी फौज पूर्ववत् मागें हटली. तिसऱ्या वेळीं तुर्की स्वार बरोबर घेऊन चाल करून पाहिली परंतु तोही प्रयत्न निष्फळ ठरला. तुर्की स्वारांचा सडा होऊन साहेबांचा घोडा मृत्युपंथास पोंचला. परंतु इतक्या अडचणींना हटणारा वेलस्ली नव्हता. त्यानें पुन्हां प्रयत्न सुरू केला. चवथ्या वेळीं गोरे स्वार आपल्याबरोबर घेऊन त्यानें प्रयत्न केला पण त्यांतही त्याच्या वांट्याला अपयशच आलें. गुरुची विद्या गुरूस फळली. परदेशी सेनाधिकाऱ्यांकडून शिकवलेल्या पलटणांच्या जोरावर त्यानें इंग्रजांचा पराभव केला.

त्यांची त्रेधा उडालेली पाहून दौलतरावास फारच जोर आला. चवथ्या वेळीं वेलस्ली उलट खाऊन माघारा फिरतो आहे तोंच शिंद्यानें आपले लोक त्यावर भडिमार करण्याकरितां पुढें आणले. मागें स्वस्थ रहाण्याची गोलंदाजांची सूचना आनंदाचे भरांत त्याच्या लक्षांत आली नाहीं. त्यामुळें तो इंग्रजांना रेटीत रेटीत पुढें घेऊन गेला. परंतु यामुळें तोफा व इंग्रज यांच्यामध्यें त्यांचीं पलटणें आलीं व स्वतःच्या तोफा स्वतःस मृत्युमुखीं पाडणार असें त्यास दिसून आलें. यामुळें त्या बंद करणें भाग पडलें. तोफा बंद पडलेल्या पाहून वेलस्लीच्या लोकांना फार हर्ष झाला. शिंद्याच्या लोकांना पाठीवर घेऊन ते आपल्या गोळीच्या टप्यांत आल्याबरोबर इंग्रजांनीं व बापूंनीं एकदम उलटून शत्रूवर तोफांची व गोळ्यांची फैर झाडली. यामुळें शिंद्याचे लोक घाबरून सैरावैरा पळूं लागले. या लढाईत शिंद्याच्या ११२ तोफा हस्तगत झाल्या. इंग्रजांकडील मृत व जखमी लोकांची संख्या हजारावर गेली. शिंद्याकडील फारसे लोक मेले नाहींत.

बापूंचा व वेलस्लीचा स्नेहसंबंध फारच जमला होता. भोंसल्याशीं केलेल्या लढाईत बापूंनीं त्याला फारच मदत केली. गाईलगडची लढाई त्याचवेळीं झाली.

हरीभाऊ देशमूख हे गोखल्यांचे फडणीस होते. ते सांगत कीं मी गाई-लगडची लढाई व दुसऱ्या पुष्कळ लढाया पाहिल्या. पण लढाईत कोणताच शिपाई घावरल्यावांचून राहील असें नाहीं. युद्धाची बातमी ऐकणें चांगलें पण प्रत्यक्ष युद्ध पहाणें हें अत्यंत भयकारक होय असें असतांही लढाईची बातमी कानावर पडतांच लढाईवर आनंदानें नाचत जाणारे दोन पुरुष मी पाहिले. एक बापू गोखले व दुसरे परशुरामभाऊ पटवर्धन या दोघांना लढाईची बातमी कळतांच त्यांचे बाहु स्फुरण पावत असत व उत्साहानें अंगरख्याचे बंद तटतटां तुटत. जमिनींतून गोळ्या उसळत असल्यां आणि तसेंच चहुं-कडून गोळ्यांचा वर्षाव सारखा होत असला तरी हे दोघे पुरुष तेथें जाऊन छाती उघडी करून उभे रहात. घोडा गोळी लागून पडला तरी तेथेंच दुसरा घोडा आणवून त्याजवर स्वार होत असत पण दोन पावलेंही माघार घेत नसत.

बापूंचा व वेलस्लीचा स्नेहसंबंध फारच जमला होता. भोसल्यांशीं झालेल्या लढाईत विजय मिळवून वेलस्ली व बापूसाहेब पुण्यास येऊन दाखल झाले. वाटेंत त्यांस असें कळलें कीं बाळकृष्ण गंगाधर व मलबादादा या नांवाच्या गृहस्थांनीं बंड करून वाटेंत खजिना लुटण्याचें व मुलख बळकावण्याचें काम चालविलें आहे त्यांच्या फौजेचा जमाव नजीकच आहे. हें कळल्यावर बापू गोखले यांनी बंड मोडण्याचा निश्चय केला आणि त्याप्रमाणेंच थोडे दिवसांत बंड मोडून पुण्यास आले. हा त्यांचा पराक्रम ऐकून वेलस्लीसाहेब फार खूष झाले. एकंदरींत त्यांनीं जो पराक्रम केला त्याबद्दल वेलस्लीनें त्यांना पुढील-प्रमाणें सर्टिफिकेट दिलें.

Bapooji Gokhale joined me with the body of Maratha troops under his command in the month of March 1803 when I was on my march to Poona with the British troops to restore the Peshwa to exercise the powers of his highness government. This service having been effected by the arrival of his higness at

Poona. Bapooji accompanied the British army on its march from Poona in the month of June following to oppose the confederacy by the Northern Maratha chiefs then joining against the British government and their allies Rao Pandit Pradhan and the Nizam. He secured during the war which ensued with the utmost zeal and fidelity and in a manner perfectly satisfactory to me. His troops were engaged with the enemy repeatedly and always conducted themselves well and Gokhale particularly distinguished himself and then in a late action against a formidable band of free booters who had assembled upon the frontiers of the Peshwas territories and cut cff their supplies of the city of Poona. I have given him this paper in testimony of my uniform approbation of his conduct and that of his troops. I request that any British officer and others to whom this paper may at any time be shown will consider Bapooji Ganesh Gokhale as the friend of British Government.

Poona 6 th March 1804. ( sd. ) Arthur Wellesly.

वेलस्लीसाहेब व बापू गोखले हे एप्रिलमध्यें पुण्यास येऊन दाखल झाले. बाजीरावाचो व वेलस्लोंची जेव्हां भेट झाली तेव्हां बापूंच्या शौर्याचें वर्णन वेलस्लीनें पुष्कळ केलें तें ऐकून बाजीरावास कौतुक वाटलें. यानंतर बापूंचा कर्नाटकाचा संबंध सुटला व ते पुण्यासच कायम झाले.

धोंडोपंतदादांनीं पुण्यास वाडा बांधण्याचें काम चालविलें होतें. ते गत झाल्यामुळें तें कामही बंद पडलें होतें. तें काम यावेळीं पुरें करून ते वाड्यांत रहावयास गेले. ही इमारत पुरी होईपर्यंत ते शहराबाहेर रहात असत. इमारत पुरी केल्यावर त्यांनीं आपलें लग्न तेथेंच केलें.

पुण्यापासून बारा कोसांवर जेजुरी म्हणून प्रख्यात देवस्थान आहे. तेथील रामोशांनीं आसपासच्या गांवचे रामोशी जमा करून टोळी बनविली आणि गांवोगांवीं दरवडे घालण्याचा क्रम चालविला. कांहीं गांवांत दिवसा शिरून तेथील स्त्रियांवरसुद्धां अत्याचार करीत. खाण्याचे पदार्थ, रोकड वगैरे हातांत सांपडेल त्याची लूट करून गावांस उपद्रव देत. त्यांच्या उपद्रवाकडे तेथील रयतेनें बाजीरावाचें लक्ष वेधलें. बाजीरावानें बापूंची रवानगी तिकडे केली. हुकमाप्रमाणें बापूसाहेब तिकडे आपल्या फौजेनिशीं जेजुरीकडे जाऊन वाल्हे येथें मुकाम केला. दुसरे दिवशीं तेथून एका कोसावर कोथळें-गांवीं मुकाम ठोकला व तेथून फक्त ५०० पायदळ व ८०० स्वार बरोबर घेऊन जेजुरीकडे सडी स्वारी चालती झाली. तेथें गेल्यावर सर्व पायदळ श्रीमार्तंडाचे दर्शनार्थ म्हणून पर्वतावर चढविलें आणि तुम्ही पूर्व दरवाज्यानें राजुरीकडे उतरावें असा त्यास हुकुम केला. आपण स्वतः कांहीं स्वार बरोबर घेऊन राजुरीकडे डोंगराच्या पायथ्याशीं उभे राहिले. बापू देवदर्शनास जातात अशी अफवा गांवांत पसरली होती. तो स्वारीचा देखावा पहाण्यासाठीं दोनशें हत्यारबंद रामोशी डोंगराचे माथ्याशीं उभे होते ते बापूंनीं टेहळून स्वारांस त्यांच्यावर चाल करण्यास हुकुम दिला, सर्व स्वारांनीं तरवारी पडताळून रामोशामागें धांवा सुरू केला. रामोशी हें संकट टाळण्या-साठीं पळून जाऊं लागले तों तिकडून ५०० पायदळ आपला समाचार घेण्यास सज्ज आहे असें त्यांस दिसलें त्यामुळें ते पुन्हां मैदानांत जाऊं लागले. तेथेंही त्यांस पकडण्यास स्वार तयार होतेच त्यांनीं त्यांस घेरा घालून पकडलें. बहुतेक रामोशी हातीं सांपडले. पकडलेले रामोशी कोथळें येथें नेऊन एका रांगेनें उभे केले आणि त्या सर्वांचा एकदम शिरच्छेद कराविला. त्यामुळें सर्व रामोशांस दहशत बसली व त्यांनीं पुढें बंड न करितां घरचा रस्ता पकडला.

कोंकणांत कोलगडगारी किल्ला फार मजबूत समजला जात असे. तेथील किल्लेदारानें तो स्वतःच बळकावला व आसपासच्या मुलखांत धामधूम करूं

लागला. त्याचें पारिपत्य करण्याचेंही काम बापूंकडेच आलें. त्यांनीं बाळाजीपंत मराठे यांस वस्त्रें फौज व तोफ देऊन त्यांची रवानगी तिकडे केली. ते किल्ल्यास शह देऊन बसले. किल्लेदार यानें एकदोन वेळां लढाई करून मोर्चे उठविले. मराठ्यांकडून बंदोबस्त होईना हें पाहून बापूंनीं सयाजी जगताप, रामचंद्रपंत व यमाजीपंत पाच्छापुरकर, बाबाजीराव गोखले वगैरे प्रमुख सरदारांस सरंजाम देऊन पाठविलें. त्यांनीं जाऊन लढाई करून मोर्चे भातखळ्यास बसविले. त्या दिवशीं मनरची लढाई होऊन शंभर लोक ठार व दोनशें जखमी झाले याप्रमाणें लढाई होऊन मोर्चे कायम झाले. हा वेढा जवळजवळ एक वर्ष टिकला शेवटीं किल्ला ताब्यांत घेऊन ते पुण्यास आले.

## बापूंच्या हालचाली

ता. २६ जून १८०२ मुकाम लष्कर नजीनक धारवाड. चिरंजीव बापू बरोबर जमाव आज पांच हजार स्वार व पांच हजार पायदळ आहे. दोन पलटणें सुद्धां आहेत. पांच तोफांशिवाय कर्नाटकी प्यादे २५० येणेंप्रमाणें सैन्य आहे. कित्तुर तालुक्याकडे जाणार. आज कूच करून गदगचे मुक्कामास जाणार. कित्तुरकर यांचे बोलणेंचा नाद लागला आहे. श्रीमंतांकडून सांडणीस्वार आला आहे. फौजसुद्धां हुजुरीं बोलावणें आलें आहे. सावनूरीं मसलत पडली सबब फौजेचे खर्चाची अडचण आहे. याजकरितां कित्तुरचा जाबसाल उरकण्यांत आलेवर पुढें मसलत हुजूर जावयाची होईल. स्वार व पायदळ मिळून दोन हजार नवीन सरंजाम ठेवणार.

कित्तुरकर यानें दंगा आरंभला आहे. दोन तीन हजार पायदळ व हजार स्वार घेऊन तडकोडचें ठाणें धारवाड किल्ल्याखालील तोफा लावून घेतलें व बेट्टिगिरी येथें शिलशिला लाविला. रा. बापू गोखले फौजसुद्धां नरगुंदनजिक आहेत. बागलकोट तालुक्यांतून पाऊण लक्ष रुपये खंडणी वसूल केली.

गोखले यांचा मुक्काम सुतकडें कसबें येकाडी येथें आहे. शिमगा तेथें करणार. कित्तुरकराकडे बाकी आहे ती घेऊन पुढें आजरें चांदगड येथें जाणार.

गोखले यांनीं येणगीवरून कूच करून इंचनाळानजीक करकुमीवर येऊन मुक्काम केला. वाटेंत मुरगोड तालुक्यास बराच उपद्रव दिला. कित्तुरकरांशीं अद्याप तह ठरला नाहीं. गोखले पुण्यांत आले त्यांना होळकरांशीं लढण्यास पाठविण्यांत आलें. खर्चास ५००० रुपये दिले.

कृष्णराव गोपाळराव देशपांडे कारडगीकर यांचें बापू गोखल्यांशीं वितुष्ट वाढून ते दोन हजार फौजेसह सावनूर प्रांतांत दंगा करूं लागले. ता. ६ जानेवारी १८०६ रोजीं इंग्रजांनीं सावनूर मुक्कामीं देशपांड्यांच्या लष्करावर छापा घातला आणि सर्व लष्कराची दाणादाण करून देशपांडे बंधूंना कैदेंत टाकलें.

## शरीर व स्वभाववर्णन

बापू गोखले हे गौरवर्णाचे होते. शरीर मोठें भव्य आणि कमावलेलें होतें. कांति लिंबासारखी टवटवीत होती. चेहरा देखणा व दुसऱ्यावर छाप पाडणारा होता. डोळे मोठाले व पाणीदार असत. डावे डोळ्यास धोंडजी वाघाचे लढाईंत जखम झाली होती. मरणाचे वेळीं त्यांचें वय ३९ वर्षांचें होतें. त्यांचें जेवणखाण साधें असे. त्यांना नाच व तमाशे आवडत नसत. पदरची मंडळी खूष ठेवण्यांत त्यांचा हातखंडा असे. त्यांचे मंडळींत फितूर बिलकूल नव्हता. ते घोड्यावर जबर बसणारे होते. बाजीरावानें त्यांस पुष्कळ खंदे व वाईट घोडे देऊन पाहिले होते पण बापूंनीं त्यांना वठणीवर आणलें. कसाही घोडा असो त्याजवर बसण्याची बापूंस कधींच भीति वाटली नाहीं. बापू नेहमीं मोरोबा दादा यांचे बागेंत घोडा फिरविणें बोथाटी खेळणें वगैरे कसरत करीत असत.

बाजीराव व मालकम यांची भेट अशीरगडाजवळ पांढरकवड्यावर झाली होती. त्यावेळीं श्रीमंतांनीं मालकमला असें सांगितलें कीं ‘ बापू गोखले इमानी सरदार लढाईंत पडले त्यांजला संतति नाहीं तरी त्यांचे पत्नीचे मांडीवर दत्तक पुत्र देऊन त्यांचे नांवची जहागीर त्यांचे घराण्यांत चालण्याची व्यवस्था

करावी. त्यांच्यावरोवर जे सरदार मृत झाले त्यांचेंही चालवावें. माल्कम साहेबांनीं तें म्हणणें मान्य करून यमुनाबाईस दत्तक घेण्यास सांगितलें पण त्यांनीं तें नाकारलें व आपले नांवानें २०००० चा सरंजाम चालविला. त्याशिवाय बापूंनीं देसाई याजकडून २५००० ला विकत घेतलेला किरोली गांवही चालविला. त्या १८४२ मध्यें ब्रम्हावर्तास मरण पावल्या. त्यांची व बापूंची क्रिया बाळाराम गोखले यांनीं एकाच दिवशीं केली.

गुडगुडीकर नाईक व सुरापुरकर नाईक यांचें आपापसांत भांडण होऊन प्रसंग लढाईवर आला. जोराची लढाई होऊन सुरापुरकरांनीं गुडगुडी संस्थान आपल्या ताब्यांत घेतलें. गुडगुडी संस्थानच्या नाईकांनीं धोंडोपंतांची मदत घेऊन सुरापुरकरांवर चाल केली. त्यावेळीं धोंडोपंतांजवळ ५०० स्वार व हजार पायदळ अशी सैन्याची तयारी होती. दहा घटका सारखी लढाई चालू होती. कांहींच निभाव लागेना तेव्हां खुद्द गोखले स्वारसहीत शत्रूवर चालून गेले. त्यांनीं जोराचा हल्ला चढवून शत्रूपक्षाचे १५०–२०० मुख्य सरदार गारद केले. तेव्हां सुरापुरकरांचा धीर खचला. त्यांची फौज लुटून तोफा हत्ती पायदळ वगैरे सर्व ताब्यांत घेऊन धोंडोपंत स्वस्थानीं आले. श्रीमंतांस हें वर्तमान कळून त्यांनीं दादांस मोत्याची कंठी व शिरपेंच वक्षीस म्हणून पाठवून दिलीं तीं त्यानीं मोठ्या समारंभानें स्वीकारलीं.

## राज्याची समशेर

बाजीरावाच्या बेबंदशाही कारभारामुळें कर्नाटकांत चालू असलेली धामधूम आपण मागें पाहिलीच पण महाराष्ट्राचें नष्टचर्य तेवढ्यानें संपलें नव्हतें. काशीराव होळकराचा सरदार मालोजी गावडे हा दहा हजार सैन्यानिशीं खानदेश लुटीत होता तर दुसरा जिवाजी यशवंतराव २५–३० हजार सैन्यासह गोदावरीच्या उत्तर तीरास लोकांना सतावीत होता. तिसऱ्या टोळीचें आधिपत्य विठोजी होळकर यानें घेतलें होतें. मंगळवेढें, करकंब व पंढरपूर या बाजूला त्यांनीं धुमाकूळ माजवला होता. या कामांत त्याचे साथीदार

बाळकृष्ण गंगाधर बावनपागे, यशवंत रामकृष्ण व कृष्णराव मोदी हे सामील होते.

विठोजी होळकरानें बंड करतांना आणखीं एक विशेष गोष्ट केली. ती म्हणजे तो स्वतःस सनदशीर लुटारू असें भासवीत होता. त्यानें बाजीरावाची राज्यावरील मालकी आपण मानीत नाहीं असें जाहिर केलें. इतकेंच नव्हे तर अमृतराव हाच खरा राज्याचा मालक आहे व त्यानें आपणांस या प्रांताच्या सनदा दिल्या आहेत असें तो म्हणत असे व त्याप्रमाणें तो जीं जीं ठाणीं हस्तगत करी त्यांवर पहिल्यानें अमृतरावाचें निशाण लावी.

त्याला वाटेंत जरी विशेषसा अडथळा झाला नाहीं तरी सोलापुरच्या सुभेदारानें मात्र त्याला मोजलें नाहीं. आले आहांत तसे एक लाख रुपये घेऊन जा व मला उपद्रव देऊं नका असें तो म्हणाला. परंतु विठोजीनें तें ऐकलें नाहीं. हें राज्य अमृतरावाचें आहे व किल्ला हस्तगत करण्याचा त्याचा हुकूम असल्यामुळें मला किल्ला पाहिजे असें त्याचें म्हणणें पडलें. किल्लेदार अमृतरावाची सनद मानीना. तेव्हां विठोजीनें त्याच्यावर हल्ला केला. सोला-पुरकरांच्या कुमकेस आबा काळे व पानशे यांची फौज तोफांसह आली होती. पण चार घटकांतच विठोजीनें त्यांचा पाडाव केला. सोलापुरकरांनीं थोडासा नेट धरला पण त्यांनाही परत फिरावें लागलेंच. विठोजीनें तेथें लुटालूट केली पण ठाणें घेण्याच्या भरीस मात्र तो पडला नाहीं.

ही बातमी जेव्हां पेशव्यांस कळली तेव्हां त्यांना अत्यंत राग आला. एकवेळ विठोजी नुसता लुटारू म्हणून पुढें येता तर तें त्यांच्या जिवास इतकें लागलें नसतें परंतु तो जेव्हां बाजीराव राज्याचा मालक नसून अमृत-राव आहे असें म्हणूं लागला तेव्हां मात्र त्यांना जास्त त्वेष आला. हें काम साधें नसून त्याचा लवकर नायनाट केला पाहिजे असें ते म्हणूं लागले या कामीं उपयोगी पडेल असा एकच भरंवशाचा सरदार त्यांचेकडे होता व तो म्हणजे बापू गोखले. त्यांत पेशव्यांनीं ‘ राज्याची समशेर ’ ही सार्थ

पदवी दिली होती. त्यांना या कामाकरितां त्यांनीं कर्नाटकांतून परत येण्याविषयीं लिहीलें.

विठोजी होळकर सोलापुराहून निघाला तो कर्नाटकांत शिरला तेथें त्यानें फारच धामधुम माजवली. अनेक गांवांपासून खंडण्या घेतल्या. त्याला जिवाजी यशवंत, व बाळकृष्ण गंगाधर हे दोघे येऊन मिळाले. बाजीरावानें त्यांच्यापैकीं जिवाजी यशवंत, बाळकृष्ण गंगाधर याचा भाऊ रघुनाथ गंगाधर यांस तडजोड करण्याकरितां म्हणून पुण्यास बोलाविलें व त्यांचा विश्वासघात करून त्यांस तुरुंगाचा रस्ता दाखविला.

विठोजी होळकराचा नाश करण्याकरितां यशवंतराव पानशे, त्रिंबकराव ऊर्फ नाना पुरंदरे, यांच्या हाताखालील फौजा बापूंना मंगळवेढ्यास मिळाल्या. तेथें जवळच माण नदीवर शत्रूचा मुक्काम होता. तेव्हां १३ मार्च १८०१ रोजीं दोन्ही सैन्यांची घनघोर लढाई होऊन विठोजी होळकर व त्यांचे साथीदार या सर्वांचा मोड झाला. विठोजी होळकर बापूंचे हातीं सांपडला. त्यांनीं त्याला पेशव्यांच्या हवालीं केला. उरलेली फौज पळाली. तिचा पाठलाग नगरपर्यंत करण्यांत आला. नंतर बापू पुन्हां कर्नाटकांत गेले.

बाजीरावानें विठोजीचा खून मात्र अत्यंत क्रूर तऱ्हेनें केला. त्याला सरकारवाड्यांत बेडी घालून नेण्यांत आलें. तेथें नेल्यावर त्याला मारमार मारला व शेवटीं हत्तीच्या पायांनीं त्याचा चुराडा केला.

---

## प्रकरण ८ वें

# खडकीची लढाई

इंग्रजांनीं पेशव्यांशिवाय बहुतेक हिंदुस्थानचा बंदोबस्त केल्यानंतर त्यांची बुभुक्षित नजर पेशव्यांकडे वळली. बाजीरावानें वसईच्या तहानें स्वतःस बांधून घेतलेंच होतें. शिंदे होळकर आपणांस मदत करतील ही आशा बाळगावी तर १८०४ ते १८०६ या लढायांमध्यें त्यांचा नाश झाला होता. त्यांनीं बाजीरावाच्या दरबारांत व सैन्यांत आपले गुप्त हेर पेरलेच होते. बाजीराव जेवणांत कोणते पदार्थ खातो याचा तपशिलवार रिपोर्ट इंग्रजांस मिळत होताच. त्याच्या सैन्यांत त्यांनीं फितुरी उत्पन्न केलीच होती. विंचूरकर, अप्पासाहेब निपाणकर वगैरे सरदार ' भाकरी पेशव्याची चाकरी इंग्रजांची, या तत्त्वानुसार वागत होते. बापू गोखल्यांवर सुद्धां हा फितुरीचा प्रयोग करण्यांत आला त्यांनीं त्याला दाद दिली नाहीं ही गोष्ट वेगळी.

बापू गोखल्यांचा लिंगो भगवान नांवाचा वकील इंग्रजांच्या दरबारीं होता. आपल्याबरोबर लढण्याची बाजीरावानें तयारी चालविलेली दृष्टीस पडतांच वेलस्लीनें ' हल्लीं लढाई नमूद केली आहे तेव्हां आपली व आमची दोस्ती लक्षांत ठेऊन योग्य तें करावें. ' अशा अर्थाचा बराच लांबलचक निरोप त्याच्याबरोबर बापूंना पाठविला. कर्नाटकांतून वेलस्ली व बापू पुण्यास आल्यावेळीं वेलस्लीनें बापूंची प्रशंसा इंग्रजांजवळ केली होती त्याचा फायदा घेऊन बापूंचें मन आपल्याकडे ओढण्याचा त्याचा विचार होता. बापूंनीं कर्नाटकांत गाजविलेला पराक्रम सर्वश्रुतच होता. पेशव्यांचा दाब कर्नाटकांतून उडविण्याचा बहुतेक सर्व सरदारांनीं प्रयत्न चालविला असतां एकट्या बापूंनीं त्या सर्वांना एकाचवेळीं तोंड दिलें. स्वार्थ साधावयाचा असता तर त्याचवेळीं त्यांना तो

मुलुख आपल्या घशाखालीं घालतां आला असता पण त्याचें हें ब्रीद नव्हतें स्वतःच्या बळावर कमावितां येणारी जिंदगी ज्याला नकोशी वाटली नव्हे असला स्वामिद्रोही विचार ज्याचे मनाला मुळींच शिवलासुद्धां नाहीं तो असल्या फितुरांच्या निरोपांना बळी पडणार ही गोष्ट शक्यच नव्हती. जमीन मऊ वाटली म्हणून कोंपरांनीं खणावयास जावें पण खालीं वज्रासारखी टणक सांपडून कोपरांच्या हाडांचा चुरा व्हावा असेंच या बाबतींत झालें. इंग्रजांनीं अदमास केला त्यांत त्यांची चूक नव्हती कारण मराठी सैन्यांतील प्रत्येक इसम फितुरीस लालचावून इंग्रजांच्या कारस्थानांस बळी पडत होता. या भुलावणीस भुलणारे हाताच्या बोटांवर नव्हे बोटाच्या पेरावर मोजण्याइतकेही निघाले नाहींत. जेथें इंग्रजांना बापूंच्या मनाची पारख झाली नाहीं तेथें बाजीरावाला ती न झाल्यास नवल नाहीं. त्यानेंही बापूंबद्दल सावधगिरी बाळगलीच होती. बापूंनीं आपल्या बाणेदार स्वभावास अनुसरून, ‘ कंपनी मजकूर यांची खातरजमा सरकारांत गुंतून हल्लीं लढाई नमुद झाल्यावर सरकार कामांत काम कसूर केलेस खातरजमेस इंग्रज बहादूर यासी बट्टा आणि हरामखोरपणा येईल. ज्यांच्या पदरीं आपणांस ठेविलें आहे त्यांच्या इमानें इतबारें चाकरीवर **प्राण गेला तरी चिंता नाहीं** सरकारशीं तनाखोरी केल्यास तूर्त आम्हांस ( इंग्रज ) दौलत देतील परंतु लोकांचा अपवाद व परलोक नाहीं. हें कर्म आमच्यानें होणार नाहीं. आपली दोस्ती आम्हीं मिळविली आहे. आमची लोकांत अपकिर्ती केली असतां ज्यांनीं खातरजमा केली आहे त्यांची शिफारस होईल. नहून दुसरा भाव मनीं न आणावा. स्वामीद्रोह आहे. ( तो ) आम्हीं करून स्वप्राणांनिशी राहून त्या योगानें दौलत मिळवून अनभव केल्यानें लोक निंदा करतील तें कोठवर ऐकावें **त्यापेक्षां जीवन माफक सन्मुख युद्धामध्यें सरकार कामावर आल्यास श्रेयस्कर,** असें बेदरकारपणें उत्तर दिलें. बापूंच्या जीविताचे सारसर्वस्व या त्यांच्या एका उत्तरांत आहे. त्यांचा मोठेपणा या वाक्यांवर आधारलेला आहे. तो काळ म्हणजे ज्याकाळीं प्रत्येक मनुष्य फितूर बनला होता. बाजीरावाचे

दिवाण दिवाण कसले शत्रूने पाळलेले पोसलेले पोळ बापूंच्या जिवाचे आपल्या कृत्यांनीं लचकेच तोडीत होते. बाजीरावाचा भरंवसा नव्हता. स्वतःच्या जीवाची शाश्वती नव्हती. पायाखालची वाळू भराभर ओहटीमुळें विरून जात होती. ध्येयास्तव झगडणारे मूर्ख ठरले जात होते. आयुष्याच्या आकांक्षा अल्पशा आशेवर सुद्धां आधारतां देत नव्हत्या. तळहातावर शीर घ्यावयाचा प्रसंग लाक्षणिक अर्थानें सुद्धां नव्हे तर अक्षरशः आला होता. ज्यांच्याकरितां धडपडाव-याचें, ज्यांच्याकरितां त्याग करावयाचा, ज्यांच्याकरितां होमकुंडामध्यें स्वतःची आहुती घालावयाची. आपलीं मुलेंबाळें माता पत्नी एकंदरीनें सर्व गण गोत यांना आपल्या पश्चात् वणवण फिरावयास लावावयाचें त्यांना त्या जनतेला त्या राजाला त्या प्रतापसिंह महाराजांना या त्यागाची बिलकूल कदर नव्हती. असलें मातीमोल रत्न या कोंवळ्यांच्या हातीं सांपडल्यामुळें मातीमोल ठरण्याचा दुर्दैवी प्रसंग आम्हांवर आला. बापूंसारखा मोहरा या करंट्यांच्या हातीं पडला आणि त्यांनीं त्यांच्या मेहनतीचें चीज आपली पोळी पिकवून केलें. बापूंच्या धडधडलेल्या चितेवर स्वतःच्या स्वार्थाच्या विड्या ज्याला ज्याला शक्य वाटलें त्यानें त्यानें पेटवल्या. त्यावेळीं एकाचीही सदसद्विवेकबुद्धी जागृत झाली नाहीं. आपण काय करतों आहोंत याची कोणालाही शुद्ध उरली नाहीं. सगळे स्वार्थ साधल्यामुळें बेहोष झाले होते. त्यांना निशा चढली होती. पुढें काय चाललें आहे, आपल्याकरितां, आपल्यासारख्या नादाना-करितां कोण कोण बळी पडत आहेत, आपली चैन कोणाच्या जीवावर चाललेली आहे हें डोळे उघडून पहाण्याचें सुद्धां त्यांना सुचलें नाहीं याकडे आपण लक्ष दिलें पाहिजे, या महात्म्याला या तपस्व्याला या त्यागी वीराला तळहातावर शीर घेण्याची पाळी कां आली याचा योग्य तो विचार करून याला शक्य त्या मार्गानें मदत केली पाहिजे ही जाणीव त्यांना अजिबात झाली नाहीं. मरेना मेलातर ! आपली चैन करावयाची टाकून उगीच रानांवनांतून मूर्खासारखा धडपडत आहे असा त्यांचा उपहास केला गेला. त्यांच्या उच्च हेतूंची धुळधाण करण्यांत आली. हे कोण विंचुर-

कर, पेशव्याचे जिवलग दोस्त, अंतरंगांतले सल्लागार यांनीं काय केलें ? बापूंनीं इंग्रजांच्या नाशाकरितां चालविलेल्या खटपटींची वित्तंबातमी इंग्रजांना एकही कानामात्रा न गाळतां, एकही वेलांटी इकडची तिकडे न करतां, एकही स्वल्पविराम अर्धविराम न चुकवतां इंग्रजांना पोंचवली व बापूंच्या आयुष्याला पूर्णविराम दिला. हे कोण अप्पा देसाई निपाणकर यांचा हुद्दा सर लष्कर निपाणकर सर लष्कर म्हणजे लष्कर सर करणारा पण यांनीं काय केलें? अष्ट्यासारख्या शेवटच्या संग्रामांत जेथें बापूंच्या पतनामुळें मराठी राज्याचा शेवटचा तंतू तुटण्याची वेळ आली तेथें त्यांना मृत्यूच्या तोंडी दिलें आणि स्वतःची कातडी शाबूत राखली. बापूंनीं ' मी पुढें होतों तुम्हीं चला असा निरोप पाठवितांच यांनीं परसाकडण्याची सबब सांगावी यापेक्षां आमचा, आमच्या राष्ट्राचा, या महाराष्ट्राचा दैवदुर्विलास कोणता ? मराठी राज्याची, बापूंच्या जीविताची किंमत स्वतःच्या एखाद्या हलक्या विधीपेक्षां कमी लेखणारे नराधम-हो नराधम-या राष्ट्रांत उत्पन्न झाले. मराठी राज्याचा अंत इंग्रजांनीं केला नाहीं, त्यांच्या सुधारलेल्या तोफांनीं केला नाहीं त्यांच्या सैन्यांतील शिस्तबाज शिपायांनीं केला नाहीं, त्यांच्या युद्ध कौशल्यानें केला नाहीं, तो या विंचुरकरांनीं केला, तो या निपाणकरांनीं केला, तो या फितु-रांनीं केला आणि ते प्रतापसिंह महाराज ? परमपूज्य शिवरायाचे वंशज या राष्ट्राचे कायदेशीर व नैतिकदृष्टया मालक यांनीं आपलें राज्य बचावण्याकरितां काय केलें ? कोठें समशेर गाजविली ? नाहीं. बाजीरावाला बापूंना पैशाचा पुरवठा केला ? छे नांव काढूं नका. बाजीरावाला सल्लामसलत दिली ? त्याचा पुरावा नाहीं. त्यांनीं केलेल्या कृत्यांचा पुरावा आहे. त्यांनीं राज्य बचाव-ण्याकरितां केलेल्या कृत्यांची माहिती उपलब्ध आहे आणि ती त्यांचे मुत्सद्दी-पण स्पष्टपणें दाखविते राज्य राखावयाचें असेल तर समशेर गाजवून चालत नाहीं. तरवारींच्या खणखणाटाचे कठोर स्वर तेथें उपयोगीं पडत नाहींत. तेथें ' घालीन लोटांगण वंदीन चरण ' असेंच लीनतेनें म्हटलें पाहिजे. शत्रूच्या पुढें मान वांकवून आपलें राज्य संभाळलें पाहिजे. राज्य संभाळणें हें महत्त्वाचें

काम आहे. त्याच्या पुढें व्यक्तीच्या मानापमानाची मातब्बरी नाहीं. राजा हा आपल्या लोकांचा सेवक आहे. त्यानें त्यांचें हित पहिल्यानें पाहिलें पाहिजे. त्याच्यापुढें स्वतःच्या हिताहिताचा प्रश्न क्षुल्लक आहे. आपल्याला गादी नसेना कां ! परकी राजांच्या हुकुमाखालीं कां होईना ! कोठेंही आपली प्रजा सुखी असो म्हणजे झालें या एकाच स्तुत्य हेतूनें त्यांनीं बंडखोर पेशव्याला बंडखोर बापूंना व स्वतःच्या डोक्यामध्यें स्वराज्याचें वेड घेतलेल्या त्यांच्या मूर्ख अनुयायांना मदत केली नाहीं आधींच बंडानें ग्रस्त झालेल्या जनतेला आणखी भलत्याच मार्गाला लावणाऱ्या या वेड्यापीरांनां मदत न करतां त्यांना नेस्तनाबुद करण्याचे शक्य तेवढे प्रयत्न केले. ते करतांना इंग्रजांशीं कारस्थानें करण्यांत माघार घेतली नाहीं. आणि अशा रितीनें शक्य तितक्या भल्या मार्गांनीं मराठ्यांचें राज्य रक्षण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. बापू मेल्यानंतर त्यांचें शव ओळखून त्यांच्या चितेला अग्नी लावून त्यांच्या बरोबरच या भलत्याच कल्पनांची होळी करून टाकली आणि आपणांस सुस्थितींत ठेवलें ही काय कमी महत्त्वाची कामगिरी बजावली ?

पण बापू या मोठ्यांच्या आधारावर विसंबून नव्हतेच. अमका आपल्याला अमुक प्रकारें मदत करील ही त्याची अपेक्षाच नव्हती. युद्धाचे रणशिंग फुंकलें आहे. इच्छा असेल ते येऊन मिळतील नसेल ते गप्प बसतील. ज्यांना स्वार्थ साधावयाचा असेल ते विरोधही करतील ही जाणीव ठेऊनच त्यांनीं युद्धाचा दुंदुभी चोहींकडे वाजविला. त्यांचे शिपाई त्यांना मिळाले. शेवटपर्यंत त्यांनीं त्यांना दगा दिला नाहीं गरीब बिचारे बेरड, अरब; दुपारीं खाण्याचीसुद्धां त्यांना भ्रांत त्यांच्याजवळ काय द्यावयास असणार ? एक फक्त इमान! एक साधा जीव! त्याची जगाला मातबरी नसेल. कोणाला कदर नसेल पण त्यांच्या नायकाला–बापूंना–होती. बापू धडपडत आहेत हे स्वार्थाकरितां नव्हे हें प्रत्येकाला कळून चुकलें होतें. त्यांच्या हेतूंची या साध्या व हलक्या समजल्या जाणाऱ्या वीरांना जाणीव होती, स्वराज्यांत उपाशीं राहिलों तरी चालेल पण परराज्यांत पंचपक्वान्नाचें जेवण नको असें स्पष्ट

बोलून त्यांनीं बापूंना पाठिंवा दिला आणि तो शेवटपर्यंत मागें घेतला नाहीं. धन्यावर घाव पडतो आहे असें दिसतांच त्याच्यावर स्वतःच्या देहाचें चिलखत घातलें आणि शेवटीं स्वर्लोकास प्रयाण केलें. याच लोकांवर याच वीरांवर व याच देशभक्तांवर बापूंची सारी मदार होती. त्यांनीं आपलें काम चोख रितीनें बजावलें. यशावरून मनुष्याच्या कर्तबगारीची किंमत करणें योग्य होणार नाहीं. जें तत्व हृदयाशीं बाळगलें त्याच्याकरितां जंगजंग पछाडलें, मनुष्याच्या कर्तबगारीची परिसीमा त्यानें गांठली, म्हणजे झालें. त्याच्या हातीं एवढेंच असतें. या साध्या खेडवळ लोकांनीं तें केलें आणि आपली योग्यता जगाला दाखवून दिली. त्यांतील कित्येकांचीं कुटुंबें अन्नान्न करीत फिरलीं असतील. कित्येकांना थंडीवाऱ्यांत पुरतें पांघरूणही मिळालें नसेल, कित्येकांचा निर्वंश झाला असेल पण त्याची जाणीव असूनही यांनीं फिकीर बाळगली नाहीं आणि आपले ध्येय गांठण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांच्या सारख्यांचें वर्णन यशवंतांनीं पुढील ओळींत केललें आहेच.

‘ ज्यांच्या कामीं राबविली तनु इच्छा आमरण
तयांची नसे जगा चाड
कुणास ठावें परंतु पोटीं एक समाधान
सेविला कधि न मार्ग आड
असो अतां नच शस्त्र पेलवे उभें न राहवतें
वांछितें शरीर पहुडाया
सुखदुःखाच्या स्मृती तीक्ष्ण कीं रुतलेले शरते
जिवाला तीच होय शय्या
शरतल्पीं या मला पडूं दे मी इच्छामरणी
नभींच्या मोजित या तारा
कोण धनंजय शरसंधानें तृषाक्रांत वदनीं
तोषवील घालुनि जलधारा

त्यांनीं आपलें कर्तव्य केलें. त्यांची धडपड जनतेकरितां होती. जनतेनें पूर्णपणें पाठिंबा दिला असता तर त्यांना यशही आलें असतें. पाठिंबा तोकडा पडला तरी त्याबद्दल त्यांनीं फिकीर केली नाहीं. जगानें आपल्याला डोक्यावर घेऊन नाचावें, आपलें गुणगान करावें, आपल्यावर शाहीरांनीं पोवाडे रचावे या स्वार्थी हेतूनें ते या दगदगीत पडले नव्हते. 'निंदोत वानोत सुनीतिमंत, चळो असो वा कमला गृहांत, हो मृत्यु आजीच घडो युगांतीं सन्मार्ग टाकूनी भले न जाती' ही वामनपंडिताची कविता त्यांनीं आपल्यापुढें कित्त्यादाखल ठेवली होती. कर्तव्याचें समाधान त्यांना लाभलें व त्यांतच त्यांना आनंद झाला.

पण एका तऱ्हेनें पहातां हा फितुरीचा बुजबुजाट त्यांचें महत्त्व वाढविण्यास उपयोगी पडला. रत्नांची किंमत त्याच्या गुणांवर व दुर्मिळतेवर केली जाते. परिस्थितीमुळें दुर्मिळता त्यांचे वांट्यास आली. गुण तर अंगीं पूर्वीपासून होतेच आणि या दुर्मिळतेमुळें त्यांचे पोवाडे त्यांच्या मरणानंतर कां होईना पण शाहीरांनीं स्वयंस्फूर्तीनें गाईले. खेड्यांतल्या बायकांनींसुद्धां दळावयास बसतांना त्यांच्या ओंव्या गाईल्या आणि अत्यंत श्रेष्ठ नररत्न असें इतिहासकारांनीं गौरविलें. वंशज राहिले नाहींत पण त्यांचें नांव प्रत्येकाच्या हृदयांत अढळ राहिलें आणि त्यांच्या बद्दलचा आदरभाव शेंकडों वर्षें टिकला.

वसईचा तह होऊन त्यावर सही झाली नाहीं तोंच बाजीरावानें बाळोजी कुंजर व नारायणराव वैद्य या उभयतांस शिंदे व भोंसले यांजकडे पाठविलें. त्यांत उघड असें दाखविलें होतें कीं इंग्लिशांचा व आमचा तह झाला तो प्रकार कळविण्यासाठीं त्यांस तिकडे पाठविले पण खरा प्रकार मात्र वेगळाच होता. त्यांच्याबरोबर 'आपणांवर बिकट परिस्थितीमुळें हा प्रसंग ओढवला आहे आपली इच्छा याचे विरुद्ध आहे आणि तुम्ही येऊन मिळत असाल तर आपण पुन्हां एकदां इंग्रजांशीं सामना देण्यास तयार आहों' असें कळविलें. परंतु मध्यंतरी शिंदे होळकर व भोंसले यांनीं इंग्रजांशीं वेगवेगळें युद्ध केल्यामुळें त्यांचा पराभव झाला व ते आपआपल्या ठिकाणीं स्वस्थ बसले. परिस्थिती

अशी बिकट पाहून बाजीरावानें स्वतःचा खजिना भरण्यास सुरवात केली. ५ कोट रुपये जमविल्यावर प्रत्येकास फौज वाढविण्यास सांगितलें. सन १८१४ मध्यें त्रिंबकजी डेंगळ्याचे द्वारें पुन्हां शिंदे भोंसल्याशीं गुप्त तह करविले. हा त्रिंबकजी डेंगळा पूर्वी बाजीराव महाडास पळून गेला त्यावेळीं जासूदगिरीचे कामावर होता. पुढें कर्नाटकाचा सुभा सांगून त्याला फारच वाढविलें. पुढें तो बाजीरावाचा सल्लागार बनला. प्रत्येक बाबतींत त्याचा विचार घेतल्यावाचून बाजीराव तीस मूर्त स्वरूप देत नसे. पुढें गंगाधरशास्त्री पटवर्धनांचा पंढरपूर येथें खून झाला तो आरोप इंग्रजांनीं त्याच्यावर लादला व त्यास पकडून ठाण्याच्या किल्ल्यांत टाकलें. पण तो अत्यंत हिकमती होता. तो तेथून वेष पालटून पळाला व संगमनेरकडे गेला. तेथें त्रिंबकजावळी म्हणून त्याचें मूळ गांव होतें तेथें गेला. पळून गेल्यावर संगमनेर व सिन्नर या महालांतील भिल्ल जमवून खानदेशांत जाऊन राहिला. खानदेशांतील पहाडांत तो पुष्कळ दिवस फिरत होता पण शेवटीं इंग्रजांनीं त्यास पुन्हां पकडून १८१७ सालीं चुनारगड तुरुंगांत नेऊन टाकलें तेथेंच तो जन्मभर होता.

त्रिंबकजी डेंगळ्याला पकडण्याबाबत बाजीराव मुद्दाम टाळाटाळ करीत आहे असें पाहून इंग्रजांनीं ८ मे १८१७ रोजीं पुणें शहराला एकाएकीं आपल्या फौजेचा वेढा दिला. त्या वेळीं निरुपाय होऊन त्यास त्यांच्या सर्व अटी मान्य करणें भाग पडलें. या तहास पुण्याचा तह असें म्हणतात. या तहानें पेशव्यांच्या सैन्याची संख्या कमी करण्यांत आली. त्याशिवाय बराचसा मुलुखही तोडून द्यावा लागला आणि इ. स. १८१३ मध्यें पेशव्यांनीं इंग्लिश अधिकाऱ्यांकडून एक पलटण तयार करविली होती ती पुन्हां त्यांचे ताब्यांत द्यावी लागली. यामुळें इंग्लिशांची सत्ता जास्त वाढली व त्या मानानें बाजीरावाभोंवतीं पारतंत्र्याचे पाश अधिकाधिक पसरूं लागले. या गोष्टीचा परिणाम त्याच्यावर होऊन स्वाभिमानानें जगावयाचें असेल तर युद्धाशिवाय दुसरा मार्ग नाहीं अशी त्याची खात्री पटली व मग तो त्या मार्गाच्या पूर्ततेस लागला.

याच वेळीं हिंदुस्थानांत पेंढाऱ्यांचें बंड फार माजलें होतें. तें मोडण्यासाठीं सर्व मराठे सरदारांकडे इंग्रजांनीं सैन्याची याचना केली. बाजीरावालाही ही विनंति करण्यांत आली होती व त्याप्रमाणें त्यानें आपलें सैन्य वाढविलेंही. पण इंग्रजांना हें सैन्य पेंढाऱ्यांच्या बंदोबस्ताकरितां नसून स्वतःच्या बंदोबस्ताकरितां आहे असा संशय आला. जून महिन्यांत तह झाल्यानंतर जुलै महिन्यांत बाजीरावाची स्वारी यात्रेकरितां म्हणून पंढरपुरास गेली. आणि कांहीं दिवसांनीं तेथून निघून साताऱ्याजवळच्या माहुलीच्या वाड्यांत राहिली. तेथें त्याची व सर जॉन मालकम यांची भेट झाली. बाजीरावानें आपलें गाऱ्हाणें त्याच्या समोर सरळ मांडलें. पेंढाऱ्यांच्या बाबतींत आपणांस मदत केल्यास आपण हा लगाम सैल सोडूं असें त्यांनीं वचन दिलें व त्या वचनावर विसंबून त्यानें सैन्य वाढण्याची कोशीस केली. मालकमचें मन बाजीरावाबद्दल साफ होतें पण पुण्याच्या दरबारांतील इंग्रज रेसिडेंट एल्फिन्स्टन याचा त्याच्यावर विश्वास नव्हता. यामुळें बाजीरावाची स्थिती दुहेरी कात्रींत सांपडल्यासारखी झाली. सैन्य न वाढवलें तर मालकम् चेंपणार वाढवलें तर एलफिन्स्टन्चा दट्टया आहेच परंतु मनुष्याला आशा ही आहेच. सैन्य ठेवण्यामध्यें मालकम् संतुष्ट रहाला असता व आपल्या हातीं एक हुकमी पत्ता सांपडला असता या दुहेरी हेतूनें त्यानें आपलें सैन्य वाढविण्यास सुरवात केली. तिचें वर्णन पेशव्यांच्या बखरींत पुढीलप्रमाणें केलें आहे.

" श्रीमंत फौज ठेऊं लागले अवघे बोलवून पुणियास आणिले. नवे फौजेची कलमजारी केली. आला स्वार पायदळ याची हजेरी घेऊन चाकरीस ठेविलें १०००० अरब चाकरीस ठेविले व ३००० नंगे गोसावी चाकरीस ठेविले. तेव्हां इंग्रजांचा नेट भारी होत चालला. त्यांनींही पलटणाची तयारी केली. श्रीमंतांची लाख फौजेची हजिरी झाली तोफखाना पानशे यांजकडून तयार करवीत चालले. नवे बाण करण्याचा आरंभ केला. दारूगोळा यांचाही सरंजाम चालविला."

बाजीरावानें इंग्रजांविरुद्ध सैन्याची तयारी केली असें धरून चाललें तरी इंग्रजांनीं तोच मार्ग बाजीरावाला दडपण्याकरितां अवलंबला होता ही गोष्ट विसरतां कामा नये. उत्तर हिंदुस्थानांत पेंढाऱ्याकरितां म्हणून जमा केलेलें सैन्य बाजीरावालाच पेंढारी समजत होतें कीं काय नकळे. कारण त्यांच्यापैकीं ब्रिगेडिअर जनरल स्मिथ याच्या ताब्यांतील चवथ्या डिव्हिजनमधील शिपाई खानदेशांतून कूच करीत अहमदनगरावरून पुण्याचा रस्ता पकडीत होते. मुंबईची एक युरोपियन पलटण, मद्रास नेटिव्ह घोडेस्वारांची दुसरी पलटण, आणि मद्रास नेटिव्ह इन्फंट्रीच्या पंधराव्या रेजिमेंटमधील दुसरी पलटण यांनींही बाजीरावालाच आपलें लक्ष्य केलें होतें. आपल्याकडे हीं दोन्ही सैन्यें कशाकरितां येत आहेत हें न कळण्याइतका बाजीराव मूर्ख नव्हता. त्याला हा इंग्रजांचा कावा कळला व त्यानें दुप्पट जोरानें आपलें सैन्य वाढविण्यास सुरवात केली. बाजीरावाच्या मनांत निश्चित असा कोणताही विचार होता असें सांगतां येत नाहीं. पण इंग्रजांच्या बाबतींत तसें नाहीं. १८१७–१८१९ मधील लढायांच्या इतिहासांत कर्नल लेफ्टनंट ब्लेकर यानें पुढील मजकूर स्पष्टपणें लिहिला आहे.

It may be proper to mention, that these orders of the supreme Government were dated on the I6th of May 1817; at which period the affairs at Poona, previous to the treaty, were in that unsettled state which has been described. Accordingly Sir Thomas Hislop's instructions were embraced in the first instance, the object of which was to rednce the Peshwa's power.

इंग्रज एवढेंच करून थांबले नाहींत. बाजीरावाप्रमाणेंच त्यांनींही नवीन सैन्य भरतीला सुरवात केली आणि ती सुद्धां बाजीरावाच्या मुलुखांतून –कोंकणांतून. सैन्य वाढवण्याकरितां बाजीरावाचे हुकूम जिकडे तिकडे गेले होतेच तसे ते कोंकणांतही गेलेच. व तेथील अंमलदारांनीं सैन्य वाढविण्यास

सुरवात केली. इंग्रजांनींही तेथेंच प्रयत्न चालविल्यामुळें त्यांस जास्तींत जास्त सैन्य जमा करणें कठीण जाऊं लागलें व त्यामुळें त्यांनीं इंग्रजांना सैन्य गोळा करण्यास प्रतिबंध केला. लढाईचें खुसपट काढण्याऱ्या इंग्रजांनीं लगेच बाजीरावावर इंग्रज द्वेषाचा आरोप ठेवला. स्वतः गुन्हा करावयाचा व दुसऱ्याला गुरकावयाचे ही शक्तिवानांची रीतच असते.

बाजीरावावर दुसरा आरोप म्हणजे त्यानें जमविलेलें सैन्य ताबडतोब पेंढाऱ्यांच्या बंदोबस्ताकरितां इंग्रजांकडे पाठविलें नाहीं. हें सैन्य पावसाळ्याच्या सुरवातीला जमा झालें होतें. पावसाळ्याचे दिवस सैन्याच्या हालचालीला गैरसोयीचे असतात अर्थात त्या सैन्याला इंग्रजांना मदत करावयास जावयाचेंच असेल तर पावसाळा संपल्यावर जातां आलें असतें ही गोष्ट उघड होती. पण इतका विचार करण्याचें इंग्रजांना काय कारण ? त्यांनीं याबद्दल बाजीरावाला उघड कांहींच न विचारतां आपलीं सैन्यें पुण्याकडे वळविलीं. उरावर हीं सैन्यें असतांना बाजीराव आपलीं सैन्यें बाहेर कशी पाठविणार ?

याशिवाय त्यांनीं बाजीरावाच्या सैन्यामध्यें फितुरीचे प्रयोग चालविले होतेच आणि हे प्रयत्न शेवटचीं एक दोन वर्षें नव्हे तर १८०३ सालापासून म्हणजे १४–१५ वर्षें चालू होते. आर्थर वेलस्ली यानें मेजर शॉला पुढील पत्र २४ ऑगस्ट १८०३ रोजीं लिहिलें होतें.

You will have observed from my letters to Colonel Close that I have urged him to pay the ministers in order to have accurate information of what passes.

त्यानंतर २८ सप्टेंबर १८०३ रोजीं असइच्या छपवणींतून ज. वेलस्ली यांनीं पुण्याचे रेसिडेंट कर्नल क्लोज यांना पुढील पत्र लिहिलें.

Lord Wellesley has taken up the question of paying the Peshwa's ministers in a great scale.

The Peshwa has no ministers. He is every thing himself and every thing is little therefore we ought to pay those who are supposed to be and are called his ministers to have intelligence of what passes in the Peshwas secret council.

विंचुरकरांच्या फितुरीबद्दल हेस्टिंग्स प्रायव्हेट जर्नलमध्यें उल्लेख आहेच.

बापूंना फितूर करण्याबद्दल चाललेल्या प्रयत्नांची हकिकत मागें दिली आहेच.

याबद्दल सोहनीकृत पेशव्यांच्या बखरींत पुढीलप्रमाणें उल्लेख आहे.

'सारे सरदार फितुरलेले' इंग्रजांचा पैका खाल्लेला तेव्हां ती फौज इंग्रज यांशीं म्हणजे लढते असें घडत नाहीं. या गोष्टी त्यानंतर लहानापासून थोरांपर्यंत सर्वांना माहीत झाल्या होत्या. खडकीच्या लढाईवरील एका पोवाड्यांत—

' फितूर झाला ठाव नव्हता चोर बातमी फिरंग्यांची ।
तयारी झाली लैनेची ।।


मराठ्यांचें राज्य नष्ट होत असलेलें पाहून ज्याचें हृदय तिळतिळ तुटत होतें असा प्रभाकर शाहीर बाजीरावावरील पोवाड्यांत म्हणतो.

ईश्वर सत्ता विचित्र सारें दैवानें घडविलें
हरिश्चंद्र आणि रामचंद्र नव पांडवांस रडविलें
फितुर करुनी सर्वांनीं अपलें राज्य मात्र बुडवीलें

शिवाय यशवंतराव घोरपडे आणि बाळाजीपंत नातू हे पेशव्यांच्या दरबारांतील बातम्या इंग्रजांना सांगत ही गोष्ट ग्रँट डफनेंही कबूल केली आहे.

आणि असे पुरावे स्वत:च्या विरुद्ध असतां यांनीं–पेशव्यानें इंग्रजांच्या फौजेंत फितूर उत्पन्न करून बेदिली करण्याचा प्रयत्न चालविला होता असें निर्लज्जपणें वर मान करून सांगावें यासारखा निंद्य अपराध दुसरा कोणता ? Everything is fair in love and war असें दिमाखानें म्हणणारे

## खडकीच्या लढाईतील सैन्यांच्या हालचालींचें वर्णन.




१ १ १ १ पेशव्यांची लाइन.

२ २ पेशव्यांचे घोडेस्वार हल्ला करावयाला पुढें जात आहेत.

३ पेशव्यांच्या पायदळाची एक तुकडी ७ व्या नेटिव्ह इन्फन्ट्रीवर हल्ला करण्याकरितां पुढें जात आहे.

४ सातव्या नेटिव्ह इन्फन्ट्रीवर हल्ला होत असतांना जरीपटक्याच्या निशाणाची जागा.

५ ५ कॅप्टन फोर्ड यांच्या दापोडीच्या पलटणीला अडविण्याकरितां जाणारे पेशव्यांचे घोडेस्वार. मोर दीक्षित यांचा मृत्यु.

६ ६ खडकी येथें ठेवलेल्या दोन तोफांनीं मागें हटविलेले पेशव्यांचे घोडेस्वार.

७ ७ इंग्लिशांवर हल्ला करण्याकरितां पुढें आलेलें, परंतु लगेंच मागें फिरवून लावण्यांत आलेलें, पेशव्यांचें पायदळ.

८ खडकी गांव आणि इंग्लिशांची छावणी येथें ६ व्या बाँबे नेटिव इन्फन्ट्रीची एक तुकडी व दोन तोफा होत्या.

९ ९ ९ ९ खडकीच्या सैन्याला आपल्या हाताखालील लोकांसह जाऊन मिळण्याकरितां एल्फिन्स्टन ज्या रस्त्यानें गेला तो रस्ता.

१० १० इंग्लिश सैन्याच्या लायनीची पहिली जागा.

११ ११ इंग्लिश सैन्याच्या लायनीची दुसरी जागा.

१२ १२ १२ या लायनीला येऊन मिळण्याकरितां दापोडी येथून निघालेल्या कॅप्टन फोर्ड याच्या हाताखालील पलटणी पुढें येत आहेत.

१३ दापोडीची पलटण आपल्या उजव्या बाजूचें सैन्य माघारें वळवून पेशव्यांच्या स्वारांना मागें हटविते.

१४ १४ पेशव्यांचें सैन्य पुण्याकडे परत वळलें त्या वेळीं इंग्लिशांचें सैन्य जेथें येऊन पोंचलें होतें, ती त्यांच्या लाइनीची तिसरी आणि शेवटची जागा.

व स्वतः त्याप्रमाणें वागणारे लढाईचे बाबतींत सत्यासत्याचा न्याय अन्यायाचा विधिनिषेध न बाळगणारे इंग्रज बाजीरावाला मात्र फितुरीबद्दल दोष देऊं कसे शकतात ?

अशा तऱ्हेनें गुप्त व उघड रीतीनें दोन्ही पक्षांनीं लढाईच्या तयारीस जोरानें सुरवात केली तरी पहिलें पाऊल कोणीं पुढें टाकावें हा महत्त्वाचा प्रश्न होऊन बसला होता. बाजीरावाचें सैन्य कमी झालें. त्याचा मुलुख तोडला गेला आणि प्रतिपक्षाचें बळ मात्र वाढत चाललें ही गोष्ट उघड दिसत होती. इंग्रजांचें दडपण आपणांवर यापुढें असेंच वाढूं द्यावें कीं काय हा प्रश्न बाजीरावानें आपल्या जवळच्या सरदारांना विचारला असतां बरेचसे तटस्थ राहिले, उरल्यापैकीं कांहींनीं लढाई अजीबात करूं नये असें सांगितलें, कांहींनीं आपली तयारी होईपर्यंत थांबावें असा पोक्तपणाचा सल्ला दिला, आणि अगदीं एक दोघे लढाई आजच पुकारावी या मताचा धडाडीनें पुरस्कार करणारे निघाले. विंचुरकर आपल्या सैन्यासह बरेच दिवस ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांच्या सैन्याबरोबर होते. त्यावेळीं त्यांना इंग्रजी सैन्यांतील शिस्तीची, टापटिपीची व कर्तबगारीची चांगली माहिती झालेली होती. त्यांनीं सांगितलें कीं, इंग्रजांची फौज आपल्यापेक्षां सरस आहे तेव्हां त्यांच्याशीं लढाई करून आपल्याला यश मिळावयाचें नाहीं. पण ती गोष्ट बाजीरावला पटली नाहीं. विंचुरकरांनीं दिलेला सल्ला निःपक्षपातीपणाचा नव्हता. ते आधींच फितूर झालेले होते. ते बाजीरावाबरोबर शेवटपर्यंत राहिले पण स्वामिनिष्ठ म्हणून नव्हे. बारामती येथील मुत्सद्दी गोविंदराव काळे यांचेंही मत लढाईच्या विरुद्ध होतें. त्यांनीं पुढीलप्रमाणें सल्ला दिला. ' तूर्त इंग्रजांशीं लढाईचा प्रसंग घालूं नये. तुमचा सर्व सरंजाम नवा. काल चाकर ठेवलेला आज लढून मरतो असें नाहीं. वर्ष दोन वर्षें अशी फौज व इंग्रजांशीं सख्यत्व आहे तेंच चालवावें. दुसरें, लढाईचा प्रसंग शहराशीं करूं नये. एखादी मोहीम परराज्यांत बाहेर काढली आणि इंग्रजांस समागमें घेऊन जावें. व तिकडे गेल्यावर लढाईचा



ग्रं. सं. ता.

प्रसंग करावयाचा तो करतां येईल. सध्यां लढाई केली असतां इंग्रज म्हणजे हटला जातो असें घडत नाहीं.'

काळ्यांप्रमाणेंच दुसऱ्या मराठे सरदारांचा सल्ला होता. पण तो बाजीरावाला व बापूंना मानवला नाहीं. तत्व या दृष्टीनें त्यांचें म्हणणें बरोबर होतें पण त्याप्रमाणें वागण्यास परिस्थिति पाहिजे तशी अनुकूल नव्हती. सरंजाम नवा होता ही गोष्ट खरी. पण शत्रू शेजारीं येऊन भिडल्यामुळें तो ठेवावा लागला होता ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. बाजीराव खातो काय याची वातमी ठेवणारे इंग्रज तो हें सैन्य कशाकरितां ठेवीत आहे याची वित्तंवातमी काढल्याखेरीज रहातील ही गोष्ट बुद्धीला कशी पटेल ? शहराजवळ लढाई नको हें म्हणणें बरोबर आहे पण दुसरीकडे लढाईची तयारी असेल तर ना ? इंग्रज आपलें सर्व सैन्य पुण्याचे रोंखानें आणीत होते याचा हेतूच बाजीरावाला पुण्यांत कोंडावयाचा व बाहेरची मदत मिळूं न देण्याचा होता. अशा स्थितींत तो किंवा त्याचे सेनापती ससैन्य बाहेर जाणार कसे व इंग्रजांशीं लढाई देणार कोणत्या मार्गानें ? आणि यामुळें त्यांना जगावयाचेंच असेल तर इंग्रजांशीं युद्ध करावयास पाहिजे होतें आणि तेंही पुण्याजवळ. त्याला त्यांचा इलाज नव्हता.

आपल्या या लढाईच्या तयारीला भिऊन इंग्रज पुण्याजवळून काढता पाय घेत असतील तर पहावें म्हणून खडकीच्या लढाईच्या दिवशीं दुपारीं दोन वाजण्याच्या सुमारास विठोजी नाईक गायकवाड यांचेबरोबर 'तुम्ही पुण्यास गेल्या मे महिन्यामध्यें जसा वेढा घातला होता तसा आज घालणार आहां असें तुमच्या हालचालींवरून दिसतें व त्यामुळें मला भीति वाटत आहे. तरी तुमचा तसा विचार नसेल तर तुम्हीं आपलें सैन्य दुसऱ्या कोठेंतरी हालवावें' असा निरोप पाठविला पण त्याचें योग्य तें उत्तर मिळालें नाहीं.

गोविंदरावें काळ्यांचा सल्ला बाजीरावाला पटला नाहीं व तो पटण्यासारखा नव्हता हें वर सांगितलेंच. त्यांनीं लढाईची तयारी केली. 'पुण्यांत तमाम

सरदार गोळा झाले. निपाणकर, अक्कलकोटवाले भोंसले, निंबाळकर, घोरपडे, जाधव, विंचुरकर, पटवर्धन, बापू गोखले, राजेबहादुर भेईटे, पुरंदरे किरकोळ सरंजामा असे मिळून (व) नवीन ठेवलेली फौज मिळून लाख सवालाख घोडे मिळाले. खेरीज पायदळ, आरब, रोहिले, पठाण सिद्दी गोसावी. शिवाय रजपूत रांगडे मुसलमान असे ५०००० पायींचे लोक नवे चाकर ठेविलेले असा सरंजाम जाहला.' असें पेशव्यांच्या बखरींत वर्णन आहे. या सगळ्या सैन्याचें आधिपत्य बापूंकडे देण्यांत आलेलें होतें. या नवीन आलेल्या सैन्याची गारपीराजवळ छावणी पडूं लागली. तेथें पूर्वीपासून कर्नल बर याच्या हाताखालीं कांहीं पलटणें रहात होतीं. या इंग्रजी लष्करांत नेटिव्ह इन्फंट्रीच्या सहाव्या आणि सातव्या रेजिमेंटमधील म्हणून एकंदर १२०० शिपाई लोक होते व शिवाय त्यांच्याजवळ दोन तोफाही होत्या. या छावणीच्या सभोंवार पेशव्यांच्या लष्कराच्या छावण्या येऊन उतरल्या. गोसावी लोकांचीं पलटणें वानवडीजवळ येऊन उतरलीं. त्याचप्रमाणें रेसिडेंट मि. एल्फिन्स्टन् यांचा बंगला, आणि भांबुर्डें गांव यांच्या दरम्यानच्या मैदानामध्यें विंचुरकरांचे घोडेस्वार, पायदळ आणि तोफखाना यांचा तळ येऊन पडला. अशा रितीनें गारपिराजवळील इंग्लिशांची फौजही पेशव्यांच्या लष्कराकडून चोहोंबाजूंनी वेढली जात होती. शिवाय गारपिरावरील इंग्लिशांच्या छावणीच्या बाजूनें शहरांतील कित्येक बागांचीं कुंपणें असल्यामुळें त्यांच्या आडून शहरांतील पेशव्यांच्या शिपायांना इंग्लिशांवर हल्ले करण्यास सोईचें पडत असे. त्याचप्रमाणें इंग्लिशांच्या छावणींतील फितूर लोकांना पेशव्यांना जाऊन मिळण्याची सोय झाली होती. असा प्रकार चालू असतां लढाईचें आणखीं एक कारण उपस्थित झालें. इंग्लिशलष्करांतील लेफ्टनंट शॉ याला पेशव्यांच्या तीन घोडेस्वारांनीं घोड्यावरून ओढलें आणि आपल्या भाल्यानें त्यांच्या मांडीला जखमा केल्या. मराठ्यांच्या सैन्याची तयारी झाल्यानंतर इंग्लिशांच्या छावणीवर ताबडतोब हल्ला करावा असें मराठे सरदारांनीं बाजीरावास सुचविलें. ता. २८ रोजीं रात्रीं तोफेच्या

गाड्यांना बैल जुंपण्यांत आले. घोडेस्वारांनीं आपल्या घोड्यावर खोगिरें चढवलीं. पायदळाच्या पलटणी लढाईकरितां तयार झाल्या. अशा रितीनें त्यादिवशीं रात्रीं शहरांत मोठी धामधूम चालली होती. घोड्यांच्या टापांचा व तोफेच्या गाड्यांचा ध्वनीं आकाश दणाणून सोडीत होता. त्या रात्रीं संगमावरील बंगल्यांत एलफिन्स्टन व इंग्रज इतिहासकार ग्रँटडफ हे चाललेल्या प्रकारांकडे भीतिग्रस्त मुद्रेनें लक्ष लावीत होते. निसर्गानेंही पेशव्यांचाच कित्ता गिरवला. पाऊस, विजा, मेघगर्जना यांनीं आकाश भरून व दणाणून गेलें होतें. यादिवशींच जर इंग्रजांवर हल्ला झाला असता तर त्यांचें साफ चंदन उडालें असतें. आणि म्हणून बापू त्याबद्दल घाई करीत होते. पण बाजीरावाला तो सल्ला मानवला नाहीं. त्यानें सारी रात्र सल्लामसलतींत घालविली. दुसरे दिवशीं त्यांनीं सैन्य हलविण्याबद्दल एल्फिन्स्टन्ला निरोप पाठविला. पण त्यानें त्याप्रमाणें कांहींच केलें नाहीं. पुण्याच्या रोखानें निघालेलें इंग्रजांचें लष्कर तेथें ता. ३० रोजीं येऊन पोंचलें. मध्यंतरीं गारपिरावर असलेलें इंग्रजांचें सैन्य कर्नल बर यानें खडकीस आणलें, ता. १ व २ नोव्हेंबर या दोन दिवसांत त्यांनीं आपल्या सैन्याची बहुतेक व्यवस्था लाविली. जवळच नदीच्या पाण्याचा पुरवठा असल्यामुळें लष्कराची पाण्याची चांगलीच सोय झाली. त्याशिवाय पेशव्यांनीं कर्नल फोर्ड याजकडून एक पलटण कवायत शिकवून तयार केली होती तीही त्यांचे जवळच होती व ती आपणांस ऐनवेळीं मदत करील अशी इंग्रजांना खात्री होती. व म्हणून तिनें आपणांस कसकसें येऊन मिळावें याची संपूर्ण योजना एलफिन्स्टननें तयार केली होती.

यावेळीं मराठे फारच जोरांत होते. सैन्यामध्यें अवर्णनीय उत्साह संचरला होता व *त्या उत्साहाच्या* भरांत त्यांनीं इंग्रजांना चेपण्यास सुरवात केली होती. कर्नल बर यांनीं आपली छावणी सोडल्याबरोबर मराठ्यांनीं ती जागा हस्तगत केली. तेथें त्यांनीं टाकलेल्या सर्व सामानाची लुटालूट केली व तेथून एकेक पाऊल पुढें टाकीत रेसिडेन्सीकडे मोर्चा वळविला. हा प्रकार

पाहून एल्फिन्स्टन घाबरला व त्यानें पेशव्यांना असें करण्यांत तुमचा हेतू तरी काय असें विचारण्याकरितां कर्नल फोर्ड यास पाठविलें. कॅप्टन फोर्ड हा पेशव्यांच्या पलटणीचा मुख्य होता त्यामुळें त्याचा पेशव्यांशीं बराच संबंध आला होता. सदाशिव माणकेश्वराच्या मागून प्रधानपदावर आरूढ झालेल्या मोर दिक्षित वसईकरांशींहीं त्याचे हितसंबंध गुंतले होतेच. कर्नल फोर्ड जेव्हां त्यांचेकडे बातमी काढण्याकरितां म्हणून आला तेव्हां बाजीरावाचा विचार पर्वतीकडे जाण्याचा आहे असें त्यास त्यांचेकडून कळलें. पेशवे व इंग्रज यांच्यांत जर दुर्दैवानें लढाई जुंपली तर तुम्ही आम्हांस मिळावें अशी त्यांनीं फोर्डला विनंति केली; पण कांहीं झालें तरी आपल्या देशबांधवांविरुद्ध मी लढणार नाहीं असें त्यानें सांगितलें. तेव्हां देशबांधवांविरुद्ध लढावयाचें नसलें तरी तुम्हीं पेशव्यांच्या अन्नावर पोसले गेल्यामुळें त्यांचे विरुद्धही न लढतां तटस्थ रहा अशी दिक्षीतांनीं विनंति केली. पण फोर्डनें तें सुद्धां ऐकलें नाहीं. तेव्हां दुर्दैवानें या लढाईत आपल्या दोघांपैकीं कोणी मेल्यास उरलेल्यानें त्याच्या बायकामुलांची व्यवस्था करावी असें ठरलें व या दोघां मित्रांनीं एकमेकांचा शेवटचा निरोप घेतला.

मोर दिक्षीत बाजीरावाच्या लढाईच्या बेतास पहिल्यापासून विरुद्ध होते. त्यांचें व फोर्डचें दळणवळण असल्याकारणानें लोकांना त्यांच्याबद्दल संशय आला होता. लढाईचा हा मनसुबा चालला असतांना ते विरुद्ध गेलेले पाहून बापूंनीं त्यांच्यावर फितुरीचा आरोप केला. त्या मानी वीराला या आरोपाचा चटका लागला व आतां नुसतें बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं, आपली स्वामीभक्ति–देशभक्ति–आतां समरांगणावरच दाखविली पाहिजे असा विचार करून त्यांनीं लढाईत जोरानें ‘ मारीन किंवा मरेन ’ या ईर्षेनें भाग घेतला आणि पराक्रमाची शर्थ करून महाराष्ट्राची करुण हांक ईश्वराच्या कानावर घालण्याकरितां स्वर्गलोकीं प्रयाण केलें.

कर्नल फोर्ड व मोर दिक्षीत यांची मुलाखत ५ नोव्हेंबर रोजीं सकाळीं झाली. लगेच दुपारीं २ वाजतां पेशव्यांकडून विठोजी नाईक गायकवाड यास

एल्फिन्स्टनला भेटण्यास पाठविण्यांत आलें. तुम्ही आपल्या जवळचें इंग्रजी सैन्य दूर कोठें तरी पाठवून या व नेटिव्ह सैन्य आम्हीं सांगूं तेथें आणून ठेवा असा त्याचेबरोबर बाजीरावाचा निरोप होता. परंतु एल्फिन्स्टननें तें ऐकलें नाहीं तेव्हां तुमच्या या ताठरवृत्तीचे परिणाम तुम्हांस भोगावे लागतील असें त्यानें बजावलें व तो आपल्या छावणींत निघून गेला. तो परत आल्यावर इंग्रज पेंचांत असून सुद्धां आपलें म्हणणें मान्य करीत नाहींत तेव्हां शेवटचा लढाईचा मार्ग पत्करणें पेशव्यांस भाग पडलें व बापूंनीं व पेशव्यांनीं लढाईचा बेत मुक्रर केला. बाजीराव आपल्यावरोबर कांहीं थोडेसे स्वार घेऊन पर्वतीवर गेला व बापू सर्व लष्कर घेऊन खडकीस इंग्रजांवर हल्ला करण्यास पुण्यांतून बाहेर पडले. ज्या वेळीं लष्कर बाहेर निघालें तेव्हां जरिपटक्याची काठी मोडली. कांहीं भावनावश लोकांना हा एक अपशकून झाला कीं काय म्हणून शंका आली पण सर्व सैनिकांच्या भावना 'मारूं किंवा मरूं' अशा झाल्या होत्या. शकूनापशकूनाकडे लक्ष द्यावयास त्यांस फुरसत नव्हती. त्यांचें लक्ष एकाच गोष्टीकडे गुंतलें होतें. युद्ध! युद्धाशिवाय दुसरा विचार त्यांच्या डोक्यांत शिरूंच शकत नव्हता व त्यामुळें त्यांनीं तिकडे विशेषसें लक्ष दिलें नाहीं.

मराठ्यांची अशी जोरदार तयारी पाहून एल्फिन्स्टनला तेथें रहाणें धोक्याचें वाटूं लागलें. त्यामुळें त्यानें कर्नल बर यास जाऊन मिळण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें त्यानें बायकामुलांना आगाऊ पाठवूनही दिलें. विठोजी नाईक आपल्या छावणींतून परत गेल्यावर पेशवे आतां कोणच्या हालचाली करतात याचा तपास करण्याकरितां त्यानें प्रसिद्ध इतिहासकार ग्रँटडफ यास पाठविलें तेथील टेकडीच्या आडून गुप्तपणें जाऊन ग्रँटडफनें टेहळणी करण्यास सुरवात केली. दिसलेल्या देखाव्यानें त्याच्या छातींत धडकी भरली. गणेश खिंडीच्या बाजूनें पेशव्यांचें लष्कर जिकडे तिकडे पसरत चाललें होतें. हें पहातांच त्याचा धीर खचला व त्यानें एल्फिन्स्टनला सर्व परिस्थिती निवेदन करून पळून जाण्याचा सल्ला दिला. पेशव्यांचे स्वार हळुहळु रेसिडे-

न्सीपर्यंत पोंचले होते. एल्फिन्स्टननें एक क्षण जर वांया दवडला असता तर रेसिडेन्सी व तेथील माणसें यांचें चंदन उडालें असतें. पळण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता. पण पळण्याची तयारी करण्याइतकीसुद्धां त्याला फुरसत मिळाली नाहीं. सर्वांत महत्वाची वस्तू म्हणजे पत्रव्यवहार. ती जर शत्रूच्या हातांत सांपडली तर आपलें कृष्णकारस्थान चव्हाट्यावर यावयास वेळ लागणार नाहीं या भीतीनें व पळत असतां स्वतःजवळसुद्धां तो रहाण्याची खात्री नाहीं या धसक्यानें तो त्यांना जाळून टाकणें भाग पडलें, आणि तें काम पुरें झाल्याबरोबर त्यांनीं रेसिडेन्सीमधून बाहेर धूम ठोकली.

एलफिन्स्टन्नें जें सैन्य पाहिलें त्यांत बापू गोखले, मोरादिक्षित मराठे, चिंतामणराव पटवर्धन, तासगांवकर व मिरजकर पटवर्धन, अप्पाजी पाटणकर, घोरपडे, पुरंदरे राजेबहाद्दर, अक्कलकोटवाले, मिरज विंचुरकर वगैरे सर्व मराठी वीरांचीं पथकें होतीं. यांतील कांहीं स्वतःवरील आक्षेप टाळण्याकरितां आले होते. त्यांनीं इंग्रजांना मदत केली नाहीं त्याप्रमाणेंच त्यांचे विरुद्ध उठावणीही केली नाहीं. कांहीं पेशव्यांकडे आले पण आंतून इंग्रजांस फितूर होते. कांहीं लढण्याच्या तयारीनें आले पण युद्ध सुरू झाल्यावर पेशव्यांचें नुकसानच होईल अशी प्रामाणिक भावना असल्यामुळें त्यांना लढाईबद्दल फारसा उत्साह वाटत नव्हता. राहतां राहिले थोडे बेडर पण जयिष्णू वीर. पण त्यांची संख्या अतिशय अल्प होती. इंग्रजांच्या म्हणण्याप्रमाणें यावेळीं पेशव्यांच्या फौजेंत २०,००० घोडेस्वार ८००० पायदळ आणि १४ तोफा होत्या. शिवाय बाजीरावाच्या जवळ ५००० घोडेस्वार व ८००० पायदळ त्याच्या संरक्षणाकरितां राहिलें होतें. हा सर्व आंकडा ४१००० चा होतो. वरीलप्रमाणें झालेलें वर्गीकरण लक्षांत घेतलें म्हणजे खरे इमानानें लढणारे लोक किती होते याची सहज कल्पना येईल. शिवाय हे आंकडे प्रतिपक्षानें दिलेले आहेत व ते तसे असल्यामुळें त्यांत वरीचशी अतिशयोक्ती असली पाहिजे याचेंही विस्मरण होतां उपयोगी नाहीं. इंग्लिशांकडे पायदळाची संख्या २८०० असून त्यापैकीं फक्त ८००

युरोपियन शिपाई होते. त्याशिवाय कर्नल फोर्ड यांची पलटण व ८ तोफा होत्या.

पेशव्यांचें सारें लष्कर रेसिडेन्सीच्या सभोंवार एखाद्या समुद्रासारखें पसरलें होतें. एल्फिन्स्टन पळून गेल्यावरोबर मराठ्यांचें लष्कर त्यांच्या निवासस्थानांत शिरलें व त्यांनीं तेथील बंगला व सर्व सामानसुमान जाळून टाकलें. विद्याव्यासंगी एल्फिन्स्टनचा उत्कृष्ट ग्रंथसंग्रह अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडला व ही सर्व ज्ञानाची ज्योत आकाशांतील ज्योतींत विलीन झाली. एलफिन्स्टन मेण्यांत वसून निघाला, त्या वेळेस नदीच्या पलीकडे विंचुर-करांची फौज होती. त्यांनीं त्याच्यावर गोळ्या घालावयास पाहिजे होत्या पण हें काम त्याचे हातून झालें नाहीं. हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यामुळें एल्फिन्स्टन् वांचला व आपल्या वरोवरीच्या ५०० लोकांसह कर्नल वर याचे छावणींत आला. तो संकटांत आहे असें कळतांच कर्नल वर यानें त्याच्या मदतीस आपल्या लष्करांतील एक तुकडी पाठविली. त्या तुकडीच्या सहाय्यानें एल्फिन्स्टनची स्वारी ३॥–४ च्या सुमारास खडकीस येऊन पोंचली. एकंदर सर्व प्रकारचें स्वरूप लक्षांत घेऊन त्यांनीं तावडतोब लढाईस सुरवात करावयाचें ठरविलें. त्यांचें सैन्य थोडें असलें तरी त्याच्यांत फाटा-फूट अजिबात नव्हती. त्यामुळें त्यांना मराठ्यांशीं सामना देणें विशेषसें अवघड वाटलें नाहीं. पलटणींत फंदफितूर झाल्याची शंका एल्फिन्स्टनला आली होती पण ती अस्थानीं ठरली.

कर्नल वर यानें आपलें सैन्य पेशव्यांस तोंड देण्याकरितां उभें केलें. त्या सैन्याच्या मध्यभागीं मुंबईहून आलेली युरोपिअन् लोकांची पलटण, एल्फिन्स्टननें आपल्याबरोबर आणिलेले शिपाई, आणि सहाव्या रेजि-मेंटच्या दुसऱ्या बॅटलियनमधील एक तुकडी इतके लोक होते. त्या सैन्याच्या रांगेमध्यें डाव्या बाजूला सातव्या रेजिमेंटपैकीं पहिली तुकडी होती. आणि या एकंदर लाईनीच्या दोन्ही बाजूंला दोन तोफा होत्या. या लाईनीला मिळण्याकरितां दापोडीहून कर्नल फोर्ड याच्या हाताखालचें

सैन्य कूच करून येत होतें. यावेळीं संध्याकाळचे ४ वाजून गेले होते. या सुमारास पेशव्यांचे घोडेस्वार पुढें चाल करून निघाले. त्यांच्या लाईन-मधील डाव्या व उजव्या बाजूचे बगलांतील घोडेस्वार पुढें सरसावले. या दोन्हीं बगलांनीं आपल्यामध्यें इंग्रजांच्या फौजांना गांठून चिणावें असा बापूंचा बेत होता. इतक्यांत मोर दिक्षीतांना फोर्डचें लष्कर इंग्रजांना मिळ-ण्याकरितां येत असल्याचें आढळून आलें. तेव्हां या दोन्ही सैन्यांची गांठ पडूं नये म्हणून मोर दिक्षीत आणि रास्ते आपापल्या हाताखालचे घोडेस्वार घेऊन तिकडे वळले. लढाईला निघण्याचे वेळीं बापूंनी त्यांच्यावर फितुरीचा आरोप केला असल्यामुळें फोर्डलाच चोपला म्हणजे आपल्याबद्दल गैरसमज दूर होईल या कल्पनेनें मोर दिक्षीतांनीं त्यांच्यावर हल्ला केला. शत्रूच्या स्वारांना आपल्या माऱ्याच्या आटोक्यांत यावयास लावण्याकरितां कर्नल फोर्डनें आपलें सैन्य मागें हटविलें व आटोक्यांत आल्यावर आपल्या लोकांना त्यांच्यावर गोळीबार करण्याचा हुकूम दिला. जवळच्या तीन तोफांनीं दिक्षीतांच्या सैन्यावर सरबत्ती सुरू केली तेव्हां दिक्षीतांनीं तो प्रयत्न सोडून देऊन खडकीकडे आपलें सैन्य वळविलें पण तेथें खडकीच्या सैन्याच्या दोन तोफा तयार होत्या. त्यांनीं तिकडून गोलंदाजी सुरू केली. दिक्षीतांचें सैन्य दोघांच्या चापटींत सांपडलें व एक मोठा गोळा लागून मोर दिक्षीत मारले गेले. मराठी सैन्याच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें नेता नाहींसा होतांच उरलेलें सैन्य सैरावैरा पळूं लागलें. कर्नल फोर्डच्या मार्गातील कांटा—पूर्वा-श्रमींचा मित्र कां असेना—नाहींसा झाला व त्याला कल्पनेपेक्षांही लवकर आपल्या सैन्याला मिळतां आलें. यावेळीं इंग्लिशांच्या फौजेवर मराठ्यांनीं निकराचा हल्ला केला. पेशव्यांकडील ३००० अरब व गोसावी यांनीं आपलें सैन्य मागें टाकून सातव्या रेजिमेंटची पहिली बटॅलिअन यांच्यावर जोराचा हल्ला केला. मराठ्यांकडील फ्रेंच सेनापती डी पिंटो यानें या हल्ल्यांत पुष्कळसा पुढाकार घेतला होता, या हल्ल्यांत तो मरण पावला. अरब गोसावी आप-ल्यावर चालू येत आहेत असें पहातांच त्यांना चेपण्याकरितां इंग्रजांचें सैन्य

पुढें सरसावलें. इंग्रजी सैन्य दुभंगल्याची संधी साधून बापूंनीं आपल्या निवडक ६००० स्वारांसह त्यामधून घुसण्याचा प्रयत्न केला. बापूंचा हा कौशल्याचा प्रयत्न कर्नल बर यांच्या लक्षांत आला व ते सातव्या रेजिमेंट-जवळ आले त्यांनीं त्या सैन्यास पाठीमागच्या तुकड्यांस न सोडण्याचा इषारा दिला व उलट त्यांचेकडून बापूंवर बंदुकांच्या फैरीच्या फैरी झाड-विल्या. पण असल्या आघातांना बापूंनीं मुळींच दाद दिली नाहीं. ते तसेच जोर जोरानें पुढें घुसले. शत्रूची फळी फोडली व त्यांचे प्रयत्न निष्फळ केले. परंतु इतक्यांत बापूंच्या घोड्याला जखम लागल्यामुळें त्यांना दुसरा घोडा घेण्यासाठीं माघारें फिरावें लागलें. बापू माघारे फिरले तरी यशस्वी होऊन माघारे फिरले. त्यामुळें त्यांच्या सरदारांना जोर आला व त्यांनीं आपले घोडे जोरजोरानें पुढें आणले. त्या मुक्या प्राण्यांनींही आपल्या धन्यांना साथ दिली. बापूंचे सरदार पुढें सरसावले व त्यांनीं आपली घोडदौड यशस्वी रितीनें चालविली. पण येथें निसर्ग त्यांच्या आड आला. ते जों पुढें जातात तों एक दलदलीचा व चिखलानें भरलेला खोल असा ओढा लागला व ते सर्व त्यांत अडकले. ही संधी साधून इंग्लिशांनीं त्यांच्यावर गोळीबार सुरू केला. पण याही संकटांना या नरवीरांनीं दाद दिली नाहीं. तशा अडचणीं-तून त्यांच्यापैकीं तीनशें जण उठले व त्यांनीं मोठ्या आवेशानें शत्रूवर हल्ला चढविला. तो इतक्या जोराचा होता कीं तो परतवण्याकरितां दुसऱ्या पलटणांची मदत इंग्रजांना घ्यावी लागली.

पेशव्यांच्या सैन्याची उजवी व डावी बाजू यांनीं आपलें काम चोख रितीनें बजावलें. कॅप्टन फोर्डची मदत इंग्रजांना ऐनवेळीं उपयोगी पडली. ती न पडती तर त्यांचा मुळींच टिकाव लागला नसता. मराठ्यांच्या सैन्यावर शत्रूनें जोराचा मारा चालविल्यामुळें तें तेथून हटलें पण उजवीकडील सैन्यानें बागांचा आश्रय घेऊन इंग्रजांच्या डाव्या बगलेवर खूप जोराचा मारा चाल-विला होता. त्यांनीं तेथील सैन्याला जेरीस आणलें. कर्नल बर त्यांच्या मदतीला गेला व म्हणून त्यांना मराठ्यांचा हल्ला परतवितां आला.

अशा रितीनें लढाईची धुमश्चक्री चालू असतां संध्याकाळ पडली व त्यामुळें दोन्ही सैन्यांना लढाई थांबविणें भाग पडलें. जिकडे तिकडे काळोख पडूं लागला. तेव्हां कर्नल बरनें आपलें सैन्य आंवरतें घेतलें. दोन्ही बाजूंच्या सेनापतींनी लढाईत चांगलाच भाग घेतला. इंग्लिशांचा सेनापती कर्नल बर हा अर्धांगवायूनें पीडित होता तरी त्यानें आपलें काम उत्कृष्ट तऱ्हेनें बजावलें. लढाईत त्याचे दोन नोकर शेजारीं गोळी लागून मरण पावले. त्याच्या स्वतःच्या घोडयाला एक गोळी लागली व दुसरी टोपीला चाटून गेली तरी सुद्धां त्यानें आपलें पाऊल मागें घेतलें नाहीं. जेथें जेथें सैन्य कमजोर झालेलें दिसत असे तेथें तेथें त्यानें स्वतः जाऊन त्यास मदत केली. मराठ्यांच्या बतीनें बापूंनीही आपलें काम योग्य रितीनें पार पाडलें. घोडयाला गोळी लागली—मरण समीप ओढवलें—तरी लढाईतून पाय मागें घेतला नाहीं. शत्रू ढिलाई दाखवितो कधीं व आपण त्याच्या चुकीचा फायदा घेतों कधीं याची ते वाट पहात होते. जी जी संधी सांपडली ती ती त्यांनीं साधली. आणि असे उत्कृष्ट सेनापती दोन्ही बाजूला होते म्हणूनच या लढाईत निश्चीत रितीनें असें कांहींच घडलें नाहीं.

बापूंना या लढाईबद्दल फार खात्री वाटत होती. हा एक विजय म्हणजे पुढील कार्याला शुभशकुनच असें ते मानीत होते. इंग्रजांचा पराभव आपण करूं शकतों, त्यांना भिण्यासारखें त्यांच्यांत कांहीं विशेष नाहीं ही भावना आपल्या सैन्यामध्यें पसरविणें हें त्यांचें ध्येय होतें आणि म्हणून त्यांनीं बाजीरावाच्या आग्रहाला न जुमानतां युद्ध चालू ठेवलें होतें. याबाबतींत पेशव्यांच्या बखरींतील पुढील मजकूर वाचण्याजोगा आहे. "त्यासमयीं इंग्रज यांचें बोलणें श्रीमंतांकडे आलें. एल्फिन्स्टनसाहेब फार घाबरले त्या समयीं श्रीमंत यांचीं बोलावणीं बापू गोखले यांस गेली. परंतु बापू गोखले यांचा लढाईचा आग्रह फार मोठा. इंग्रज कोंडला व इंग्रज यांचे लोकांस खावयास कांहीं नाहीं अशी निकड बसली असती म्हणजे इंग्रज कौलांत आले असते. परंतु बापू गोखले यांचा लढाईचा आग्रह फार मोठा. खावं-

दाचे मनांत इंग्रज मोडावयाचा नाहीं. तेव्हां बोलावण्यावर बोलावणीं बापू गोखले यांस श्रीमंतांची गेलीं. शेवटीं निदान श्रीमंतांनीं सांगून पाठविलें तेव्हां बापू गोखले शह सोडून माघारे आले. ”

हा उतारा वाचतांना बाजीरावाची मनस्थिती व तत्कालीन परिस्थिती विचारांत घेतली पाहिजे. बाजीरावाला इंग्रजांची तिडीक आली म्हणून तो लढत नव्हता. त्याला एल्फिन्स्टन जरी वाईट दिसला तरी मालकमवर त्याची फार भक्ति होती हेंही विसरून चालणार नाहीं. एल्फिन्स्टनवर चढाई करण्यांत त्याचा नाश करावयाचा बाजीरावाचा हेतू नव्हता तर आपला धाक दाखवून त्यानें आपल्या विरोधी चळवळी थांबवाव्या अशी त्याची इच्छा होती व म्हणून एल्फिन्स्टनचा निरोप येतांच तो नरमला व आपलें कार्य साधलें असें त्यास वाटलें. पण बापूंची तशी स्थिती नव्हती. एल्फिन्स्टनकडे ते एक व्यक्ति म्हणून पहात नव्हते तर इंग्रजी साम्राज्याचा एक घटक तो आहे अशी त्यांची कल्पना होती. नरमगरम हा स्वभावभेद असला तरी तो ठरलेल्या धोरणाला बाध आणूं शकणार नाहीं अशी त्यांची खात्री होती. व त्यामुळें कार्य साधावयाचेंच असेल तर एकट्या एल्-फिन्स्टनला विरोध करून साधणार नाहीं, करावयाचाच असेल तर सर्व इंग्रजांना विरोध; नसेल तर कोणालाच नाहीं. असें त्यांस वाटत होतें. इंग्रजांचा पाय येथें शिरकूं नये म्हणून त्यांनीं शक्य ती खटपट केली होती. इंग्रजांचें व पेशव्यांचें यशवंतराव होळकरांशीं वैर असतांना सुद्धां त्यांनीं त्याच्याशीं पत्रव्यवहार चालविला होता.

इंग्रजांकडे पहाण्याच्या बापूंच्या व बाजीरावाच्या चष्म्यांत असा फरक पडला असल्यामुळेंच बापूंनीं बाजीरावाचें म्हणणें मान्य केलें नाहीं. सायं-काळीं लढाई तहकुब झाल्यावर बापू जेव्हां पेशव्यांच्या गोटांत परत आले तेव्हां लढाईपूर्वीच्या व नंतरच्या परिस्थितींत फरक पडलेला त्यांना आढळून आला. पेशव्याचें मत लढाईविरुद्ध बनलें; त्यामुळें जे केवळ दडपणामुळें लढाईस आले होते त्यांनीं हातपाय गाळले. फितुरांना तर रान मोकळें

सांपडलें. स्वाभिमानाची चाड असणारे मोर दिक्षीत लढाईत मारले गेले. त्यामुळें कांहीं घाबरले. यामुळें बापूंच्या म्हणण्याप्रमाणें त्या रात्रीं शत्रू-सैन्यावर त्यांना छापा घालतां आला नाहीं. बापूंबद्दल इंग्रजांस फार भीती वाटत होती. रात्रीं आपल्या सैन्यावर पेशव्यांचा छापा येईल कीं काय याची त्यांना सारखी भीति वाटत होती. एल्फिन्स्टनला सारी रात्र जागून काढावी लागली. या रात्रीं छापा पडला तर खात्रीनें महाराष्ट्राचा इतिहास वेगळा झाला असता. पण आतां त्याबद्दल रडून काय उपयोग ?

लढाईचा निकाल या दृष्टीनें बोलावयाचें असेल तर दोन्ही पक्षांत बरोबरी झाली असें म्हणणें भाग पडेल. दोघांनाही एकमेकांच्या बलाबलाचा अंदाज मिळाला. पेशव्यांनीं दुसऱ्या दिवशीं हल्ला केला नाहीं म्हणून त्यांचा पराभव झाला असें इंग्रजांचें म्हणणें आहे. पण हें म्हणणें किती हास्यास्पद आहे हें याच्या उलट तुमच्या अंगांत ताकद होती तर तुम्हीं स्वस्थ कां बसलां, असा युक्तिवाद करून दाखवतां येईल. आणखीं सैन्य बोलवायाची गरज इंग्रजांना भासली, यामुळें शत्रूबरोबर टक्कर देण्याची त्यांची तयारी नव्हती, असें स्पष्टपणें म्हणावें लागतें. बापूंची तयारी होती. पण बाजीरावामुळें त्यांना मनगटें चावीत स्वस्थ बसावें लागलें. त्यांनीं मिळविलेल्या विजयाला बाजीरावामुळें बरोबरीचें स्वरूप देणें भाग पडतें.

या लढाईमध्यें इंग्लिशांकडील मेलेले व जखमी मिळून एकंदर ८६ लोक होते. त्यांपैकीं ५० नेटिव्ह शिपाई व एक युरोपियन ऑफिसर इतके मरण पावले. पेशव्यांकडील मोर दिक्षित व डी पींटो हे दोन सरदार पडले व एकंदर मेलेले व जखमी यांची संख्या ५०० झाली होती. पण हेही आंकडे युरोपिअन ग्रंथकारांनीं दिले आहेत हें लक्षांत ठेवलेंच पाहिजे.

---

# प्रकरण ९ वें.

## पळ नव्हे गनिमी कावा.

खडकीची लढाई त्यादिवशीं संपली; पण ती Decisive स्वरूपाची झाली नसल्यामुळें दोन्हीही पक्षांत युद्धाची खुमखुमी शिल्लक होती. एल-फिल्स्टननें आपल्याला ब्रिगेडीअर जनरल स्मिथ यांची तुकडी येऊन मिळे-पर्यंत कालहरण करावयाचें आहे हें ओळखलें व तो त्याप्रमाणें वागूं लागला. बाजीरावाला वरचेवर सलोख्याचें आमीष दाखविणारे निरोप पाठविण्याचें कारण हेंच. बाजीरावाला या निरोपांतील रहस्य उमगलें नाहीं. त्यामुळें त्याला एल्फिन्स्टन नरम आला असें वाटलें व त्यानें आपल्या सैन्यास फेरहल्ला न करण्याबद्दल कळविलें. बापू गोखले या निरोपांनीं फसले नाहींत पण पेशव्यापुढें यांचा इलाज चालेना. अहमदनगरहून ब्रिगेडिअर जनरल स्मिथ हा मुक्कामावर मुक्काम करीत पुण्याकडे येत होता. त्याच्या आगमनाची बातमी बापू गोखले यांनीं राखून त्याला आपल्या स्वारांकडून वाटेंत एकसारखें अडविण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट त्यांना बाजीरावाला न कळवतां करावयाची होती. व तशी करावयाची असेल तर बोभाटा न करतील असे निवडक स्वार त्यांना पाठवावयाचे होते. यामुळें त्यांना त्याचा जोरदार रितीनें प्रतिकार करतां आला नाहीं. हे स्वार इंग्लिशांच्या सैन्याला जागोजाग अडवीत होते व त्यांना एकसारखा त्रास देत होते. शिरूर व पुणें यांच्या दरम्यान कोंडापूर मुक्कामीं या दोन्हीं सैन्यांची बराच वेळ गांठ पडून इंग्लिशांचा पराभव झाला व त्यांचे सामानानीं भरलेले दोन हजार बैल त्यांनीं पकडून आणिले. परंतु हे हल्ले भुरटेगिरीचे झाल्यामुळें त्यांचा विशेषसा परिणाम ब्रिगेडीअर जनरल स्मिथवर न होतां तो १३ नोव्हेंबर रोजीं पुण्यास येऊन पोंचला. या दोन्ही

सैन्यांची गांठ पडूं देणें बापूंना पसंत व इष्ट वाटत नव्हतें. पण पेशव्याच्या अधिकारापुढें त्यांचें कांहीं चालेना. त्यामुळें ता. १३ रोजीं कर्नल बर व स्मिथ यांची सैन्यें एकत्र झालीं.

हीं सैन्यें एकत्र झाल्यानंतर मुळामुठा नदी उतरून मग पेशव्यांच्या सैन्यावर हल्ला करावा असा त्यांचा विचार ठरला व त्याप्रमाणें त्यांनीं नदीला पायउतारही पाहून ठेविले होते. या पायउतारानें शत्रू आपल्यावर चाल करून येऊं नये म्हणूनही जागा त्यांनीं आपल्या तोफांच्या माऱ्यांत ठेविली होती. हा हल्ला १४ नोव्हेंबर रोजींच होणार होता. पण त्या पायउतारावरून तोफा जाऊं न शकल्यामुळें तो बेत पुढें ढकलण्यांत आला व ती वाट स्वतःस सोईस्कर अशी तयार करण्याचें काम प्रथम हातीं घेण्यांत आलें. या त्यांच्या हाल-चालींवर बापूंची नजर होतीच. ही वाट दुरुस्त होऊं दिल्यास आपणांवर हल्ला लवकरच सुरू होईल अशी त्यांस खात्री वाटली व म्हणून त्यांनीं कांहीं स्वार त्यांना हरकत करण्याकरितां पाठवून दिले. या स्वारांनीं पायउतार दुरुस्त करणाऱ्या सैनिकांना अडथळा करण्याचें काम सुरू केलें. ता. १६ नोव्हेंबररोजीं रात्रीं ११ वाजेपर्यंत या चकमकी चालल्या. पेशव्यांच्या सैन्यानें खूप जोर केला व इंग्रजांना आपल्या गोटाकडे पिटाळून लावलें. परंतु या त्यांच्या पराक्रमाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. दुसऱ्या दिवशीं इंग्लिशांचें सैन्य पायउतार उतरून अलीकडच्या तीरावर येऊन पोंचलें. या सैन्याचा अधिपति कर्नल मिल्ने हा होता. या सैन्यांत मुंबईची युरोपियन पलटण, रेसिडन्सीच्या तैनातींतील लोक, पहिल्या आणि सातव्या नेटिव्ह पायदळ पलटणींतील एकेक तुकडी, याप्रमाणें निरनिराळ्या तुकड्या होत्या. त्यावेळीं दहा तोफा त्यांचे सैन्यांत होत्या. त्यानंतर थोड्या वेळानें कर्नल स्मिथ याच्या छावणींतील सैन्य दुसऱ्या पायउतारानें दुसऱ्या बाजूनें पुण्या-वर हल्ला करण्याकरितां बाहेर पडलें. या सैन्यामध्यें ५५ वी पायदळाची पलटण व दुसरी, तिसरी आणि नववी रेजिमेंट यांच्यापैकीं पलटणीची एकेक तुकडी आणि घोड्यावरील तोफखाना अशीं तयारी होती.

दोन्ही सैन्यें एकत्र होऊन गारपिरच्या रोंखानें आलीं; पण गारपिरांत काय होतें ? बाजीराव, बापू गोखले व सर्व सैन्य तेथून केव्हांच कूच करून पसार झालें होतें. ' रविवारीं सकाळीं सूर्योदयापासून तीन प्रहरपर्यंत पायदळाची लढाई नदीवर जहाली नंतर इंग्रज बहाद्दर यांनी तोफा पलटण तयार करून फौजेवर तोफा रोखून गेले. श्रीमंतांकडील तोफाही सुरू झाल्या. अस्तमान पर्यंत उभय शेजेकडील बेसुमार गोळे चालले. नंतर रात्र जहाली. श्रीमंतांकडील पायदळ नदी धरून राहिला त्याजवर पलटण चालून आल्यानंतर पायदळ जागा न सोडतां बंदुकीच्या फैरा व बाणांचा मारा मनस्वी जहाला. तों चंद्र अस्तमान जहाला. तरी लढाई मनस्वी जहाली. श्रीमंतांकडील फौजेची व पलटणाची नासाडी फारच झाली. गोखले मात्र आपल्या फौजेनिशीं जाग्यावर कायम राहिले. हजार पायदळ जखमी झालें. तोफखाना वगैरें सिंहगडास रवाना करून श्रीमंतांस बापू गोखले यांनीं सासवडास जाण्यास चवदा वेळ विनंति करोन सांगून पाठविलें परंतु श्रीमंतांनीं लढाई न सोडतां लढाईतच राहिले. होणार होईल परंतु धनी गेल्यामुळें लष्कराचा धीर सुटला असें भले लोक म्हणतील या आदेशानें रहातांच श्रीमंतांस सत्य विनंति बापू गोखले जनाव देशपांडे सानपूर, अंताजीपंत मामा गद्रे यांजबरोबर सांगून पाठविलें. इकडे समग्र रात्र लढाई होत होती. सूर्य उगवला तों इंग्रजबहाद्दर यावयाच्यापूर्वीं सरदार विंचुरकर व पटवर्धन व गोरे यांनीं जागा सोडून गेलेंच होते. हें पाहून राहिल्यास परिणाम नाहीं म्हणून बापू गोखले पुणें सोडून सासवडास जाऊन राहिले ' बखरकार या लढाईचें वर्णन पुढीलप्रमाणें करतात.

" खडकीच्या लढाईनंतर पेशव्यांच्या सैन्यानें कांहीं एक न केल्यामुळें इंग्लिशांना जो अवकाश सांपडला त्या अवकाशांत इंग्रज यानें आपल्या पलटणांची तयारी केली. घोडनदीहून जनरल स्मिथ हा मोठा लढाई सरदार दोनचार पलटणें दारुगोळ्यासुद्धां तयारी करून पुस्यावर आला. इंग्रजांची लढाईची तयारी झाली. इकडे श्रीमंत दिवाळी होऊन बाहेर पडले. ते डेऱ्यास

येऊन दाखल झाले. तेथें अवघी फौज जमा झाली. तोफखानाही तयार होऊन तेथें आला. अशी तयारी होऊन कार्तिक शु. ८ मीस तिसरे प्रहरीं लढाईस प्रारंभ झाला. तेव्हां इंग्रज येऊन येरवड्यावर तयार होऊन उभा राहिला. इकडे बापू गोखले फौजेची तयारी करून लढाईच्या उद्देशानें निघाले. ते येरवड्यावर गेले. तेथें गेल्यावर टेकडी येरवड्यानजीक आहे ती श्रीमंतांचे फौजेनें आटपली. त्या टेकडीवर आरब गोसावी चढले. असें होत असतां दिवे लागणीच्या संधींत लढाई सुरू झाली. कांहीं काळ लढाई होत आहे. महाकाळ तोफ पुरंदरास होती ती पुण्यास अगोदरच आणलेली होती. तीच तोफ तोफखान्यांतून ओढून लढाईस नेली.

आरब गोसावी लढत होते. दारुगोळ्याचा व खाण्यापिण्याचा पुरवठा कांहीं मागाहून झाला नाहीं. इंग्रजांचे फौजेची मारागिरी मोठी होऊं लागली त्यासमयीं रात्र दहाबारा घटका जहाली. त्यावेळेस श्रीमंत यांनीं स्वारी तयार करून सगळा आपला आजबाव आटोपून दिव्याचे घांटाचा रस्ता धरिला. घांटांत स्वारी गेली ते वेळेस हजारों मशाली लाविल्या. असे पळाले. तें बापू गोखले यांनीं पाहून तेही याच रस्त्यानें चालले. सारी फौज उधळली. तो उजेड इंग्रज यानें पाहिला. तेव्हां त्यानें लढाईचा लगट भारी केला. अरब गोसावी लढत होते, त्यांजवळ दारुगोळा नाहींसा झाला. त्यांत वहुतेक माणसें ठार झालीं. आरब गोसाव्यांनीं पळ काढला. टेकडी इंग्रजांनीं सही केली आणि तेथून पुढें चाल केली. ”

या कामीं अरबांचा उत्साह किती दांडगा होता त्याचें वर्णन प्रभाकराच्या पुढील उताऱ्यांत मिळतें.

**‘ फसले शके सत्राशें एकुणचाळिसांत रणभूमीस ’**
**ईश्वर संवत्सरांत कार्तिक शुक्ल अष्टमीस ।**
**प्रहर दिवसां रविवारीं सर्व अरब आले गुरमाईस ।**
**खूप मोर्चा बांधून विनविती श्रीमंत स्वामीस.**

(चाल) दारूगोळी पुरवावी आम्ही आज हटकुन त्यांशीं लढूं.
गर्दीस मिळवुन देउन पलटणें क्षणांत डोंगर चढूं.
शिपाईगिरीची शर्थ करूनी समशेरी सोन्यानें मढूं.
(चाल) लाविलें बापुसाहेबांनीं तोंड जाऊनी
दीड प्रहर रात्र होतांच श्रीमंत दम खाउनी
गेली स्वारी मशाला हिलाल मग लावुनी
(चाल) जलदी करून साहेबांनीं लाविलें निशाण पुणियाला.
खेंचून वाड्याबाहेर काढिलें कदीम शिपायाला.

पाच्छापुरकरांच्या बखरींतील उतारा पहिल्यानें दिला आहेच त्यावरून बाजीराव सैन्याला लढाईवर टाकून एकटा पळून जाण्यास तयार नव्हता हें उघड दिसतें. त्याच्या पलायनाचा दोष ( मानला तर ) सर्वस्वी बापूंवर येऊन पडतो. हा पळ नव्हता. तो एक लष्करी डावपेंच होता. तो कां करावा लागला, बापूंना बाजीरावाच्या नांवास बट्टा लागेल असें वर्तन करावयास सांगण्याची कां पाळी आली तें उपोद्धातांत सांगितलें आहेच. येरवड्याची लढाई ही मनापासून लढलेली लढाईच नव्हती. तिचा एकच हेतू होता व तो म्हणजे सर्व बाजूंनीं इंग्रजी सैन्यानें घेरींत आणलेल्या पेशव्याला त्या वेढ्यांतून पार बाहेर काढणें व याकरितांच लढाईची हुल दाखविण्यांत आली. समोरासमोर तोंड देऊन लढण्याचें त्राण मराठी सैन्यांत उरलें नव्हतें. बाहेरून नवीन असें दुसरें कोणतें सैन्य कुमकेस येईल अशी आशासुद्धां बाळगतां येत नव्हती. इंग्रजांचें सैन्य ते म्हणतील तेवढें वाढवितां आलें असतें. अशा परिस्थितींत पुणें सोडण्याशिवाय दुसरा इलाजच नव्हता. लढाईचा थोड्या सैन्यानें पुष्कळांबरोबर लढण्याचा एकच मार्ग त्यांचेसमोर होता व तो म्हणजे गनिमी कावा. पुणें ही महाराष्ट्राची राजधानी असल्यामुळें ती शत्रूच्या हातीं देणें योग्य नव्हतें असें कै. परांजपे यांचें मत होतें. पण ती राखण्याकरितां धडपडावयाचें म्हणजे सर्वस्वच गमावून बसावयाचें त्यापेक्षां आज ती शत्रूच्या हातीं गेली

तरी चालेल; शक्यता झाली तर ती परत मिळवूं; त्याकरितां जिवापाड प्रयत्न करूं पण आज ती सोडून देऊं असा विचार बापूंनीं केला असल्यास नवल नाहीं. इंग्रजांचें आपल्या राजधानीभोंवतीं वेढा दिलेलें सैन्य आपल्या पाठलागाच्या निमित्तानें बाहेर काढूं. त्याला झुकांड्या देत देत बाहेर दूरवर पोंचवूं. शक्य असेल तिथें त्याची नासाडी करूं आणि मग पुन्हां आपल्या आवडत्या पुण्यनगरींत प्रवेश करूं अशी त्यांची योजना होती. राजधानी ही राजाचेबरोबर असली पाहिजे व हा राजा नामधारी असतां कामा नये. बाजीराव जेथें जेथें जाईल त्या त्या शहराला गांवाला वा खेड्याला राजधानीचें स्वरूप येईल अशी त्यांची खात्री होती. राणा प्रताप नाहीं का राजधानी मोंगलांच्या हातीं गेली तरी लढत राहिला ? बापूंचा हेतू वरीलप्रमाणें होता. हेतूची सिद्धता होणें म्हणजेच यश. तें यश बापूंनीं लढाईची हूल दाखवून मिळविलें. बाजीरावाला बिनधोक मार्गानें पुण्यांतून बाहेर नेण्याचा त्यांचा हेतू साधला.

पुण्यांतून यशस्वी रितीनें बाहेर पडल्यावर बापूंनीं आपल्या सैन्याच्या निरनिराळ्या तुकड्या केल्या व त्या निरनिराळ्या ठिकाणीं पाठविल्या. त्यांपैकीं एक तुकडी सिंहगडाकडे गेली तिनें आपल्याबरोबर बऱ्याच तोफाही नेल्या होत्या. ले. टर्नर यांचेकडे या टोळीचा पाठलाग करण्याचें काम होतें. त्यांनीं १९ नोव्हेंबर रोजीं सिंहगडाच्या पायथ्याशीं त्या फौजेचा पराभव करून त्यांचेकडील तोफा हस्तगत केल्या. पण त्याचा उपयोग कांहीं झाला नाहीं. या तोफा डोंगरावरून वाहून नेणें हें मोठ्या खर्चाचें व अडचणीचें काम होतें. त्यामुळें त्या बरोबर नेतां येईनात. शेवटीं त्या निदान मराठ्यांच्या तरी उपयोगी पडूं नयेत म्हणून त्या त्यांना फोडून टाकाव्या लागल्या. त्यांची अशी वासलात लाऊन टर्नरची स्वारी परत पुण्यास आली. तेथें पुणें शहराची व्यवस्था लावण्यांत स्मिथ गुंतला होता. त्यामुळें त्याला बाजीरावाचा पाठलाग करणें चार दिवस लांबणीवर ढकलावें लागलें होतें. या चार दिवसाच्या अवधींत बापूंनीं पुरंदर, सातारा, माहुली असा मार्ग आक्रमिला होता. तेथें अप्पासाहेब

निपाणकर १००० अरब व २००० घोडेस्वार या सैन्यासह बाजीरावाला येऊन मिळाले. वाटेंत निरा नदीच्या पुलावर इंग्रजांची व यांची दृष्टादृष्ट झाली. निरेच्या पुलावर येतांच रामचंद्रपंत सुभेदार यांच्या बरोबर बापू. गोखल्यांनीं आपली निवडक अर्धी सेना देऊन इंग्रजांवर पाठविलें. त्यावेळीं फार मोठी चकमक उडाली. सुभेदार यांच्या हातास छरे लागले. पुढें सालप्याच्या घांटांत सुभेदाराची व इंग्रजांची लहानशी लढाई झाली. अखेर देऊर येथें इंग्रजाचे फौजेनें तळ दिला व त्यांचेपासून तीन कोसांवर बापूंनीं मुक्काम केला.

बाजीरावाचा व त्याचे सरदारांचा असा विचार ठरला कीं पायदळ, तोफखाना वगैरे सर्व स्वारीसुद्धां इंग्रजांचें व त्यांचें सैन्य यामध्यें कमींत कमी अंतर ४०–५० मैलांचें राहील अशा अशा बेतानें मुक्काम करावें. अशा रितीनें बुणगें पुढें पाठविल्यावर बापू गोखले व निपाणकर यांनीं आपल्या फौजा इंग्रजांचे जवळ ठेऊन त्यांना सतावण्याच्या युक्त्या योजाव्या. रामचंद्रपंत सुभेदार यांनीं गोखल्यांचे निम्मे स्वार बरोबर घ्यावे व त्यांनीं व विंचुरकरांनीं मिळून इंग्रजांचे पिछाडीस राहून त्यांच्या मागील भागास व दोन्ही बाजूंस लढाई देत असावें. या बेताप्रमाणें पेशव्यांचें लष्कर चालू लागलें. हें सैन्य रोज कांहीं ना कांहीं चकमकी ( इंग्रजांशीं ) घडवून त्यांना त्रास देत असे. व मुक्कामाची वेळ आली म्हणजे त्यांच्यापासून ६–७ मैल अंतरावर मुक्काम ठोकीत असे. रात्रीच्या वेळीं बेसावध गांठून आपल्यावर इंग्रज छापा घालतील म्हणून तळावर गेल्यावर सेना सज्ज ठेऊन जेवणखाण आटोपावें व एका रात्रींत जवळपास तीन चार मुक्काम करावे असा त्यांनीं क्रम चालविला होता. सूर्योदय होतांच आपला रस्ता पुढें पकडावा. इंग्रज पाठलाग करीत येतांच त्यांच्यावर गोळे झाडावे, त्यांच्या लाईनीवर बाण टाकावे, त्यांच्या सेनेभोंवतीं घिरट्या घालाव्या, त्यांचे पिछाडीवर हल्ला करावा व ते मागें उलटले म्हणजे पुढील बाजूचे लोक कापून काढावते असा क्रम चालला. यामुळें इंग्रज इतके त्रासले कीं त्यांना ५–६ कोस चालण्यास ७–८ तास सहज

लागूं लागले व यामुळें त्यांनीं दोन तीन दिवस वाट चालावी व एक दिवस विश्रांति घ्यावी असें ठरविलें.

याशिवाय इंग्रजांना फसविण्याकरितां त्यांनीं दुसराही उपाय चालविला होता. एखाद्या गांवांत त्यांचा मुक्काम पडला कीं ते तेथील पाटील कुळकर्णी तलाठी वगैरे अधिकाऱ्यांना बोलावून आणीत व ज्या मार्गाला जावयाचें नसेल त्याची इतक्या बारकाईनें चौकशी करीत कीं त्या पाटलांना असें वाटे कीं बाजीराव हमखास त्याच मार्गानें गेला असला पाहिजे व म्हणून मागाहून आलेल्या इंग्रजांना ते मोठ्या प्रौढीनें बाजीराव असा असा गेला म्हणून सांगत. त्यांच्या सांगण्यावर विश्वास ठेऊन इंग्रज तिकडे जात तों पेशव्यांचें लष्कर कुठच्याकुठें गेलेलें असे. दुसऱ्या एखाद्या ठिकाणीं सैन्याच्या वेगवेगळ्या टोळ्या करून त्यांना ते निरनिराळ्या मार्गानें पाठवीत व शत्रूला गोंधळांत पाडीत. हे स्वार कोणत्याही रस्त्यानें गेले तरी त्यांनीं बाजीरावाला कोठें मिळावयाचें हें ठरलेलें असे. या प्रकारच्या गनिमी काव्यानें त्यांनीं शत्रूवर विजय मिळवला व तो इंग्रज इतिहासकारांनी सुद्धां पुढील शब्दांत कबूल केला.

Bajeerao must have been allowed to have shown considerable art in the style of warfare he adopted... He cannot be denied the praise of having exhibited much ingenuity and stratagem in his several dispositions of which their protracted result was a sufficient evidence.

( बाजीरावानें स्वीकारलेल्या लढाईच्या पद्धतींत त्यानें पुष्कळच कौशल्य दाखविलें हें कबूल केलेंच पाहिजे......त्यानें या बाबतींत जें युद्धकौशल्य व बुद्धीची पराकाष्ठा दाखविली आणि ज्यांचा पुरावा म्हणून त्यानें मिळविलेले बरेचसे विजय दाखवितां येतील त्याबद्दल त्याची केलेली स्तुति कोणीही नाकारूं शकणार नाहीं )

## जवानमर्द बापू

बाजीराव माहुलीहून निघून पुसेसावळी येथें २७ नोव्हेंबरला आला. तेथें दोन दिवस राहून ता. २९ रोजीं पटवर्धन व निपाणकर यांचेजवळील ५००० सैन्य बरोबर घेऊन तो मिरजेकडे जाण्याकरितां निघाला. वाटेंत इंग्रजांना गांठून चांगला चोप द्यावा या हेतूनें बापू गोखले एका डोंगरांत दबा धरून बसले होते. पण इंग्रज त्या डोंगराला वळसा देऊन गेल्यामुळें या खटपटीचा उपयोग झाला नाहीं. इंग्रज २ डिसेंबरला पुसे-सावळी येथें जाऊन पोंचले. या अनपेक्षित अडचणीमुळें बाजीरावाला आपली दिशा बदलावी लागली व आजपर्यंत धरलेला दक्षिण दिशेचा मार्ग सोडून त्यांनीं आपला रोंख उत्तरेकडे वळविला आणि पंढरपूरची वाट धरली. बाजीराव पंढरपूरला पोंचतो न पोंचतो तोंच इंग्रज त्याच्या पाठीवर आले पण त्यांना त्रास देण्यास बापू गोखले समर्थ होतेच. त्यांच्याशीं टक्कर देत देत इंग्रज ८ डिसेंबरला पंढरपुरास आले पण तितक्यांत बाजीराव अहमदनगर जिल्ह्यांतील पीरगांव मुक्कामीं तळ देऊन बसला होता. त्याला तेथें गांठण्या-करितां इंग्रज जातात तों बाजीराव नाशकाजवळ हजर. अशा रितीनें बाजी-रावाचा पाठलाग करणें स्मिथला अशक्य झालें. त्याच्याजवळच्या तोफा शत्रूला त्रास देण्याऐवजीं त्यालाच त्रास देऊं लागल्या. त्यांच्यामुळें बाजीरावाचा पाठलाग करणें इंग्रजांना जड जाऊं लागलें म्हणून ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यानें त्यांना शिरूर येथें नेऊन टाकलें व परत नाशकाचा संगमनेर रस्ता धरला पण तेथें जाऊन पहातात तों काय ? बाजीराव नाशका-कडे न जातां त्रिंबकजी डेंगळ्याच्या मदतीनें संगमनेरावरून ओझरचा घांट उतरून जुन्नरच्या वाटेनें पुण्याकडे गेल्याची बातमी त्याची वाट पहातच होती. बाजीरावाला पुण्यास येऊं न देण्याची केलेली खटपट अशा रितीनें निष्फळ झालेली पाहून स्मिथला काय वाटलें असेल त्याची कल्पना वाच-कांनीच करावी.

बापू गोखल्यांनीं स्वराज्याची धुरा आपल्या डोकीवर घेतली होती व ती त्यांना किती जड पडत होती याची कल्पना वाचकांस आली असेलच.

यावेळीं कौटुंबिक आपत्तीही त्यांच्यावर कोसळत होत्याच. बाजीराव जुन्नर-जवळ ब्राह्मणवाड्याकडे आला होता व तेथें त्यानें बापूंना बोलावलें, त्यावरून बापू गोखले आपली सर्व फौज घेऊन तिकडे निघून गेले. तिकडे गेल्यावर त्यांचा पहिल्या बायकोचा मुलगा गोविंदराव बाबा यास क्षयाची भावना होऊन मरण आलें. गोविंदरावाची पत्नी राधाबाई ही ओंकारांची कन्या. या वेळीं ती १५ वर्षांची असून फारच रूपसंपन्न व सुलक्षणी होती. आपला पती मरण पावलेला पाहून तिला कमालीचें दुःख झालें. तिनें सती जाण्याचा निश्चय केला व तो बापू गोखले आदिकरून आपल्या आप्तांस मोठ्या विनयानें कळविला; व सतीची सर्व सिद्धता करण्याची त्यांस प्रार्थना केली. तिचें लहान वय पाहून सर्वांसच अत्यंत वाईट वाटलें. तिच्या या बेतांत बाजीराव व बापू यांनीं पुष्कळच प्रेमाचे अडथळे आणले. परंतु तिनें त्या अडथळ्यांस दादही दिली नाहीं. तिचें लक्षच या ऐहिक गोष्टींत रमेना. पतीबरोबर स्वर्गी जाण्याचा तिनें सारखा ध्यास घेतला. 'अशुभस्य कालहरणम्' या वचनास अनुसरून त्यांनीं हा उमाळा कांहीं दिवसांनीं तरी दबेल या आशेनें तिला ' आपण ब्राह्मण-जातींतील पडलों तर सती जाणें हें कर्म शास्त्रविधीयुक्त झालें पाहिजे. शास्त्रार्थाचे ग्रंथ बरोबर आणले नाहींत म्हणून जुन्नरास कारकून पाठवून ते आणवून नंतर विधीपूर्वक अस्थिसमागमें तुला मार्गस्थ करूं' असें सांगितलें ही वडिलांची आज्ञा ऐकतांच ' चितेबरोबर सहगमन करणें हा खरा शास्त्रशुद्ध मार्ग, परंतु अस्थिसमागमें जाणें जर शास्त्रशुद्धच असेल तर ग्रंथ येतांच माझी रवानगी करून द्यावी व तसें करण्याचें मला आज अभिवचन द्यावें. ' बापूंनीं सांगितलें कीं उद्यां ग्रंथ आले म्हणजे परवां शिकस्त तर तेरवां तुझी रवानगी करूं. त्यांच्या म्हणण्यास मान देऊन तिनें प्रेतदहनास अनुज्ञा दिली.

बाजीराव अत्यंत धार्मिक होता ही गोष्ट सुप्रसिद्धच आहे. लढाईचेवेळीं सुद्धां त्याचे जवळ शास्त्रीपंडितांचें लटांबर असावयाचेंच तें यावेळेस कोठें गेलें होतें कोणास ठाऊक. त्यानें या कोंवळ्या मुलीचें मन पालटण्याचा

आटोकाट प्रयत्न केला पण याचा परिणाम उलट झाला. तिनें राहिलेल्या तीन दिवसांत खाणेंपिणें टाकलें व पतीचें दैवत श्रीशंकर याची सारखी तीन दिवस प्रार्थना केली.

तिसरे दिवशीं प्रातःकाळीं बाजीराव व बापू गोखले संकेताप्रमाणें राधा-बाईपाशीं जाऊन तिचें मन वळविण्यासाठीं पुन्हां प्रयत्न करूं लागले. पण सर्व व्यर्थ. तिनें सती जाण्याचें सोडल्यास आपण तिला पुष्कळ अलंकार देऊं, मोठी जहागीर पण देऊं, असें पेशव्यांनीं सांगितलें. पण माझे अलंकार व जहागीर पुढें गेली आहे तिचा उपभोग घेण्यास मला लवकर पाठविलें तर मी आपली अत्यंत उपकारी होईन असें तिनें सांगितलें. श्रीमंतांची स्वारी निरुत्तर झाली. त्यानंतर बापूंनीं तिचें मन वळविण्याची पराकाष्ठा केली पण त्याचाही कांहीं उपयोग झाला नाहीं. ती बापूसाहेबांस मोठ्या नम्रतेनें म्हणाली कीं आपण एकवचनी एकपत्नी वीर. आपण एकवेळ युद्धांत पाऊल टाकलें तर तें परत मागें न घेण्याविषयीं आपला नियम. केवळ श्रीरामचंद्राप्रमाणें आपलें वर्तन. तस्मात् मी आपली स्नुषा असून सत्कर्म आचरण्याविषयीं जो एकदां निग्रह केला तो मागें फिरविला तर आपले कुळास दूषण लागणार नाहीं काय ? आपण एकवचनी असें ब्रीद बाळगलें आहे. यासाठीं केलेला बेत सोडणें उचित नाहीं. त्या अर्थी तिसरे दिवशीं मार्गस्थ करण्याविषयींचें आपण दिलेलें अभिवचन प्रांजलपणें तडीस न्यावें.

असें तिचें निश्चयाचें बोलणें ऐकून सर्वांसच अति विस्मय आणि खेद वाटला. तिची बाल्यावस्था आणि शहाणपणा व सौंदर्य पाहून सर्वजण दुःखडोहीं बुडून गेले. आतां सिद्धता करणें चुकत नाहीं. असें समजून मंडप वगैरे घालून तयारी झाल्याचें तिला कळविलें. राधाबाईनें तें ऐकतांच मोठ्या आनंदानें उठून लागलेंच शुभ्र पातळ परिधान करून कपाळीं कुंकवाचा मळवट भरिला. नंतर सर्व अलंकार काढून ब्राम्हणांस व सुवासिनींस धर्म केला.

आणखींही द्रव्य श्वशुरापासून घेऊन ब्राम्हणांस वांटिलें. नंतर हातीं पंचा-रती घेऊन घरांतील सर्व मंडळीस नमस्कार करून झाले अपराधांची क्षमा करावी अशी प्रार्थना करिती झाली.

हा सर्व प्रकार पाहून मंडळी तटस्थ झाली. कोणाच्याही तोंडून शब्द निघेना. गहिंवर दाटून येऊन साऱ्यांचे डोळे पाण्यानें भरून आले. ती सर्वांचा निरोप घेत असतां मी पतिसेवा करण्यास जातें, मजवर लोभ असूं द्यावा असें म्हणूं लागली. हें तिचें बोलणें ऐकून सर्वत्रांस दुःखाच्या उकळ्या येऊं लागल्या. ती साध्वी हातीं आरती घेऊन मंडपाजवळ आली. नंतर मंडपाचे चारी बाजूस दीप प्रज्वलित करून बाहेर काकडा दिला. मग लागलीच अस्थी घेऊन आंत गेली आणि मुखावर पदर घेऊन चितेवर शयन करिती झाली. सर्व सरदार आणि आसमंताद्भागांतील सर्व लोक विस्मय करीत आहेत तों इतक्यांत ज्वालांचा भडका होऊन मंडपाची रक्षा झाली. यावेळीं बापू गोखल्यांस परम दुःख झालें. या राधाबाई माउलीचें देऊळ (थडगें) ब्राम्हणवाडें येथें असून ती नवसास पावते असें तेथील लोक सांगतात.

हें सर्व कृत्य आटोपल्यावर बाजीरावानें दुसरे दिवशीं तेथून कूच केलें व जुन्नरखेडच्या रस्त्यानें ता. ३० डिसेंबर रोजीं पुण्यापासून फक्त ८-९ कोसांवर असलेल्या चाकण गांवीं येऊन पोंचले. ता. १८ नोव्हेंबर ते ३० डिसेंबर या १॥ महिन्याच्या अवधींत पुरंदर, सालप्याचा घांट, माहुली, पुसेसावळी, मिरज, पंढरपूर, पिरगांव, संगमनेर, ओझर, जुन्नर, खेड, चाकण असे अनेक मुक्काम करून स्वतःचें नुकसान न करितां उलट शत्रूची शक्य तितक्या मार्गांनीं नासाडी करून बाजीरावाची स्वारी पुण्याकडे आली. बापूंनीं पुणें काबीज करण्याची खटपट चालविली. येरवड्याहून निघून परत पुण्यांत पोंचेपर्यंत १॥ महिन्याच्या अवधींत त्यांनीं अप्रातिम युद्ध-कौशल्य दाखविलें व तें त्यांच्या शत्रूंनींसुद्धां कबूल केलें. अशा

मुत्सद्यास व वीरास आमच्या इतिहासांत पळपुटा गणलें जावें यापेक्षां त्यांचा दुसरा कृतघ्नपणा तरी कोणता? ४०० मैलांच्या डोंगराळ कांट्याकुट्याच्या प्रवासामध्यें त्यांनीं इंग्रजांची स्वतःशीं एकही वेळ गांठ पडूं दिली नाहीं व त्यांना त्रास देण्यांत विलकूल कसूर केली नाहीं यांतच त्यांचें युद्धकौशल्य दिसून येतें.

बाजीराव पुण्याला येत आहे असें कळतांच पुण्यांतील लोकांना जो अत्यानंद झाला त्याची कल्पनासुद्धां करणें अशक्य. कैक दिवस धडपड करून आपला राजा, आपला सेनापती हे आपल्या पुण्यांत प्रवेश करणार हें ऐकून सर्वजण आनंदानें बेहोष होऊन गेले. दुर्दैवानें आपल्यावर ओढवलेलें पारतंत्र्याचें ग्रहण लौकरच सुटणार या आनंदानें त्यांची हृदयें नाचूं लागलीं. प्रत्येकजण स्वतःची सुखदुःखें विसरला आणि स्वातंत्र्याचे पोवाडे गाण्यांत गुंग झाला. स्वातंत्र्याची तहानच तशी और आहे. खावयास नसलें तरी आम्ही स्वतंत्र आहों हें म्हणण्यांत आपणांस किती तरी अननुभूत आनंद होतो. स्वातंत्र्य ही चीज अशी आहे कीं तिच्यापुढें आपणांस दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची किंमत वाटत नाहीं आणि म्हणूनच तें मिळविण्यासाठीं आपण आपलें जीवितसर्वस्व पणाला लावतों. हरलों तरी चिंता नाहीं, मेलों तरी पर्वा नाहीं, हालहाल झाले तरी हरकत नाहीं, देशोधडीला लागलों तरी उत्तम, अशा जाणीवेनें, ईर्ष्येनें, आणि इतर कोणत्याही वेळीं न सांपडणाऱ्या अशा दुर्दम्य उत्साहानें, प्रत्येक राष्ट्र, प्रत्येक समाज व प्रत्येक व्यक्ति आपल्या स्वातंत्र्याकरितां झगडत असते. जितराष्ट्र आणि तें सुद्धां ज्याचें स्वराज्य संपल्याला महिना दीड महिना सुद्धां झाला नाहीं, पूर्वीच्या वैभवाचीं दृश्यें ज्याच्या नजरेसमोर जशींच्या तशीं आहेत तें राष्ट्र, स्वराज्य मिळणार अशी बातमी कळतांच केवढ्या अनंत उत्साहपूर्ण शब्दांनी आपल्या नेत्यांचें स्वागत करण्यास सज्ज झालें असेल? राजा आपल्याला विसरला नाहीं तो परत आपल्यांत येऊन मिसळणार या वार्तेनें त्यांची हृदयें किती जोरानें हेलावत असतील याची कल्पना करणें फार कठीण

आहे. लोक साहजीकच बाजीरावाचे, बापू गोखल्यांचे, पोवाडे गाऊं लागले. आणि तो त्यांच्या हृदयांत शल्यासारखा एकसारखा सलत असणारा, इंग्रजांचें निशाण पुण्यावर पहिल्यानें फडकविण्याचें शतकृत्य करणारा बाळाजीपंत नातू आणि त्याचे सहाध्यायी यांची अवस्था काय झाली असेल ! आजपर्यंत त्याच्या या नादानपणाच्या कृत्यावद्दल उघड रितीनें बोलतां न आल्यामुळें मनांत राहिलेलें सारें किल्मिष ओकण्याची ही आलेली सुसंधी स्वातंत्र्येच्छू लोकांनीं साधली असल्यास नवल नाहीं. .

या वेळीं पुण्यांत कर्नल बर यांच्याकडे सर्व व्यवस्था सोंपविलेली होती. त्यांना पेशव्यांचें सैन्य पुण्याकडे आलेलें कळतांच पराकाष्ठेचा विस्मय वाटला. जनरल स्मिथ त्यांच्या पाठीवर असतांना पुणें आपल्या हातीं बिनधोक आहे अशा कल्पनेनें ते स्वस्थ बसले होते. पण पेशवे आले आणि स्मिथचा मात्र पत्ता नाहीं असें कळतांच आपलें पुढें कसें होणार याची त्यांना फार काळजी लागली. तेव्हां स्मिथ पाठीवर असले तर ठीकच आहे नाहीं तर आपणांवरच प्रसंग आहे व तो आपण पार पाडला पाहिजे या जाणीवेनें त्यांनीं शिरूर येथून नेटिव्ह पायदळाची एक पलटण आपल्या मदतीस बोलावली. त्याप्रमाणें पहिल्या बॉम्बे नेटिव्ह इन्फंट्रीपैकीं दुसरी बटॅलिअन, दोन तोफा, आणि अडीचशें घोडेस्वार इतकें सैन्य घेऊन कॅप्टन स्टॉंटन हा ता. ३१ डिसेंबर १८१७ रोजीं रात्रीं ८ वाजतां शिरूरहून निघाला आणि १४ तासांत २७ मैलांची मजल मारून दुसऱ्या दिवशीं सकाळीं १० वाजतां कोरेगांवजवळील एका टेकडीवर येऊन पोंचला. तेथून त्यानें सभोंवार नजर टाकली तों भीमा नदीच्या खोऱ्यांत पेशव्यांचें सैन्य पसरलेलें त्याला दिसलें. या सैन्यापासून आपला बचाव करणें शक्य नाहीं असें वाटून त्यानें कोरेगांवच्या तटबंदींत आपलें सैन्य भरण्याचा प्रयत्न चालविला. बापूंचें सैन्य त्यांच्या पाळतीवर होतेंच. इंग्लिश इतिहासकारांच्या म्हणण्याप्रमाणें बापूं-जवळ सुमारें २५००० सैन्य होतें. ही लढाई उघड्या मैदानावर झाली असती तर स्टॉंटनचा केव्हांच पराभव झाला असता व ही अडचण ओळ-

खूनच त्यानें आपलें सैन्य तटबंदीच्या आंत नेलें होतें. यामुळें बापूंचें सैन्य इतकें मोठें असून सुद्धां सर्वच त्या तटबंदींत शिरूं शकलें नाहीं. त्यामुळें त्यांना थोड्याच स्वारांनिशीं ही लढाई लढवावी लागली. इंग्लिशांचें सैन्य सारी रात्र चालल्यामुळें थकून गेलें होतें. त्यांना विश्रांति पाहिजे होती ती मिळूं शकली नाहीं. तशांत दुपारचें कडक ऊन आणि तहानेनें व्याकूळ झालेल्या जिवाला पाण्याच्या टिपुसाची सुद्धां आशा नाहीं. कारण तें मिळणार फक्त भीमानदीवर आणि ती मराठ्यांच्या ताब्यांत. बरें तटबंदी इतकी लहान कीं तीमध्यें इंग्लिशांनी या तटबंदीमध्यें मोकळेपणें फिरावयाचें म्हटलें तरी वाव नव्हता. तेव्हां या तटांत मराठे शिरणार कसे? आणि इंग्रजांना गांठणार कसे? तरीही अरबांच्या हजारहजारांच्या तीन तुकड्या तटांत दुसऱ्या बाजूनें शिरण्याचा प्रयत्न करूं लागल्या. यावेळीं तोफांचा उपयोग कोणत्याच पक्षाला झाला नाहीं. जें युद्ध झालें तें फक्त तरवारी व बंदुका यांच्या जोरावर. इंग्लिशांनीं आपले जवळील एक तोफ चालविण्याचा प्रयत्न केला पण मराठ्यांनीं ती काबीज केली व तिच्यावरील अधिकारी ले. चिशोल्म याला ठार मारून त्याचें शीर कापून पेशव्यांकडे पाठविलें. इंग्रजांचे दुसरे सेनापति लेफ्टनंट स्वॅन्सन, लेफ्टनंट कोनेलन व असिस्टंट सर्जन वुईंगेट यांना जबर जखमा झाल्या. कॅप्टन स्टॉंटननें चपलाई करून गांवांत देवळा-जवळ जी एक धर्मशाळा होती तींत या तिघांना नेऊन ठेवलें. पण मराठ्यांनीं ती हस्तगत करून वुईंगेट याला ठार मारलें. बाकीच्या अधि-काऱ्यांची तीच वाट लावण्यास ते जाणार तों पुन्हां स्टॉंटननें ती हस्तगत करून त्यांचे जीव बचावले. या धर्मशाळेशिवाय कोरेगांवमध्यें एक मजबूत गढी होती ती हस्तगत करून मराठ्यांनीं आपल्या सैन्याला सुरक्षित जागा मिळवली. ही गढी इंग्रजांचे लक्षांत न आल्यामुळें तिचा त्यांना उपयोग करून घेतां आला नाहीं. नाहींतर त्यांना तिचा फारच मोठा आधार मिळाला असता. इंग्रजांनीं आपल्याकडून शौर्याची शिकस्त केली पण तिचा उपयोग झाला नाहीं. मराठी सैन्यापुढें आपला टिकाव लागणें अशक्य आहे

असें ध्यानांत आल्यावर इंग्रज अधिकारी व नेटिव्ह सैन्य पेशव्यांस शरण जाणार होतें पण तो लांछनाचा प्रसंग कॅप्टन स्टॉंटन यानें त्यांची समजूत घालून, व संकटाच्यावेळीं धीर देऊन टाळला. त्यानें आपल्या भाषणानें सैन्यामध्यें उत्साह आणला व त्याच्या योगानें हीं दोन्ही सैन्यें सारखीं लढत राहिलीं. जागा अडचणीची असल्यामुळें पेशव्यांना त्या सर्व लोकांचा नाश करतां आला नाहीं त्यामुळें हीं दोन्ही सैन्यें रात्रीं ९ वाजेपर्यंत लढत राहिलीं व पुष्कळसा काळोख पडल्यावर मराठ्यांचें सैन्य आपल्या छावणीकडे परत निघालें. पेशव्यांचें सैन्य आतां शिल्लक राहिलें नाहीं अशी खात्री पटेपर्यंत वाट पाहून नंतर मग इंग्रज पाणी पिण्याकरितां नदीवर गेले तरी वाटेंत आपणांवर हल्ला होतो कीं काय ही शंका त्यांचे मनांत धाकधुक करीत होतीच. पण सुदैवानें तसा कांहीं प्रकार घडला नाहीं.

कोरेगांवचा संग्राम अशा रितीनें पुरा झाल्यावर मराठ्यांचें सैन्य लोणी-कंदावरून पुण्याकडे वळलें. तें लोणीकंद येथें मुक्काम केल्यावर त्यांनीं तेथून 'कर्नल बरनें तुम्हांला लोणीकंदवरून पुण्याकडे बोलाविलें आहे. त्याला मदतीची फार जरूर आहे. तरी तुम्ही परत शिरूरला न जातां पुण्यास बर यांना मदत करण्याकरितां चला,' असा निरोप पाठविण्यास सुरवात केली. त्यांना कोठून तरी स्टॉंटनला त्या तटाच्या बाहेर काढावयाचें होतें. पण त्याच्या सैन्याचा इतका शेणसडा झाला होता कीं त्यामुळें आपलें सैन्य धोक्यांत घालण्याचा त्याला धीर होईना. ब्रिगेडिअर जनरल स्मिथ हा जर तेथें हजर असता तर प्रश्न वेगळा. परंतु त्याचा पत्ताच नव्हता. जनरल स्मिथ संगमनेरपर्यंत आल्यानंतर त्याला त्रिंबकजी डेंगळ्याच्या रामोशांनीं इतकें सतावून सोडलें कीं त्याला त्या ओझरांतून लवकर बाहेर पडतां येईना. त्यानें आपल्याकडून पाठलागाची शिकस्त केली पण त्याला तो लवकर न करतां आल्यामुळें इकडे धुव्वा उडाला. कशी तरी अत्यंत खटपट करून शेवटीं तो २ जानेवारी रोजीं आपल्याबरोबर थोडेसें सैन्य घेऊन चाकणला पोंचला पण आतां त्याचा उपयोग नव्हता. शिवाय जनरल स्मिथ

आला आहे हेंही स्टॉँटनला कळलें नव्हतें. त्यामुळें निरुपाय होऊन तो २ जानेवारी रोजीं धडपडत परत शिरूरला गेला.

या लढाईत इंग्रजांच्याकडील ८०० स्वारांपैकीं २७५ लोक लढाईत मारले गेले व सुमारें २५०–३०० जखमी झाले. पेशव्यांकडील एकंदर जखमी व मेलेल्या स्वारांची संख्या १०० होती. यावरून मराठी फौजेनें इंग्रजांवर केवढा दांडगा विजय मिळविला असेल याची कल्पना करणें सोपें जाईल. मराठ्यांनीं अशा रितीनें विजय मिळविला असतांनासुद्धां कोरेगांव येथें One of the proudest triumphs of the British army in the east ( पूर्वेकडील देशांत इंग्रजांना अभिमानास्पद अशा जयांपैकीं हा विजय अत्यंत मुख्य आहे ) असा एक जयस्तंभ १८२२ सालीं इंग्रजांनीं भीमा नदीच्या कांठावर उभारला आहे. निःपक्षपातीपणानें लिहावयाचें म्हटलें म्हणजे स्टॉँटननें थोड्या सैन्यानिशीं मराठ्यांशीं लढण्यांत दाखविलेल्या बहादुरीबद्दल त्याचें अभिनंदन करणें आवश्यक आहे. पराजय झाला तरी चालेल पण शत्रूला शरण गेलों अशी नामुष्कीची पाळी त्यानें आपल्या सैन्याला आणूं दिली नाहीं याबद्दल त्याचे गोडवे इंग्रजांनीं गाइले तरी ते चालतील. एका इंग्रज अधिकाऱ्यानें लिहिल्याप्रमाणें हा 'Gallant defence of Koregaon' ( कोरेगांव येथील अभिमानास्पद बचाव ) होऊं शकेल, पण किती झालें तरी तो बचावच. विजय नव्हे. बचाव करणें आणि विजय मिळवणें यांत फरक आहे. बचाव झाला असें मानलें तर दोन्ही पक्ष तुल्यबल होते एवढाच अर्थ फार तर त्यापासून निघूं शकेल. इंग्रज श्रेष्ठ होते असा निघणार नाहीं. आणि ८०० लोकांपैकीं २७५ मरणें २५०–३०० जखमी होणें याला बचाव तरी म्हणतां येईल कीं नाहीं याची शंकाच वाटते. स्टॉँटनच्या धैर्याबद्दल अभिनंदन आम्हींही करतों परंतु अशा परिस्थितींत सुद्धां हे वरीलप्रमाणें खोटे जयस्तंभ कां उभारण्याची आवश्यकता इंग्रजांना वाटावी याचें कारण मात्र कळत नाहीं.

---

# प्रकरण १० वें.

## ‘ मरणांत खरोखर जग जगतें ’

ऐशीं अनंत फुलें फुलती, फुलोनियां सुकोनि जाती ।
कोणी त्यांची महती गणती ठेविली असे ॥
परी जें गजेंद्र शुंडेनें उपटिलें, श्रीहरीसाठीं गेलें ।
कमलपुष्प तें अमर झालें, तिन्हीं लोकीं पावन ॥
धन्य धन्य ती वंशलता, निर्वंश तिचा देशाकरितां ।
दिगंतिं पसरे सुगंधता, लोकहित परिमलाची ॥


—कविश्रेष्ठ विनायकराव सावरकर

१ जानेवारी १८१८ रोजीं कोरेगांव येथें इंग्रजांचा पराभव केल्यावर पेशव्यांच्या फौजेपैकीं ५००० लोक बरोबर घेऊन श्रीमंतांच्या फौजेंतील एक मुख्य सरदार नारोपंत आपटे हे पुण्याजवळ २–३ कोसांवर वाघोली गांवापर्यंत आले. पेशवे पुण्यास येतात असें पाहून इंग्रजांनीं पुण्यांतून आपलें चंबुगवाळें आटपण्यास सुरवात केली. कोरेगांवास विजय मिळविल्यामुळें पेशव्यांस अत्यानंद झाला होता व त्यांचें सैन्यही उत्साही बनलें होतें. अशा अत्यंत आनंदाच्या भरांत त्यांचें सैन्य पुण्याजवळ येऊं लागलें यांत आश्चर्य नाहीं. पण उत्साहाचा अतिरेक मनुष्याला आपल्या चालू परिस्थितीविषयीं बेभान करतो हें सत्य त्रिकालाबाधीत आहे. तशी स्थिती पेशव्यांच्या सैन्याची होत आली होती. पेशव्यांचें मुख्य लष्कर राजवाडीकडे होतें तें जर या सैन्याला मिळतें तर पुण्यावरची मोहीम काढण्यांत फायदा झाला असता याची जाणीव बापूंना होती आणि म्हणून त्यांनीं पुण्यावरील हल्ल्याचा

बेत मोडून काढून आपलें सैन्य राजवाडीस नेऊन मिळविलें व तेथें मुक्काम केला.

दुसरे दिवशीं राजवाडीहून निघून सर्व सैन्य जेजुरीस गेलें. कोरेगांवच्या विजयानें त्यांना हुरूप आला होता म्हणून त्यांनीं इंग्रजांशीं उघड्या मैदानांत लढाई देण्याचा घाट घातला. त्याकरितां पुण्याहून बाहेर पडतांना जी फौज त्यांनीं मागें ठेवली होती ती व आपले बरोबरचें सैन्य अशा सर्व लोकांनीं निपाणी येथें एकत्र जमावें व स्वराज्य मिळवण्याचा शेवटचा प्रयत्न करून पहावा, तोंपर्यंत रामचंद्रपंत सुभेदार आणि विंचुरकर यांनीं इंग्रजांच्या सैन्याच्या आघाडीवर असावें आणि निपाणीस येतांच पेशव्यांच्या मुख्य सैन्याला येऊन मिळावें याप्रमाणें ठरवून सर्व फौज पुढें चालू लागली. सैन्याच्या दोन टोळ्या करून एकीबरोबर तोफखाना व पायदळ देऊन तें पुढें निपाणीस रवाना केलें. व आपण बागलकोटावरून बेळगांवास येऊन निपाणीच्या मोठ्या मैदानांत लढाई द्यावी असा बेत करून मुधोळास गेले. एल्फिन्स्टन व कोरेगांव येथें जी इंग्रजांची थोडी बहुत फौज शिल्लक राहिली होती ती सर्व मिळून कोरेगांवींच राहिली. विंचुरकर अघाडीवर रहावयाचे असल्यामुळें तेही तेथेंच राहिले.

मराठ्यांच्या सैन्याचा पाडळी येथें मुक्काम आला असतां कर्नाटकांतील इंग्रजांचीं पलटणें त्यांच्या पाळतीवर आलीं. ही पलटणें व स्वार मिळून ४००८ ची सेना दीडप्रहरचे दिवसाचे सुमारास पाडळी येथें येऊन उतरली. आपण पाठलाग करीत आहों ही बातमी पेशव्यांस कळूं नये म्हणून त्यांनीं आपल्याकडून शक्य तितकी जलदी केली. पण पाडळीस जाऊन पाहातात तों बाजीराव तेथून कूच करून केव्हांच पसार झाला होता. त्यांचा बेत फसल्यावर त्यांनीं तेथेंच मुक्काम करण्याचें ठरविलें. मध्यंतरी ही छाप्याची बातमी बाजीरावास कळली व तेव्हांपासून तो जास्त खबरदारी घेऊं लागला. विंचुरकर व सुभेदार हे ठरल्याप्रमाणें निपाणीस आले नाहींत व पुण्याकडील




अष्ट्याच्या लढाईंतील सैन्याच्या हालचालींचें वर्णन.

पायदळाचाही पत्ता लागला नाहीं म्हणून निपाणीकडील लढाईचा वेत फुकट गेला. कर्नाटकची वारी उतरून गेल्यावर विंचुरकर आणि रामचंद्रपंत सुभेदार हे फौजेसुद्धां श्रीमंतांस येऊन मिळाले. पुढें जमखिंडीची वारी उतरून सर्व फौज अलिकडे आली. इंग्लिशांनीं त्यांचा पाठलाग चालू ठेवलाच होता. त्यांचे स्वार आपल्या सैन्यास मागें टाकून मराठ्यांवर हल्ला करीत. हा त्रास पाहून बापूंनीं वारी उतरतांच इंग्रजांवर हल्ला करण्याचें ठरविलें व यासाठीं विंचुरकर, सुभेदार व बापू गोखले एके ठिकाणीं राहिले. बाजीराव मिरजे-जवळ उगार गांवीं गेला. इंग्रज वारीखालींच राहिले.

त्यानंतर एल्फिन्स्टननें पेशव्यांवर उगार मुक्कामीं छापा घालण्याचा प्रयत्न केला पण ही बातमी बापूंच्या हेरांनीं त्यांस तत्काळ कळविल्यामुळें ते सुर-पालीवरून रातोरात उगारास आले. बापू मदतीस आले ही बातमी एल्-फिन्स्टनला कळतांच त्यानें छाप्याचा नाद सोडला पण बापूंनीं त्याची गांठ घेऊन त्यांची अघाडी व पिछाडी कापून काढली. एक प्रहरपर्यंत या दोन्ही पक्षांत सारखी गोळागोळी चालली होती. ही लढाई महीसाल व कवठें यांच्या दरम्यान झाली. त्या दिवशीं त्यांनीं कवठें येथें मुक्काम केला.

बाजीराव उगारवरून साताऱ्याकडे गेला व इंग्लिशांची फौज आपल्या पाठीमागें लागली आहे असें त्यानें गोखल्यांस व निपाणकरास कळविलें. उगारनंतर इंग्रजांची व त्यांची सालगांवीं गांठ पडली. त्यावेळीं बापूंनीं ससैन्य शत्रूवर हल्ला करून त्यांची नासाडी करून टाकली. निपाणकर मागें राहिले होते त्यांना तेथें आणवून बापूंनीं इंग्रजांचा समाचार घेण्यास सांगि-तलें. शत्रूचे स्वार तेथें नसून फक्त पलटणी आहेत म्हणून यावेळीं हल्ला केला तर काम फत्ते होईल असें त्यांनीं विनवणी करून सांगितलें. पण निपाणकरांनीं तें न ऐकतां शत्रूची फौज सोडून देऊन दोन तीन कोसांवर मुक्काम केला.

साताऱ्च्या प्रतापसिंह महाराजांना बापूंनीं पूर्वीच आपल्याबरोबर घेतलें होतें. ते आपल्या परिवारासह बाजीरावाबरोबर असत. ते साताऱ्याकडे गेले

असतांना इंग्रजांची फौज कोरेगांवापर्यंत आली म्हणून सालप्याच्या घांटां-तून उतरून अडचणींतून निघून जावें म्हणून बाजीराव वसंतपंचमीस अकलुज येथें निघून आला. लष्करी हालचालीच्या दृष्टीनें त्याचें हें करणें फारच मुत्सद्देगिरीचें होतें. कारण ती जागा पराकाष्ठेची विकट असून फार डोंगराळ होती. आसपास जंगल वाढलेलें होतें. उजव्या बाजूस नंदगिरी किल्ला व डाव्या बाजूस चंदनवंदन किल्ल्याचा एक कोस रुंदीचा पहाड होता. अशा अडचणींत बाजीरावाला गांठण्याचा प्रयत्न इंग्रजांनीं चालविला होता. पण त्यांचा हा कावा बापूंनीं ओळखला आणि नंदगिरी किल्ल्याजवळ इंग्र-जांवर हल्ला करून त्यांस लढाईत गुंतवलें व बाजीरावास या अडचणींतून पार पडण्यास मार्ग मोकळा करून दिला. देऊर गांवीं ३॥ प्रहर दिवसास इंग्रजांनीं मुक्काम केला. येथेंही निपाणकरांनीं फसविलें व शत्रूचा शह सोडून नंदगिरी किल्ल्याच्या उजव्या बाजूनें किन्हईचे खिंडीनें पार निघून गेले. गोपाळराव पटवर्धन जमखिंडीकर आणि बापू गोखले तेथेंच राहिले होते. त्यांना पुढें जावयाचें होतें पण परिस्थिती आशादायक नव्हती तरी तसाच धीर करून इंग्लिश लष्कराला उजवीकडे टाकून चंदन-वंदन किल्ल्याचे बाजूनें चालते झाले. वाटेमध्यें गोऱ्या स्वारांनीं बापू गोखले व जमखिंडीकर याजवर हल्ला चढविला. हा अडचणींतील हल्ला पाहून त्यांचें सैन्य घाबरलें व तें तेथून निघून चंदनवंदन किल्ल्याच्या पहाडावरून बाबुली-कडे उतरलें. यावेळीं बापूजवळ २५ स्वार व जमखिंडीकर यांजवळ फक्त १० स्वार होते; तरी त्यांनीं शत्रूची फिकीर केली नाहीं. मरण २०० पावलांवर उभें होतें. पण 'काळ आला होता तरी वेळ आली नव्हती' ही म्हण या बाबतींत सार्थ ठरली. हे बापू गोखले असें शत्रूच्या स्वारांस माहीत नव्हतें आणि बापूंच्या तोफांपुढें येण्यास कोणी धजेना यामुळें ते बचले. बापू गोखले तेथून निघून दुसऱ्या घांटानें उतरून दुसरे दिवशीं अकलुज येथें येऊन उतरले व तेथें बाजीरावास येऊन मिळाले. त्या दिवशीं वसंत-पंचमी होती म्हणून सणाचा मोठा थाट करून बाजीरावानें रंग उधळला.

इंग्रजांची फौज मागें न येतां सालप्याचा घाट उतरून तिनें निरा नदीवर मुक्काम केला. बाजीरावाला अकलुज येथें त्रिंबकजी डेंगळे २०० स्वारांनीशीं येऊन मिळाला. तसेंच ५०० पेंढारीही येऊन मिळाले. पुढें विंचुरकर आणि सुभेदार यांस शत्रूचे तोंडावर ठेऊन बाजीरावाबरोबर बापू गोखले हे राहिले व कूच दरकूच करीत त्यांनीं सोलापुरास २–३ दिवस मुक्काम केला.

शेवटील प्रसंगीं सर्व सरदारांचा सोलापूर येथें इंग्रजांशीं लढाई द्यावी असा बेत ठरला. त्यांना पळण्याचा फार कंटाळा आला होता. त्या बेता-प्रमाणें पानशांचा तोफखाना सोलापुरीं रवाना झाला होता. पटवर्धन मंडळीही सोलापुरास आली होती. बापू गोखल्यांजवळच्या अरबांच्या व गोसाव्यांच्या पलटणी तयार झाल्या होत्या. ही लढाई जर घडती तर इंग्रजांस तोंड फिरविणें भाग पडलें असतें कारण यावेळीं लढाईची सर्व तयारीच विलक्षण होऊन राहिली होती. पण बाजीराव सोलापुरास थांबण्यास तयार होईना.

बाजीरावानें सोलापुरची व्यवस्था विसाजी देवराव पाच्छापुरकर यांचे-कडे सोंपविली होती. आपण परांड्याच्या रोंखानें निघाला पंढरपुराहून पांच कोसांवर अष्टे गांवीं मुक्काम केला. माघ शु. १५ चे दिवशीं सातार्‍याहून स्मिथची स्वारी अष्ट्यास येणार असें चतुर्दशीचे दिवशीं रात्रीं कळतांच बापू गोखले बाजीरावाजवळ गेले व तुम्हीं पुढें जा आम्हीं मागाहून येतों म्हणून सांगूं लागले. पण हा बेत अप्पासाहेब निपाणकरांनीं मोडून काढला. पौर्णिमेचें स्नान व भोजन करून आपण निघून जा रात्रीं छापा आला तर मी संभाळीन असें सांगितलें. आणि बापू गोखल्यांच्या बेतांत मोडता घातला. ही बातमी कळतांच बापू चिंताग्रस्त झाले. रामचंद्रपंत सुभेदार हे घांटावर होते त्यांस कैक बोलावणीं निकडीची जाऊन सुद्धां ते आले नाहींत. आणि बाकीची सरदार मंडळी यांनीं आयत्यावेळीं दगा दिला. स्वतः कांहीं केलें नाहीं व बापूंचे पाय मागें खेंचण्याचा अश्लाघ्य प्रयत्न मात्र चालविला. अशा परिस्थितींत लढाईस तोंड द्यावें, जें काय व्हावयाचें असेल तें होईल असें आजूबाजूच्या मंडळीस सांगितलें व चतुर्दशीच्या दिवशीं दोनप्रहरीं कुचनगारा

करून लढण्यास–नव्हे मरण्यास–तयार असलेलें शेलकें सैन्य बाहेर पाठविलें. आणि आपण उजाडत आंघोळ करून अन्नाचे चार गोळे कसेतरी पोटांत ढकलून शत्रू येण्याची वाट पहात बसले. बाजीराव स्नान संध्या करून जेवावयास बसला इतक्यांत इंग्रजांचे स्वार आल्याची वातमी कळली ती कळतांच घाईघाईनें बाजीरावास बाहेर पडण्यास सांगितलें. पण तो भोजन सोडून जावें तर अधीर व बेसावध म्हणतील या भीतीनें बाहेर निघण्यास तयार होईना इतकेंच नव्हेतर ‘तुम्ही ‘ लढाईच्या कामांत महाशूर आणि सावध सर्व गोष्टींत कुशल समजोन ही मसलत तुमच्या गळीं घालून आम्ही बेफिकीर असावें तों जेव्हां पहावें तेव्हां असावध रितीने कार्य न पडतां गडबड करतां व मला त्रास देतां’ अशा तऱ्हेचे लागट शब्द त्यांना बोलूं लागला.

आदल्या दिवशींचा राग मनांत होताच आणि त्यांत या लागट शब्दांची भर. विचाऱ्या बापूंना अशा रितीनें जगण्यापेक्षां जीव नकोसा होऊं लागला. त्यांनीं बाजीरावाला शेवटचे अंतकालचे पुढील शब्द सांगितले. ‘पूर्वदिनीं याप्रमाणें छाप्याची गडबड होईल याकरितां मध्यरात्रीं कूच करोन दहा कोश दूर जावें. तेथें स्नानसंध्या व भोजन उरकल्यानंतर मुक्कामास जाण्याची मनसुभी विनंति केलीच होती. तें मनास न येतां दुसऱ्याचें उत्तर ऐकोन गडबडीनें मर्जी खटी जाहल्यास त्याणीं आपल्या धर्मेकडून पराकाष्ठा केल्यानंतर स्वामीकार्य कोण करणार? करून पल्ल्यास पोंचवतील. आज रण सिद्धच आहे. स्वामीचें चित्त सेवकजनावर विटल्यावर त्याचें असानप्राय होऊन जिवादारभ्य चित्त स्वस्थ करून रणांगणीं स्वामी-कार्यावर आले असतां श्रीसंनिधास नीट पुनरपि स्वामीच्या संनिध आल्यास याहीपेक्षां बहुमान आहे. या समयीं स्वामींनीं भोजन संपवून सत्वर स्वारी चालती झाली पाहिजे. चरणदर्शन याउपर होईल तर उत्तम न होय तर हेंच शेवटचें.’

असें बाजीरावास बजावून सांगून व त्यास शेवटचा नमस्कार करून

आपली इष्ट देवता जी हनुमान तिचें स्मरण करून डेऱ्यांतून निघून बाहेर आले. त्यानंतर रामचंद्र भोजराव पाच्छापुरकर यांस सरलष्कर निपाणकरांना जलदीनें बोलवून घेऊन या असें सांगितलें. बाजीरावानेंही त्यांस तसाच निरोप पाठविला पण निपाणकरांना स्वराज्याची आंच अजीबात नव्हती. त्यांनीं रामचंद्रपंतांबरोबर फौज घेऊन येतों म्हणून सांगा असा आश्वासन-वजा निरोप पाठविला आणि झाडयास जाण्याचें निमित्त करून आपला निभाव लागणार नाहीं तुम्हीं परत फिरा मी बाजीरावाकडे जातों म्हणून लढाई सोडून गेले. या लढाईत बापूंबद्दल व त्यांच्या सैन्याबद्दल Fifteen years in India या ग्रंथाचा अनामिक कर्ता पुढीलप्रमाणें लिहितो.

Gokhla's men were individually brave and he was an experienced general well acquainted with our tactics for he had fought as an auxilliary under Sir Arthur Wellesly and seen some of the most dashing services in India. But his troops being in a dis organised state and without the mutual dependence upon each other which discipline ensures he could never actuate them with his own brave spirit and they invaribly deserted him in the hour of trial. He was however in this warfare making soldiers of them. आणि अशा कसोटीच्या व प्रतिकूल परिस्थितीनें भरलेल्या सामन्यांत सुद्धां त्यांनीं लढाई किती धोरणानें चालविली होती याचें चित्र पुढील उतारा उत्तमपणें आपल्या डोळ्यापुढें रेखाटतो.

Gokhala had chosen the ground with great judgement behind a nullah and other obstacles which he calculated would keep back the artillery. His appearance was formidable. The front rank of his line having their spears couched while the rear ranks seemed drawn upon a ridge higher than the front arm with match locks. They opened a heavy fire upon

the cavalry when within 150 yards of their line which the latter did not return till they had advanced within a few paces of the Mahratta front.

General Smith was cut down and some confusion in the right took place. Paw with the reserve of the 22nd dragoon charged Gokla in this *desperate but brave* attempt and now the whole army of the Marattas fled in confusion.

The body of the Gokla was burned in the evening the ceremonial being accompanied with all due honour according to the custom of his caste. His person was large, his feature fine and manly and his complexion nearly fair. He had received several wounds on his face and body but the confusion was so great that it could not be ascertained under whose hand he was fallen and several inferier chiefs shared his fate around him. He wore on the morning of the action a rich dress of gold kinkob with a pearl necklace diamond earrings and an ornament of the turbon of immense value which became the plunder of some of the camp followers; for the bodies of all the officers were found nearly naked upon the return of the cavalry from pursuing the army. It is impossible not to respect the spirit of Gokla. The judgement with which he prepared to receive General Smith was only equalled by his valour and skill in bravely endeavcuring to retrieve the day, upon finding, his centre could not withstand the charge of the 22nd dragoon; and the muse of the history will encircle his name with a laurel for fidelity and devotion in his countrys cause.

या लढाईचें वर्णन कै. परांजपे यांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे.

'ता. २० फेब्रुवारी रोजीं सकाळीं प्रहर दिवसाचे सुमारास अष्ट्याचे लढाईस सुरवात झाली. ब्रिगेडिअर जनरल स्मिथ याच्या हाताखालील सैन्य शेजारच्या टेकडीवरून अष्ट्याच्या खोऱ्यामध्यें सकाळीं प्रहर दिवसास उतरूं लागलें होतें. तें सैन्य अशा रितीनें कूच करून खालीं उतरत असतां २२ व्या ड्रगून पलटणीच्या दोन टोळ्या मध्यभागीं चालल्या होत्या. त्याच्या उजव्या हाताला मद्रासची सातवी नेटिव्ह घोडेस्वारांची पलटण आणि डाव्या हाताला दुसरी नेटिव्ह घोडेस्वारांची पलटण चाललेली होती. या सैन्यांच्या तीन रांगांच्या बाहेरच्या उजव्या बाजूला कॅप्टन पिअर्स आणि डाव्या बाजूला कॅप्टन स्मिथ यांच्या हाताखालीं घोड्यावरील तोफखाना चालविण्यांत आलेला होता. सैन्याच्या रांगा अशा रितीनें कुच करीत जाऊन शत्रू जवळ आला म्हणजे प्रत्यक्ष लढाईला सोइस्कर अशी सैन्याची रचना बदलून मग शत्रूवर हल्ला करावयाचा असा ब्रिगेडिअर जनरल स्मिथ यांचा इरादा होता. ज्या टेकडीवरून अशा रितीनें इंग्लिशांचें सैन्य उतरलें त्या टेकडीच्या पुढें पण खालीं कांहीं अंतरावर एक लहानशी नदी होती व त्या नदीच्या पलीकडच्या कांठावर पेशव्यांच्या सैन्याची छावणी होती. ही छावणी जवळ येऊं लागली त्यावेळीं इंग्लिश सैन्यांतील घोडेस्वारांचीं पलटणें कूच करण्याच्या वेळच्या आपल्या रांगा बदलून शत्रूला तोंड देण्याकरितां एका लांब रांगेमध्यें उभे रहाण्याच्या तयारीला लागलीं. पण या त्यांच्या रांगा पुऱ्या झाल्या नाहींत आणि इंग्लिशांच्या घोडेस्वारांना लढाईच्या शिस्तीनें उभें रहाण्यास फुरसत सुद्धां सांपडूं शकली नाहीं. इतक्यांत बापू गोखले यांचा हल्ला इंग्लिशांच्या लाइनीवर येऊन पडला. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें बापू गोखले यांनीं श्रीमंतांचा निरोप घेतला; त्यांची सुरक्षितपणें रवानगी करून देण्याची तजवीज केली आणि आपल्या हाताखालील लोकांनिशीं शत्रूवर हल्ला करण्याकरितां तडक निघाले. पेशव्यांची छावणी आणि शत्रूंचें सैन्य यांच्या दरम्यान जी लहानशी नदी होती ती ओलांडून

## जवानमर्द बापू

बापू गोखल्यांचे स्वार एकदम आणि अचानक रितीनें इंग्रजी सैन्याच्या सातव्या घोडेस्वारांच्या पलटणींची जी रांग बनविण्यांत येत होती तिच्यावर चाल करून आले. बापू गोखल्यांचा एकदम छापा आल्यामुळें त्या ७ व्या घोडेस्वारांच्या पलटणीमध्यें एकदम गोंधळ उडून गेला. बापू गोखल्यांचे स्वार शत्रूंच्या लोकांवर आपल्या बंदुकी झाडीत तसेच पुढें चालले. २२ वी ड्रगुन्सची पलटण मध्यभागीं आणि सातवी मद्रासची नेटिव्ह घोडेस्वारांची पलटण डाव्या बाजूला अशा रितीनें मागून कूच करित येत होत्या हें पूर्वीं सांगितलें आहे. अशा रितीनें मागून कूच करीत येतांना या दोन तुकड्यांतील लोक (सोबतच्या नकाशांत दाखविलेल्या ठिकाणीं) आपली रांग बनवून उभे रहाण्याच्या उद्योगांत होते. आणि या रांगेमध्यें मद्रासची ७ वी पलटण उजव्या बाजूला आणि २२ वी ड्रगुन्सची पलटण डाव्या बाजूला अशा रितीनें या पलटणी आपल्या रांगा बनाविण्यांत गुंतलेल्या होत्या. अशा संधींत बापू गोखल्यांचे घोडेस्वार या ब्रिटिश लाईनीच्या समोर येऊन उभे राहिले. आणि त्या लाइनीच्या डाव्या बाजूला जी ७ वी घोडेस्वारांची पलटण होती तिला वळसा घालून बापू गोखले यांचे कांहीं स्वार सदर लाइनीच्या डावे बाजूकडील २२ व्या ड्रगून पलटणीच्या पिछाडीवरही हल्ला करण्याकरितां पुढें सरसावले. अशा रितीनें पेशव्यांच्या सैन्यानें शत्रूच्या २२ व्या ड्रगून पलटणीला चोहींकडून व्यापून टाकिलें यावेळीं शत्रूचे सैन्याला बापू गोखले यांनीं कसें वेढून टाकिलें होतें हें (सोबतच्या लढाईच्या नकाशावरून) कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. बापू गोखले यांचें जें युद्धकौशल्य होतें तें यांतच होतें. येथील ब्रिटिश लष्कराच्या रांगेंतील उजव्या बाजूला खुद्द ब्रिगेडिअर जनरल् स्मिथ् हा होता आणि डाव्या बाजूला मेजर डॉवेस हा होता. असे असतांनाही बापू गोखले आपल्या हाताखालील थोड्याशा घोडेस्वारांच्या मदतीनें या सगळ्या मेजरांना व ब्रिगेडिअर जनरलांना चोहोंकडून हां हां म्हणतां गराडा घालूं शकले आणि इंग्रजी फौजेच्या पुढून आणि मागून अशा दोन्हीही बाजूंनी बापू गोखल्यांनीं शत्रूच्या सैन्यावर एकाचवेळीं

हल्ला करण्यास सुरवात केली ही लष्करी कौशल्याच्या दृष्टीनें अत्यंत वाखाणण्या-सारखी गोष्ट आहे. या लढाईत बापू गोखले यांनीं दोन गोष्टींमध्यें आपलें युद्ध-कौशल्य प्रदर्शित केलें. त्यांपैकीं पहिली गोष्ट ही कीं आपल्या सैन्याच्या रांगा व्यवस्थितपणें बनूं देण्याला त्यांनीं शत्रूला अवकाश मिळूं दिला नाहीं आणि शत्रू असा बिनतयारीच्या स्थितीमध्यें गोंधळून गेला असतां बापू गोखले यांनीं शत्रूच्या सैन्यास चौफेर वेढून टाकलें ही दुसरी गोष्ट होय.

बापू गोखले यांनी शत्रूच्या सैन्याला चोहोंबाजूंनीं कसें वेढून टाकलें होतें हें वर सांगितलेंच आहे. आपल्या सैन्यावर चोहोंकडून वेढलें जाण्याचा दुर्धर प्रसंग ओढवलेला पाहून मेजर डॉवेस यानें उजव्या बाजूचें सैन्य मागें घेऊन डाव्या बाजूच्या आपल्या ड्रगुन्सच्या सैन्याकडून शत्रूवर हल्ला करविला. या सैन्याचा जो हल्ला आला त्याला तोंड देण्याकरितां बापू गोखले पुढें सरसावले. त्यावेळीं इंग्लिश सैन्यांतील कॅप्टन वॉरंड या नांवाचा एक अधिकारी व बापू गोखले यांची गांठ पडली. तेव्हां बापूंनीं त्यांच्यावर वार केला. त्याचप्रमाणें ब्रिगेडिअर जनरल स्मिथ हे उजव्या बाजूकडील सातव्या पलटणींतील घोडेस्वारांच्याबरोबर होते. त्यांनाही त्या गर्दीमध्यें त्यांच्या डोकीच्या पाठीमागच्या बाजूला तरवारीची एक जखम लागली. अशा रितीनें इंग्रजी सैन्यामध्यें शिपाई लोकांत गोंधळ उडून गेलेला असतांना आणि त्यांच्या ऑफिसरांना जखमा लागत असतांना खुद्द बापू गोखले यांना तरवारीच्या दोन जखमा लागल्या आणि तीन पिस्तुलांच्या गोळ्या लागल्या; आणि त्यामुळें ते घायाळ होऊन पडले आणि त्यांचा तेथेंच अंत झाला. ’

झालें. प्रिय वाचक आमची कथा संपली. ही शोकपर्यवसायी कथा येथेंच पूर्ण झाली. बापू गोखले यांचा जेथें अंत झाला तेथेंच आमच्या स्वराज्याच अंत झाला. लढाईत मरण आलें म्हणून त्यांना स्वर्गप्राप्ती झाली असेल पण तो स्वर्गवास त्यांना सुखाचा वाटत असेल का ? त्यांचा स्वर्ग आकाशांत नव्हता. त्यांचा स्वर्ग म्हणजे स्वातंत्र्य. हिंदुस्थानला स्वराज्यांत वैभवानें

नांदावयास लावला, रामदासांचा परमप्रिय भगवाध्वज डौलानें फडफडतांना दिसला, स्वातंत्र्याचें प्रतिबिंब प्रत्येक व्यक्तीच्या प्रफुल्ल चेहऱ्यांत आढळून आलें, म्हणजे स्वर्ग लाभला असें त्यांस वाटत होतें. स्वर्गांतील गंधर्वांच्या ताना ऐकण्यापेक्षां गरीव बिचाऱ्या मावळ्यांच्या तोंडचें कुणवाऊ गीत त्यांना जास्त प्रिय होतें. निसर्गाच्या निर्झरिणींचें नीर त्यांना स्वर्गांतील अमृतापेक्षां गोड वाटत होतें आणि स्वर्गांतील अनेक मधूर पक्वान्नांपेक्षां त्यांना मावळ्यांचा हुरडा जास्त गोड लागत होता. आणि तेवढ्याकरितां त्यांनीं आपलें सर्व आयुष्य दगदगींत घातलें. उन्हातान्हाची थंडीवाऱ्याची कशाचीच त्यांनीं फिकीर केली नाहीं. उपाशी अर्धपोटी रहावयास लागलें, तरी त्याची पर्वा केली नाहीं. स्वार्थी मित्रांना, फितुरांना, आणि इंग्रजांच्या नानाविध काव्यांना दाद दिली नाहीं. **'हालांस मानुं झोला, काळाशीं खेळुं खेळा,' 'श्रमुं सर्वदा नितांत, करूं मायभू स्वतंत्र'** या कविश्रेष्ठ गोविंदाच्या स्फूर्तीप्रद ओळींप्रमाणेंच त्यांनीं आपलें आचरण ठेवलें होतें. स्वर्ग स्वतंत्रतेंत आहे नंदनवन स्वतंत्रभूमींत आहे असें ते मानीत होते व त्याकरितां कायावाचामनें करून त्यांनीं धडपड चालविली होती.

तेथील नानाविध सुखोपयोगी गोष्टींनीं त्यांच्या आत्म्याला शांती मिळत असेल का ? सारा जन्म जो देश स्वातंत्र्यानें डोलत असावा याकरितां कष्टांत घालविला, चुलता बंधू पुत्र यांचें निधन झालें असतांना त्यांच्याबद्दल शोक करण्यास सुद्धां त्यांना एक क्षणाचीही फुरसत मिळाली नाहीं, आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां त्यांनीं अतोनात कष्ट केले, आपलें हृदय दगडासारखें कठोर केलें, सारीं दुःखें त्याचकरितां पटापट गिळलीं व हृदयांत रिचवून टाकलीं, ऊन, वारा पाऊस, दिवस रात्र यांकडे लक्ष न देतां केवळ कर्तव्याची जाणीव ठेऊन जिवांत जीव असेपर्यंत धडपड केली, पुत्रवत् प्रेम असलेल्या आपल्या साऱ्या सैन्याला मरणाच्या खाईंत एका स्वातंत्र्याकरितां लोटावयास माघार घेतली नाहीं, आपला देश स्वतंत्र रहावा, आपल्या देशांतील जमिनीवर, झाडाझुडपांवर आपली सत्ता असावी,

आपलें जिणें येथें स्वाभिमानानें व स्वतंत्र वृत्तीनें घालवितां यावें, आपल्या रानांत डोंगरावर, वेगानें वहात असलेल्या नदीवर, आपणांस मातेपेक्षांही प्रिय असलेल्या मातृभूमीवर परक्यांची स्वार्थी नजर पडूं नये, तिच्याकडे वांकड्या नजरेनें कोणी पाहूं नये, आपले सारे वंशज पारतंत्र्याच्या पंकांत रुतूं नयेत यासाठीं केलेली जिवाची आटापिटी, या सर्वांचा परिणाम उलट झालेला पाहून त्यांच्या जिवास चैन पडत असेल का ?

आजची आपली अवनती त्यांस स्वर्गांतून दिसत असेल तर त्यांच्या जिवास कोणत्या यातना होत असतील हें कल्पनेनें सुद्धां जाणतां येणें अशक्य आहे. मरणानंतर मिळालेला स्वर्गवास नको. त्याच्यापेक्षां नरकच बरा. यमपुरींतील जिवाला भोगाव्या लागणाऱ्या यमयातना याच सुखावह; कारण त्यांमुळें पुनर्जन्माची तरी आशा असते. असेंच त्यांचा आत्मा स्वतःशीं नित्यशः वदत असेल. हिंदुस्थानला स्वतंत्रतेच्या वातावरणांत विहार करतांना पाहिला, रामदासांचा परमप्रिय भगवा झेंडा आकाशांत डौलानें फडकतांना दिसला, महाराष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीच्या अंगांत आपण स्वतंत्र आहों ही भावना जागृत झालेली आढळून आली म्हणजे त्यापुढें स्वर्ग तुच्छ होय. त्यापुढें सारीं सुखें कस्पटासमान भासतील तेव्हां तो आनंदाचा दिवस मला दाखवा म्हणून त्यांनीं जगच्चालक प्रभूच्या पायीं धरणें धरलें असेल. हिंदुस्थानांतील लोकांना त्यांच्या कोणच्या पापांबद्दल जर ही पारतंत्र्याची बेडी पडत असेल तर त्या सर्व पापांकरितां मी एकटा घाल तें कठीणतम शासन सुखानें स्वीकारतों; इतकेंही होत नसेल तर एकदांच–फक्त एकदांच–मला पुनर्जन्म द्या म्हणजे मी स्वतःबरोबर स्वातंत्र्याचाही पुनर्जन्म करीन असें ते ईश्वरापुढें विनवून बोलत असतील.

प्रिय वाचक ! त्यांचा जीव धडपडत होता तो स्वार्थाकरितां नव्हे. स्वार्थ साधावयाचा असता तर त्यांना केवढी संधी होती ! लाखों रुपये बाजीरावाची बाजू सोडण्याबद्दल त्यांना मिळत होते. ते घेऊन बसले असते म्हणजे त्यांस वंशपरंपरा जहागीर मिळाली असती. सबंध जीव दगदगींत घालण्याची गरज भासली नसती. बसायला एक, कामाला दुसरा, निजावयाला

तिसरा असे बंगलेच्या बंगले त्यांना उठवतां आले असते. इंग्लिशांना मदत केल्यावद्दल त्यांच्या वंशजांना पदव्या मिळाल्या असत्या. त्यांचे वंशज आले असतांना हे कोण बापू गोखल्यांचे वंशज असें त्यांचें आज नांवही निघालें असतें. पण त्यांना फितुरीचे सुरुंग लावून स्वातंत्र्यमंदीर कोसळून पाडून स्वतःचे इमले उभारावयाचे नव्हते. त्यापेक्षां त्यांनीं ओसाड जमिनींतील एखादें खोपट पत्करलें असतें अथवा वरीलप्रमाणें हे कोण बाप गोखल्यांचे वंशज अशा उद्गारांची त्यांना गरज नव्हती. तर ' निर्वंश होउनि ठरेल अखंड वंश ' हें त्यांचें ब्रीद होतें.

हें लक्षांत ठेऊन त्यांच्या नांवानें इमारती नसल्या तरी आपलीं हृदयमंदिरें त्यांच्याकरितां आहेत. त्यांना सुग्रास अन्न मिळालें नाहीं तरी हरकत नाहीं आपले गोडगौरवाचे शब्द हेच त्यांचे सुग्रास होत. त्यांना वंशज नसले तरी चालेल आपणच त्यांचे वंशज असें म्हटलें पाहिजे. वंशज, त्यांना ऐष आरामांत लोळण्याकरितां नको होते. त्यांच्या हातून तडीस न गेलेलें काय पुढें नेण्याकरितां त्यांना वंशजांची गरज होती. हें कार्य हिंदुस्थानला स्वराज्य मिळवून देण्याचें कार्य—पुरें करण्याकरितां जो झटेल तोच त्यांचा खरा वंशज. मग तो त्यांच्या रक्तापासून उत्पन्न झाला असो वा नसो. स्वदेशाभिमान हेंच त्यांचें रक्त व स्वातंत्र्याभिमान हेंच त्यांचें मांस. हें रक्तमांस ज्याच्या अंगांत असेल तोच त्यांचा औरस वंशज. मग तो त्यांच्या कुळांतला असो वा नसो अशी त्यांची श्रद्धा होती.

आणि म्हणून त्यांचा जीव तळमळतो आहे ही जाणीव ठेऊन त्यांनीं आपणांकरितां केलेल्या कष्टांचें स्मरण करून आपण त्यांचे रक्तामांसाचे वंशज बनूं व त्यांचें स्वराज्य संपादनाचें कार्य पुरें करूं अशी प्रतिज्ञा करा. या प्रतिज्ञेनें त्यांचा तळमळणारा आत्मा शांत होईल. त्यांच्या जिवाला जें सौख्य होईल तें नुसतें त्यांच्या समाधीवर चार फुलें वहाण्यानें अथवा एक थोर पुरुष होऊन गेला म्हणून चार अश्रू ढाळण्यानें होणार नाहीं हें ध्यानांत ठेवा. तुमचा पराक्रम पाहून त्यांना आनंदाश्रू ढाळूं दे.


या लढाईंत बापू वारले असें समजून एका प्रेतास अग्नि दिला गेला. परंतु हें प्रेत बापूंचेंच होतें किंवा नाहीं याबद्दल निश्चित असें मत कोणींच व्यक्त केलें नाहीं. मराठी दप्तर रुमाल २ भाग २ यांत याबद्दल पुढीलप्रमाणें मजकूर आहे.

“ नंतर बापू गोखले यांचा मुडदा डोलींत घालून आणिला. तो ओळखण्यास कोणी पाठवावें म्हणावे जर्नल यांनीं निरोप पाठविला. त्याजवरून बळवंतराव चिटणीस यांस पाठविलें. ओळखून आले. फक्त आंगरखा आंगांत मलमलीचा उतरला होता. घोड्यांनीं तुडविलें त्यांनीं पायाचें कातडें गेलें होतें. दोन जखमा लागल्या होत्या. पहिले जखमेचा डोळा उघडा होता. त्याप्रमाणें पाहून झाल्यावरही गोखले यांच्या मुड्याची डोली व अंताजीपंत हाजरनीस नि. गोखले जखमी ऐशा दोन डोल्या महाराजांपाशीं डेऱ्यावर पाठविल्या. महाराजांनीं व सर्वेत्रांनीं पाहून ओळखल्यावर अग्नि देण्यास हुकूम देवविला. शोभनें वगैरे मिळवितां चार घटका रात्रीस ओढ्याचे कडेस नेऊन अग्नि दिली. ”

परंतु हा मजकूर व पाच्छापूरकरांच्या बखरींतील मजकूर यांत विरोध आहे. बापूंचें प्रेत दहन करण्यांत आलें या हकिकतीवर खुद्द यमुनाबाईचाही विश्वास बसला नाहीं. त्यांनी बापूंचा पत्ता लावण्याकरितां जंगजंग पछाडलें परंतु निश्चित असें त्यांना कांहींच कळलें नाहीं. बापू नव्या संग्रामाची तयारी करण्याकरितां नाहींसे झाले असावे अशी त्यांची समजूत कायम होती. परंतु ही तयारी इहलोकांतच करावयाची असें कोणीं सांगितलें आहे ?

---

## बापूंचें हस्ताक्षर.



( सर्व पत्र किरकोळ माहिती या प्रकरणांत दिलें आहे. )

## प्रकरण ११ वें

# प्रतिनिधींचा पाडाव.

प्रतिनिधी हा एक नवीन हुद्दा राजाराममहाराजांनी आपल्या राज्याच्या बचावार्थ जिंजीस गेल्यावेळीं उत्पन्न केला. राजाचा प्रतिनिधी म्हणजे राजाच्या गैरहजेरींतील सर्व राज्याचा सर्वाधिकारी. शिवाजी महाराजांच्या हयातींत मोरोपंत पिंगळ्यांनंतर नांव घेण्यासारखे दुसरे पेशवे झाले नाहींत. तें पद अजिबात काढून टाकणें शक्य नव्हतें म्हणून लायक मनुष्याकरितां राजाराम महाराजांनीं प्रतिनिधी हें नवीन पद निर्माण केलें. पेशवाच जेथें नव्हता तेथें प्रतिनिधीची स्थापना करणें बरोबर होतें. परंतु लायक व कर्तबगार पेशवा मिळाल्यानंतर राज्याचीं सर्व सूत्रें पेशव्यांच्या हातांत गेलीं तर काय नवल? प्रतिनिधी प्रकरणाबद्दल लिहितांना कै. खरे यांनीं व ताई तेलणीवर लिहितांना महाराष्ट्राचे इतिहाससंकलक श्री. सरदेसाई यांनीं प्रतिनिधींची तरफदारी केली आहे व त्याच मानानें प्रतिनिधींचें राज्य खालसा करण्याचा प्रयत्न केला असा बाजीरावावर आरोप करून तो उठावदार दिसावा म्हणून आणखींही लहान मुलालासुद्धां न पटणारे आक्षेप त्याच्या भोंवतीं निर्माण केले आहेत.

कै. खरे यांचें म्हणणें असें होतें कीं प्रतिनिधीनें अमक्यावर स्वारी करावी असा त्यास हुकुम करण्याचा बाजीरावास अधिकार नव्हता. याचें कारण एकच आणि तें म्हणजे राजारामानें प्रतिनिधीचा हुद्दा राजाच्या खालोखाल ठरविला होता. राजा स्वतःच जेव्हां लढाईस निघेल तेव्हांच प्रतिनिधीनें त्याचेबरोबर बाहेर पडावयाचें, एरवीं नाहीं; आणि असें असतां पेशव्यांनीं प्रतिनिधीवरतीं कुरघोडी करण्याचा निष्कारण प्रयत्न केला.

कै. खेर यांचा आक्षेप असा आहे. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांपासून तों तहत दुसऱ्या बाजीरावापर्यंत सर्व पेशव्यांशीं आपल्या या हक्काकरितां प्रतिनिधींनीं कुरबुर केली. पहिल्या बाजीरावाला पेशवेपद मिळूं न देण्याकरितां त्यांनीं जंग जंग पछाडले पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं व राज्यकारभारांत पेशवाच श्रेष्ठ ठरला. अर्थात् जो श्रेष्ठ ठरला त्यानें कनिष्ठांना हुकूम करावयाचे नाहीं तर काय कनिष्ठांनीं वरिष्ठांना ? राजाराममहाराजांनी प्रतिनिधी या शब्दाचा अर्थ विशिष्ट तऱ्हेनें केला म्हणून काय, 'बाबावाक्यं प्रमाणं,' असें समजून पिढ्यान्‌पिढ्या सर्व लोकांनीं तो मानावा ? जें पद ज्या कर्तबगारीकरितां निर्माण करण्यांत आलें, जे अधिकार त्या पदाला विशिष्ट वेळीं मिळाले, ती कर्तबगारी निर्माल्यवत् ठरल्यावर, ती विशिष्ट वेळ टळल्यावरसुद्धां त्यांना उपभोगावयास मिळावे ? आणि या पदाचा नंतरचा मोठेपणा कां, तर राजाराममहाराजांनीं हें पद निर्माण केलें म्हणून ? राजाराम महाराजांपेक्षां शिवाजीमहाराज अनेक पटींनीं मोठे होते ही गोष्ट कै. खरे व रियासतकार सरदेसाई यांना सुद्धां कबूल केलीच पाहिजे. एखादी प्रथा लायक मनुष्यानें पाडली म्हणूनच खरी असें म्हणावयाचें असेल तर त्याच्याहून अधिक लायक माणसानें पाडलेली प्रथा जास्त सत्य असें म्हणणें ओघानेंच येतें. शिवाजीमहाराजांनीं पेशवेपद निर्माण केलें त्याला राजकारणांत श्रेष्ठस्थान दिलें आणि प्रतिनिधी ? नव्हे असलें कांहीं पद निर्माण करावें अशी कल्पनाही त्यांना आली नाहीं. ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे असें त्यांस वाटलें असेल. कोणच्याही दृष्टीनें पहा लायकीचे दृष्टीनें पहा अथवा प्राचीनत्वाच्या दृष्टीनें पहा पेशवेच श्रेष्ठ ठरतात आणि याच भावनेनें दुसऱ्या बाजीरावानें प्रतिनिधींना लढाईवर जाण्याची आज्ञा केली त्याबद्दल त्यास काडीइतकाही दोष देतां येणें शक्य नाहीं.

पेशव्यांचें प्रतिनिधींशीं वांकडें होतें ही गोष्ट वर आलीच आहे. भवानराव प्रतिनिधींची व राघोबादादा पेशव्यांची चांगली लढाई झाली होती पण त्यांत प्रतिनिधींचा पाडाव झाला. प्रतिनिधींचे चिरंजीव परशुरामपंत, व

राघोबादादांचे चिरंजीव बाजीरावसाहेब या दोघांनीं एकमेकांच्या शत्रुत्वाचा वारसा आपापल्या वडिलांपासून घेतला. बाजीरावाच्या हातीं राज्यकारभार आल्यावर त्यानें परशुरामपंतांना दडपण्यास सुरवात केली ही गोष्ट मात्र खरी.

मनुष्य कारणें शोधूं लागला कीं त्याला त्यांची वाण पडत नाहीं हें खरें त्याप्रमाणें बाजीरावालाही कारण मिळालें. प्रतिनिधींच्या दरबारांत दुफळी माजलेली होती. परशुरामपंत अल्पवयी होते तेव्हां त्यांची आई काशीबाई व दिवाण बळवंतराव फडणवीस हे कारभार पहात. प्रतिनिधी वयांत आल्या-वरसुद्धां त्यांनीं त्यांच्या हातांत राज्यकारभार देण्यास टाळाटाळ केली. परशुरामपंत साधा शिपाईगडी होता. त्याला छक्केपंजे समजत नसत. आपल्याला आपला न्याय्य हक्क मिळत नाहीं असें दिसून येतांच त्यानें तो जबरदस्तीनें घेण्यास सुरवात केली.

या त्याच्या वर्तनाबद्दल वैषम्य वाटून काशीबाईनें बाजीरावाकडे तक्रार केली व आपल्या हेतूच्या समर्थनार्थ त्यानें ताई तेलीण नांवाची रक्षा ठेविली आहे असें सांगितलें.

परशुरामपंतांनीं ताई तेलणीस ठेवली हा मोठा गुन्हा होता असें नव्हे. ते ज्या दिवशीं जन्मास आले त्याच दिवशीं त्यांचे वडील वारल्यामुळें आपल्या पुत्रांचे जन्मदिवशीं आपण मरूं असें त्यांस वाटूं लागलें. परंतु अनौरस मुलाचे जन्मवेळीं तुम्हीं मरणार नाहीं असें ज्योतिषानें सांगितलें त्यावरून त्यांनीं ताई तेलीण ही रक्षा ठेवली. हा भोळ्या समजुतीचा परि-णाम होता व म्हणूनच तो क्षम्य होता.

बाजीरावाकडे काशीबाईनीं तक्रार करतांच त्यांनीं, "आरब लवकर दूर करणें, तुम्हीं सारा दिवस आरबांचे जमादाराशीं खलबतें करतां हें ठीक नाहीं. तुम्हीं दोन्ही बायका टाकून दिल्या व नाटकशाळा ठेविली ती जातीची तेलीण, हें बहुत निंद्य, कामाचें नाहीं. तुम्हीं आपलें वर्तन न सुधारल्यास शासन होईल असा परशुरामपंतांना हुकुम पाठविला. त्याप्रमाणें

त्यानें 'तेलीणीची पोर टाकीन, कारभाऱ्यांच्या सल्ल्याप्रमाणें वागेन; पुण्यांतून जाणार नाहीं,' असें कबूल केलें.

ताई तेलणीबद्दल बाजीरावानें जो हुकूम सोडला तो काशीबाईचे सांगण्यावरून सोडला. त्याच्या वर्तनाबद्दल त्याच्या आईचीच तक्रार मिळाल्यावर बाजीरावाचें फावलें यांत शंका नाहीं. बाजीराव बदफैली होता असें निश्चित निदान नाहीं आणि सरदेसाईंच्या म्हणण्याप्रमाणें त्यानें आपल्या ब्राह्मण गर्ती (पती असलेल्या) व गतभर्तृका अशा स्त्रियांशीं संबंध ठेवला. थोडासा विचित्रपणा केला तर बाजीरावाला फक्त ब्राह्मण स्त्रियांशींच अनैतिक संबंध ठेवणें पसंत होतें असें म्हणतां येईल. कारण तो 'तुम्ही नाटकशाळा ठेवली ती **जातीची तेलीण**' असें म्हणतो. परंतु हा विचित्रपणा सुद्धां कै. खरे व श्री. सरदेसाई यांचे कोटिक्रमाचें मानानें क्षम्य ठरेल कारण या बाबतींत बाजीरावाला दोष देतांना मुसलमान मस्तानी बाळगणाऱ्या पेशव्यांच्या नातवाला पहिला (प्रतिनिधींच्या बदफैलीपणाचा) आरोप शोभत नाहीं' असें म्हटलें आहे. आजानें वाईट कृत्य केलें तर त्याला नातू कसा जबाबदार होतो तेंच कळत नाहीं. त्याला आपल्या आजोबांचीही किळस आली नसेल कशावरून? पहिल्या बाजीरावानें मस्तानी ठेवली त्याबद्दल त्याचा प्रत्यक्ष मुलगा नानासाहेब किती तऱ्हांनीं बाजीरावाविरुद्ध झगडत होता याचा पुरावा श्री. सरदेसायांनीं आपल्याच लिखाणांत दिला आहे म्हणून बरें. पण नानासाहेबांच्या मतें नानासाहेबाला दुसऱ्या कोणाला त्याच्या अनीतिमान वर्तनाबद्दल बोलण्यास बंदी. कारण बापानें मुसलमानीण ठेवली म्हणून. श्री. सरदेसाई हे समाजकारणांत सुधारक आहेत. त्यांनीं तरी असें पोरकट विधान करावयास नको होतें. कदाचित् हा त्यांच्या उतारवयाचा परिणाम असेल. हा विषय इतका वाढवण्याचें कारण म्हणजे एकदां एखाद्याबद्दल पूर्वग्रह दूषित करून घेतले म्हणजे हवेतसे आरोप कसे केले जातात, गैरलागू विधानें कशीं ठोकून दिली जातात याचा एक उत्कृष्ट पुरावा दाखविणें हा होय.

बाजीरावाबद्दल पुष्कळांनीं अन्याय केला आहे त्या मानानें त्यांच्या टीकाकारांवर हा चढविलेला हल्ला कांहींच नाहीं.

प्रतिनिधीनें कबूल केलें खरें पण त्याप्रमाणें वागण्याचा त्याचा स्वभाव नव्हता; तो हाडाचा शूर असल्याकारणानें दुसऱ्याच्या बंधनांत राहील ही गोष्ट शक्यच नव्हती. त्यानें पुन्हां सैन्याची जमवाजमव करून आपल्या आईस त्रास देण्यास सुरवात केली.

प्रतिनिधींच्या दोन स्त्रिया होत्या. एक बिडकर यांची कन्या लक्ष्मीबाई व दुसरी हैवतराव देशपांडे यांची कन्या काशीबाई. बापूंनीं त्यांची व्यवस्था नीट लावली. शेवटीं त्यांना कऱ्हाडकर प्रतिनिधी यांचे भाऊबंद विशाळगडकर प्रतिनिधी संस्थान करवीर यांनीं बापू गोखले यांस पत्र पाठवून या दोघी बायांस विशाळगडी नेऊन ठेवलें.

काशीबाईनीं प्रतिनिधींस पकडून बंदींत ठेवलें पण त्या ठिकाणावर हल्ला करून ताई तेलणीनें त्यांस सोडवून आणलें. लगेच प्रतिनिधीला आपण सातारकर महाराज यांचे अंकित आहोंत याची जाणीव झाली व त्याप्रमाणें त्यानें लोकांत प्रसिद्धही केलें. सातारकर राजांचें नांव घेतल्यामुळें त्यांना बरेच लोक मिळाले. परंतु त्या लोकांना हे आपल्या आईच्या पक्षाकडील लोकांस अत्यंत क्रूरतेनें वागवीत असल्याचें आढळून आलें. त्याशिवाय पैशाचा तोटा पडला कीं कोणावर केव्हां धाड पडेल याचा नेम नसल्यामुळें ते परशुरामपंतांस सोडून गेले. तरी परशुरामपंत हटले नाहींत. त्यांनीं हरप्रयत्नानें पुन्हां सैन्य जमवलें व आपल्या आईशीं युद्ध सुरू केलें. ही तक्रार पुन्हां पेशव्यांकडे गेली व त्यांनीं बापू गोखले यांस पाठवून त्यांच्याकडून १८०६ सालीं प्रतिनिधींस पकडविलें. बापूंनीं प्रतिनिधीस काशीबाईच्या हवालीं केलें व तिनें त्यांस पकडून एका गढींत अडकवून ठेवलें.

ताई तेलणीस हें कळतांच तिनें आपल्या सैन्यास चिथविलें व साताऱ्याच्या पश्चिम दिशेस अवघड जागीं असलेला वासोटा नांवाचा किल्ला आपल्या ताब्यांत

घेतला. त्याच्या आसपास राहून तिनें आपल्या धन्यास सोडवून आणिलें. सांपळ्यांत सांपडलेला सिंह सुटल्यावर जितक्या जोरानें पिसाळतो तितक्याच आवेशानें प्रतिनिधीनें आपलें कार्य चालू ठेवलें. त्यांनीं पूर्वीचाच पुकारा पुढेंही चालू ठेवला. 'राज्याचा खरा मालक छत्रपती आहे. आम्हीं नोकर छत्रपतींचे. बाजीरावाचे हुकूम आम्हीं बिलकुल जाणत नाहीं. उलट त्याचा बंडावा मोडून आम्हीं छत्रपतींस पुढें आणणार' असेंही त्यानें जाहीर केलें.

बाजीरावाची आज्ञा धुडकावली जाते असें दिसून येतांच त्यानें बापूंना पुन्हां प्रतिनिधींवर लढण्यास पाठविलें. त्यावेळीं प्रतिनिधींच्या सरदारांनीं त्यांस गोखल्यांशीं लढूं नये असें सांगितलें पण ते त्यांनीं ऐकिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर वासोटा किल्ल्याच्या बाहेर तुम्हीं लढाईला जाऊं नका असें त्यास परोपरीनें सांगत असतांनासुद्धां त्यांनीं आपल्या सरदारांस धुडकाऊन लावलें. होते नव्हते तेवढे सर्व लोक गोळा केले व गोखल्यांशीं सामना देण्यास तयार झाले. बापूंनीं त्यांचा थोड्याच वेळांत धुव्वा उडविला. या लढाईंत प्रतिनिधींचा हात तुटला व अंगावर चवदा जखमा झाल्या पण शेवट ते बापूंच्या हातीं जिवंत लागले.

बापूंनीं त्यांना त्यांच्या इतमामानें वागविलें. त्यांच्या हाताची जखम बांधण्याची तजवीज केली परंतु ते बांधूं देईनात. ते म्हणूं लागले कीं मला मातोश्री काशीबाई व कारभारी बळवंतराव यांच्या स्वाधीन करणार नसाल तर जखम बांधूं देईन नाहीं तर देणार नाहीं. याप्रमाणें त्यांचें फारच आग्रहाचें बोलणें ऐकून बापूंनीं ती गोष्ट मान्य केली. ही गोष्ट अमान्य करणें व प्रतिनिधींचा अंत पहाणें हें कांहीं बापूंचें ब्रीद नव्हतें. म्हणूनच त्यांनीं प्रतिनिधींना वचन दिलें व त्यांची जखम बांधून घेतली. त्या दिवसापासून प्रतिनिधी बापूंस वडिलांप्रमाणेंच मानीत असत. याप्रमाणें प्रतिनिधींचा पाडाव करून बापू पुण्यास निघून आले. *

---

* ही हकीकत श्री. सरदेसाई यांनीं आपल्या ताई तेलणीवरील लेखांत कां दिली नाहीं तें समजत नाहीं. इतिहासकार निःपक्षपाती असतात असें म्हटलें जाते मग असा पक्षपात कां ? का सरदेसाई इतिहासकार नाहींतच.

प्रतिनिधीचा पाडाव झाला तेव्हां पुन्हां तेलणीनें उचल खाल्ली. तिनें आपल्या ताब्यांतील किल्ल्यांत शिबंदी भरली व पुन्हां धामधूम आरंभली. वासोटा किल्ल्यांत तिला फारच चांगला आश्रय मिळाला. हा किल्ला तिनें ८–१० महिने लढवला. शेवटीं धान्याच्या कोठाराला आग लागल्यामुळें लोकांची उपासमार होऊं लागली. त्यांचे अंगीं लढण्याची ताकद राहिली नाहीं असें पाहून ती आपण होऊन गोखल्यांच्या स्वाधीन झाली. बापूंनीं तिला इतमामानें पुण्यास नेऊन ठेवलें.

या लढाईत बापूंना किंवा त्यांच्या सैन्याला शारीरिक त्रास विशेषसा पडला नाहीं. जो काय पडला तो मानसिक. बाजीरावाची नेहमींची पद्धत अशी कीं कोणत्याही सरदाराला कोठेंहीं लढाईस पाठवला तरी त्याच्या सैन्यखर्चाकरितां पैसे द्यावयाचे नाहींत. बापू कर्नाटकांतून आले तेव्हांच त्यांच्याजवळचे सर्व पैसे खलास झाले होते आणि पुण्यास आल्याबरोबर लगेच त्यांना प्रतिनिधींचा बंदोवस्त करण्यास पाठविण्यांत आलें. सैन्याचे पगार आधींच थकलेले. तेव्हां शिपायांनीं अदबीनें कां होईना पण पैसे मागण्यास सुरवात केली यांत नवल नाहीं. बरें रक्कमही कांहीं थोडी थोडकी नव्हती. सुमारें १६–१७ लक्ष रुपयांचा प्रश्न होता यावेळीं बापूंना किती मानसिक त्रास झाला होता याची साक्ष त्यांनीं आपल्या गुरूंस ( चिदंबरबाबांस ) पाठविलेल्या पत्रांत मिळते. सैन्याचें धरणें बसलें आहे, गलगा फार वाढला आहे. कांहीं सुचत नाहीं. स्वामींचे आशिर्वादावर जगत आहें. अशा अर्थाचीं कितीतरी वाक्यें त्यांनीं आपल्या या पत्रांत लिहिलीं आहेत. वासोटा पडल्यावर प्रतिनिधींच्या खजिन्यांत फारच अल्प पैसा शिल्लक राहिला होता. तेव्हां त्यांनीं कर्ज काढून आपल्या शिपायांचे पगार चुकवले. पुण्यास आल्यावर त्यांनीं पेशव्यांस १७ लक्ष रुपये खर्चाची यादी दिली. त्यानें ती मंजूर करून बापूस दरसाल दोन लक्ष रु. देण्याचा ठराव केला त्याप्रमाणें बरेचसे पैसे बापूंस परत मिळालेही.

प्रतिनिधींकडून ताब्यांत घेतलेली सर्व जहागीर बाजीरावानें बापूंच्या ताब्यांत दिली. ही बापूंवर मेहरबानी नव्हती. त्याच जहागिरीच्या उत्पन्नांतून बापूंस त्यांचे खर्च केलेले पैसे परत मिळत होते. शिवाय ही जहागीर बापूंच्या ताब्यांत ठेवण्यास आणखी एक कारण होतें व तें म्हणजे बाजी-रावानें स्वार्थाकरितां ही जहागीर लढून मिळवली हा लोकापवाद टाळणें हें होय. बापूंनीं जहागीर आपल्या ताब्यांत ठेवली ती याकरितां. असें अस-तांना सरदेसायांनीं ' बापू गोखल्याला प्रतिनिधीची जहागीर मिळाली पण ती पचली नाहीं ' असें एक वाक्य आपल्या ताई तेलणीवरील लेखांत लिहिलें आहे.

चीड येते ती अशा वाक्यांची. घरच्याघरीं आरामखुर्चीवर पडून दुसऱ्याला निष्कारण लागट शब्द लिहिणाराचा जो संताप येतो तो अत्यंत कडक शब्दांत लिहूनसुद्धां शांत होत नाहीं. बापूंनी जहागीर मिळवली पण ती पचवली नाहीं. या एका वाक्यांत सरदेसायांच्या अंतरांतलें वीष सांठवलें आहे. इति-ह-आस म्हणजे जसें घडलें तसेंच इतिहासकारानें लिहिलें पाहिजे. ज्या ज्या गोष्टी माहीत असतील त्या सर्व दिल्या पाहिजेत. त्या विषयाचें त्याचें ज्ञान अद्यावत् असलें पाहिजे हें इतिहाससंकलक सरदेसायांना मी सांगावयास पाहिजे असें नाहीं. ताई तेलणीवरील लेखांत त्यांनीं कै. खऱ्यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांचा मनमुराद उपयोग केला आहे त्याच संग्रहांत ही जहागीर बापूंच्या हातांत कां ठेवली गेली याचा खुलासा दिला आहे तो सरदेसायांनीं वाचलाच नसेल असें म्हणवत नाहीं. त्याप्रमाणें कै. बापू गोखल्यांचें १८८९ सालीं प्रसिद्ध झालेलें चरित्रही त्यांच्या दृष्टी-समोरून गेलें असलेंच पाहिजे आणि सरदेसायांनीं हें ( मनांत नसलें तरी ) कबूल केलेंच पाहिजे नाहीं तर या विषयाचें पूर्ण ज्ञान नसतांना त्यांनीं लेख लिहिला असा मी त्यांच्यावर आरोप करणारच. मनुष्य पक्षांधतेनें लिहूं लागला म्हणजे त्याला खऱ्याखोट्याचा सुमार नाहीं असें म्हणतात तें खोटें नव्हे.

# सदरील फोटो गुर्लहोसूर येथील बापूंच्या विहिरीचा आहे.

गुर्लहोसूर हें बापूंच्या गुरूंचें ( चिदंबर दिक्षितांचें ) निवासस्थान होतें.



हल्लीं तेथें बापूंचा पडित वाडा व विहीर आहे. त्याचप्रमाणें चिदंबर दिक्षीतांचें देवालयही तेथें आहे. त्यांचा दर-वर्षी उत्सव होत असतो त्या देवळास बापूंनीं वर्षासन दिलें आहे. त्यामुळें बापूंची आठवण दर वर्षी तेथें निघते. यंदांचा उत्सव दे. ज. स. ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर यांच्या अध्य-क्षतेखालीं झाला. फोटो-मध्यें बसलेली मंडळी बेळगांवच्या लिंगराज कॉलेजमधील मराठी वाङ्मय मंडळाचे सभासद आहेत. गुर्लहोसूर हें नाट्याचार्य किर्लोस्कर यांचें गांव असल्यामुळें तेथें वरील मंडळींनीं किर्लोस्कर स्मृतिदिन साजरा केला. तेव्हां घेतलेल्या फोटोंपैकीं हा एक फोटो आहे.

[ फोटोग्राफर डॉ. **के. वा. साठे**, बेळगांव ].

पण याच्याहून चीड येणारा वाक्यार्थ ' पण ती पचली नाहीं ' हा आहे. जहागीर पचणें याचा अर्थ सरदेसायांनीं जगाविरहीत केला असला तर गोष्ट निराळी पण सामान्य समाज मात्र बापूंना लोकांचे तळतळाट बाधले म्हणूनच पचली नाहीं असा करील. त्याचप्रमाणें पचली नाहीं म्हणजे त्यांनीं मिळविलेली जहागीर अन्यायानें मिळविली होती म्हणूनच ती त्यांचे ताब्यांतून गेली असें म्हणेल.

बापूंचे ताब्यांतील जहागीर कां गेली याचें खरें कारण श्री. सरदेसायांना आकलन झालें नसल्यास नवल नाहीं. कारण त्यांना ती दृष्टीच नाहीं. राष्ट्राकरितां लढल्यानें जहागीर जाऊं शकते याची जाणीव फक्त स्वातंत्र्यभक्तांनाच असते. जगांत चिरस्थायी असें कांहींच नाहीं. सेनापति बापूंची कऱ्हाडची जहागीर त्यांना पचली नाहीं याचें कारण म्हणजे लोकांचे तळतळाट; आणि बाकीची पचली नाहीं—त्यांच्या नंतर वंशाच्या त्यांच्या ताब्यांत राहिली नाहीं—याला काय कारण ? शिवाजी महाराजांनीं एवढें मोठें राज्य कमावलें तें संभाजीनें बरेंचसें घालवलें शेवटीं त्याला शत्रूच्या हातीं सांपडावें लागलें. यावरून जर एखादा नादान टीकाकार असें म्हणूं लागला कीं शिवाजी महाराजांनीं राज्य अन्यायानें मिळविलें म्हणूनच तें पचलें नाहीं तर त्या टीकाकाराची किंमत जग काय करील याची सरदेसायांना जाणीव असेलच.

बापूंना आपली जहागीर फितुरी करून कायम ठेवतां आली असती. तसे कितीतरी सरदार आज हयातच आहेत आणि ती जहागीर त्यांच्या वंशजांचे ताब्यांत रहाती म्हणजे लगेच सरदेसायांचें मत बापूंविषयीं फार उत्तम झालें असतें असें म्हणणें भाग आहे. पेन्शनर या दृष्टीनें त्यांची बाजूही त्यांना खरी दिसत असेल, पण सामान्य जनतेला मात्र ती तशी दिसत नाहीं. बापू जर एखाद्या विशेष गुणामुळें जनतेला वंदनीय वाटत असतील तर त्यांच्या फितुरीला बळी न पडण्याच्या गुणामुळेंच होय.

पण हें एवढेंच कशाला. ताई तेलणीच्या बाबतींत त्यांनीं दिलेलें सुभा-

पित 'गुणाः पुजास्थानं गुणिषु नच लिंगं नच वयः' हें बापूंना इतर बावतींत तर लागू पडलेंच पण त्यांच्या जहागिरीच्या बावतींतही लागू पडलें होतेंच. ते वारले तेव्हां त्यांना पुत्र शिल्लक नव्हता तरी त्यांच्या नांवावर तीच जहागीर त्यांना दत्तक देऊन चालू ठेवण्याचें त्यांच्या प्रतिपक्षानें-इंग्रजांनीं-ठरविलें होतें.

गुणी गुणं वेत्ति न वेत्ति निर्गुणो ।
बली बलं वेत्ति न वेत्ति निर्बलः ॥
पिको वसंतस्य गुणं न वायसः ।
करीच सिंहस्य बलं न मूषकः ॥

हें सुभाषित या बावतींत इंग्रजांना बरोबर लागू पडतें. ( आणि याचा दुसरा भाग श्री. सरदेसायांनाही लागू पडतोच) या बावतींत बापूंचे कारभारी श्री. रामचंद्रपंत सुभेदार यांनीं मुंबईच्या गव्हर्नरांना ब्रह्मावर्तीहून पाठविलेलें पुढील पत्र विचारार्ह आहे.

'यादी. बापूजी गणेश गोखले हे सरकार श्रीमंत पेशवे यांजकडील सरदार यांची वंशवृद्धी होऊन त्यांचें यथास्थित चालावें असें श्रीमंतांचे लक्षांत येऊन त्यांची स्त्री यमुनाबाई यानीं दत्तकपुत्र घेऊन त्याचें नांव धोंडो बापूजी ठेवावें अशी आज्ञा झाली होती. पुढें श्रीमंतांची व जनरल सरमालकमसाहेब बहादूर यांची भेट सन १८१८ इसवीचे सालीं झाल्यावर मोहोचे मुकामीं गोखले यांची जहागीर कंपनींतून चालवावी येविषयीं श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें जनरलसाहेब यांचे नांवाचीं वस्त्रें व अलंकार कंपनीसरकारांतून दिले व त्यांचे जहागिरीचा बंदोबस्त होण्याबद्दल एल्फिस्टन्‌साहेब बहादूर यांचें नांवें पुण्यास पत्रें देऊन गोखले यांजकडील स्वार वगैरेसुद्धां त्यांजकडील सरदार यांची रवानगी झाली. ते समयीं सरदार यांसही वस्त्रें देऊन जनरलसाहेबांनीं निरोप दिला. त्याप्रमाणें धोंडो बापूजींचें दत्तविधान व्हावयाचें तें यथाविधि होऊन त्यांचा बंदोबस्त कंपनीसरकारांतून करून देऊन चालविलें पाहिजे.

जनरल सर जॉन मालकमसाहेब गव्हर्नर हे सरकार दौलत मदार कंपनी-सरकारचे मुखत्यार उमराव होते, त्यांची नेकनामी सर्वत्र जाहीर आहे. त्यांणीं पेशजी महुचे मुक्कामीं मु. गोखले यांजविषयीं मान्य केलें आहे. त्यापक्षीं सुप्रेजल गव्हर्नमेन्ट यांची उत्तम कीर्ती व नेक अवसाफ दुनियेंत प्रसिद्ध. तेथून गोखले यांजवर मेहरबानी अवश्य करण्यांत आली पाहिजे.'

इंग्रजांनीं बापूंच्या वंशजांना कशा तऱ्हेनें वागविण्याचें ठरविलें होतें याची कल्पना या पत्रावरून सहज होईल. यमुनाबाईच्या मांडीवर दत्तक देऊन बापूंची जहागीर चालू करण्याचें इंग्रजांनीं ठरविलें होतें व अशा तऱ्हेनें ती चालली असती तर ती बापूंना पचली असें श्री. सरदेसाई यांनीं म्हटलें असतें. परंतु दुर्दैव बापूंचें कीं इतकी विशाल दृष्टी यमुनाबाईनीं ठेवली नाहीं. त्या सरळ असें म्हणत कीं 'माझा पती जिवंत आहे तो परत येऊन भेटला कीं या जहागिरीच्यापेक्षां हजारोंपट श्रेष्ठ अशी जहागीर कमवील व ती अभिमानानें राखील. दुसऱ्यानें दिलेली भिकार देणगी नको. ज्यामध्यें स्वाभिमानास बिलकूल वाव नाहीं अशी जहागीर देण्यांत देणाराचा जरी मोठेपणा असला तरी घेणारा मात्र वाईट असतो.' आणि आम्हांलाही हेंच मत ग्राह्य वाटतें व अशीं निर्लोभी व बेदरकार माणसेंच वंद्य वाटतात. मग श्री. सरदेसायांसारखे लोक कितीही विषारी लिहोत.

शेवटीं आजच्या काळाला अनुरूप असे सेनापति बापूंसारखे वीर पुरुष या महाराष्ट्रांत निर्माण होवोत व महाराष्ट्राला आपल्या पूर्वीच्या वैभवसंपन्न स्थितींत राखण्याकरितां झटोत अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून व बापूंच्या चरणावर ही वेडीवांकडी चरित्रपुष्पांजली वाहून भारावलेल्या नजरेनें त्यांची रजा घेणेंच इष्ट.

REFBK-0005455